# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

**सत्र–५ पेपर ७** DSE - E 66

# पाश्चात्त्य समाजशास्त्रीय विचारवंत

**(Western Sociological Thinkers)**

**सत्र–६ पेपर १२** DSE - E 191

# भारतीय समाजशास्त्रीय विचारवंत

**(Indian Sociological Thinkers)**

**बी. ए. भाग–३ : समाजशास्त्र**

(शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२२
बी. ए. भाग-३ समाजशास्त्र पेपर (७ व १२) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ३००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-14-7

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### ■ समाजशास्त्र अभ्यासमंडळ ■

अध्यक्ष – **डॉ. मच्छिंद्र सकटे**

सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज, उंब्रज, जि. सातारा

- **डॉ. अरुण विठ्ठल पौडमल**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज (के.एम.सी.)
  कोल्हापूर
- **प्रा. डॉ. जे. एच. कराडे**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती प्रतिमा शहाजीराव पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. संजय हिंदुराव शिंदे (सनदे)**
  सरदार बाबासाहेब माने कॉलेज,
  रहिमतपूर, जि. सातारा
- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती के.आर.पी. कन्या महाविद्यालय,
  उरुण–इस्लामपूर, जि. सांगली.
- **डॉ. सतीश सर्जेराव देसाई**
  एस. एम. डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज,
  मिरज, जि. सांगली

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण विभागाअंतर्गत बी. ए. पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या आणि समाजशास्त्र विषयाची निवड केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मी पेपर क्र. ७ (पाश्चात्त्य समाजशास्त्रीय विचारवंत) व पेपर क्र. १२ (भारतीय समाजशास्त्रीय विचारवंत) चा प्रमुख संपादक या नात्याने आपले मनःपूर्वक स्वागत करतो. शिवाजी विद्यापीठाचा समाजशास्त्र विषयाचा विद्यमान पदवी अभ्यासक्रम एकूण तीन वर्षाचा असून या विषयाची बी.ए. पदवी संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांना सत्रपद्धतीनुसार एकूण सोळा पेपर्सचा अभ्यास करावा लागतो. प्रथम वर्षासाठी पेपर क्र. १ व २, द्वितीय वर्षासाठी पेपर क्र. ३ ते ६ तर तृतीय वर्षासाठी पेपर क्र. ७ ते १६ हे पेपर्स अभ्यासावे लागणार आहेत. त्यामध्ये आतापर्यंत आपण पेपर क्र. १ ते ६ अभ्यासले असून बी.ए. च्या शेवटच्या वर्षासाठी पुढील पेपर्स क्र. ७ ते १६ यांचा अभ्यास करावा लागणार आहे.

बी. ए. भाग-३ मध्ये शिकत असलेल्या समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून सत्र ५ साठी पेपर क्रमांक ७ ''पाश्चात्त्य समाजशास्त्रीय विचारवंत'' (Western Sociological Thinkers) आणि सत्र ६ साठी पेपर क्रमांक १२ ''भारतीय समाजशास्त्रीय विचारवंत'' हे अतिशय महत्त्वपूर्ण असे पेपर आहेत. यामध्ये एकूण ८ घटक समाविष्ट केले आहेत. या सर्व घटकांचा अभ्यास केल्याने विद्यार्थ्यांना अनेक पाश्चात्य समाजशास्त्रज्ञांची उदा. ऑगस्त कॉम्त, एमिल डुरखाईम, कार्ल मार्क्स, मॅक्सवेबर, इत्यादी. तसेच डॉ. जी. एस. घुर्ये, डॉ. एम. एन. श्रीनिवास, डॉ. ए. आर. देसाई, डॉ. इरावती कर्वे इत्यादी भारतीय समाजशास्त्रज्ञांची वास्तव माहिती मिळणार आहे.

ज्यावेळी विविध समाजशास्त्रीय विचारवंतांचा अभ्यास त्यांच्या उपघटकानुसार केला जाईल त्यावेळी आपणास या समाजशास्त्रज्ञांची वैचारिक-सैद्धांतिक बैठक समजून येईल. अर्थात पाश्चात्य विचारवंतांवर सोप्या भाषेत पुस्तक लिहिणे हे तसे खूप अवघड काम मानावे लागेल. परंतु माझ्या सर्व अभ्यासू सहकाऱ्यांनी त्यांच्यावर सोपविलेल्या घटकांचे लिखान अतिशय अभ्यासपूर्ण असे केल्यामुळे सदरचे पुस्तक माझ्या दृष्टीने परिपूर्ण झाले आहे अशी माझी श्रद्धा आहे.

शेवटी प्रमुख संपादक या नात्याने मी सर्वप्रथम मा. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दूर शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. डी. के. मोरे, शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र विभागप्रमुख व अभ्यासमंडळाचे चेअरमन डॉ. मच्छिंद्र सकटे, अभ्यास मंडळाचे सर्व सदस्य आणि दूर शिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय सेवकांचे मोलाचे सहकार्य मिळाल्यामुळेच मला संपादकीय जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडणे शक्य झाले हे मी प्रामाणिकपणे कबूल करू इच्छितो. वरील सर्वांचा मी शतशः ऋणी आहे.

■ **संपादक** ■

**डॉ. मच्छिंद्र सकटे**

सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज,

उंब्रज, जि. सातारा

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**पेपर–७ पाश्चात्त्य समाजशास्त्रीय विचारवंत**
**पेपर–१२ भारतीय समाजशास्त्रीय विचारवंत**
बी. ए. भाग–३ : समाजशास्त्र

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **श्री. पांडुरंग शंकर साळुंखे**<br>कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूर | १ | २ |
| **श्री. संपतराव लक्ष्मण मोहिते**<br>माजी पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभागप्रमुख,<br>सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड, जि. सातारा | २, ३ | १ |
| **प्रा. बबन रणजित पाटोळे**<br>सहाय्यक प्राध्यापक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३ | – |
| **श्री. जयंत चंद्रकांत घाटगे**<br>अधिव्याख्याता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,<br>पेठवडगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | ४ | – |
| **सौ. शामला रघुनाथ माने**<br>सहयोगी प्राध्यापक, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | – | ३ |
| **प्रा. अश्विनी मारुलकर**<br>श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली. | – | ४ |

■ **संपादक** ■

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | घटकाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–७** | |
| १. | ऑगस्त कॉम्त | १ |
| २. | कार्ल मार्क्स | १५ |
| ३. | एमिल डुरखाईम | २७ |
| ४. | मॅक्स वेबर | ४३ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१२** | |
| १. | डॉ. जी. एस. घुर्ये | ६७ |
| २. | डॉ. ए. आर. देसाई | ९७ |
| ३. | डॉ. एम. एन. श्रीनिवास | ११३ |
| ४. | डॉ. इरावती कर्वे | १३२ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १
# ऑगस्त कॉम्त (१७९८–१८५७)

**घटक संरचना**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्तावना

१.२ अभ्यास विषयाची मांडणी

  १.२.१ तीन अवस्थांचा नियम

  १.२.२ विज्ञानवाद अथवा प्रत्यक्षवाद

  १.२.३ सामाजिक स्थितीशास्त्र आणि सामाजिक गतीशास्त्र

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक संज्ञा

१.५ स्वयं: अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी प्रश्न

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्टे

समाजशास्त्राविषयी ऑगस्त कॉम्तच्या उत्क्रांतीवादी विचारांची माहिती करून घेत असताना आणि समाजशास्त्र विषयाला वैज्ञानिक दर्जा मिळवून देत असताना त्यानी घेतलेल्या प्रयत्नांची दखल घेवून या घटकांमध्ये आपण खालील अभ्यास उद्दिष्टांवर विशेष लक्ष देणार आहोत.

१. 'तीन अवस्थांचा नियम' स्पष्ट करताना त्यांनी मांडलेली उत्क्रांतीवादी विचारसरणी समजून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

२. ऑगस्त कॉम्त यांच्या विज्ञानवादी दृष्टिकोनामध्ये समाजशास्त्रीय अभ्यासाच्या दृष्टीने स्पष्ट केलेल्या त्यांच्या दृष्टिकोनाचे आणि विचारांचे स्वरूप जाणून घेणार आहोत.

३. त्याच प्रमाणे कॉम्त यांनी समाजशास्त्राचे वर्गीकरण करताना सामाजिक स्थितीशास्त्र आणि सामाजिक गती शास्त्र अशा दोन प्रकारांमध्ये कसे वर्गीकरण केले आहे हे जाणून घेणार आहोत.

## १.१ प्रस्तावना

बी. ए. भाग ३ मध्ये शिकत असलेल्या समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून सत्र क्र. ५ साठी ''पाश्चात्य समाजशास्त्रीय विचारवंत'' आणि सत्र क्र. ६ साठी ''भारतीय समाजशास्त्रीय विचारवंत'' हा अतिशय महत्त्वाचा असा पेपर आहे. या पेपरमध्ये एकूण आठ घटक समाविष्ट केलेले आहेत. या सर्व घटकांचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांना काही पाश्चात्य आणि भारतीय समाजशास्त्रज्ञांची माहिती मिळणार आहे. समाजशास्त्रीय विचारांचा उगम साधारणत: फ्रान्स, जर्मनी, इंग्लड, इटली या सारख्या युरोपियन देशांच्या मधून १७ व्या शतकात झाला. परंतु भारतामध्ये त्याची सुरुवात १९ व्या शतकाच्या आरंभापासून झालेली दिसते. असे म्हटले जाते की, युरोपियन समाजशास्त्रज्ञांनी ज्या विचारांची पायाभरणी केली ते विचार प्रामुख्याने ते ज्या समाज व्यवस्थेमधून आले, त्या समाजांना लागू पडणारे होते. परंतु खऱ्या अर्थाने हे सर्व विचार केवळ युरोपियन समाजापुरते मर्यादित नव्हते तर, त्या विचारांचा स्पर्श एकूण मानवी समाज आणि वर्तनाशी असलेला आढळतो.

ज्या वेळी विद्यार्थी अशा समाजशास्त्रीय विचारवंताचे विचार अभ्यासतील त्या वेळी त्याना समाजशास्त्रीय विचारांचा इतिहास समजून येईल. या पेपरमधील पहिले सत्र क्र. ५ साठी चार घटक हे प्रामुख्याने (उदा. ऑगस्त कॉम्त, एमिल डुरखाईम, कार्ल मार्क्स आणि मॅक्स वेबर) हे पाश्चात्य विचारवंताच्या अभ्यासासाठीचे आहेत. आणि सत्र क्र. ६ साठी (डॉ. जी. एस. घुर्ये, डॉ. एम. एन. श्रीनिवास, डॉ. ए. आर. देसाई आणि डॉ. इरावती कर्वे) हे भारतीय विचारवंताच्या अभ्यासासाठीचे आहेत.

प्रत्येक घटकामध्ये ज्यावेळी समाजशास्त्रीय विचारवंताचा अभ्यास केला जाईल त्यावेळी त्याविचारवंताशी संबंधित असणारे सैद्धांतिक विचार हे उप-घटकांच्या माध्यमातून दिलेले आहेत. तसेच त्या विचारवंताने प्रकाशित केलेले त्याचे समाजशास्त्रीय लिखान, त्याच्या विचारावर इतर अभ्यासकांचा असलेला प्रभाव आणि त्याचा थोडक्यात जीवन परिचय मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. अशा स्वरूपाच्या प्रयत्नाचे एक प्रमुख उद्दिष्ट म्हणजे, समाजशास्त्रज्ञांनी कशा प्रकारे त्यांच्या विचारांची मांडणी वैज्ञानिक आणि सैधांनिक पद्धतीने केली आहे याची आपल्याला कल्पना येते. "Masters of Sociological Thought" या पुस्तकाचे लेखक लुईस कोझर यांनी त्यांच्या अभ्यास मांडणीमध्ये असे नमूद केले आहे की, विविध समाजशास्त्रज्ञांनी ज्या समाजशास्त्रीय विचारांचे योगदान केले आहे ते विचार म्हणजे समाजशास्त्रीय विचारांचे सामाजिक परिस्थितीशास्त्र आहे. ("The Knowledge contributed by different sociologists be called as the ecology of sociological ideas.")

### ❒ ऑगस्त कॉम्तचा अल्पसा परिचय :-

ऑगस्त कॉम्त यांचा जन्म १९ जाने. १७९८ रोजी. फ्रान्सच्या दक्षिण प्रांतात असणाऱ्या 'माँटपेलिअर' शहरामध्ये झालेला होता. तरुण वयामध्ये ऑगस्त कॉम्त शिक्षण घेत असताना त्यांच्या विचारावर सर्वात जास्त प्रभाव डॅनियल इनकॉन्ट्री या गणित विषयाच्या शिक्षकाचा होता. कॉम्त हे १८१४ मध्ये पॅरीस शहरामध्ये अत्यंत नामांकित असणाऱ्या 'इकोल पॉलीटेकनिक' या शाळेची प्रवेश पूर्व परिक्षा उत्तीर्ण झालेले

होते. त्यानंतर ते पॅरिस शहरामध्ये कायमचे रहिवाशी म्हणून राहिले. ऑगस्त कॉम्त यांच्या एकूण जीवनावर आणि त्यांच्या कार्यावर शेवट पर्यंत ज्या प्रमुख अभ्यासकाचा प्रभाव होता त्याचे नांव 'हेन्री सेंट-सायमन' असे होते.

फ्रेंच राज्य क्रांतीचा परिणाम म्हणून फ्रान्स मधल्या समाज व्यवस्थेमध्ये ज्या विविध घटना घडून आल्याने जी एक प्रकारची अव्यवस्था निर्माण झाली होती त्या विषयी ऑगस्त कॉम्त समाधानी नव्हते. त्यांना ज्या प्रकारची समाज व्यवस्था अपेक्षित होती त्या प्रकारची समाज व्यवस्था नैतिकतेवर आधारित असावी असे वाटत होते. त्या दृष्टिकोनातून त्यांनी प्रयत्न करत असताना, वस्तुनिष्ठ नियमांवर आधारित अशा स्वरूपाची एक वैज्ञानिक अभ्यासाची शाखा निर्माण केली. त्याला 'समाजशास्त्र' किंवा 'समाजाचे विज्ञान' (Science of Society) असे म्हटले जाते. 'इकोल पॉली टेकनिक' मध्ये काम करत असताना त्यांनी 'Positive Philosophy' 'विज्ञाननिष्ठ तत्त्वज्ञान' हे समाजशास्त्रीय लिखान करून ते १८४२ मध्ये प्रकाशित केले. या ग्रंथामध्ये त्यांनी समाजशास्त्रीय विचारांची अतिशय रचनात्मक अशी मांडणी केली आहे.

कॉम्त यांनी सर्व प्रथम Sociology ही संज्ञा मांडली. ज्या वेळी कॉम्त यांनी पहिल्यांदा ज्या सामाजिक शास्त्राची मांडणी केली त्या वेळी त्यांनी त्याला 'Social Physics' अशी संज्ञा दिली होती. परंतु ही संज्ञा बेल्जियम मधल्या 'ॲडाल्फ क्यूटलेट' या संख्याशास्त्राच्या अभ्यासकांकडून चोरली गेली आहे असे लक्षात आले, त्या वेळी त्यांनी 'Sociology' ही लॅटीन आणि ग्रीक शब्दातून तयार झालेली नविन संज्ञा मांडली. कॉम्त अशा स्वरूपाच्या विचारांची मांडणी करत होते की, ज्यामधून समाजासाठीचे विज्ञान (Science of Society) नैसर्गिकशास्त्रा सारखे असेल व त्या मधून मानवी जीवनाच्या गतकालीन घटनांचा आढावा घेवून त्या घटना- संबंधीचा भविष्य कालीन वेध घेता येईल. त्यांचे असे मत होते की, मानवी समाजाचा अभ्यास अशा वैज्ञानिक पद्धतीने झाला पाहिजे की, जसा आपण सभोवतालच्या नैसर्गिक घटनांचा अभ्यास करतो. त्यांनी आपल्या वैज्ञानिक विचारांची मांडणी Positive Philosophy या ग्रंथामध्ये करताना फ्रान्स मधल्या उद्‌बोधन कालखंडातल्या विचारांच्या विरोधात विचार स्पष्ट केले होते.

## १.२ अभ्यास विषयाची मांडणी

या घटकांमध्ये एकूण तीन भाग आहेत. त्यामध्ये तीन अवस्थांचा नियम, विज्ञानवाद आणि सामाजिक स्थितीशास्त्र व सामाजिक गतीशास्त्र इत्यादीचा समावेश होतो. या सर्वाचा अभ्यास कॉम्त यानी केला.

### १.२.१ तीन अवस्थांचा नियम (Law of Three Stages)

तीन अवस्थांचा नियम किंवा मानवी विकासाच्या अवस्थांचा नियम कॉम्तच्या समाजशास्त्रीय विचारातील एक प्रमुख विचार समजला जातो. अशा स्वरूपाच्या विचारातून त्यांनी मानवी वंश एका निश्चीत अशा अवस्थांच्या मधून कसा प्रगत होत गेला या संबंधी विश्लेषण केले आहे. या संदर्भात वैचारिक मांडणी करताना त्यांनी वानर वंशा पासून ते आधुनिक युरोपियन समाजापर्यंत होत गेलेल्या वाटचालीचा संदर्भ

विचारात घेतलेला नाही. या उलट त्यांनी वैज्ञानिक पद्धती मधल्या तुलनात्मक पद्धतीचा अवलंब करत असताना विशिष्ट कालखंडाचा आधार घेवून आपल्या विचारांची मांडणी केली आहे.

कॉम्तच्या मते, आपण सर्वजणच एका विशिष्ट अवस्थांच्या मधून जात असताना बाल्या अवस्था, पौगंडअवस्था आणि वृद्धा अवस्थांच्या मधून जात असतो. परंतु या प्रत्येक अवस्थेमध्ये आपली मानसिक कुवत एक सारखी नसून भिन्न-भिन्न असते. ज्याप्रमाणे मानवाची मानसिक प्रगती ही पहिल्या अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जात असताना होत असते त्याच प्रमाणे आपल्या विज्ञान शाखांची वाटचाल देखील अशा अवस्थांच्या मधून होत असताना त्यांच्या सैद्धांतिक मांडणी मध्ये वेगवेळ्या अवस्थांच्या मध्ये फरक पडत गेल्याचे दिसते.

**१. धर्मशास्त्रीय अथवा काल्पनिक अवस्था :-**

कॉम्तच्या मते, धर्म शास्त्रीय अवस्थेमध्ये मानव त्याच्या सभोवताली घडून येणाऱ्या सामाजिक घटनांचा अर्थ जाणून घेण्याचा प्रयत्न करीत असतो, व असा अर्थ जाणून घेत असताना त्याला असे वाटू लागते. की, या सर्व घटना कोणत्या तरी अद्‌भूत अशा नैसर्गिक शक्तीमुळे अथवा इश्वर शक्तीमुळे घडून येत असतात. त्यामुळे मानवी विचारांची ही अवस्था म्हणजे, एका अर्थाने नंतरच्या दोन अवस्थांची सुरूवातच होती. मानवी मन हे नेहमीच नैसर्गिक घटनांचे स्वरूप जाणून घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत आले आहे. या प्रयत्नांचा एक भाग म्हणूनच मानव आपला उगम कुठून झाला हे जाणून घेत असताना तो आपण कुठून आलो? या विषयी माहिती शोधू लागला तसेच तो आपल्या जगण्यापाठीमागच्या कारणाचा हेतू जाणून घेत असताना आपण कशासाठी जगतो? अशा प्रकारचे प्रश्न आणि त्याची उत्तरे शोधू लागला. त्याच्या या सर्व प्रश्नांचे समाधान अद्‌भूत नैसर्गिक शक्ती आणि इश्वरशक्तीच्या मदतीने होत गेले. विविध वस्तूच्या मध्ये असणारी जादूगिरी व बहुदेववादाची संकल्पना (अनेक देव-देवतांची पूजा) या अवस्थे मध्येच प्रचलीत असलेली आढळते. बहुदेववादाच्या विचारानंतर मानव एकेश्वरवादी (Monotheism) विचारांचा पाठपुराव करू लागला. त्याला असे वाटू लागले की, त्याच्या सर्व समस्यांचे समाधान एकेश्वरवादाच्या पूजेअर्चेतून होऊ शकते.

**२. आध्यात्मिक अवस्था :-**

ऑगस्त कॉम्तच्या मते, मानवी प्रगतीचा आढावा घेण्यासाठी इतर दोन अवस्थांचा विचार करता आध्यात्मिक अवस्थेला फारसे महत्व नाही. या आध्यात्मिक अवस्थेमध्ये मानव अमूर्त शक्तीवर विश्वास ठेवू लागला. ही अवस्था म्हणजे एक प्रकारे धर्मशास्त्रीय अवस्था आणि विज्ञानवादी अवस्थांच्या मधली स्थित्यंतराची अवस्था असून या अवस्थेच्या साह्याने धर्मशास्त्रीय अवस्थेकडून विज्ञानवादी अवस्थेकडे जाता येते. या प्रकारच्या अवस्थेमध्ये मानव त्याच्या सभोवताली घडून येणाऱ्या घटनांची कारणमीमांसा इश्वर शक्तीच्या आधारे न देता अमूर्तशक्तीचा आधार घेवून स्पष्टीकरण देतो. आपल्या सभोवतालचा निसर्ग ही एक अद्‌भूत शक्ती अथवा अमूर्त शक्ती असून निसर्गातील विविध घटना का घडून येतात? या संबंधीचे स्पष्टीकरण केले जाते. अशा प्रकारे घडून येणाऱ्या घटनांच्या मागे असणाऱ्या अनेक प्रकारच्या कारणांचा

विचार केला जातो. मानवी विचार अशा ठिकाणी येवून पोहचलेले असतात की, ज्या मध्ये घडून येणाऱ्या विविध घटनांचे कारण एकच आणि ते म्हणजे 'निसर्ग' आहे असे समजले जाते.

### ३. विज्ञानवादी अवस्था :–

विज्ञानवादी अवस्थेमध्ये मानवी विचार हे विश्वाच्या उत्पत्ती संबंधी आणि घटनेमागील कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात. या अवस्थेमध्ये व्यक्ती काल्पनिक विचार आणि अद्‌भूतशक्ती यासारख्या अंधश्रद्धेचा त्याग करून निश्चीत अशा नियमांचा स्वीकार करतात व या नियमांच्या मदतीने त्यांच्या सभोवतालीघडून येणाऱ्या घटनां जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. या अवस्थेमधील नियमांची मांडणी अनुभवजन्य संशोधन आणि सैद्धांतिक माहितीच्या आधारे होत असते. अशा प्रकारच्या नियमांची मांडणी करताना कॉम्त यांनी नैसर्गिक शास्त्रातील नियमासारखे काटेकोर नियम मांडण्यामध्ये उत्सुकता न दाखविता अमूर्त पातळीवर नियमांची कशी मांडणी करता येईल या संबंधी विचार केला. ऑगस्त कॉम्तच्या मते, ज्या वेळी खऱ्या अर्थाने विज्ञानवादी अवस्था पूर्णत्वाला येते त्या वेळी आपोआपच पहिल्या दोन अवस्था म्हणजे धर्मशास्त्रीय व अध्यात्मिक अवस्था नष्ट होतात. ऑगस्त कॉम्तच्या तीन अवस्थांच्या नियमांची अमंलबजावणी समाजाच्या विविध स्तरामध्ये झालेली आढळून येते. ऑगस्त कॉम्त यांनी मानवी प्रगतीसाठी या नियमांचा उपयोग करताना मानवाची प्रगती विविध अवस्थांच्या मधून कशी होत गेली हे स्पष्ट करताना बाल्यावस्थेचा संबंध धर्मशास्त्रीय अवस्थेशी, पौंगडावस्थेचा संबंध आध्यात्मिक अवस्थेशी आणि प्रौढावस्थेचा संबंध विज्ञानवादी अवस्थेशी जोडलेला दिसतो. या नियमाचा संबंध कॉम्त यांनी शास्त्राची श्रेणी रचना स्पष्ट करण्यासाठी देखील उपयोगात आणला. प्रत्येक शास्त्राचा विकास एका विशिष्ट अवस्थेमधून कसा होत गेला हे स्पष्ट करताना समाजशास्त्र हा विषय मात्र विज्ञानवादी अवस्थेतून का गेला नाही म्हणून त्यांनी समाजशास्त्रामध्ये विज्ञानवादी विचारांच्या विकासाला अधिक महत्व दिलेले दिसते. त्यांनी विश्वाची विभागणी तीन प्रकारांमध्ये केली आहे. विश्वाचा सुरुवातीचा इतिहास म्हणजे धर्मशास्त्रीय अवस्था होय. त्यानतंर विश्वाची वाटचाल आध्यात्मिक अवस्थेमधून झाली. आणि शेवटी कॉम्तच्या समकालीन कालखंडात विश्व विज्ञानवादी अवस्थेपर्यंत येवून पोहचले होते. कॉम्तची अशी धारणा होती की, विज्ञानवादाशी संबंधीत नियमांचे स्वरूप समाजातील व्यक्तींना समजून येईल व त्या प्रमाणे ते त्याचा पाठपुरावा करण्याचा प्रयत्न करतील. कॉम्तच्या मते, एखाद्या विशिष्ट मानवी समाजाची प्रगती कशा प्रकारे घडून आली हे जाणून घेण्यासाठीचे मार्गदर्शन या नियमाच्या आधारे करता येते. परंतु या नियमांच्या साह्याने आपण समाजामध्ये अटळ स्वरूपात असणाऱ्या समाज परिवर्तनाची अथवा विकासाची दिशा मात्र बदलू शकत नाही.

**✻ स्वयं–अध्ययनासाठीचे प्रश्न–१ ✻**

**अ) बहुपर्यायी प्रश्न.**

१. खालील पैकी कोणत्या अवस्थेमध्ये मानव सामाजिक घटना इश्वर शक्तीच्या प्रभावामुळे घडून येतात असे समजतो?

(अ) आध्यामिक अवस्था (ब) धार्मिक किंवा काल्पनिक अवस्था

(क) विज्ञानवादी अवस्था (ड) वरीलपैकी एकही नाही.

२. खालील पैकी कोणत्या अवस्थेमध्ये मानव कोणतीही सामाजिक घटना अमूर्त शक्तीच्या प्रभावामुळे घडून येते असे समजतो?

(अ) अध्यात्मिक अवस्था (ब) धार्मिक किंवा काल्पनिक अवस्था

(क) विज्ञानवादी अवस्था (ड) वरीलपैकी एकही नाही.

३. खालील पैकी कोणत्या अवस्थेमध्ये व्यक्ती धार्मिक विचारांचा अथवा अद्‌भूत शक्तीचा त्याग करतात?

(अ) धर्मशास्त्रीय अथवा काल्पनिक अवस्था.

(ब) आध्यात्मिक अवस्था.

(क) विज्ञानवादी अवस्था.

(ड) वरील पैकी एकही नाही.

४. खालील पैकी कोणता विचार कॉम्तच्या तीन अवस्थेच्या नियमांशी सुसंगत आहे?

(अ) रचनात्मक-कार्यात्मक विचार (ब) उत्क्रांतीवादी विचार

(क) संघर्षात्मक विचार (ड) वरील पैकी एकही नाही.

५. विज्ञानवादी अवस्थेमध्ये नियमांचा शोध कोणत्या आधारावरती घेतला जातो?

(अ) अनुभवजन्य संशोधन (ब) अतार्किक विचार

(क) तथ्य संकलन (ड) वरीलपैकी एकही नाही.

## १.२.२ कॉम्तचा प्रत्यक्षवाद अथवा विज्ञानवाद (Positivism by August Comte)

विज्ञानवादी विचारांच्या मांडणी मुळे ऑगस्त कॉम्तची समाजशास्त्रामध्ये खूप प्रसिद्धी झाली. या ठिकाणी विज्ञानवादाचा अथवा प्रत्यक्षवादाचा अर्थ नियमांच्या मांडणीतील सारखेपणा असा असून हे नियम स्थल, काल परस्थिती अनरूप बदलत नसतात. ऑगस्त कॉम्तच्या मते, अशा स्वरूपाच्या नियमांची मांडणी संशोधन आणि सैद्धांतिकता याच्या माध्यमातून होत असते.

**१. वास्तववादी दृष्टिकोन :-**

कॉम्तच्या मते, आपल्या सभोवताली असणारे विश्व हे जैविक आणि सामाजिक स्वरूपात आहे. समाजशास्त्राच्या अभ्यासकांसमोर अशा विश्वातील घटनांचा शोध घेवून त्यांचे स्पष्टीकरण करण्याचे कार्य असते. त्यांनी अभ्यासकांना आणि संशोधकांना वास्तववादी दृष्टिकोनाचा स्वीकार करून विश्वातील घटने

संबंधीचे सत्य जाणून घेत असताना अभ्यासामध्ये तंतोतंत पणा आणण्याचा प्रयत्न करा असे सुचित केले. तसेच विज्ञानवादाचा पुरस्कार करत असताना, समाजशास्त्र हे एक वास्तववादी शास्त्र असून त्याचा त्यांनी प्रमुख वास्तववादी असणाऱ्या भौतिकशास्त्राशी संबंध दाखविण्याचा प्रयत्न केला.

**२. समाजशास्त्रासाठीच्या अभ्यास पद्धती :–**

ऑगस्त कॉम्त यांनी समाजशास्त्राची संकल्पना स्पष्ट करताना समाजशास्त्र अध्ययनासाठीच्या ज्या प्रमुख अभ्यास पद्धतींचे विश्लेषण केले आहे, त्या मध्ये निरीक्षण, प्रयोग पद्धती, तुलनात्मक पद्धती, आणि ऐतिहासिक पद्धतीचा उल्लेख केलेला दिसतो. ऑगस्त कॉम्तच्या मते, आपण या पद्धतींचा आपल्या सभोवतालच्या विश्वासबंधीचे अनुभवजन्य ज्ञान करून घेण्यासाठी सामाजिक संशोधनामध्ये उपयोग करू शकतो.

**३. सामाजिक विश्वासबंधीचे नियम :–**

ऑगस्त कॉम्त हे केवळ समाजशास्त्रातील अभ्यास पद्धतीवरच बोलत नाहीत तर त्यांनी सैद्धांतिक मांडणी (theory) वर देखील विचार स्पष्ट केले आहेत. आपल्या सभोवतालच्या सामाजिक जीवनासबंधीचे त्यांनी सैद्धांतिक विश्लेषण करीत असताना, कांही नियम स्पष्ट केले आहेत. अशा स्वरूपाचे नियम हे सामान्यतः सभोवतालच्या सामाजिक परिस्थितीशी निगडीत असणाऱ्या घटनांच्या निरीक्षणावरील असून त्या मध्ये मानवी वर्तनाचा समावेश केलेला नाही. त्यांनी तीन अवस्थांच्या नियमाचा आधार घेवून मानवाच्या बौद्धीक प्रगतीचे विश्लेषण केले आहे. अशा विश्लेषणामध्ये त्यांनी धर्मशास्त्रीय अवस्था, आध्यात्मिक अवस्था आणि विज्ञानवादी अवस्थांचे स्पष्टीकरण केले आहे. त्यांच्या मते, वरील तीन अवस्थांच्या पैकी, शेवटच्या विज्ञानवादी अवस्थेत व्यक्ती त्यांच्या सभोवतालच्या विश्वा सबंधीची माहिती करून घेण्यासाठी वैज्ञानिक विचारांचा पाठपुरावा करतील.

**४. समाज व्यवस्था आणि प्रगतीसाठी विज्ञानवादाचा उपयोग :–**

ऑगस्त कॉम्त ज्या वेळी एका बाजूला विज्ञानवादी विचारांची मांडणी करत असताना कधीही न बदलणाऱ्या नियमांची मांडणी करतात, त्याच वेळी ते दुसऱ्या बाजूला त्यांच्या समकालीन समाज–व्यवस्थेशी निगडीत असणाऱ्या नकारात्मक सामाजिक घटनांच्या निर्मूलनासाठी विज्ञानवादाचा कसा उपयोग होऊ शकतो या संबंधीचे विश्लेषण देतात. या ठिकाणी नकारात्मक सामाजिक घटना म्हणजे, फ्रान्स समाज व्यवस्थेमधल्या राजकीय आणि नैतिक मूल्यांच्या मध्ये घडून येणारे अद्य:पतन असा अर्थ विचारात घेतला आहे. कॉम्तचे विज्ञानवाद म्हणजे एक प्रकारचे असे प्रतिकारात्मक विचार होते की, ज्या मधून त्याच्या सभोवताली घडून येणाऱ्या नकारात्मक वैचारिक मांडणीवर आघात करता येत होता. कॉम्तच्या मते, विज्ञानवादी हेच एकमेव असे विचार आहेत की, ज्या मधून समाजाची व्यवस्था आणि प्रगती करून घेता येते. विज्ञानवादी विचार बुद्धीवंताच्या नकारात्मक वैचारिक मांडणीवर आणि सामाजिक व्यवस्थेवर नियंत्रण ठेवतो त्याच वेळी तो दुसऱ्या बाजूला समाजामध्ये विज्ञानवादी विचारांची वाढ करून समाजाची प्रगती घडवून आणीत असतो.

विज्ञान वाद ही ऑगस्त कॉम्तची अतिशय महत्त्वपूर्ण अशी विचारसरणी होती. ऑगस्त कॉम्तच्या कालखंडात वैचारिक मतभेदाचे प्रमाण जास्त होते. त्यांनी आपल्या विज्ञानवादी विचारांच्या साह्याने वैचारिक मतभेदाचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी एका ठिकाणी असे म्हटले आहे की, 'मानवाचे विचार या एकूण विश्वाचे नियंत्रण करतात.' (Ideas govern the world) या ठिकाणी विज्ञानवादी विचारांचा उपयोग काल्पनिक वैचारिक मांडणीतून केलेला नसून वैज्ञानिक दृष्टिकोनातून केलेला आहे. आणि त्यामुळे विज्ञानवादी विचारांच्या मांडणीत फ्रान्समध्ये प्रचलित असणाऱ्या धार्मिक विचारांना गृहित धरलेले नाही.

**❊ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न-२ ❊**

**अ) मोकळ्या जागा भरा.**

१. .................. शास्त्रामध्ये नियम नेहमीच स्थिर आणि न बदलणारे असतात.

२. 'समाजशास्त्र' ही संज्ञा देण्यापूर्वी ऑगस्त कॉम्त यांनी समाजशास्त्राला ................ अशी संज्ञा दिली होती.

३. विज्ञानवादी विचारांच्या मध्ये फ्रान्समधल्या ................ विचारांना गौण स्थान दिले होते.

४. ................. अवस्थेमध्ये विज्ञानवादी विचारांचा स्वीकार केला जातो.

५. कॉम्त यांनी .................. या प्रमुख नैसर्गिकशास्त्राशी समाजशास्त्राची तुलना केली आहे.

## १.२.३ सामाजिक स्थितीशास्त्र आणि सामाजिक गतीशास्त्र

या ठिकाणी ऑगस्त कॉम्तचे समाजशास्त्र ज्या प्रमुख दोन घटकांच्यावर विशेष भर देते ते म्हणजे सामाजिक संरचना आणि सामाजिक परिवर्तन होय. सामाजिक स्थिती शास्त्र आणि सामाजिक गतीशास्त्र यांच्यातील मूलभूत फरक विचारात घेतल्याने समाज व्यवस्था आणि सामाजिक प्रगती जाणून घेण्यास मदत होते. या ठिकाणी आपण समाज व्यवस्था म्हणजे समाजाचे अस्तीत्व टिकून राहण्याच्या उद्देशाने समाजातील घटकांच्या मध्ये कायम स्वरूपी असणारे स्थैर्य विचारात घेतो तर, सामाजिक प्रगतीचा अर्थ समाजातील विकास या अर्थाने होत असतो. ऑगस्त कॉम्तच्या मते, या संकल्पना स्वतंत्र नसून त्या परस्परांशी सबंधित आहेत.

### ❑ सामाजिक स्थितीशास्त्र (Social statics) :-

ऑगस्त कॉम्त यांनी सुरूवातीस सामाजिक स्थितीशास्त्राचा अभ्यास करत असताना समाज व्यवस्थेच्या स्थैर्यासाठी पायाभूत घटकांचा विचार केला आहे. त्यासाठी त्यानी समाज व्यवस्थेमधल्या विविध घटकांचा विचार करून ते घटक कशा प्रकारे कार्य करतात या संबंधी चर्चा केली आहे.

ऑगस्त कॉम्तच्या मते, समाज-व्यवस्था आणि त्यांचे घटक यांच्या मधील परस्परसंबंधामुळे या घटकांच्या मधील ऐक्य स्वयंस्फूर्त स्वरूपाचे असते. ज्या वेळी अशा घटकांच्या मध्ये परस्परांमधील ऐक्याचा अभाव दिसून येतो त्यावेळी समाजामध्ये सामाजिक समस्या निर्माण होते.

**१. कुटुंब : समाज–व्यवस्थेचा एक घटक :–**

ऑगस्त कॉम्त यांनी व्यक्ती हा समाजाचा घटक म्हणून नाकारत असताना कुटुंब हा खऱ्या अर्थाने समाज व्यवस्थेचा सर्व प्रथम घटक असतो व अशा कुटुंबांची मिळून आदिवासी व्यवस्था तयार होते व त्यातून पुढे राष्ट्रासारखी व्यवस्था निर्माण होते. कॉम्तच्या मते, कौटुंबिक वातावरणामध्ये व्यक्तीच्या अहंभावी (Egoistic) स्वभावावर अकुंश ठेवून व्यक्तीला सामाजिक वर्तन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातात. सर्व मानवी समाजाच्या दृष्टीने विचार करता, कुटुंब संस्था ही सर्व प्रथम अशी आदर्श नमुना पद्धती असून तिचा उगम कुटुंब आणि नातेसंबंध व्यवस्थे मधून होत असतो. तसे पाहता एकूण समाज व्यवस्थाच कुटुंबाची मिळून तयार झालेली असते. आणि त्यामुळे समाज व्यवस्थेचा तो खऱ्या अर्थाने घटक असतो व त्यानंतरच्या घटकांमध्ये समाजातील वर्ग, जाती इ. सारखे लहान आकाराचे घटक असतात. नंतर लहान शहरे, नगर हे समाजाचे नव्याने स्थापन होणारे घटक असतात.

**२. भाषा : मानवी संस्कृतीचा एक भाग :–**

कॉम्तच्या मते, भाषेच्या साह्याने आपल्या गतकालीन पिढीच्या विचारांचा साठा करता येतो आणि पूर्वजांच्या संस्कृतीचा ठेवा जतन करून ठेवता येतो. भाषेच्या माध्यमातून एका बाजूला आपण समाजातील सदस्यांना एकत्रित ठेवू शकतो, त्याच वेळी दुसऱ्या बाजूला आपल्या पूर्वजांच्या विचारांशी देखील निगडीत रहातो. व्यक्तींखेरीज समाज अस्तित्वात राहू शकत नाही. जर समाजामध्ये सर्व सदस्यांसाठी समान भाषा नसेल तर आपण समाज व्यवस्थेमध्ये सामाजिक ऐक्य आणि सामंज्यस निर्माण करू शकत नाही. मानवी समुदायासाठी समान बोलीभाषा असणे गरजेचे असते. तरी सुद्धा कॉम्तच्या मते, भाषेचा उपयोग समाजासाठी एक माध्यम म्हणून करता येवू शकतो परंतु तिच्या साह्याने मानवी वर्तनाला दिशा देता येत नाही.

**३. समान धार्मिक श्रद्धा :–**

केवळ समानभाषा हा मानवी समाजाचा महत्वाचा घटक नसून समान धार्मिक श्रद्धा हा सुद्धा मानवी समुदायाचा एक महत्वाचा घटक असतो. धर्म समाजाला एक सार्वत्रिक स्वरूपाचे तत्त्व निर्माण करून देतो की, ज्यामुळे त्या तत्त्वाच्या आधारावर समाज एकसंघ रहातो, अन्यथा समाजातील व्यक्ती–व्यक्तींच्या मधील मतभेदामुळे समाज–व्यवस्था नष्ट होण्याची भिती असते. धर्मामुळे व्यक्तीला तिच्या स्वतःच्या अहंभावी वर्तनावर मात करता येते आणि तो समाजातील आपल्या सोबत असणाऱ्या इतर सदस्यांशी आपुलकीने रहाण्याचा प्रयत्न करतो. धर्म हा समाजातील एक शक्तीशाली स्वरूपाचा असा घटक आहे की, जो समान श्रद्धा आणि संप्रदायाच्या व्यक्तींना एकत्रित ठेवण्याचा प्रयत्न करतो. धर्म हा समाज–व्यवस्थेच्या मुळाशी असतो.

### ४. श्रम–विभाजन :–

धर्म आणि भाषा या घटकांच्या खेरीज श्रमविभाजन हा चौथा घटक सुद्धा समाजातील व्यक्तींना परस्परांशी जोडण्याचे कार्य करतो. समाजातील विविध प्रकारची कार्ये समाजातील व्यक्तींना एकत्रित जोडण्याचे कार्य करतात जे समाज आकाराने मोठे असतात अशा समाजामध्ये विविध प्रकारच्या कार्य पद्धती आणि त्यांच्या वितरण पद्धतीमुळे गुंतागुंत निर्माण होत असते. कॉम्त यांच्या मते, अशा स्वरूपाच्या श्रम विभाजनाचा परिणाम म्हणून समाजातील व्यक्तींच्या अंगी असणाऱ्या कार्य गुणांचा विकास होऊन परस्परांवर विसंबून रहाण्याच्या प्रवृत्तीमध्ये वाढ होते, आणि त्यामुळे व्यक्तींच्या मध्ये ऐक्य निर्माण होते. परंतु त्याच वेळी आधुनिक औद्योगिक समाजव्यवस्थेमधल्या श्रमविभाजनाचा परिणाम समाज–व्यवस्थेवर होतो.

अशा प्रकारे, ऑगस्त कॉम्त यांनी भाषा, धर्म, समान धार्मिक श्रध्दा आणि श्रमविभाजन या समाज–व्यवस्थेच्या विविध घटकांच्या माध्यमातून समाजाचे व्यापक स्वरूप स्पष्ट केले आहे. कॉम्तच्या मते, समाज व्यवस्थेच्या निर्मिती साठीच्या अटी समाज व्यवस्थेचे स्वरूप आणि सामाजिक स्थितीशास्त्राचा अभ्यास हा प्रामुख्याने सामाजिक गतीशास्त्राच्या अभ्यासाशी सबंधित असतोच. सामाजिक गती शास्त्र हे प्रामुख्याने मानवी प्रगती आणि उत्क्रांतीशी संबंधीत असते.

## ❑ सामाजिक गतीशास्त्र (Social Dynamics)

सामाजिक गतीशास्त्राच्या अभ्यासाचे ऑगस्त कॉम्तचे मुख्य उद्दिष्ट हे सामाजिक घटनांच्या क्रमासंबंधीच्या नियमाचा अभ्यास करण्याचे होते. कॉम्तच्या मते, समाज हा परिवर्तनशील असतो. परंतु समाजातील हे परिवर्तन एका विशिष्ट सामाजिक नियमाप्रमाणे आणि क्रमा क्रमाने घडून येत असते. समाजामध्ये प्रगती घडून येते याचा अर्थ समाजात उत्क्रांतीवादी स्वरूपात टप्प्या–टप्प्याने हळूवार बदल घडून येतात. कॉम्त यांनी सामाजिक गतीशास्त्राला मानवी समाजाच्या प्रगतीचा सिद्धांत म्हणून संबोधिले आहे.

### १. मानवी विचारांचे बदलते स्वरूप :–

ऑगस्त कॉम्त यांनी मानवी प्रगतीचा आढावा घेत असताना, समाजातील भौतिक घटकांच्या मधील बदलांपेक्षा मानवी विचारांच्या मध्ये घडून येणाऱ्या परिवर्तनावर आपल्या अभ्यासाचे लक्ष अधिक केंद्रित केले आहे. कॉम्त यांनी समाजाचे स्वरूप स्पष्ट करताना, समाज हा धर्मशास्त्रीय अवस्थेपासून विज्ञानावादाचे वर्चस्व असणाऱ्या औद्योगिक समाजापर्यंत कसा उत्क्रांत होत गेला या संबंधी त्यांनी आपले विचार स्पष्ट केले.

### २. सामाजिक स्थितीशास्त्रापेक्षा सामजिक गतीशास्त्र अधिक महत्त्वाचे :–

मानवी समाज जीवनासंबंधीच्या नियमांचा शोध घेण्याच्या दृष्टिकोनातून सामाजिक स्थितीशास्त्र आणि सामाजिक गतीशास्त्र या दोन्ही घटकांना समान महत्त्व असले तरी, कॉम्त यांनी सामाजिक गतीशास्त्राला अधिक महत्त्व दिले आहे. याला कारण म्हणजे त्याना फ्रान्स समाज व्यवस्थेमध्ये ज्या प्रकारच्या समाज परिवर्तनाची अपेक्षा होती ती समाज कल्याणाच्या माध्यमातून व्हावी असे वाटत होते. परंतु त्यासाठी त्यांनी

कधीही क्रांतीकारी परिवर्तनाला साथ दिली नाही. कारण उत्क्रांतीवादी परिवर्तनामुळे चांगल्या स्वरूपाचे परिवर्तन घडून येवू शकते या विचारावर त्यांची खूप श्रद्धा होती.

**३. सामाजिक विकासातून प्रगतीचे सातत्य टिकून रहाते :–**

कॉम्तच्या मते, कोणत्याही समाजातील प्रगतीचे मूल्यमापन हे त्या समाजातील विकासाच्या माध्यमातून मोजले जाते. कोणताही समाज हा मूलतः गतीशिल स्वरूपाचा असतो. प्रत्येक समाज व्यवस्थांच्या मध्ये परिवर्तन हे जरी दिसून येत असले तरी, प्रत्येक समाजातील परिवर्तनाची गती एका विशिष्ट काल खंडात एक सारखी नसून त्या मध्ये भिन्नता दिसून येते.

सामाजिक घटनेचा अभ्यास हा प्रामुख्याने सामाजिक स्थितीशास्त्र आणि सामाजिक गतीशास्त्र अशा दोन प्रकारांतून केला आहे. सामाजिक स्थितीशास्त्र म्हणजे समाजाची मूलभूत अवस्था, सामाजिक संरचना किंवा समाजाची व्यवस्थाबद्ध रचना की, ज्यामुळे समाज–व्यवस्थेला स्थैर्य मिळत असते. सामाजिक गतीशास्त्र ही दुसरी अशी कल्पना आहे की, जिचा सबंध हा समाजातील प्रगतीशी जोडला आहे. कॉम्त यांच्या मते, समाजाची प्रगती आणि व्यवस्था या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. शेवटी आपण असे म्हणू शकतो की, प्रत्येक समाज व्यवस्थेला एक पायाभूत अशी संरचना असते किंवा व्यवस्था असते. परंतु याच संरचनेमध्ये कालमानानुसार परिवर्तन अथवा विकास घडून येत असतो.

**✻ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न–३ ✻**

**अ) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. कॉम्तच्या समाजशास्त्राचे प्रमुख दोन प्रकार कोणते आहेत?

२. कोणत्या प्रकारच्या समाजशास्त्रामध्ये सामाजिक स्थैर्याचा अभ्यास केला जातो?

३. सामाजिक स्थितीशास्त्राचे कोणते चार घटक आहेत?

४. सामाजिक गतीशास्त्राचा अभ्यास विषय कोणता?

५. कॉम्त यांनी कोणत्या युरोपियन समाजात परिवर्तनाचे स्वरूप पाहिले होते?

## १.३ सांराश

या पेपरचा अभ्यास करताना, सुरुवातीलाच आपण ऑगस्त कॉम्त यांचे विचार जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या विचारवंताने आपल्या विचारांची मांडणी प्रामुख्याने १७ व्या शतकात फ्रान्स मध्ये उद्भवलेल्या सामाजिक ताण–तणाव आणि राजकीय हालचालीच्या पार्श्वभूमीवर केलेली होती. कॉम्त यांनी प्रामुख्याने समाजासंबंधीचे भविष्यातील स्वरूप पूर्वकथन करेल असे समाजशास्त्र निर्माण केले.

प्रथम उप–घटकांत आपण कॉम्तच्या तीन अवस्थांचा नियम याची तर द्वितीय घटकात विज्ञानवादी दृष्टिकोनांची चर्चा केली. कॉम्तचे असे मत होते की, समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी आणि संशोधकांनी

त्यांच्या अभ्यासामध्ये तंतोतंतपणा आणण्यासाठी विज्ञानवादी दृष्टिकोन अंगी बानवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. समाजशास्त्राच्या अभ्यासासाठी विज्ञानवादी दृष्टिकोनांचा अवलंब सामाजिक संशोधनाद्वारे सामाजिक जीवनासबंधीचे अनुभवजन्य ज्ञान मिळवण्यासाठी होतो. कॉम्त यांचे असे मत होते की, विज्ञानवादाचा पुरस्कार करणे म्हणजे, फ्रान्स समाज व्यवस्थेमध्ये रूढ असणाऱ्या नैतिक आणि राजकीय अव्यवस्थेसारख्या नकारात्मक घटनां नाहीशा करणे होय.

तृतीय उप-घटकांमध्ये कॉम्त यांनी सामाजिक स्थितीशास्त्र आणि सामाजिक गतीशास्त्र या दोन प्रकारांची चर्चा केली आहे. समाजशास्त्राचे अशा दोन प्रकारामध्ये वर्गीकरण करून कॉम्त यांनी मानवी समाजातल्या समाज व्यवस्थेचे स्वरूप आणि प्रगतीचे स्वरूप स्पष्ट केले आहे. कॉम्त यांच्या मते, सामाजिक स्थितीशास्त्राच्या अभ्यासामध्ये सामाजिक स्थैर्य (Social Stability) विचारात घेतले जाते, व त्या मध्ये कुटुंब, भाषा, समान धर्म, श्रद्धा, श्रम-विभाजनाचे स्वरूप इ. सारख्या समाज-घटकांचा अभ्यास केला जातो तर दुसऱ्या बाजूला आपण समाजातील परिवर्तन अथवा प्रगतीचा अभ्यास सामाजिक गतीशास्त्रामध्ये करतो. सामाजिक गतीशास्त्रामध्ये मानवी विचारांचे बदलते स्वरूप, आणि कोणत्याही समाजातील सामाजिक विकास अभ्यासला जातो.

या सर्व घटनांचा विचार केला असता, ऑगस्त कॉम्त हा विचारवंत प्रामुख्याने समाजशास्त्र-परंपरेच्या सुरूवातीच्या कालखंडातील होता असे दिसून येते. कॉम्तच्या विचारांचा संदर्भ आजही तितकाच उपयोगाचा आहे. कॉम्तच्या समाजशास्त्रीय विचारांची मांडणी अशा सामाजिक परस्थितीमध्ये झाली की, ज्या वेळी नकारात्मक विचारांमुळे समाज व्यवस्था विस्कळीत झालेली होती. त्यामुळे अशा नकारात्मक विचार मांडणीवर मात करावयाची असल्याने त्यांनी आपल्या विज्ञानवादाच्या विचारातून समाजाचे उद्बोधन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

## १.४ पारिभाषिक संज्ञा

- **शास्त्रांची श्रेणी रचना :** ज्या क्रमाने शास्त्रांचा उदय घडून आला तो क्रम.
- **सामाजिक स्थितीशास्त्र :** सामाजिक स्थैर्य किंवा समाजाचे विविध घटक आणि त्यांची कार्यपद्धती.
- **सामाजिक गतीशास्त्र :** समाजाचे बदलते स्वरूप अभ्यासणे.
- **विज्ञानवाद अथवा प्रत्यक्षवाद :** सामाजिक घटनांच्या अभ्यासासाठी नैसर्गिकशास्त्रांच्या अभ्यासावर आधारित असणारा वैज्ञानिक दृष्टिकोन.
- **विचारसरणी :** अभ्यासासाठी अभ्यासकाने स्वीकारलेली विचारांची पद्धती.
- **धर्मशास्त्रीय :** धर्माच्या अभ्यासावर आधारित.
- **अध्यात्मिक :** तत्वज्ञानाच्या अभ्यासाची शाखा, ज्या मध्ये मूर्त घटकांचा अभ्यास केला जातो.
- **बहुदेव वाद :** बहुदेव वादाची संकल्पना की, ज्यामध्ये अनेक देव-देवतांची पूजा होते.

- **एकेश्वरवाद :** एकेश्वरवादाची संकल्पना की, ज्या मध्ये एका देवतेची पूजा होते.
- **घटक :** एका पासून अलग असलेली व स्वतःचे स्वतंत्र स्थान असणारी बाब.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नासाठीची उत्तरे

❀ **स्वयं अध्ययन प्रश्न–१**

१. धार्मिक किंवा काल्पनिक अवस्था.

२. आध्यात्मिक अवस्था.

३. विज्ञानवादी अवस्था.

४. उत्क्रांतवादी विचार.

५. अनुभवजन्य संशोधन.

❀ **स्वयं अध्ययन प्रश्न–२**

१. नैसर्गिक शास्त्रामध्ये.

२. Social Physics.

३. धार्मिक विचारांना.

४. विज्ञानवादी.

५. भौतिकशास्त्र.

❀ **स्वयं अध्ययन प्रश्न–३**

१. सामाजिक स्थितीशास्त्र आणि सामाजिक गतीशास्त्र.

२. सामाजिक स्थितीशास्त्रामध्ये समाज व्यवस्था आणि समाजात घडणाऱ्या क्रिया–प्रतिक्रिया यांचा अभ्यास केला जातो.

३. भाषा, कुटुंब, धर्म आणि श्रमविभाजन.

४. सामाजिक प्रगती आणि विकास.

५. फ्रान्स समाज व्यवस्था.

## १.६ सरावासाठीचे प्रश्न

**अ) विश्लेषणात्मक स्वरूपाचे प्रश्न.**

१. ऑगस्त कॉम्त यांची समाजशास्त्राची संकल्पना स्पष्ट करा.

२. कॉम्तचे विज्ञानवादा सबंधीचे विचार स्पष्ट करा.

३. कॉम्तचा तीन अवस्थांचा नियम स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा.**

१. कॉम्तचा तीन अवस्थांचा नियम.

२. कॉम्तचा विज्ञान वाद.

३. सामाजिक स्थितीशास्त्र.

४. सामाजिक गतीशास्त्र.

## १.७ अधिक वाचनासाठीची पुस्तके


१. **Aron Raymond** (1965) : *"Main Currents in Sociological Thought"*, Vol. I New York : Basic Books Aronson Ronald.

२. **Coser Lewis A.** (1966) : *"Masters of Sociological Thought"*, Jaipur and New Delhi : Rawat Publications.

3. **Ritzer George** (1996) : *"Classical Sociological Theory"*, New York : The McGraw - Hill companies, Inc.


❑❑❑

# घटक – २
# कार्ल मार्क्स (१८१८–१८८३)

**घटक संरचना**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्तावना

२.२ अभ्यास विषयाची मांडणी

  २.२.१ द्वंद्वात्मक भौतिकवाद

  २.२.२ वर्ग संघर्ष सिद्धांत

  २.२.३ कामगार वर्गाची अलगता

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक संज्ञा

२.५ स्वयं: अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठीचे प्रश्न

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील गोष्टी साध्य होणार आहेत.

- कार्ल मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद सिद्धांत माहित करून घेणे.
- मार्क्सची वर्ग संघर्ष संकल्पना जाणून घेणे.
- मार्क्सची कामगार वर्गाची अलगता माहित करून घेणे.

## २.१ प्रस्तावना

कार्ल मार्क्स हा जर्मन समाजशास्त्रज्ञ अधिक क्रांतीकारी विचार प्रवृत्तीचा असल्यामुळे त्याने आपले सर्व विचार वास्तवतेशी निगडीत विषद केले. तसेच विविध कल्पनांची आणि दृष्टिकोनांची मांडणी केली. कार्ल मार्क्सवर हेगेलच्या विचारांचा खूप प्रभाव होता. त्याचा परिणाम अर्थातच मार्क्सच्या विविध विचारांवर झाला.

कार्ल मार्क्सने आपल्या द्वंद्वात्मक भौतिकवाद सिद्धांतामध्ये हेगेलने सांगितलेल्या कल्पना स्पष्टपणे नाकारल्या. त्याचा हा सिद्धांत हेगेल्याप्रमाणे अध्यात्मवादावर आधारित नसून तो भौतिक वादावर आधारलेला आहे. त्याच्या मते, भौतिक बदल हेच महत्वाचे आहेत. जगातील प्रत्येक बदलाचे कारण द्वंद्व असल्याने मानवाने नेहमी वास्तवता विचारात घेतली पाहिजे.

मार्क्सची वर्ग संघर्ष संकल्पना सर्वात महत्वपूर्ण असून या विचारामुळेच तो जग प्रसिद्ध विचारवंत म्हणून ओळखला गेला. त्याच्या मते, वर्ग संघर्ष हा एक वास्तव संघर्ष असून भौतिकवादी समाजाचा तो एक अविभाज्य घटक आहे. त्याच्या मते, आर्थिक कारणानुसार मानव समाजात मालक-गुलाम, सरंजामदार-शेतमजूर आणि भांडवलदार-कामगार हे वर्ग एकमेकांविरुद्ध संघर्षाची भूमिका स्विकारतात. या पार्श्वभूमीवर त्याने मानवी इतिहास संघर्षरुपी आहे असे मत मांडले. तसेच कामगार वर्गाची अलगता ही संकल्पना समाजातील भौतिकतेमुळे म्हणजेच वस्तुवरील मालकीमुळे निर्माण होत असते असा महत्वपूर्ण विचार स्पष्ट केला. भांडवलशाही उत्पादन व्यवस्थेत भांडवलदार वर्ग हा नेहमीच कांमगार वर्गावर आपले वर्चस्व निर्माण करतो. एक प्रकारे त्याला आपला गुलाम समजतो. त्याच्याकडून फक्त शारीरिक श्रम करून घेतो आणि कामाचा योग्य मोबदला मात्र देत नाही. अशावेळी उत्पादन प्रक्रियेतील कामगार आपोआप आपल्या कामामध्ये अलगता किंवा अलिप्ततेचे धोरण अमलात आणतो. थोडक्यात भांडवलशाही समाजव्यवस्थेत भांडवलदार आणि कामगार यांच्यामध्ये असंतुलन वाढत गेल्याने **प्रस्थापितांविरुद्ध विस्थापीत** प्रक्रियेला चालना मिळते. त्याचा परिणाम म्हणून कामगारांच्यामध्ये दुरावा निर्माण होतो.

## ३.२ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

कार्ल मार्क्सपूर्वी अनेक विचारवंतांनी समाजवाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याची म्हणावी अशी शास्त्रीय चिकित्सा केली गेली नाही. कार्ल मार्क्सने मात्र समाजवादी विचाराना नवीन रुप देण्याचा प्रयत्न केला. त्याच्या समाजवादी विचारसरणीमुळे पूर्व युरोप, चीन आणि डाव्या विचारसरणीची राष्ट्रे प्रभावित होवून तिथे समाजवादी क्रांतीला सुरुवात झाली.

मार्क्सने आपल्या समाजशास्त्रीय विचारांमध्ये श्रम, मूल्य, भौतिकता यांना आधारभूत मानून श्रमाला योग्य स्थान मिळावे आणि श्रमिकाला त्याचा योग्य मोबदला मिळावा अशी आग्रहाची भूमिका स्विकारली. या पार्श्वभूमीवर त्याने आपले खालील महत्वपूर्ण विचार मांडले.

उदा. १) द्वंद्वात्मक भौतिकवाद.

२) वर्गसंघर्ष सिद्धांत.

३) कामगार अलगीकरण धोरण अथवा परात्मता.

### ३.२.१ कार्ल मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद (Dialectical Materialism) अथवा विरोध विकासवाद सिद्धांत

मार्क्सच्या समाजशास्त्रीय विचारातील सर्वात महत्वपूर्ण सिद्धांत म्हणून द्वंद्वात्मक भौतिकवादाकडे पाहिले जाते. या सिद्धांतावर हेगेलेच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव आढळून येतो. मार्क्सने आपला हा सिद्धांत विरोधी दृष्टीकोनातून मांडला. हेगेल हा वैचारिक तत्त्वज्ञानाच्या इतिहासाचा प्रतिनिधी म्हणून ओळखला जातो. मार्क्सने या सिद्धातांद्वारे संघर्षवादी विचारसरणी विशद केली आणि हेगेलच्या वैचारिक क्षमतेवर उभ्या असणाऱ्या द्वंद्ववादाला नकार दिला.

कार्ल मार्क्सच्या मते, निसर्ग हा भौतिक वस्तुस्थितीचा प्रथम घटक असून आधी भौतिक सृष्टीत बदल होतात व नंतर कल्पना सृष्टीत बदल होतात. उदा. नदी प्रथम आपले स्वरूप बदलते व त्यानुसार मानव आपल्या विचारात बदल करू लागतो. याचाच अर्थ मार्क्सने कल्पनाशक्तिपेक्षा भौतिक घटकास जबाबदार धरले. त्याच्या म्हणण्यानुसार विरोधी विचार प्रक्रियेतून एक नवा विकसीत विचार निर्माण होतो. जगातील प्रत्येक बदलाचे कारण द्वंद्व असल्याने मानवाने नेहमी वास्तवाचा विचार केला पाहिजे असे स्पष्ट मत कार्ल मार्क्सने मांडले. मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवाद विचाराचा मुलाधार वैज्ञानिक असल्याने हेगेलपेक्षा हा सिद्धांत खूप प्रचलित झाला.

हेगेलने चुकीच्या पद्धतीने वस्तुस्थिती, सत्य आणि शाश्वतता यांचा संबंध मन आणि आत्म्याशी जोडला. नैसर्गिक प्रक्रिया आणि मानवी संघर्ष यामध्ये फरक असल्याने हेगेलच्या द्वंद्ववादाबाबत अनेक अर्थ घेतले जातात. मार्क्सने मात्र अमुर्त कल्पनांचा वरवर अर्थ घेणाऱ्याना बौद्धिक दृष्टिकोनातून विरोध केला. मार्क्सच्या मते, कल्पनांचा अर्थ व्यवहारी दृष्टीने लावणे योग्य आहे. मार्क्सचे तत्त्वज्ञान हे एक शास्त्र असल्याने त्याच्या विचाराना समाजशास्त्रीय महत्व असल्याचे स्पष्ट होते.

थोडक्यात हेगेल हा कल्पनावादी असल्याने त्याला वास्तविक जग हे विचारांचे बाह्य स्वरूप वाटते. त्याचा कल्पनावाद विश्वाच्या आणि मानवी समाजाच्या अस्तीत्वाअगोदरच निर्माण झाला आहे या गृहीतकावर आधारित असल्याने तो कार्ल मार्क्सच्या विचारा विरुद्ध असलेला जाणवतो. अर्थात मार्क्सने हेगेलच्या कल्पनावादाला विरोध केला असला तरी त्याने द्वंद्वात्मक संकल्पनेची कोठेही स्तुती केली नाही.

मार्क्सच्या मते, विश्वातील कोणतीही वस्तू खऱ्या अर्थाने स्थिर नाही. सर्व वस्तू किंवा घटना यामध्ये नेहमी अंतर्विरोध असतो. अशा अंतर्विरोधामुळेच द्वंद्वात्मक संघर्ष होऊन त्यातून विकास घडून येतो, तसेच विश्वातील कोणतीही वस्तु पूर्णपणे स्वतंत्र नाही. समाजातील व्यक्तींच्या बाबतीत देखील एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीवर आधारित असल्याचे निदर्शनास येते. जेव्हा भौतिक परिस्थितीत बदल होतो तेव्हा व्यक्तिला आपले विचार देखील बदलावे लागतात. भौतिक जगात विकास आणि विनाशाचे चित्र सतत सुरू असल्याचे दिसून येते यातून संघर्षाचा उदय होतो आणि अशा संघर्षातूनच समाजक्रांती घडून येते. त्यामुळेच कार्ल मार्क्सने मानवी इतिहास संघर्षरूपी असून त्यातून विरोध विकासवाद ही प्रक्रिया सदैव उदयास येते असे मत मांडले आहे.

मार्क्सचे भौतिकवादी विचार हे गुंतागुंतीच्या भौतिक नैसर्गिक प्रक्रियेशी आणि मानवी इतिहासाशी संबंधित आहेत. इतिहासापासूनचे मानवी अस्तीत्व सर्वाना परिचित आहे. भौतिक वस्तुसाठी मानवावर कोणतेही नियंत्रण नाही परंतू त्याला त्यासाठी संघर्ष करावा लागणार आहे. संघर्ष करण्याची ऐतिहासिक परिस्थिती म्हणजे समाजाचा पूर्ण विकास होय. अर्थात त्यासाठी मानवाला बराचसा कालावधी घालवावा लागतो. आधुनिक समाजात मनुष्य जाणीवपूर्वक आणि स्वतंत्रपणे जगण्याच्या दृष्टीने नवनवीन वस्तुची निर्मिती करण्याचा प्रयत्न करीत आहे.

## ❐ मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवाद सिद्धांताची प्रमुख वैशिष्ट्ये :-

कार्ल मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद सिद्धांत अथवा विरोध विकासवाद संकल्पना ही भौतिकवादावर आधारित असल्याने मार्क्सने या सिद्धांताची **ठळक वैशिष्ट्ये** खालीलप्रमाणे सांगितली.

### १. वस्तूंचे अस्थायी स्वरूप :-

मार्क्सच्या द्वंद्ववादी दृष्टिकोणानुसार विश्वातील कोणतीही वस्तू खऱ्या अर्थाने स्थिर नाही. प्रत्येक वस्तूचा विकास होतो आणि विनाशही घडून येतो. याचा अर्थ उत्पत्ती, विकास आणि लय हे निसर्ग नियम प्रत्येक वस्तूला लागू पडतात. हे परिवर्तन विरोध विकासवादाच्या तत्त्वावर होत असते. म्हणजेच ते कधी सरळ होत नाही. उदा. पाणी गरम केल्यानंतर ते बराच वेळ गरम राहते. त्याची लगेच वाफ बनत नाही. मात्र एका निश्चित अवस्थेनंतर परिवर्तनाचा हा क्रम संपुष्टात येतो. मानव समाजात देखील निश्चित अवस्थेनंतर जुनी समाज व्यवस्था संपुष्टात येऊन त्याठिकाणी नवीन समाज व्यवस्था प्रस्थापित होते. उदा. सरंजामशाहीला भांडवलशाही आणि भांडवलशाहीतून समाजवाद अथवा साम्यवाद.

### २. वस्तूतील अंतर्विरोध :-

मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवाद सिद्धांताचे हे सर्वात ठळक वैशिष्ट्य आढळते. त्याच्या मते, सर्व वस्तू किंवा घटना यामध्ये नेहमी अंतर्विरोध किंवा परस्पर संघर्ष असतो. अशा संघर्षात द्वंद्व घडून येते. असे द्वंद्व विरोधातून विकास यासाठी उपयुक्त ठरते. अशा वेळी समाजात सामाजिक परिवर्तन घडून येते. मार्क्सच्या मते वर्गसंघर्षाची प्रक्रिया वाढत जावून तिचा विस्फोट झाला अथवा क्रांती झाली की संपूर्ण समाजव्यवस्थाच बदलते.

### ३. वस्तूवरील परस्परावलंबित्व :-

मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिक सिद्धांताचे हे तिसरे ठळक वैशिष्ट्य आढळून येते. त्याच्या मते, विश्वातील कोणतीही वस्तू पूर्णपणे स्वतंत्र नाही. प्रत्येक वस्तू एकमेकांवर आधारित आहे. एक मानव समाज देखील दुसऱ्या समाजावर आधारित आहे.

वरील वैशिष्ट्यांवरून असे स्पष्ट होते की, भौतिक परिस्थितीत बदल झाला की, व्यक्तीचे विचारदेखील बदलतात. भौतिक जगात विकास आणि विनाशाचे चक्र अव्याहतपणे सुरू असल्याने सदैव

परिवर्तन होत असते. परिवर्तनविरोधी आणि परिवर्तनवादी यांच्यामध्ये संघर्ष निर्माण होतो. या संघर्षातून समाजक्रांती घडून येते. मार्क्सच्या मते, जगातील सर्व संघर्ष हे प्रामुख्याने आर्थिक संघर्ष असतात.

अशा रीतीने मार्क्सने अगोदरच्या मानवी इतिहासाला महत्व दिले आणि कल्पना शक्तीपेक्षा भौतिक घटकास जबाबदार धरले. जगातील प्रत्येक बदलाचे कारण द्वंद्व असल्याने मानवाने नेहमी वास्तवाचा विचार केला पाहिजे असे स्पष्ट मत मांडले. त्याच्या द्वंद्वात्मक भौतिकवाद सिद्धांताचा मुलाधार वैज्ञानिक असल्याने हेगेलपेक्षा हा सिद्धांत खूप प्रचलित झाला. स्पेन्सरच्या उत्क्रांतीवादापेक्षा मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद वेगळा नाही. या सिद्धांतामध्ये समाजाचे शास्त्र, त्याची निर्मिती, विकास आणि सुधारणा याबाबत पूर्ण माहिती दिली आहे. मार्क्सने मनुष्य हा निसर्गाचाच एक भाग आहे यावर जोर दिला असून समाजाच्या इतिहासातून भौतिक कृति आणि संस्थात्मक बांधणी यांचा क्रम निश्चित केला जातो, असे म्हटले आहे. त्याने आपला हा सिद्धांत मांडताना काल्पनिक दृष्टिकोण न स्विकारता वास्तव दृष्टिकोण स्वीकारला. त्यामुळे मार्क्सचा हा सिद्धांत आजदेखील खूप प्रचलित आहे.

*** स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ***

१. मार्क्सने त्याच्या निसर्ग आणि समाज सिद्धांतामधून कोणाच्या सिद्धांतास विरोध केला आहे?

२. हेगेलच्या सिद्धांताचा कोणता भाग मार्क्सने शिल्लक ठेवला आहे?

३. मार्क्स आणि एंजेल्सने कशामुळे वस्तुची वास्तवता जगात मांडली आहे?

४. द्वंद्वात्मक भौतिकवादाचे ठळक वैशिष्ट्य कोणते आहे?

५. मार्क्सने या सिद्धांतामध्ये कल्पना शक्तीपेक्षा कोणत्या घटकास जबाबदार धरले?

### ३.२.२ वर्ग संघर्ष सिध्दांत (Class Conflict Theory)

मार्क्सचा वर्गसंघर्ष सिद्धांत हा उत्पादन पद्धत अथवा उत्पादन व्यवस्थेशी निगडीत असून सर्वात महत्त्वपूर्ण सिद्धांत म्हणून मानला जातो. त्याचा हा सिद्धांत समाजाच्या आर्थिक रचनेशी निगडीत असून समाजात दोन वर्ग उदयास आले आणि त्यांची निर्मिती उत्पादन प्रक्रियेद्वारे झाली. यातील एका वर्गाचा उत्पादन साधनावर पूर्ण मालकी हक्क असतो तर दुसरा वर्ग अशा मालकीपासून वंचित असतो. ज्या वर्गाकडे उत्पादन साधनांची मालकी असते असा वर्ग आर्थिक भूमिकेतून मालक, सामाजिक दृष्टीने शोषणकर्ता आणि राजनैतीकदृष्ट्या शासक असतो. उदा. स्वामी, सामंत (सरंजामदार), भांडवलदार इत्यादी. याउलट ज्या वर्गाला फक्त शारीरिक कष्टच करावे लागतात आणि मालक देईल त्या वेतनावर विनातक्रार जीवन जगावे लागते असा वर्ग आर्थिक दृष्ट्या निर्धन, सामाजिक दृष्टीने शोषित तर राजनैतिक दृष्ट्या शासित असतो. उदा. गुलाम, शेतमजूर, कामगार इत्यादी.

मार्क्सच्या मते, पहिला वर्ग नेहमी दुसऱ्या वर्गाचे आर्थिक, सामाजिक, मानसिक शोषण करतो. यातूनच या उभय वर्गामध्ये सतत एकमेकाविरूद्ध संघर्ष प्रवृत्ती वाढत जाते. या पार्श्वभूमिवर मार्क्सने **मानवी इतिहास**

**संघर्षरुपी** आहे असे मत मांडले. वर्गसंघर्ष हा एक वास्तव संघर्ष असून भौतिकवादी समाजाचा तो एक अविभाज्य घटक आहे. आर्थिक कारणानुसार मानव समाजात प्राचीन काळापासून ते आजपर्यंत जे जे वर्ग उदयास आले त्यांच्यामध्ये एकमेकाविरुद्ध संघर्षाची भुमिका निर्माण झाल्याचे स्पष्ट होते.

### ❒ समाजाची आर्थिक रचना :–

मार्क्सच्या मते, उत्पादन शक्ती आणि उत्पादन सत्ता यातूनच सत्ताधारी व सत्तेपासून वंचित अशा दोन वर्गाचा उदय झाला. पैसा, संपत्ती अथवा भांडवल या आर्थिक घटकाशी निगडीत समाजात वर्गव्यवस्था उदयास आली. मानवाने आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्तीचा तसेच तंत्रज्ञानाचा उपयोग केला. त्याच्या मते, वस्तूंचे उत्पादन आणि उत्पादनाचे साधन यातूनच उत्पादन सत्ता निश्चित होते.

### ❒ सामाजिक वर्गाशी संबंध :–

मार्क्सच्या मते, मानवाचा उत्पादन पद्धत आणि उत्पादन साधनांशी निश्चित मार्गाने संबंध येत असतो. कामाची विभागणी आणि संपत्तीचा संबंध यातून मानवाची जागा निश्चित ठरते. प्रत्येकाच्या आवडी निवडीनुसार उत्पादन साधनांशी संबंध येण्यातूनच 'वर्ग जाणीव' निर्माण झाली. अर्थात जेव्हा उत्पादन साधनाची मालकी असणारा वर्ग आयुष्यभर शारीरिक कष्ट करणाऱ्या लोकांचे शोषण करतो तेव्हापासूनच उभय वर्गाचे सामाजिक, आर्थिक व मानसिक संबंध संघर्षमय स्वरूपाचे बनले, यालाच मार्क्सचा वर्ग संघर्ष सिद्धांत असे संबोधिण्यात आले.

मार्क्सच्या मते, भांडवलशाही समाजात उत्पादन आणि वितरण यामध्ये एकप्रकारची ''**बळी तो कान पिळी**'' अशी मक्तेदारी निर्माण होते. यातूनच 'वर्गजाणीव' (Class Consciousness) उदयास येते भांडवलशाही व्यवस्थाच वर्गसंघर्षाच्या निर्मितीचे आणि विनाशाचे साधन असते. शेवटी या वर्गसंघर्षाची परिणती क्रांतीकारी परिवर्तनात होत असते. अशा क्रांतीमधून 'शोषक वर्गाचा विनाश होतो आणि शोषित वर्गाची हुकुमशाही प्रस्थापित होते. यालाच मार्क्सने साम्यवाद अथवा समाजवाद' असे नाव दिले. अर्थात जोपर्यंत भांडवशाही समाज व्यवस्था अस्तित्वात राहिल तो पर्यंत वर्गसंघर्ष राहणारच हे त्रिवार सत्य आहे.

### ❒ मार्क्सच्या वर्गसंघर्ष सिद्धांतातील महत्वपूर्ण बाबी :–

मार्क्सने आपला जो वर्गसंघर्ष सिद्धांत स्पष्ट केला त्यातील महत्वाच्या बाबी खालील प्रमाणे.आहेत.

**१. कामगार वर्गाचा उदय :–**

भांडवलशाही समाज व्यवस्थेत उत्पादन साधनाची मालकी नसणारा आणि भांडवलदाराच्या नियंत्रणाखाली शारीरिक कष्ट करणाऱ्या कामगार वर्गाचा उदय झाला. अशा वर्गामध्ये कालांतराने भांडवलदारांच्या विरूद्ध संघर्ष करण्याची भावना वाढत जाते.

### २. संपत्ती अथवा भांडवलाला महत्त्व :–

मार्क्सच्या मते, भांडवलशाही समाज व्यवस्थेत व्यक्तीचे वर्तन हे संपत्तीशी असलेल्या संबंधावरून ठरते. तसेच व्यक्तीचे स्थान तिच्या आर्थिक उत्पादनाच्या साधनांच्या मालकी हक्कावरून ठरते. वर्गजाणिवेची वाढ आणि उत्पादन साधनाची मालकी यातील विषमता यामुळे भांडवलदार व कामगार यांच्यात संघर्ष निर्माण होतात.

### ३. दारिद्र्यामध्ये वाढ :–

भांडवलशाही समाज व्यवस्थेत भांडवलदारांकडून कामगारांची जी आर्थिक पिळवणूक केली जाते, त्यामुळे सतत कामगाराच्या दारिद्र्यात वाढ होत जाते. उपासमार, आजार, भूकबळी याचे प्रमाण वाढत जाते. याउलट भांडवदाराचे जीवन मात्र ऐषाआरामाचे बनते.

### ४. दुरावा किंवा अलगता :–

मार्क्सच्या मते, भांडवलशाही समाज व्यवस्थेत आर्थिक पिळवणूक आणि कामाच्या ठिकाणची अयोग्य परिस्थिती यामुळे कामगाराच्या मनामध्ये उत्पादन प्रक्रियेविषयी दुरावा किंवा अलगतेची भावना वाढत जाते. उत्पादन प्रक्रियेविषयी आत्मीयता वाटत नाही.

### ५. आर्थिक सत्ता व अधिकाराचे केंद्रिकरण :–

मार्क्सच्या मते, ज्यांच्या हातात आर्थिक सत्ता असते त्यांना राजकीय सत्ता मिळविणे अवघड नसते. भांडवलदार वर्गाकडून नेहमी आपल्या आर्थिक सत्तेचा व अधिकाराचा वापर कामगार वर्गाची पिळवणूक करणे यासाठीच केला जातो. अशा वर्गाकडेच सत्ता व अधिकाराचे केंद्रिकरण झालेले असते. कामगार वर्ग मात्र अशा अधिकार किंवा सत्तेपासून वंचित होतो. परिणामत: कामगार वर्गामध्ये भांडवलदार वर्गाविरुद्ध वर्गसंघर्ष भावना वाढीस लागते.

### ६. साम्यवादाचा उदय :–

मार्क्सच्या वर्गसंघर्ष सिद्धांतातील सर्वात शेवटची महत्वपूर्ण बाब म्हणजे साम्यवाद किंवा समाजवादाचा उदय ही होय. मार्क्सच्या मते, जेव्हा उत्पादन प्रक्रियेत कामगार वर्गाची सत्ता प्रस्थापित होईल अशावेळी संपत्तीच्या खाजगी मालकी हक्कातील विषमतेमुळे निर्माण होणारी वर्गव्यवस्थाच नष्ट होईल आणि वर्ग विरहीत समाज उदयास येईल. यालाच मार्क्सने साम्यवाद असे नाव दिले. अशा समाज व्यवस्थेत प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या कुवतीनुसार उत्पादन प्रक्रियेत सहभाग घेऊ शकेल. त्याचा हा सिद्धांत स्तरीकरणाचा सिद्धांत नसून तो सामाजिक परिवर्तनाचा व्यापक असा सिद्धांत आहे. तसेच हा सिद्धांत म्हणजे समग्र समाजपरिवर्तनाचे एक साधन आहे. या सिद्धांताच्या सखोल अभ्यासानंतर आपणास एक गोष्ट मान्य करावी लागेल, ती म्हणजे मार्क्सचा वर्गसंघर्ष सिद्धांत वस्तुस्थितीनिदर्शक होता.

*** स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्न-२ ***

१. समाजात कोणत्या प्राथमिक वस्तुस्थितीच्या आधारे इतरांशी संबंध निश्चित केले जातात?

२. समाजाच्या आर्थिक रचनेमध्ये कोणत्या गोष्टी समाविष्ट केल्या जातात?

३. कोणत्या गोष्टीमुळे वर्ग संबंध आणि वर्ग संघर्ष प्रस्थापित होतात?

४. वर्ग जाणीव म्हणजे काय?

५. मार्क्सच्या वर्ग संघर्ष सिद्धांतातील महत्त्वाच्या बाबी कोणत्या?

६. साम्यवाद म्हणजे काय?

### ३.२.३ अलगतेचा सिद्धांत (Theory of Alienation) (मार्क्सचा कामगार परात्मतेचा सिद्धांत)

कार्ल मार्क्सचा कामगार वर्गाची अलगता किंवा कामगारांचे अलिप्ततेचे धोरण हा विचार देखील महत्वाचा म्हणून ओळखला जातो. त्याच्या मते, अलगता हे भांडवलशाहीचे वैशिष्ट्य असून त्यातील उत्पादन प्रक्रियेत कामगारांची अलगता सातत्याने दिसून येते. त्याने आपला वरील विचार भौतिकवादी दृष्टिकोणातून स्पष्ट केला आहे. ''अलगता, अलगीकरण किंवा परात्मता म्हणजे एखाद्या समाजापासून अलग होणे अथवा त्यामध्ये जाणीवपूर्वक असहभाग दाखविणे होय.''

मार्क्सने भांडवलशाही समाज व्यवस्थेमधील कामगारांची अलगता पुढीलप्रमाणे दर्शविली आहे. भांडवलशाही उत्पादन व्यवस्थेत भांडवलदार वर्ग हा कामगारांच्यावर सातत्याने आपले वर्चस्व निर्माण करतो. त्याला आपला गुलाम समजतो. तसेच या वर्गाला आपल्याच अंकित ठेवण्याचा प्रयत्न करतो. त्यांच्याकडून फक्त शारीरिक श्रम करून घेतले जातात. मात्र त्याना कामाचा योग्य मोबदला दिला जात नाही. अशावेळी उत्पादन प्रक्रियेतील कामगार आपोआप अलग होतो अथवा उत्पादन प्रक्रियेबाबत अलीप्ततेचे धोरण स्वीकारतो. यातूनच भांडवलदार आणि कामगार यांच्यामध्ये संघर्षाला सुरुवात होते. मार्क्सच्या मते, अलगता, दुरावा आणि विनमुखता या मुळच्या समाजशास्त्रीय संकल्पना आहेत. मार्क्सचा हा विचार हेगेल व फ्युअर बॅच यांच्या संकल्पनांच्या मुळाशी असुन मानवाच्या नशिबानुसार आत्मीक समाधानाचे ध्येय, शेवट आणि परिस्थिती याबरोबरच मानवी गरजा पुरेशा प्रमाणात पूर्ण न होणे, व्यक्ती असमाधानी असणे आणि कामगाराना कामाचा योग्य मोबदला न देणे याचे हे चित्रण आहे.

फ्युअर बॅचने समाजरचनेचे स्पष्टीकरण द्वंद्वात्मक आणि ऐतिहासिक भौतिकवादाशी निगडीत केले आहे. त्यांच्या मते, अलगता आणि समाजाची रचना यांचा संबंध प्रेरणा, वर्ग संघर्ष व राजकीय कृतीशी असतो. मार्क्सने मात्र मानवी स्वभाव आणि निसर्ग यांना अधिक महत्व दिले. मार्क्सच्या मते, भांडवलशाहीमध्ये उत्पादन, देवाण घेवाण आणि समाजातील कामाची विभागणी यांचा संबंध संपत्तीशी असतो. जेव्हा कामगारांच्यावर स्वत:ऐवजी इतरांचे नियंत्रण असते आणि उत्पादन प्रक्रियेशी निगडीत त्यांचे इतराशी संबंध संघर्षयुक्त असतात, अशावेळी कामगार अलगतेचे धोरण स्वीकारतात.

### ❒ कामगारांच्या आर्थिक क्षेत्रातील अलगतेच्या अथवा अलीप्ततेच्या बाजू (कामगार अलीप्ततेचे प्रकार)

कार्ल मार्क्सने भांडवलशाही समाज व्यवस्थेमध्ये कामगारांची आर्थिक क्षेत्रातील अलगता अतिशय महत्त्वपूर्ण समजून अशा अलगतेला खालील चार बाजू असल्याचे नमूद केले. उदा. (१) कामगारांची उत्पादनातील अलगता (२) कामगारांच्यामध्ये वस्तुपासून आढळणारी अलगता (३) कामगाराला स्वत:पासून अलगता वाटू लागते (४) समाजापासून कामगार अलिप्ततेचे धोरण स्वीकारतो. मार्क्सने कामगार अलीप्ततेचे चार प्रकार सांगून त्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे केले आहे.

**१. कामगारांची उत्पादनातील अलगता :** भांडवलशाही उत्पादन पद्धतीत कामगार हा महत्त्वपूर्ण घटक असून त्याला स्वत:चे अस्तित्व टिकविण्यासाठी त्यामध्ये मन लावून काम करावे लागते. परंतु उत्पादित मालावर त्याचा कोणताही मालकी हक्क नसतो. सर्व प्रकारचे स्वामित्व भांडवलदाराचेच असते. तो उत्पादन साधनांचा मालक न राहता गुलाम बनतो. कामाविषयी वाटणारी आत्मीयता नष्ट होऊन त्याविषयी परकेपणा वाटू लागतो. त्यातूनच कामगारांमध्ये अशा उत्पादन प्रक्रियेविषयी अलगतेची भावना वाढीस लागते. थोडक्यात, स्वत: तयार केलेल्या मालावर जर आपला अधिकार नसेल तर असा कामगार उत्पादन पध्दतीपासून अलग होत जातो.

**२. वस्तूंपासून अलगता :** मार्क्सने नैसर्गिक संपत्ती आणि मानवी श्रम या दोन गोष्टी वेगळ्या मानल्या. जोपर्यंत निसर्ग ही संपत्ती मानून तिच्यावर उपजीविका होत असते तोपर्यंत कोणताही दुरावा व्यक्तीमध्ये असत नाही. परंतु जेव्हा मानव उत्पादित वस्तूंवर स्वत:ची मालकी प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा दुरावा अथवा अलगतेचा प्रारंभ होतो. उदा. आधुनिक काळातील उत्पादन प्रक्रियेत भांडवलदारांचा निर्मित वस्तूंवर अधिकार असतो. कामगाराला फक्त श्रम करावे लागतात. स्वत:चे श्रम विकून अथवा अतिशय कष्ट करून श्रमाची अल्प किंमत मिळते. त्याचे अतिरिक्त मूल्य अथवा फायदा त्याच्याऐवजी भांडवलदारालाच मिळतो. दिवसेंदिवस कामगार फायद्यापासून अलग होतो. यातूनच मालक-कामगार वर्ग-संघर्ष तीव्र बनतात. भांडवलदार दिवसेंदिवस धनवान तर कामगार दिवसेंदिवस फायद्यापासून अलग होतो. ओघानेच कामगारांमध्ये वस्तूंपासून अलगता निर्माण झाल्याचे दिसून येते.

**३. स्वत:पासून अलगता :** मार्क्सच्या मते, कामगारांनी भरपूर कष्ट करून देखील उत्पादित मालावर तसेच त्यापासून मिळणाऱ्या फायद्यांवर त्यांची मालकी नसेल तर कामगार वर्गांची कामाविषयी वाटणारी आत्मीयता कमी होते. त्याविषयी परकेपणा वाटू लागतो. आपले कष्ट स्वत:साठी नसून दुसऱ्यासाठी आहे, अशी भावना निर्माण होते. याचा परिणाम म्हणजे अशावेळी त्या कामगाराला स्वत:पासून अलगता वाटू लागते.

**४. समाजापासून अलगता :** भांडवलशाहीमध्ये कष्ट करणारा वर्ग (मजूर अथवा कामगार) दिवसेंदिवस गरीबच होत जातो. श्रमाच्या मोबदल्यात त्याला कमी वेतन मिळाल्याने त्याची श्रमशक्ती कमी होते. याउलट, अतिरिक्त मूल्याची सतत वाढ होत जाते. भांडवलदाराची मक्तेदारी आणि साम्राज्यवाद सुरू होतो. भांडवलदार व कामगार यांच्यामध्ये संघर्ष भावना वाढीस लागते. यामध्ये भांडवलदार वर्ग नेहमी शक्तिमान

बनतो. तो पैशाच्या जोरावर कामगारांचे आर्थिक शोषण करू लागतो. अशा वेळी कामगार वर्ग आपण कोणासाठी कष्ट करायचे? समाजाचे हित कशासाठी पाहायचे? या प्रवृत्तीचा बनतो. ओघानेच तो समाजापासून अलगतेचे धोरण स्वीकारतो.

थोडक्यात जेव्हा कामगारांचा उत्पादित मालावर कोणताही मालकी हक्क नसतो तेव्हा ओघानेच कामगारांच्यामध्ये उत्पादन प्रक्रिये विषयी दुराव्याची अथवा अलगतेची भावना वाढीस लागते. यातूनच मालक -कामगार वर्ग संघर्ष तीव्र बनतात. जेव्हा कामगारांच्यावर इतरांचे नियंत्रण असते अशावेळी वस्तूंचे उत्पादन, उत्पादनाची साधने व त्याची मालकी आणि उत्पादन प्रक्रियेशी असणारा संबंध इत्यादीबाबत कामगार वर्गाची`अलगता निदर्शनास येते. समाजरचनेत हा कामगार वर्ग नेहमी अलग राहिलेला जाणवतो. यालाच मार्क्सने कामगार वर्गाची अलगता असे संबोधिले आहे. भांडवलशाहीचा जसा विकास होतो, त्याप्रमाणात समाजात वर्ग संघर्ष वाढत जातात. कष्ट करून देखील योग्य मोबदला मिळणार नसेल तर कामगारांची उत्पादन प्रक्रियेत दुराव्याची भवना निर्माण होते. एक वर्ग दुसऱ्या वर्गापासून अलगतेचे धोरण स्विकारतो.

**※ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ ※**

१. मार्क्सच्या मते अलगता हे कोणत्या समाज व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे ?

२. मार्क्सने भांडवलशाहीमधील कामगाराच्या अलगतेचे स्पष्टीकरण कसे केले ?

३. मार्क्सचा कामगार वर्गाची अलगता हा विचार कोणाच्या संकल्पनेच्या मुळाशी आढळून येतो?

४. फ्युअर बॅचने समाजरचनेचे स्पष्टीकरण कोणत्या संकल्पनाशी निगडीत केले आहे?

५. मार्क्सने कामगारांच्या आर्थिक क्षेत्रातील अलगतेच्या कोणत्या बाजू मांडल्या आहेत? अथवा कामगार परात्मतेचे कोणते प्रकार सांगितले?

## ३.३ सारांश

कार्ल मार्क्सने या घटकात द्वंद्वात्मक भौतिकवाद, वर्गसंघर्ष आणि कामगार वर्गाची अलगता इत्यादी संकल्पनांचा सैद्धांतिक दृष्टीने आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्याने उत्पादन पद्धतीशी निगडीत मानवी संबंध, उत्पादन साधनाची मालकी आणि भांडवलदार व कामगार वर्गामधील वर्गसंघर्ष जाणीव इत्यादीचे वास्तव विवेचन केले आहे. वस्तुच्या उत्पादनावर श्रमीकांचा मालकी हक्क नसल्याने हा वर्ग उत्पादन साधनापासून अलगतेचे धोरण स्वीकारतो. त्याच्या तत्त्वज्ञानाच्या मुळाशी त्याचा प्रत्यक्ष अनुभव असल्याने, सामाजिक विचारांच्या क्षेत्रात त्याने वरील महत्त्वपूर्ण सिद्धांताद्वारे जे योगदान केले ते अद्वितीय आहे. त्याच्या विविध सिद्धांतांनी जगाचा नकाशाच बदलून टाकला. भांडवलशाहीच्या शोषणाविरुद्ध मार्क्सने आवाज उठविला आणि श्रमिकांची न्याय बाजू घेतली. त्यामुळे तो **श्रमिकांच्या ह्दयातील सम्राट** बनला. श्रमिकांमध्ये जागृती निर्माण करून क्रांतीच्या मार्गाने वर्गविरहीत समाजाची स्थापना करता येईल. यालाच कार्ल मार्क्सने साम्यवाद किंवा समाजवाद हे नाव दिले.

## ३.४ पारिभाषिक शब्द किंवा संज्ञा

- **द्वंद्वात्मक भौतिकवाद :** जगातील प्रत्येक बदलाचे कारण द्वंद्व.
- **वर्ग संघर्ष :** उत्पादन पद्धत व उत्पादन संबंध या आर्थिक रचनेशी निगडीत विचार.
- **कामगारांचे अलगतेचे धोरण :** भांडवलशाहीचे वैशिष्ट, कामगारांचा मालकी हक्क वंचित अथवा कामगारांची उत्पादन प्रक्रियेत दुराव्याची भावना.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

*** स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे-१ ***

१. मार्क्सच्या सिद्धांताचे स्वरूप हेगेलेच्या सिद्धांताच्या विरुद्ध आहे.

२. मार्क्सने हेगेलची द्वंद्वात्मक संकल्पना स्वीकारली परंतू कल्पनावादास नकार दिला आहे.

३. मार्क्स आणि एंजेल्सने वस्तूंची प्रक्रिया आणि स्वरूप हे जगातील वस्तुस्थितीशी संबंधीत असल्याचे स्पष्ट केले आहे.

४. अंतर्विरोधामुळेच द्वंद्वात्मक संघर्ष होऊन त्यातून विकास घडत येतो. हे मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवादाचे ठळक वैशिष्ट्य आहे.

५. मार्क्सने द्वंद्वात्मक भौतिकवाद सिद्धातामध्ये कल्पना शक्तीपेक्षा भौतिक घटकास जबाबदार धरले.

*** स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे-२ ***

१. मानवाचा भौतिक जगाशी संबंध हा प्राथमिक वस्तुस्थिती व इतरांशी कसा सबंधित आहे.

२. वस्तूंचे उत्पादन आणि उत्पादन साधने, त्यांचा मानवाशी तसेच संपत्तीशी असणारा संबंध या बाबी आर्थिक रचनेशी निगडीत असतात.

३. उत्पादन साधनाशी संबंध व त्यातून निर्माण होणारा वर्ग संबंध

४. उत्पादन आणि वितरण यामध्ये एक प्रकारची 'बळी तो कान पिळी' अशी मक्तेदारी निर्माण झाल्याने उदयास येणारी जाणीव.

५. कामगार वर्गाचा उदय, संपत्तीला महत्व, दारिद्र्यामध्ये वाढ, कामगार अलगता, अधिकाराचे केंद्रिकरण, साम्यवादाचा उदय.

६. ''समाज व्यवस्थेत प्रत्येक व्यक्तीचा स्वत:च्या कुवतीनुसार उत्पादन प्रक्रियेत सहभाग. तसेच वर्गविरहीत समाजाचा उदय म्हणजे साम्यवाद होय.''

❊ **स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे–३** ❊

१. भांडवलशाही समाजव्यवस्थेचे वैशिष्ट्य.

२. भांडवलदार वर्ग सातत्याने कामगारांच्यावर आपले वर्चस्व निर्माण करतो, त्याना आपला गुलाम समजतो आणि आपल्याच अंकित ठेवण्याचा प्रयत्न करतो.

३. हेगेल व फ्युअर बॅच.

४. द्वंद्वात्मक आणि ऐतिहासिक भौतिकवादाशी निगडीत.

५. उत्पादन, वस्तु, स्वत:पासून आणि समाजापासून अलगता अथवा अलिप्तता.

## ३.६ सराव किंवा गृहपाठ

१. कार्ल मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवादावर टीप लिहा.

२. वर्गसंघर्षाची व्याख्या लिहा.

३. कामगार वर्गाची अलगता म्हणजे काय?

## ३.७ अधिक वाचनासाठीची पुस्तके


१. Aron, Raymond : Main Currents in Sociological Thought (Vol. I & II)

२. Bogardus E.S : Development of Sociological Thought

३. Barnes H.E : 'An Introduction to the History of Sociology', Phoenix Books. The University of Chicago Press London 1966

४. Cohen P. S. : 'Modern Social Theory'

५. Coser, Lewis A : 'The Masters of Sociological Thought'

६. Fletcher R. : 'The Making of Sociology' (Vol. I & II)

७. Mohite, Salunkhe : Samajashastriya Vicharvant, Phadake Prakashan, Kolhapur.

८. Marulkar Vijay : Samajshastriya Vicharancha Itihas, Prachi Prakashan, Mumbai.

९. Vaidhya N. S. : Samajshastriya Vichar Parampara, Vidhya Prakashan, Nagpur.


❏❏❏

# घटक – ३
# एमिल डुरखाईम (१८५८–१९१७)

**घटक संरचना:**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्तावना

३.२ विषय विवेचन

३.२.१ सामाजिक सत्याचा अभ्यास

३.२.२ श्रमविभाजनाचा सिद्धांत

३.२.३ आत्महत्येचा सिद्धांत

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक संज्ञा

३.५ स्वयं:-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठीचे प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील गोष्टी साध्य होणार आहेत.

- सामाजिक सत्य आणि त्याच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास जाणून घेणे.
- श्रमविभाजनाचा सिद्धांत समजून घेता येईल.
- आत्महत्या सिद्धांत समजून घेणे.

## ३.१ प्रस्तावना

ऑगस्त कॉम्तचा वारसा चालविणारा, समाज शास्त्रात वैज्ञानिक अभ्यास पद्धतीचा पुरस्कार करणारा आणि सामाजिक वर्तनाचा सत्य संकल्पनेद्वारे विचार करणारा एक फ्रेंच विचारवंत म्हणुन डुरखाईमकडे पाहिले जाते.

डुरखाईम हा एक हुशार विद्यार्थी आणि तत्त्ववेत्ता म्हणून ओळखण्यात आला होता. तो प्रत्येक गोष्टीचा तत्त्वज्ञानासारखा अभ्यास करीत होता. समाज शास्त्राला अधिक सामाजिक व शास्त्रीय स्वरुप प्राप्त करून

देण्यामध्ये डुरखाईमचा सिहांचा वाटा आहे. त्याने मानव समाजाचे शास्त्रशुद्ध अध्ययन हेच आपले जीवित कर्तव्य मानले. समाज हा व्यक्तिपेक्षा श्रेष्ठ व महत्त्वाचा आहे असे समजून डुरखाईमने आपले सर्व सिद्धांत मांडले.

फ्रेंच विचारवंत डुरखाईमने खालील तीन उपघटकामध्ये आपले सैद्धांतिक विचार मांडले आहेत. उदा. (१) सामाजिक सत्य संकल्पना, (२) आत्महत्या सिद्धांत, (३) श्रमविभाजनाचा विचार

### ३.२.१ 'सामाजिक तथ्य' संकल्पनेचा अभ्यास (The Study of Social Facts)

डुरखाईमने सामाजिक सत्याचे स्पष्टीकरण देताना नवीन शास्त्राचा उपयोग करणे आवश्यक आहे असे मत मांडले. सामाजिक सत्य जाणून घेणे हा समाजशास्त्राचा मुख्य अभ्यासविषय असल्यामुळे वैज्ञानिक अभ्यास पद्धतीचा स्वीकार ही काळाची गरज आहे असे डुरखाईमला वाटते. सामज शास्त्रज्ञांनी आपला अभ्यास हा केवळ संकल्पनांच्या आधारे न करता तो सामाजिक सत्याच्या आधारे करावा असे मत मांडले. अर्थात त्यासाठी वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब, व्यक्तिगत आवडी निवडीकडे दुर्लक्ष आणि सामाजिक घटनांच्यामधील कार्यकारण संबंध शोधुन त्याचे विश्लेषण करावे यासारखे मार्ग सुचविले.

❒ **सामाजिक तथ्याची वैशिष्ट्ये :–**

डुरखाईमने आपली 'सामाजिक तथ्य' संकल्पना विषद करताना या संकल्पनेची खालील विविध ठळक वैशिष्ठे सांगितली.

अ) सामाजिक सत्य अथवा तथ्ये ही समाजातील बाह्य स्थितीशी संबंधित आहेत.

ब) अशी तथ्ये वेगळी आणि प्रस्थापित समाजाशी संबंधित आहेत.

क) ती मानवी मर्यादा पलिकडे निसर्गाशी संबंधित असतात.

ड) सत्य जाणून घेण्यासाठी अभ्यासकाने आपल्या अनुभवाचा तसेच विचारांचा उपयोग करावा.

थोडक्यात सामाजिक सत्यावरच मानवी जीवन आधारित असल्याने त्यात कोणताही बदल होत नाही. शिक्षण आणि सवयी या मानवाशी संबंधित आहेत. या गोष्टी समाजाची गरज म्हणून ओळखल्या जातात. त्यामुळे त्या मानवी श्वासाप्रमाणे सर्वाना परिचित आहेत. उदा. सर्व लोक सूप हे चमच्याने पितात, परंतु ते जर सरळ पिले तर काही तरी अमान्य गोष्ट घडत आहे असे वाटते.

डुरखाईमच्या मते, समाजात नेहमीच सामाजिक सत्य योग्य नसते. उदा. कायदे. परंतु सामाजिक सत्य हे नेहमीच अस्तीत्वात असते. ठराविक ठिकाणी आणि ठराविक प्रदेशात सामाजिक सत्यामध्ये बदल होत असतात. या सर्व मुद्यांच्या आधारे डुरखाईम असे सुचित करतो की, सामाजिक सत्य हे एक नवीन शास्त्र आहे. त्याचा अभ्यास म्हणजे समाजशास्त्राचे अभ्यासक्षेत्र होय.

## ❒ सामाजिक तथ्याच्या निरीक्षणासाठीचे नियम :–

डुरखाईमने आपली सामाजिक सत्य संकल्पना विशद करताना सामाजिक सत्याच्या निरीक्षणासाठीचे खालील ६ नियम सांगितलेले आहेत.

### १. सामाजिक तथ्याचा वस्तू म्हणून विचार करणे :–

डुरखाईमच्या मते, समाजशास्त्र म्हणजे सामाजिक तथ्यांचा अभ्यास होय. सामाजिक तथ्ये ही वस्तु सारखी असतात. ती मनात नसतात तर त्याचे बाहेर जावून निरीक्षण करावे लागते. सामाजिक सत्याचा वस्तुस्थितीशी संबंध जोडू नये. आत्म परिक्षणाकडे दुर्लक्ष करावे परंतु निरीक्षण आणि प्रयोग याना महत्व द्यावे याचाच अर्थ सामाजिक सत्याना वस्तु म्हणुन मानले जावे. उदा. व्यक्तींच्या फॅशन्स.

### २. व्यक्तीगत मतप्रणाली आणि सामाजिक तथ्य याचा स्वतंत्र विचार करणे :–

डुरखाईमने सामाजिक सत्याचा हा दुसरा नियम विषद करून त्याद्वारे सामाजिक सत्याची खात्री व्यक्तीगत मतप्रणालीतून न करता ती निरीक्षणातून करून घेतली पाहिजे असे म्हटले. याचा अर्थ सामाजिक घटकांची माहिती जशी असेल तशी ती स्वीकारली पाहिजे. दोहोंचा विचार स्वतंत्रपणे केला गेला पाहिजे. म्हणजेच वैयक्तिक भूमिका बाजूला ठेवली पाहिजे. तरच घटनेची सत्य माहिती मिळू शकते.

### ३. पूर्व संकल्पनांचे निर्मूलन :–

डुरखाईमने सामाजिक सत्याचा पूर्व संकल्पनांचे निर्मूलन हा तिसरा नियम सांगितला. सत्य जाणून घेण्यासाठी अभ्यासकाने आपल्या अनुभवाचा तसेच विचारांचा उपयोग करावा. अनावश्यक संकल्पना अथवा पूर्व ग्रहांचा त्याग करावा, तरच अभ्यासामध्ये वस्तुनिष्ठता येवू शकेल.

### ४. घटनांशी संबंधित तथ्यांचे बाह्य वैशिष्ट्यानुसार पूर्वस्पष्टीकरण करणे :–

डुरखाईमच्या मते, कोणत्याही अभ्यासकाला आपले अध्ययन कार्य सखोल व प्रगत करण्यासाठी घटनेशी संबंधित बाह्य वैशिष्ट्यांचे पूर्वस्पष्टीकरण करणे गरजेचे असते. उदा. बेकारी आणि गुन्हेगारीची प्रवृत्ती अथवा दारिद्रय आणि वाढते जनन प्रमाण असे स्पष्टीकरण केल्यामुळे आपले अध्ययन कार्य अधिक प्रगत व तंतोतंतपणे करता येते.

### ५. सामाजिक तथ्य हे मानवी प्रकटीकरणाच्या पलीकडचे असले पाहिजे.

### ६. सामाजिक तथ्याचा अभ्यास निरीक्षणाद्वारे केल्यामुळे निश्चीत व सुस्पष्ट होतो.

अशारीतीने डुरखाईमने आपल्या सामाजिक सत्य संकल्पनेद्वारे सामाजिक तथ्याना एक वस्तु मानून त्याचा अभ्यास करावा म्हणजे निश्चित व स्पष्ट स्वरुपात सत्य प्रकट करणे शक्य होईल असा विचार मांडला. याचा अर्थ सामाजिक घटनांचा अभ्यास करताना मानवी भावना, पूर्वग्रह आणि व्यक्तीगत घटकांना महत्त्व देऊ नये असा विचार विशद केला.

* **स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१**

१. सामाजिक सत्याचे अस्तीत्व वैयक्तिक ज्ञानाच्या पलीकडे का असते?

२. सामाजिक सत्याची वैशिष्ट्ये कोणती?

३. व्यक्तीला सामाजिक सत्यामध्ये सहभागी का व्हावे लागते?

४. सामाजिक सत्याचे डुरखाईमने कोणते नियम सांगितले?

५. सामाजिक सत्यास वस्तु म्हणून संबोधण्याची गरज का आहे?

## **३.२.२ श्रम विभाजनाचा सिद्धांत** (Theory of division of labour)

दि डिव्हिजन ऑफ लेबर इंन सोसायटी या एमिल दुरखाईम श्रमविभाजन विषयी आपले विचार व्यक्त केले आहे श्रमविभाजन ही या ग्रंथांमधील केंद्रीय संकल्पना आहे. दुरखाईमला श्रमविभाजना मध्ये अभिप्रेत असलेला अर्थ, श्रमविभाजनाची सज्ञा, समाजातील श्रमविभाजनाचे प्रकार्य अथवा परिणाम आणि श्रमविभाजनाची विकृती रूपे याचे सामान्य परिणाम हा या ग्रंथातील प्रमुख कल्पनांचा परिचय देण्यात आला आहे.

**श्रमविभाजन या संज्ञेचा अर्थ:**

व्यक्तीमध्ये कामाचे विभागणी करावी व त्या कामाचे वाटप करावे असा सर्व साधारण श्रमविभाजन याचा अर्थ आहे. कोणत्या ही कारखान्यात काम करणारे कामगार एखाद्या उत्पादनाचे विशिष्ट भाग आपसात वाटून घेतात आणि ते परस्पर आपले काम करत असतात त्यानंतर त्या कामातील शेवटचा भाग म्हणून सर्वांचे काम स्वतंत्र अशा विभागाकडे दिले जाते. ते उत्पादन निर्मितीसाठी सर्व कामगारांचे श्रम एकत्र एकवटलेले असते त्यांच्या श्रमाचे त्या उत्पादनासाठी विभागणी झालेली असते यातून अनेक उत्पादनाची निर्मिती होते यामध्ये स्कूटर, विमान, संगणक, मोटार, रेफ्रिजरेटर, यंत्र आधी सर्व औद्योगिक उत्पन्नाबाबत विविध क्षेत्रात श्रम विभाजन या प्रकारे दिसून येत असते. श्रमविभाजन या संज्ञेचा आधुनिक उत्पादनास संदर्भात हाच सर्वसामान्य अभिप्रेत असा अर्थ आहे. पण दुरखीमने अशा मर्यादित अर्थाने श्रमविभाजन ही संज्ञा वापरली नाही हे लक्षात घेणे आवश्यक आहे.दुरखाईंने स्वतः श्रम विभाजन या संज्ञेचा अर्थ शास्त्रज्ञांना आणि समाज शास्त्रज्ञांना अभिप्रेत असणाऱ्या अर्थाबद्दल भेद स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते उत्पादनाचा दर किंवा उत्पादनाचे प्रमाण वाढवण्याच्या प्रधान हेतूने श्रमाचे विभाजन करून विविध कामगारांना विविध विशिष्ट कामे वाटून देणे असा अर्थ शास्त्रज्ञांना अभिप्रेत असलेला सर्व विभाजनाचा अर्थ आहे. पण दूरखीमला श्रमविभाजन नावाचा अर्थ याहून व्यापक आणि अभिप्रेत अर्थ होता. त्यांच्या दृष्टिकोनातून, आर्थिक क्षेत्रात दिसून येणारे श्रम विभाजन हे संपूर्ण समाजातील विभाजनाचे-सामाजिक श्रमविभाजनाचे केवळ वरचेवर चे एक रूप आहे. मग दूर की मला अभिप्रेत असलेला श्रमविभाजन आजचा व्यापक आणि मूलभूत अर्थ

कोणता? श्रम विभाजन म्हणजे सामाजिक विभेदन अथवा समग्र समाजाचा संरचनेत घरून येणारे निवेदन होय. सामाजिक संरचनेत विभाजन करून आल्यामुळे समाजातील कार्याचे विशेषीकरण होत जाते व प्रत्येक व्यक्तीला विशिष्ट कार्य प्राप्त होते. परिणामी व्यक्ती व्यक्ती व समूह समूहात परस्पर सहकार्य व परस्परावलंबन निर्माण होऊन जैविक ऐक्यभाव निर्माण होतो. परिणामी व्यक्ती व्यक्तित्व समुहा समूहात परस्पर सहकार्य व परस्परावलंबन निर्माण होऊन जैविक ऐक्यभाव निर्माण होतो. अशाप्रकारे सर्व श्रमविभाजन हे आधुनिक औद्योगिक समाजात ऐक्य निर्माण करणारे तत्त्व बनते. एमिल दुरखीमने श्रम विभाजन ही संज्ञा वरील अर्थाने वापरले आहे. दुसऱ्या शब्दात, सामाजिक संरचनेतील विभेदन, कार्याचे विशेषीकरण, व्यक्तीभेदावर आधारित त्यांचे समाज सदस्यांमधील वितरण आणि परिणामी निर्माण होणारी परस्पर सहकार्याची आणि परस्परावलंबाची एक्यभाव साधक सामाजिक प्रक्रिया अशा अर्थाने दुरखीमने श्रमविभाजन ही संज्ञा वापरली आहे.

औद्योगिक क्षेत्रात विविध विशिष्ट व्यवसायाचा आणि भूमिकांचा होणारा विकास म्हणजे समग्र समाजात घडून येणाऱ्या मूलभूत संरचनात्मक सामाजिक विभेदनाची अभिव्यक्ती असते असे दूरखीमने प्रतिपादन केले आहे.

**श्रमविभाजनाची कारणे–** (Causes of Division of Labour)

सामाजिक तत्त्वांचा शास्त्रीय अभ्यास समाजशास्त्रात झाला पाहिजे अशी दुर्खीम ची भूमिका होती. एका सामाजिक तत्त्वाची स्पष्टीकरण व इतर सामाजिक तत्त्वाच्या आणि समग्र समाजाच्या संदर्भात दिले गेले पाहिजे असाही त्यांचा आग्रह होता. जैविक आणि मानसशास्त्रीय पातळीवर तत्त्वांच्या आधारे सामाजिक व त्याचे स्पष्टीकरण करणे त्यांना मान्य नव्हते. सामाजिक कार्याचे स्पष्टीकरण देताना ही, सामाजिक तथ्यांचे कारणे त्यांचे कार्य या दोहोंचा स्वतंत्र शोध घेतला जावा, असा दुर्खीमचा पद्धती शास्त्रीय दृष्टिकोन होता. दुर्खीमने स्वतः केलेल्या संशोधनात ही त्याने त्यावरील पद्धती शास्त्रीय दृष्टिकोनाचा अवलंब केला आहे. समाजातील श्रमविभाजन या त्यांच्या पहिल्या ग्रंथात ही याची प्रचिती येते. श्रमविभाजन करून येण्यास जबाबदार असलेली दुर्खीम ने दिलेली कारणे कोणती हे पाहण्यापूर्वी त्यांचे श्रमविभाजनाची कोणत्या प्रकारचे कारणमीमांसा नाकारले होते हे पाहणे उचित ठरेल. श्रमविभाजन का घडून येते? या प्रश्नाच्या उत्तरा दाखल उपयुक्ततावादी विचारवंत, अर्थशास्त्रज्ञ हेतूलक्षी स्पष्टीकरण देत होते. त्यानुसार सर्व विभाजनामुळे उत्पादनात प्रचंड प्रमाणात वाढ घडून येते आणि परिणामी एकूण आर्थिक संपन्नता भौतिक सुबत्ता आणि मानवी सुखासमाधानात वाढ होते. श्रमविभाजनाच्या उपयुक्ततेवर ती या स्पष्टीकरणात भर होता. तसेच आर्थिक संपन्नता आणि मानवी सुख-समाधानात वाढ घडून यावी या हेतूने माणूस श्रमविभाजनाचा विकास घडवून आणतो. आशा हेतूलक्षी स्वरूपाचे स्पष्टीकरण होते. दुरखीमने श्रमविभाजनाचे वरील प्रकारचे स्पष्टीकरण दोन कारणासाठी नाकारलें. एक तर त्यांच्या मते मानवाच्या भौतिक संपन्नतेत व सुख समाधानात घडून येणारी वाढ हा श्रमविभाजनाचा परिणाम आहे, ते श्रमविभाजनाचे कारण होऊ शकत नाही. दुसरे असे की, श्रमविभाजनामुळे अपरिहार्यपणे मानवाच्या केवळ भौतिक सुखात वाढ होते. एवढेच नाही, त्याचे अनिष्ट परिणाम होऊ शकतात, झालेले दिसतात. एकोणिसाव्या शतकातील युरोपीय देशातील आत्महत्यांचे वाढते

प्रमाण हे याचे निदर्शक आहे. श्रमविभाजनाची कारणे शोधताना, मानवी समाजाच्या ऐतिहासिक उत्क्रांती प्रक्रियेकडे लक्ष देऊन खंडयुक्त समाजाच्या सामाजिक संघटना कसे विघटन घडून आले यावर दुरखीमने आपले लक्ष केंद्रित केले. खंडयुक्त समाजातील कुल किंवा आप्त संबंधावर आधारित समूह परस्पराहुन आलंग, स्वतंत्र आणि सापेक्षता स्वायत होते. त्या समूहात त्यातील व्यक्तीत फारशा आंतरक्रिया घडून येत नव्हत्या. कोणत्या कारणामुळे हे स्वायत, स्वतंत्र समूह परस्परांच्या जवळ येऊन, परस्परात विलीन झाले व त्यांच्यात आंतरक्रिया घडून येऊन विभेदन, श्रमविभाजन घडवून आले हे दुरखिमने स्पष्ट केले आहे. खंडयुक्त समाजाच्या सामाजिक विघटनात विघटन घडून येऊन सामाजिक परिवर्तन घडून येण्यास व त्याचबरोबर श्रमविभाजनात वाढ व विकास घडून येऊन त्यांचे आधुनिक औद्योगिक समाजात रूपांतर घडून येण्यास, दुरखाईमच्या मते पुढील तीन प्रमुख कारणे जबाबदार ठरली.

१) समाजाचा आकार वाढणे

२) समाजाची बहुतिक घनता वाढणे

३) समाजाची नैतिक घनता वाढणे.

ही कारणे परस्पर संबंधित असून ती संयुक्तरित्या सर्व विभाजनाच्या विकासावर जबाबदार आहेत असे दुरखीमचे प्रतिपादन आहे.

१) समाजाचा आकार वाढणे याचा अर्थ समाजातील लोकसंख्येत वाढ होऊन त्यांच्या प्रादेशिक सीमा विस्तारणे.

२) समाजाची भौतिक घनता वाढणे म्हणजे विशिष्ट भूप्रदेशातील लोकसंख्येचे वितरण किंवा लोकसंख्येची घनता वाढणे हे होय लोकसंख्येतील वाढीबरोबर समाजाची घनता वाढेल हे स्पष्ट आहे.

३) समाजाची नैतिक घनता वाढणे म्हणजे लोकांमधील पारस्परिक आंतरक्रिया वाढ होणे आंतरक्रिया ची व्याख्या आणि वारंवारता वाढत जाऊन त्यांच्यात सहकार्य भावना वाढत जाणे त्या आधारित समाजामध्ये संबंध प्रस्थापित होणे. वरील दोहोत, म्हणजे समाजाचा आकार आणि त्याची भौतिक घनता यात वाढ झाली म्हणजे त्याची परिनिती नैतिक घनता वाटण्यात होते व सर्वांच्या एकत्रित परिणामामुळे सामाजिक विभेदन वाढत जाऊन श्रमविभाजन विकास घडून येतो. प्रारंभीच्या खंड युक्त समाजात वरील तिन्ही कारणामुळे आधी स्वतंत्र, स्वायत्त असणारे समूह परस्परसंपर्कात आले. त्यांच्या प्रादेशिक सीमा विस्तारत जाऊन ती एकाच समाजाचे भाग बनले. स्वतंत्र, स्वायत्त खंड परस्परात विलीन झाले. सभोवतालच्या विशेष आणि प्रदेशातील आवश्यक अशी साधन सामग्री संपादन करण्यासाठी लोक व समूह परस्पर सहकार्याने कामाची परस्परात वाटणी करून घेऊ लागले. अशा रीतीने श्रमविभाजन अस्तित्वात आले असे दुर्खीमचे प्रतिपादन आहे. दुरखीमने डार्विनच्या सिद्धांताचा तत्वाच्या आधारे सामाजिक उत्क्रांती चे स्पष्टीकरण दिले आहे. विशिष्ट प्रदेशात प्राण्यांची संख्या वाढून भौतिक घनता वाढते तेव्हा त्यांच्या कार्याचे विशेषीकरण घडून येते. सामाजिक उत्क्रांती प्रक्रियेत लोकसंख्येची घनता व नैतिक घनता वाढून श्रमविभाजन अस्तित्वात आल्यामुळे अस्तित्वासाठी प्रत्येक

माणसाला इतरांशी जीवघेणी स्पर्धा करावी लागत नाही. प्रत्येकास इतर प्रत्येकाबरोबर स्पर्धा करण्याची गरज उरत नाही. अशा प्रकारे सामाजिक विभेदन हे जिवंत राहण्यासाठी व्यक्ती, व्यक्तित्व, समुह, समूहात चालणाऱ्या संघर्षाचे शांततामय निराकरण ठरते. प्राणी जगतातील अस्तित्वासाठी संघर्ष इतका टोकाचा असतो की काही प्राणी जिवंत राहण्यासाठी इतर काही प्राण्यांचे अस्तित्व संपुष्टात येते. म्हणजे अस्तित्वासाठी च्या त्यांच्या झगड्यात काही प्राणी इतर प्राण्यांना मारून खातात. पण मानवी समाजातील श्रमविभाजनामुळे सर्व माणसांचीच अस्तित्व टिकून राहते. प्रत्येक माणसाला केवळ इतर काय अशीच स्पर्धा करावी लागते. प्रत्येक जण आपले कार्य पार पाडत असताना एक प्रकारे सर्वांच्याच अस्तित्वासाठी योगदान देत असते. पण त्याच वेळी प्रत्येक जणाला स्वतंत्र, स्वायत्त से जीवन जगण्याची संधी मिळते. श्रमविभाजनामुळे उच्च पातळीवरील जैविक एक्केभाव निर्माण होऊन समग्र समाजाचेही अस्तित्व आणि सातत्य अबाधित राखले जाते.

**श्रमविभाजनाचे प्रकार्य/परिणाम:** (Functions/Consequences of Division Labour)

सामाजिक तथ्यांच्या संपूर्ण स्पष्टीकरणासाठी केवळ त्यांच्या कारणांचा शोध घेणे पुरेसे नाही तर त्यांच्या प्रकार्याचा शोध हि आवश्यक आहे असे दुरखींमचे प्रतिपादन होते. सामाजिक तथ्य आणि समाजाच्या गरजा या दोहोंत सुसंगत संबंध असल्याने दाखवून देणे म्हणजे त्या तथ्याचे प्रकार्य स्पष्ट करणे होय. सामाजिक तथ्य समाजाची एखादी वां अनेक गरजा भागवण्याचे कार्य कसे करते हे स्पष्ट करणे म्हणजे त्या तथ्या प्रकार्य स्पष्ट करणे होय. दुरमखींने श्रमविभाजनाची व्यवस्था समाजाची कोणती गरज भागवते हे स्पष्ट केले आहे. दुसऱ्या शब्दात, समाजाच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीने श्रमविभाजनाचे कोणते सकारात्मक परिणाम होतात हे दुरखीमने स्पष्ट केले आहे. उपयुक्तवाद्यांनी अर्थशास्त्रज्ञांनी निदर्शनास आणल्या प्रमाणे श्रमविभाजनामुळे उत्पादनात वाढ होऊन आर्थिक संपन्नतेत भर पडते हे दुरखीमला मान्य होते. पण त्यांच्या मते तो श्रमविभाजनाचा सापेक्षता गौण स्वरूपाचा म्हणजे कमी महत्त्वाचा परिणाम होय. श्रमविभाजनामुळे व्यापक समाजव्यवस्थेला कोणते योगदान लागते याकडे लक्ष देणे त्याला अधिक महत्त्वाचे वाटत होते. श्रमविभाजनाचा समाजावर होणारा माहिती परिणाम हा त्यामुळे होणाऱ्या आर्थिक लाभ यापेक्षा अधिक महत्त्वाचा आहे, असे दुर्खीमचे मत होते.दोन किंवा अधिक व्यक्ती मध्ये एक्यभावनेची निर्मिती करणे हे श्रमविभाजनाचे खरे प्रकार्य आहे. (it is true functions is to create between two or more people a feeling of solidaritus-Durkheim, quoted From lan craib,1997:66)

**समाजातील व्यक्ती–** व्यक्तीत, समूहा-समूहात सेवांचे आदान-प्रदान, पारंपारिक कर्तव्याची जाणीव, परस्पर सहकार्य आणि परस्परावलंबन निर्माण होणे हे समग्र समाजाच्या संदर्भातील विभाजनाची सकारात्मक परिणाम आहेत. या सर्वांची परिणीती ज्यात होते असे श्रमविभाजन प्रमुख प्रकार्य म्हणजे आधुनिक औद्योगिक समाजात उच्च पातळीवरील जैविक एक्यभाव निर्माण करणे होय. दुसऱ्या शब्दात श्रमविभाजनामुळे समाज एकसंध ठेवला जातो. (the division of labour holds society together). आणि हेच त्याचे प्रमुख का प्रकार्य आहे. सामाजिक ऐक्य ही समाजाच्या अस्तित्वासाठीची एक प्रमुख गरज आहे आणि तिची पूर्तता श्रमविभाजनामुळे होते. आधुनिक औद्योगिक समाजात श्रमविभाजनामुळे माणसाच्या व्यक्तिगत तेच्या

विकासाला चालना मिळते हा देखील श्रमविभाजनाचा एक महत्त्वाचा सकारात्मक परिणाम होय. प्राचीन, आदिम, खंडयूक्त समाजात व्यक्ती मध्ये समानता अधिक होती. सामूहिक जाणीव आणि तीव्र आणि प्रभावी होती. सामूहिक जाणीव व्यक्तीच्या व्यक्तिगत जाणीवेचा बहुतांशी भाग व्यापून टाकत होती. त्यामुळे ही आंतरिक ऐक्यभाव असणाऱ्या प्राचीन, आदिम समाजात व्यक्तीला व्यक्ती स्वातंत्र्य, स्वायत्तता नव्हती. व्यक्तिगततेच्या विकासाला वावच नव्हता. आता आधुनिक औद्योगिक समाजात त्याउलट स्थिती आहे. श्रमविभाजन जैविक ऐक्यभाव याचा आधारच मुळी व्यक्ती –व्यक्तीतील भेद हा आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे कार्यक्षेत्र मिळते, त्यात तिला स्वायत्ता असते. व्यक्तिगत क्षमतांच्या, स्वतंत्र्य व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यास संधी मिळते. आधुनिक समाजात सामूहिक जाणीवेची-समान श्रद्धा व मुल्ये यांची व्याप्ती अधिकाधिक संकुचित होत जाते. आणि त्याच प्रमाणात व्यक्तिगत जाणिवेची व्याप्ती वाढत जाते. म्हणजे प्रत्येक व्यक्तीला अनेक प्रसंगात आपल्या व्यक्तिगत श्रद्धा जोपासण्याची स्वतःच्या पसंतीप्रमाणे निर्णय घेण्याची व वागण्याचे स्वातंत्र्य लाभते. या अर्थाने श्रम विभाजनामुळे व्यक्तीच्या व्यक्तिगततेच्या विकासाला चालना मिळते. अर्थात व्यक्तीला मिळणारे स्वातंत्र्य म्हणजे सामाजिक दबावापासून, समाजाच्या बंधनातून तिची मुक्तता होणे असे नव्हे तर समाजाकडून व्यक्तीला अधिक स्वायत्तता मिळणे होय, असे दुर्खीम ने स्पष्ट केले आहे. श्रम विभाजनामुळे पारंपारिक समाजातील सामुहिक जाणीवेचा म्हणजे नैतिक तिचा र्हास होतो हे खरे असले तरी आधुनिक समाजात सामूहिक नैतिकताच शिल्लक राहत नाही असे मात्र नव्हे. पूर्वीच्या समाजातील सामुहिक नैतिकतेचा धार्मिक आशय. संकुचित होत जातो, पण आधुनिक समाजात श्रमविभाजन यामुळे लोकांमध्ये सेवांचे परस्पर आदान-प्रदान पारंपारिक कर्तव्याची भावना परस्परावलंबित्व यामुळे सहकार्याची भावना निर्माण होते. श्रमविभाजनामुळे सामाजिक जीवनात निर्माण होणारी सहकार्याची वृत्ती हे एक प्रकारे नव्या नैतिकतेची निर्मिती असते असे दुरखीमला अभिप्रेत होते. कारण सहकार्याला ही अंगभूत नैतिकता असते. (Cooperation has its intrinsic morality-Durkheim quotes from nthony Giddins,1978:23. असे दुरखीमने त्याच्या ग्रंथात म्हटले आहे.

**श्रमविभाजनाची विकृत रूपे आणि त्याचे अपसामान्य परिणाम:**

श्रमविभाजन वरील ग्रंथाच्या शेवटी तात्कालीन श्रम विभाजनाच्या विकृत रूपांची व त्याच्या अपसामान्य परिणामांची चर्चा केली आहे. अनेक अभ्यासा कडून या भागाकडे दुर्लक्ष झाले असले तरी अँथोनी Giddins यांनी त्या ग्रंथातील हा शेवटचा पुरवणी वजा भाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन केले. श्रम विभाजनामुळे सामान्यता सहकार्य आणि ऐक्यभावाची निर्मिती होते. (The division of labour normally engenders co-operations and solidarity). या मतावर दुरखीमने विशेष भर दिला आहे. या विधानातील सामान्यता हा शब्द महत्त्वाचा आहे. म्हणजे श्रमविभाजनामुळे अपरिहार्यपणे सहकार्य आणि ऐक्यभावाची निर्मिती होते असेच नाही, असेही दुरखीमने त्यातून सुचवले आहे. विशेषता श्रमविभाजनाची विकृत रूपे समाजात अस्तित्वात असतील तर त्याचे अपसामान्य परिणाम होऊन समाजात संघर्ष आणि अव्यवस्था निर्माण होऊ शकते असे दुर्खीम चे प्रतिपादन आहे. तात्कालीन युरोपीय समाजात वाढत्या औद्योगिक करणा बरोबरच श्रमविभाजन ही विकसित होत गेले होते, पण तरीही जैविक एकात्मभाव निर्माण

होत असल्याचे प्रत्यक्षात अनुभवास येत नव्हते. कारण त्या काळात युरोपीय देशात औद्योगिक कलह, संप, अशांतता याचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले होते. श्रमविभाजन यावरील ग्रंथ लिहिताना ही वस्तुस्थिती दुरखिमला नजरेआड करता आली नाही. वाढते कामगार-मालक संघर्ष ही सर्व आंदोलने वर्गसंघर्ष जन्य परिस्थिती याचे सैद्धांतिक स्पष्टीकरण देण्यासाठी विभाजनाच्या विकृत रूपाची व त्याच्या अपसामान्य परिणामाची चर्चा केली आहे. दुर्खीमच्या मते कामगार मालक संघर्ष वर्गीय आंदोलने हे श्रमविभाजनाचे सामान्य परिणाम नसून ते श्रमविभाजनाच्या विकृत रूपाचे अपसामान्य परिणाम आहेत. श्रमविभाजनाची तीन विकृत रूपे दूरखीमने निदर्शनास आणली आहेत. त्याविषयी थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे देता येईल. जेव्हा समाजात यांत्रिक ऐक्यभावाचे विघटन झालेले असते, पण जैविक ऐक्यभाव पूर्ण विकसित झालेला नसतो किंवा जैविक ऐक्यभाव निर्माण होण्यासाठी आवश्यक असलेल्या पूर्व अटीची पूर्तता झालेली नसते तेव्हा त्या संक्रमण काळात श्रमविभाजनाची विकृत रूपे व त्याचे नकारात्मक परिणाम दिसून येतात असे दुर्खीम चे प्रतिपादन आहे.

१) **नियमनशून्य श्रमविभाजन** (Anomic division of labour)

दुरखीमच्या मते वर्ग संघर्ष हा नियमनशून्य श्रमविभाजनाचा परिणाम आहे. (कार्ल मार्क्सला मात्र ते भांडवलशाही समाज व्यवस्था नष्ट करण्यासाठी कामगारानी उचललेले पाऊल वाटत होते.) दुर्खीमच्या विश्लेषणनुसार यांत्रिकी एक्केभावाकडून जैविक एक्केभावाची निर्मिती होण्याच्या संक्रमण काळातील म्हणजेच जैविक एक्केभावाची अपूर्ण, अर्धवट निर्मिती झाल्याचे ते एक लक्षण वाटत होते. वर्ग संघर्ष हा दुरखीमच्या दृष्टीने नियमशून्य श्रमविभाजनाचा परिणाम होय. औद्योगीकीकरणाची फारच झपाट्याने वाढ होते, पण उद्योगधंदे व व्यापारी अस्थापना सुरळीत चालविण्यासाठी आवश्यक अशी प्रभावी मूल्ये आणि नियम यांचा मात्र विकास झालेला नसतो अशी स्थिती म्हणजे नियमहिंनतेची स्थिती होय. अशा स्थितीत भांडवलदार नफा मिळवण्याच्या एकमेव उद्देशाने कामगारांचे शोषण करतात. त्यामुळे मालक, कामगार संघर्ष निर्माण होणे अटळ ठरते. अशा स्थितीत व्यापक समाजातही जर बाजार व्यवस्थेवर आणी भांडवलदार मधील जीवघेण्या स्पर्धेवर प्रभावी नियंत्रण राखणाऱ्या यंत्रणा निर्माण झाल्या नसतील तर औद्योगिक क्षेत्रात अनागोंदी आणि अस्थैर्य निर्माण होते. हे टाळण्यासाठी नियंत्रणे व सुयोग्य नैतिक नियम अस्तित्वात येण्याची आवश्यकता दुरखींमने प्रतिपादन केली आहे.

२) **जुलमी श्रमविभाजन** (Forced division of labour)-

श्रमविभाजन अयोग्य रीतीने झाले असेल तरीही त्याचे अपसामान्य परिणाम दिसून येतात. व्यक्तीच्या क्षमता,पात्रता यांना अनुसरूनच व्यक्तीत कामाचे वाटप झाले पाहिजे. पण जर असे झाले नाही म्हणजे ज्याच्यात पात्रता आहे त्यांना अनुरूप अशी कामे मिळाली नाहीत व ज्यांच्यात पात्रता नाही मात्र त्यांच्या कुवतीला झेपणार नाहीत अशी कामे दिली गेली असतील तर ते आयोग्य रीतीने झालेले श्रमविभाजन होय. नैसर्गिक पात्रतांचा विचार न करताच व्यक्तीवर कामे लादने म्हणजे जुलमी श्रमविभाजन होय. उदाहरणार्थ, आपल्या जातीचा किंवा आपला नातेवाईक आहे म्हणून त्याला एखाद्या कारखान्याचा व्यवस्थापक बनवले

तर बाह्य सामाजिक वैशिष्ट्यामुळे (जात, नातेसंबंध) ते काम संबंधित व्यक्तीवर लादलेच गेलेले असते. दुसऱ्या बाजूला लायक, पात्र पण गरीब अनोळखी व्यक्तीला ते पद दिले जात नाही. अशा स्थितीत मग ती व्यक्ती दुसरे एकादे कमी दर्जाचे काम नाईलाजास्तव स्वीकारते. पण या दोन्ही व्यक्ती आपापले काम योग्यरीत्या मनापासून करू शकत नाहीत. ह्या जुलमी श्रमविभाजनाचा परिणाम म्हणून ही संघर्ष, नागरी असंतोष असे नकारात्मक परिणाम घडून येतात. ज्यांच्या त्याच्या नैसर्गिक क्षमतांना अनुरूप असेच श्रमविभाजन घडून आले पाहिजे असे दूरखीमचे प्रतिपादन होते. जेव्हा प्रबल वर्ग आणि जाती यांचेच श्रमविभाजनावर नियंत्रण असते व ती आपल्याच हितसंबंधांना प्राधान्य देतात, जेव्हा व्यवसाय वंशपरंपरागत रीतीने चालवली जातात, जेव्हा करारातच पक्षपातीपणा, विषमता असते, तेंव्हा व्यक्तींना व्यवसायाच्या समान संधी मिळत नाहीत. तेव्हा जुलमी श्रमविभाजन अस्तित्वात येते. अशा स्थितीत मग वारंवार तंटे उद्भवतात, उत्पादन मंदावते व सामाजिक ऐक्य धोक्यात येते.

**३) श्रम विभाजन आतील कार्यात समन्वयाचा आणि सुयोग्य व्यवस्थापनाचा अभाव:** (Lack of co-ordination and proper management of functions in division of labour).

चांगल्या श्रमविभाजनात लोकांना केवळ विविध कामे वाटून देणे अभिप्रेत नाही. विविध व्यक्तींच्या कामात सुसूत्रता आणि समन्वय घडवून आणणे हे देखील अत्यंत महत्त्वाचे असते. दुसऱ्या शब्दात कामाचे व्यवस्थापन चांगल्या रीतीने घडून येणे आवश्यक असते हे झाले नाहीत तरी देखील त्याचे उत्पादनावर व परस्पर सामाजिक संबंधावर प्रतिकृती किंवा नकारात्मक परिणाम घडून येऊ शकतात. असे दुर्खीमचे प्रतिपादन होते. सुयोग्य विभाजनासाठी व आधुनिक औद्योगिक समाजात जैविक एक्भाव निर्माण होण्यासाठी दुरखीमने पुढील प्रमुख उपाय सुचवले आहेत.

१) औद्योगिक संबंधाचे नैतिक नियमाच्या आधारित नियंत्रण करण्यात यावे.

अ) समग्र अर्थव्यवस्थेच्या पातळीवर राज्यसंस्थेने असे नियंत्रण प्रस्थापित करावे.

आ) प्रत्येक व्यवसायातील लोकांचे व्यावसायिक संघ (Occupational Guilds)निर्माण व्हावेत व त्यांनी त्या त्या व्यवसायिक याचे नैतिक नियमन घडवून आणावे.

२) श्रमविभाजनाने सुरू केलेले संरचनात्मक बदल पूर्णपणे घडवून आणावेत.

३) नैसर्गिक विषम तिची तंतोतंत अभिव्यक्ती सामाजिक विषमतेत होईल अशा रीतीने, म्हणजेच स्वेच्छा, पात्रता यांच्या आधारावर कामाची विभागणी करून आणावी.

**❊ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न– २**

१. एमिल दुरखीमने श्रमविभाजना विषयी आपली केंद्रीय संकल्पना कोणत्या ग्रंथात मांडली आहे.

२. आधुनिक समाजामध्ये कोणत्या गोष्टीमुळे लोकांमध्ये सेवांचे परस्पर आदान-प्रदान, पारस्पारिक कर्तव्यभावना, परस्परावलंबित्व, यामुळे सहकार्यभावनेची निर्मिती होते.

३. समाजाची भौतिक घनता वाढणे म्हणजे

४. दुरमखीच्या मते वर्ग संघर्ष हा कोणत्या प्रकारचा श्रमविभाजनाचा परिणाम आहे?

५. जुलमी श्रमविभाजन म्हणजे काय?

६. जुलमी श्रमविभाजनाचेकोणते नकारात्मक परिणाम घडून येतात?

७. दुरखींमने श्रमविभाजन ही संज्ञा कोणत्या अर्थाने वापरली आहे.

## ३.२.३ आत्महत्तेचा सिद्धांत (Theory of Suicide)

एमिल डुरखाईमने १८९७ मध्ये 'Lee Suicide' (ली सुसाईड) हा आत्महत्तेसंबंधी विवेचन करणारा ग्रंथ लिहून त्यामध्ये 'आत्महत्त्या' ही एक सामाजिक घटना असून ती विघटनातुन निर्माण होते असा महत्वपूर्ण विचार मांडला. त्याच्या मते, समाजातील आत्महत्तेची घटना हे सामाजिक सत्य आहे. अशा घटना सहसंबंधातील परिस्थितीतून आणि ठराविक व्यक्तीकडून घडत असतात.

डुरखाईमपूर्वी अनेक विचारवंतांनी आत्महत्या ही नैराश्य, दारिद्रय, बेकारी, शारीरिक आजार, असफल प्रेमसंबंध इत्यादी कारणाने केली जाते असे मत मांडले. मात्र डुरखाईमने ही सर्व कारणे अमान्य करून प्रथमत: **आत्महत्या ही एक सामाजिक घटना** असून उपयुक्ततावादी सामुहिक जीवनाच्या विघटनातून ती निर्माण होते असा विचार मांडला. डुरखाईमच्या मते, आत्महत्या हे एक सामाजिक सत्य (Social Fact) असल्यामुळे अशा घटनेचे विश्लेषण सामाजिक कारणाच्या संदर्भातच केले पाहिजे. त्याच्या या विवेचनाला समाजशास्त्रीय बैठक असून त्याचा हा विचार श्रमविभागणीच्या विचाराशी निगडीत आहे. ज्याना प्राप्त परिस्थितीत समायोजन साधता येत नाही अशा व्यक्तीच आत्महत्त्येचा मार्ग स्वीकारतात या पार्श्वभूमीवर डुरखाईम आत्महत्त्येकडे एक 'सामाजिक सत्य' म्हणून पाहतो.

❐ **आत्महत्येची व्याख्या :-**

डुरखाईमने आत्महत्येची व्याख्या खालील प्रमाणे सांगितली.

''ज्या कृतीचा शेवट आत्मनाश किंवा मृत्यूमध्ये होतो अशी व्यक्तीकडून घडणारी होकारात्मक, नकारात्मक, प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष कृती म्हणजे आत्महत्या होय.'' उदा. स्वत: गळफास लावून घेणे, आग लागलेल्या घरात बसून राहणे यावरून असे स्पष्ट होते की, व्यक्तीच्या जीवनातील असमर्थतता आत्महत्त्या प्रवृत्तीस कारणीभूत ठरते.

❐ **आत्महत्येस जबाबदार असणारी कारणे अथवा घटक :-**

डुरखाईमने आत्महत्त्या ही एक सामाजिक घटना असून या घटनेला खालील विविध कारणे जबाबदार असल्याचे नमूद केले. उदा. (१) आधुनिक समाजातील औद्योगिकरण व नैतीक मूल्यांचा ऱ्हास, (२)

कुटुंबाचे दुर्लक्ष, (३) प्राप्त परिस्थितीत समायोजन साधण्याची अशक्यता, (४) असाधारण वैवाहिक संबंध, (५) सामाजिक एकतेचा ऱ्हास इत्यादी.

डुरखाईमच्या मते, आत्महत्येला वरील अनेक सामाजिक कारणेच अधिक प्रमाणात जबाबदार असतात. जेव्हा समाजाकडून सर्वांगिण विकासासाठी औद्योगिकरण, श्रमविभाजन, विशेषीकरण, नवीन नैतिक मूल्यांचा स्वीकार केला जातो तेंव्हा जुन्या वर्तनाविषयक नियमांची चौकट बिघडू लागते. अशावेळी व्यक्तींच्यामध्ये आत्महत्तेचे प्रमाण वाढण्यास मदत होते.

आजच्या औद्योगिक समाजात मोठ्या प्रमाणात सामाजिक रचनेत घडून येणारे बदल, नीतीमत्तेचा ऱ्हास, व्यक्ती स्वातंत्र्याची वाढ, असंतुलित सामाजिक संबंध यासारखी सामाजिक कारणे आत्महत्तेला जबाबदार असतात. डुरखाईमच्या मते, प्रत्येक मानव समाजात सातत्याने आत्महत्त्या होत असतात आणि त्या सामाजिक परिस्थितीवर अवलंबून असतात. तसेच त्या वेगवेगळ्या प्रकारच्या असतात.

### ❒ आत्महत्त्येचे वर्गीकरण किंवा प्रकार :–

डुरखाईमने आत्महत्येचे वर्गीकरण किंवा प्रकार विशद करताना आत्महत्या ही प्रामुख्याने एक सामाजिक घटना अथवा सामाजिक सत्य आहे असे मत मांडले आणि खालील प्रमुख चार प्रकार सांगितले.

### १. परार्थवादी किंवा परहितवादी आत्महत्या (Altruistic Suicide)

डुरखाईमने आत्महत्येचा हा प्रथम प्रकार विषद करून यामध्ये व्यक्ती दुसऱ्याच्या हितासाठी आत्महत्या करते. व्यक्तीवर पूर्णत: गट अथवा समुहाचे वर्चस्व असते. त्यामुळे व्यक्ती स्वत:चा जीव वाचविण्यापेक्षा समाजासाठी बलिदान करते. उदा. राष्ट्रहितासाठी सैनिकांचे बलिदान, पतीच्या निधनानंतर त्याच्या चित्तेवर जाळून घेणाऱ्या स्त्रीचे बलिदान, यासारख्या घटना परहितवादी आत्महत्या म्हणून ओळखल्या जातात.

थोडक्यात आत्महत्त्येच्या या प्रकारामध्ये 'स्व'जीवन इच्छेपेक्षा समूह अथवा गटनिष्ठा अतिशय महत्त्वाची मानली जाते. त्यामुळेच डुरखाईमने परहितवादी आत्महत्त्येला 'समाजहितासाठी व्यक्तीचा बळी' अशी कल्पना मांडली. जपानी लोक अनेक प्रसंगी परार्थवादी आत्महत्या करणे पसंत करतात. केवळ समूह हितासाठी व्यक्ती सर्व प्रकारचा त्याग करण्यास तयार होते. याचाच अर्थ **स्वहितापेक्षा गटाशी बांधिलकी** हा विचार श्रेष्ठ असतो. उदा. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील भगतसिंग, बाबू गेणू इ. चे बलिदान

### २. आत्मकेंद्रित अथवा अहंवादी आत्महत्या (Egoistic Suicide)

डुरखाईमने आत्महत्येचा हा दुसरा प्रकार सांगितला. त्याच्या मते, या प्रकारात व्यक्ती समाजात न मिळसता स्वत:मध्येच गुंग राहते. स्वत:ला समाजापासून वेगळे समजते. आपणास कोणाचाच आधार नाही असे समजून एकाकी जीवनाचा अंत आत्महत्येने करते. अशा व्यक्ती केवळ स्वत:चाच विचार करतात. त्यांच्यामध्ये एक प्रकारची अहंभावाची भावना निर्माण होते. अशा घटना ज्या समुदायात घडतात त्यात व्यक्तीगत स्वायत्तता व स्वत:ची जबाबदारी यांच्यावर जोर दिलेला असतो. डुरखाईमच्या मते, कोणतीही

व्यक्ती जेव्हा एकाकी असते तेव्हा ती आपला अहंकार जपण्याचा प्रयत्न करते. आपला अहंकार दुखावला गेला की, अशी व्यक्ती आत्महत्तेचा मार्ग जवळ करू लागते.

डुरखाईमने आत्मकेंद्रित आत्महत्येची खालील अनेक उदाहरणे दिली आहेत. उदा. कॅथॉलिक धर्मपंथीयांपेक्षा प्रॉटेस्टंट धर्मपंथियांमध्ये आत्महत्त्येचे प्रमाण अधिक असते. अपत्य असणाऱ्यांच्यापेक्षा अपत्य नसणाऱ्या व्यक्तींच्यामध्ये आत्महत्तेचे प्रमाण अधिक असते. विधवा अथवा घटस्फोटीत स्त्रियांच्यामध्ये अशी आत्महत्या अधिक आढळून येते.

### ३. प्रमाणकशुन्य अथवा निराशावादी आत्महत्त्या (Anomic Suicide)

डुरखाईमने आत्महत्तेचा प्रमाणकशुन्य आत्महत्या हा तिसरा प्रकार सांगितला. यामध्ये ''जेंव्हा समाजात आकस्मित अथवा अचानक बदल घडून येतात आणि अशा बदलाशी व्यक्तींना समायोजन साधता येत नाही तेंव्हा त्यांच्याकडून आत्महत्येचा जो मार्ग स्वीकारला जातो. त्यालाच प्रमाणकशुन्य आत्महत्त्या असे म्हटले जाते.'' उदा. व्यापारातील मंदी, दिवाळखोरी, आकस्मिक आलेले दारिद्रय, गमवावी लागलेली नोकरी, मालकीच्या हरविलेल्या वस्तु अशा वेळी व्यक्तीच्या जीवनाची चाकोरीबद्ध चौकट ढासळते. नवीन परिस्थिती, मूल्ये अथवा नियमने व्यक्तीवर नियंत्रण ठेवू शकत नाही. यामुळे अस्थिरता निर्माण होते आणि त्यातून अशा व्यक्ती आत्महत्तेचा मार्ग स्विकारतात.

### ४. दैववादी आत्महत्या (Fatalistic Suicide)

आत्महत्येच्या या प्रकारामध्ये व्यक्ती स्वत:च्या जीवनामध्ये आलेल्या अपयशाचे खापर (दोष) दुसऱ्याच्या माथी फोडते आणि निराशेपोटी स्वत:चे जीवन संपविते. उदा. मनापासून कष्ट न करता अपयश आल्यास देव अथवा नशिबावर विश्वास ठेवून आत्महत्या केली जाते. सध्याच्या संमिश्र समाजात दैववादी आत्महत्या अधिक प्रमाणात घडून येतात.

आत्महत्येच्या वरील चार प्रमुख प्रकारांचा परामर्श घेतल्यानंतर डुरखाईम अशा निष्कर्षाप्रत पोहचतो की, समाजातील सर्वच व्यक्ती आत्महत्या या विचाराला बळी पडत नाहीत. ज्यांना बदलत्या परिस्थितीत समायोजन साधणे शक्य होत नाही अशाच व्यक्ती आत्महत्येचा मार्ग अवलंबितात.

### * स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३

१. डुरखाईमने आत्महत्येसंबंधी विवेचन करणारा कोणता ग्रंथ लिहिला?

२. डुरखाईमच्या मते, आत्महत्या ही कोणती घटना असून ती केंव्हा केली जाते?

३. डुरखाईमने आत्महत्येचे किती व कोणते प्रकार सांगितले?

४. परहितवादी आत्महत्या म्हणजे काय?

५. डुरखाईमने आत्मकेंद्रित आत्महत्तेची कोणती उदाहरणे सांगितली आहेत?

## ३.३ सारांश

या घटकात आपण फ्रेंच समाजशास्त्रज्ञ एमिल डुरखाईम याने दिलेली सामाजिक सत्याची वैशिष्ट्ये अभ्यासली व त्या नियमांचे निरीक्षण केले. डुरखाईमच्या आत्महत्या या सिद्धांताद्वारे आत्महत्या ही व्यक्तीगत बाब नाही तर ती एक सामाजिक घटना आहे हे समजावून घेतले. त्याचबरोबर समाजात श्रमविभाजनाचे महत्त्व डुरखाईमने समजून सांगितले आहे. त्याने प्रस्तूत घटकात श्रमविभाजन अर्थ, प्रकार्य, परिणाम व श्रमविभाजनाची अपसामान्य रूपे याचे विवेचन केले आहे.

## ३.४ पारिभाषिक शब्द किंवा संज्ञा

- Introspection – आत्मपरिक्षण करणे.
- Constraining – निर्बंध.
- Conjecture – अनुमान.
- Solidarity – एकता.
- Normlessness – निर्णय न घेता येणे.
- Associational – संबंधित.
- Reductionist – गुंतागुंतीच्या गोष्टींचे सोपे पृथःकरण.
- Personified – निर्जीव वस्तुत मानवाचे गुण असणे.
- Transcendental – तत्त्वज्ञानापलीकडील अनुभव.
- Dissolution – विसर्जन.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

**※ स्वयं–अध्ययन प्रश्न १ ची उत्तरे**

१. कारण या प्रक्रियेचा संबंध व्यक्तीगत आत्मपरिक्षणाशी नाही जर आपणास ज्ञान मिळवावयाचे असेल तर आपणास मनाच्या बाहेर जावून विचार करावा लागेल.

२. डुरखाईमने समाजिक सत्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगितली.

१) सामाजिक तथ्ये समाजात बाह्यरूप असतात.

२) ती व्यक्तीवर निर्बंध म्हणून असतात.

३) ती समाजात विखुरलेली असतात.

४) निसर्गाशी संबंधित असतात.

३. व्यक्तीला सामाजिक सत्यामध्ये सहभागी व्हावे लागते कारण त्याद्वारे वस्तुनिष्ठता समजते तसेच त्याचा अर्थ समजून घेता येतो.

४. डुरखाईमने सामाजिक सत्याचे खालील नियम सांगितले.

उदा. १) सामाजिक सत्य हे वस्तु म्हणून विचारात घेतले पाहिजे.

२) सामाजिक सत्याचे निरीक्षण व्यक्तीगत प्रकटीकरणाच्या पलीकडील असते.

३) विशिष्ट मानसिक दृष्टिकोन गृहित धरुन वस्तुनिष्ठपणे निरीक्षण करणे.

४) घटनांशी संबंधित तथ्यांचे बाह्य वैशिष्ट्यानुसार पूर्वस्पष्टीकरण करणे.

५) पूर्वसंकल्पनांचे निर्मूलन करणे.

६) व्यक्तीगत मतप्रणाली आणि सामाजिक सत्य यांचा स्वतंत्र विचार करणे.

५. सामाजिक सत्यास वस्तु म्हणून संबोधिण्याची गरज असते कारण त्यामुळे निश्चित व स्पष्ट स्वरुपात सत्य प्रकट करणे शक्य होईल.

**※ स्वयं-अध्ययन प्रश्न २ ची उत्तरे**

१. दि डिव्हिजन ऑफ लेबर इंन सोसायटी

२. श्रमविभाजन.

३. विशिष्ट भू प्रदेशावरील लोकसंख्येचे वितरण/लोकसंख्येची घनता वाढणे होय.

४. नियमनशून्य

५. नैसर्गिक पात्रताचां विचार न करताच व्यक्तीवर कामे लागणे म्हणजे जुलमी श्रमविभाजन होय.

६. संघर्ष, नागरी असंतोष.

७. सामाजिक संरचनेतील विभेदन, कार्याचे विशेषीकरण, व्यक्तीभेदावर आधारित त्यांचे समाज सदस्यांमधील वितरण आणि परिणामी निर्माण होणारी परस्पर सहकार्याची आणि परस्परावलंबाची एक्यभाव साधक सामाजिक प्रक्रिया अशा अर्थाने दुरखीमने श्रमविभाजन ही संज्ञा वापरली आहे.

**※ स्वयं-अध्ययन प्रश्न ३ ची उत्तरे**

१. "Lee Suicide".

२. 'सामाजिक घटना' असून प्राप्त परिस्थितीत समायोजन साधता येत नाही अशा वेळी व्यक्ती आत्महत्या करते.

३. चार प्रकार उदा. (१) परहितवादी (२) आत्मकेंद्रित (३) प्रमाणक शुन्य (४) दैववादी

४. दुसऱ्याच्या हितासाठी केलेली आत्महत्या म्हणजे परहितवादी आत्महत्या होय.

५. कॅथॉलिक पंथापेक्षा प्रॉटेस्टंट पंथात अधिक प्रमाण, अपत्य नसणाऱ्या व्यक्ती, विधवा अथवा घटस्फोटीत स्त्रिया यांच्यामध्ये आत्मकेंद्रित आत्महत्या अधिक प्रमाणात आढळते.

## ३.६ सरावासाठी प्रश्न (सराव किंवा गृहपाठ)

१. सामाजिक सत्य अथवा तथ्य याच्या वैशिष्ट्यांवर टीप लिहा.

२. श्रमविभाजन सिद्धांताची माहिती लिहा.

३. डुरखाईमने सांगितलेले आत्महत्येचे प्रकार लिहा.

## ३.७ अधिक वाचनासाठीची पुस्तके


१. **Aron, Raymond** : *"Main Currents in Sociological Thought"*, (Vol. I & II).

२. **Barnes H. E.** : *"An Introduction to the History of Sociology"*, Phoenix Books. The University of Chikago Press London, 1966.

३. **Bogardus E. S.** : *"Development of Sociological thought".*

४. **Beteille Andre** - *"Sociology : Essays on Approach & Method"*.

५. **Coser, Lewis A.** : *"The Masters of Sociological Thought".*

६. **Fletcher R.** : *"The Making of Sociology"*, (Vol. I & II).

७. **George Ritzer** : *"Classical sociological Therory"*.

८. **Mohite / Salunkhe** : *"Samajshastriya Vicharvant"*, Phadake Prakashan, Kolhapur.

९. **Vaidhya N. S.** : *"Samajshastriya Vichar Parampara"*, Vidhya Prakashan, Nagpur.


❑❑❑

# घटक – ४
# मॅक्स वेबर (१८६४–१९२०)

**घटक संरचना:**

४.१ मॅक्स वेबरचा जीवन वृतांत

४.२ मॅक्स बेबरची ग्रंथसंपदा

४.४.१ मॅक्स वेबरने मांडलेले आदर्श प्ररूपांविषयीचे विचार

स्वयं–अध्ययनासाठीचे प्रश्न–१

४.४.२.मॅक्स वेबरचा 'सामाजिक क्रियेचा सिध्दांत'

स्वयंअध्ययनासाठी प्रश्न –२

४.४.३ मॅक्स वेबरवेबरचा 'अधिकारांचा' अथवा 'सत्तेचा सिध्दांत'

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न –३

४.४ सारांश

४.५ स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी प्रश्न

४.७ अधिक वाचनासाठीची पुस्तके

**प्रास्ताविक** : या पेपरमध्ये आतापर्यंत आपण ऑगस्ट कॉम्त कार्ल मार्क्स व एमिल डरखाईम या पाश्चात्य समाजशास्त्रज्ञांनी मांडलेल्या विविध समाजशास्त्रीय सिध्दांतांची ओळख करून घेतली आहे. या शेवटच्या युनिटमध्ये आपल्याला समाजशास्त्राला वैज्ञानिक दृष्टीकोन मिळावा यासाठी ज्या समाजशास्त्रज्ञाने आपले विविध समाजशास्त्रीय सिध्दांत मांडले त्या मॅक्स वेबरच्या समाजशास्त्रीय सिध्दांताची ओळख करून घ्यावयाची आहे. कोणताही विचारवंत हा त्याच्या जिवनात घडलेल्या विविध घटना, त्याच्यावर तत्कालीन परिस्थितीचा पडलेला प्रभाव व त्यातून त्याने निर्माण केलेली ग्रंथसंपद यावरून ओळखला जातो. यासाठी सर्वप्रथम आपण या सर्व बाबींचा थोडक्यात का असेना परिचय करून घेणे अत्यंत आवश्यक बनते. मॅक्स वेबरबाबत आपले मत स्पष्ट करताना आट्टो स्टॅमर यांनी ज्याच्याविषयी तो 'कोण्या एका विद्यापीठाचा, कोण्या एका देशाचा किंवा कोण्या एका गावाचा नसून, तो संपूर्ण वैज्ञानिक आणि समाजशास्त्रीय विश्वाशी संबंधित आहे' असे गौरवोद्‌गार काढले होते तर रेमंड ॲरॉन यांनी आपल्या 'मेन करंट इन सोशिऑलॉजिकल थॉट' या ग्रंथच्या दुसऱ्या खंडात 'माझ्यासाठी जो सर्वश्रेष्ठ समाजशास्त्रज्ञ आहे आणि मी तर असे म्हणेन की तोच एक समाजशास्त्रज्ञ आहे' असे मत मांडले आहे, त्यावरून मॅक्स वेबरचे समाजशास्त्रातील योगदान किती

महत्वाचे आहे स्पष्ट होते. अशा या समाजशास्त्रज्ञाच्या समाजशास्त्राच्या जडणघडणीतील वाटा नेमका कसा, कोणता आणि किती आहे याचा विचार आपण मॅक्स वेबरच्या विविध सिध्दांतातून आणि विचारांतून या युनिटमध्ये आपण करून घेणार आहोत.

## ४.१ मॅक्स वेबरचा जीवनवृत्तांत

मॅक्स वेबरचा जन्म २१ एप्रिल १८६४ रोजी जर्मनीतील इर्फर्ट या गावी झाला.त्याचे मातापिता दोघेही प्रोटेस्टंट पंथीय होते आणि त्यांना झलेल्या एकूण सात अपत्यांपैकी सर्वात मोठा असालेल्या मॅक्स वेबरने समाजशास्त्राला नैसर्गिक व भौतिकशास्त्रांप्रमाणेच वैज्ञानिक दर्जा देण्याचा प्रयत्न केला म्हणूनच त्याला समाजशास्त्रात पध्दतीशास्त्रानुसार अध्ययन करण्याचे श्रेय दिले जाते. त्याचे आजोबा हे बिलेफल्ड शहरातील तागाचा व्यापार करणारे एक प्रमुख व्यापारी होते. वेबरच्या पित्याच्या मनातही आपण आपल्या कुटुंबात परंपरेने चालत आलेला तागाचा व्यापारच पुढे चालवण्याचा व त्यात वाढ करण्याचा विचार होता. त्याचे वडिल राजकारणातही विशेष रस घेणारे होते. कांही काळ त्यांची इर्फर्ट शहरात न्यायाधीशपदी नेमणूकही झाली होती पण त्यात न रमल्याने ते बर्लिन शहरात आले व तेथेच खऱ्या अर्थाने त्यांनी आपल्या राजकीय जीवनाला प्रारंभ केला. कांही काळ बर्लिन शहराच्या नगरपरीषदेचे ते सभासदही होते.जर्मनीतील तत्कालीन राष्ट्रीय उदारमतवादी पक्षाचे ते महत्वाचे सभासद होते. पुढे त्यांच्या पक्षाने बिस्मार्कच्या धोरणांना पाठींबा द्यायला सुरूवात केली. या काळात घरी येणाऱ्या विविध राजकीय व्यक्तींच्या विचारांचा प्रभाव छोटया वेबरवर पडत होता. इतके असले तरी सुखासीन पिता व अत्यंत धार्मिक मनोवृत्तीची आई यामुळे घरात सतत असलेल्या तणावपूर्ण वातावरणाचा विघातक प्रभाव वेबरच्या मनावर पडला व लहानपणापासूनच तो अत्यंत रोगट व भिञ्या प्रवृतीचा बनत गेला. यामुळेच की काय त्याला वाचनाचे वेड लागले.

आपल्या वडिलांच्या ईच्छेनुसार वेबरने अठराव्या वर्षी हेडेलबर्ग विद्यापीठात कायद्याचा अभ्यास करण्यासाठी प्रवेश घेतला. येथील तीन वर्षाच्या काळात त्याने कायद्याप्रमाणेच इतिहास, तत्वज्ञान, अर्थशास्त्र इत्यादी विषयांचेही अध्ययन केले. येथे तो त्याच्या काकांच्या घरीच रहात होता. त्याला आपल्या चुलतभाप्रमाणेच बिअर पिण्याचीही सवय लागली. अती बिअर सेवनामुळे तो अत्यंत अशक्त आणि रोगटही दिसू लागला हे खरे असले तरी त्याने आपल्या अभ्यासावर याचा अजिबात विपरीत परिणाम होऊ दिला नाही. येथे तीन वर्षाचा कालावधी पूर्ण केल्यानंतर तो स्ट्रांसबर्गला येऊन सैन्यात भरती झाला. या ठिकाणी तो त्याची मावशी व तिच्या यजमानांच्या विचारांमुळे प्रभावीत झला आणि त्याच्या मनात धर्म आणि धार्मिक ग्रंथांविषयी ओढ निर्माण झाली. परिणामी त्याच्यातील स्वच्छंदीपणात परिवर्तन झाले आणि जीवनातील नैतिक शिस्तीच्या तत्वाबाबत तो जागृत झाला, इतकोच नव्हे तर त्या तत्वाचा त्याने स्वीकारही केला. १८८४ साली सैन्यातील नोकरी संपवून तो घरी परतल्यानंतर त्याने बर्लिन विद्यापीठात प्रवेश घेतला. येथे त्याचा मॉमसेन या इतिहासतज्ञाशी परिचय झाला व त्यांच्याच मार्गदर्शनाखाली त्याने रोमन कायद्याचा अभ्यास केला. १८८८ मध्ये 'हिस्ट्री ऑफ  कमर्शियल सोसायटीज इन द मिडल एजेस' हा आपला पीएच.डी. च्या पदवीसाठीचा प्रबंध त्याने सादर केला व त्यानंतर १८९१ मध्ये 'रोमन ॲग्ररिअन हिस्ट्री' हा

संशोधनपर ग्रंथ वेबरने पोस्ट डॉक्टरेटसाठी लिहिला. या व इतर संशोधन कार्याने त्याची बर्लिन विद्यापीठात अधिव्याख्याता म्हणून नियुक्ती झाली.

१८९३ मध्ये त्याचा विवाह मॉरिॲनी श्निटगर हीच्याशी झाला व याच वर्षी त्याची नेमणूक फ्रीबर्ग विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात झाली. यानंतर दोघांनीही अत्यंत बौध्दिक आणि नैतिक जीवन उपभोगले पण तो वैवाहिक जीवनात मात्र समाधानी नव्हता. १८९५ साली 'राष्ट्रीय स्थिती आणि आर्थिक धोरण' या विषयावर दिलेल्या त्याच्या भाषणातून त्याची तीव्र राष्ट्रभक्ती आणि उत्कृष्ट बुध्दीमत्ता स्पष्ट होऊन त्याची राजकीय आणि विद्वान व्यक्तीत ख्याती झाली. १८९६ साली त्याला हेडेलबर्ग विद्यापीठाने अर्थशास्त्राचा प्राध्यापक म्हणून आमंत्रित केले त्याचा स्विकार करून तो हेडेलबर्ग येथे आला आणि अल्पावधीतच त्याला येथील विद्वानांमध्ये महत्वाचे स्थान प्राप्त झाले. याबरोबरच वेबरने ख्रिश्चन सामाजिक व राजकीय जीवनात अधिकाधिक सहभाग घ्यावयासही सुरूवातही केली आणि राजकीय व सामाजीक जीवनावर अनेक निबंध प्रसिध्द केले. परिणामी राजकीय व सामाजिक जीवनातही तो एक महत्वपूर्ण व्यक्ती म्हणून ओळखला जाऊ लागला.

इ.सन १८९७ च्या जुलैमध्ये त्याचे मातापिता त्याच्याकडे हेडेलबर्गला भेटण्यासाठी आले.त्याच्या आईने वेबरकडे कांही आठवडे राहण्याची इच्छा व्यक्त केली असता वेबर व त्याचे पिता यांच्यामध्ये कडाक्याचे भांडण झाले व शेवटी वेबरने आपल्या पित्याला घरातून हाकलून दिले. एका महिन्यातच त्याच्या पित्याचे निधन झाले.याचा त्याच्या मनावर आघात होऊन तो मनोविकृतीचा रोगी बनला. नंतरची पाच वर्षे तो यातून बाहेर पडू शकला नाही. आपल्या या अवस्थेमुळे त्याने आपल्या हेडेलबर्ग विद्यापीठातील पदाचा राजीनामा दिला व तो हेडेलबर्ग येथेच एका आरोग्यधामात रहायला गेला.तेथे त्याच्यावर अनेक तज्ञांनी उपचार करण्याचा प्रयत्न केला पण त्यांचा कांहीही उपयोग झाला नाही. नंतर १९०३ पासून त्याची बैध्दिक स्थिती हळूहळू सुधारत गेली व त्याने जर्मन सामाजिक नियतकालीकाच्या संपादकीय विभागात काम करण्यास सुरूवात केली. पुढे १९०४ मध्ये म्हणजे सुमारे साडेसहा वर्षानंतर त्याने प्रथमच सेंट लुईस येथील कला आणि विज्ञान कॉंग्रेस समोर जर्मनीची सामाजिक संरचना' या विषयावर व्याख्यान दिले. यानंतर सुमारे साडेतीन महिने त्याने अमेरिकेत वास्तव्य केले. येथील वास्तव्यात त्याच्यावर अमेरिकन समाज जीवनाचा विशेष प्रभाव पडला. येथील वास्तव्यातच त्याला भांडवलशाहीच्या विकासातील 'प्रोटेस्टंट आचारशास्त्राचे योगदान व़ नोकरशाही' या महत्वपूर्ण संकल्पना सुचल्या होत्या. १९०५ मध्ये त्याने 'दी प्रोटेस्टंट इथिक्स ॲण्ड दी स्पिरीट ऑफ कॅपिटॅलिझम' हा महत्वपूर्ण ग्रंथ लिहिला. या ग्रंथाने त्याला खूप प्रसिध्दी मिळाली. पुढे १९०८ आणि १९०९ मध्ये त्याने उद्योगधंद्यातील कामगारांचे अनुभवाधिष्ठीत अध्ययनही केले. १९१० मध्ये त्याने 'फर्डिनांड टोनीज' आणि 'जॉर्ज सिमेल' यांच्याबरोबरीने 'जर्मन सोशिऑलॉजिकल सोसायटीची' स्थापना केली व बरीच वर्षे सोसायटीचा सचिव म्हणूनही काम केले.

पहिल्या महायुध्दाच्या काळात वेबरने सैनिकी हॉस्पिटलचा संचालक म्हणून काम करत असताना महायुध्दाच्या विनाशकारी बाजूचे चित्रण केले आणि जर्मनीने ब्रिटनशी शस्त्रसंधी करावी या मताचा पुरस्कार केला. १९१८ मध्ये व्हिएन्ना विद्यापीठात एक पूर्ण सत्र विद्यार्थ्यांसमोर व्याख्याने दिली. पुढच्याच वर्षी

म्हणजे १९१९ साली म्यूनिच विद्यापीठाने आमंत्रित केल्यानंतर विद्यार्थ्यांसमोर दिलेली 'विज्ञान एक व्यवसाय आणि राजकारण एक व्यवसाय' ही व्याख्याने फारच गाजली. १९१८ ते १९२० या कालावधीत त्याने राजकीय कार्यक्रमात सहभागी होतानाच वृतपत्रात जर्मनीतील घडामोडींवर लेख, निबंध आणि निवेदने प्रसिध्द केली.'डच डेमॉक्रटीक' पक्षाचा तो संस्थापक सदयही होता. १९२० च्या जून महिन्याच्या सुरूवातीला त्याला खुप ताप यायला सुरूवात झाली, हा ताप म्हणजे न्युमोनिया असल्याचे समजेपर्यंत खूप उशीर झाला होता. परिणामी १४ जून १९२० रोजी समाजशास्त्राला वैज्ञानिक रूप प्राप्त करून देणारा वेबर काळाच्या उदरात गडप झाला व त्याच्या मृत्यूमुळे एका वादळी व्यक्तीमत्वाच्या समाजशास्त्रज्ञाचा अंत झाला.

## ४.२ मॅक्स वेबरची ग्रंथ संपदाः

हेडेलबर्ग विद्यापीठ व परिसर हे वेबरच्या ग्रंथ संपदेच्या निर्मितीचे स्फूर्तीस्थान असून त्याचे लिखान हे मुख्यतः निबंधात्मक स्वरूपाचे असल्याचे आढळून येते. मॅक्स वेबरचे लिखाण मुख्यतः जर्मन भाषेतच होते त्याचे पुढे इंग्रजी भाषेत मोठया प्रमाणात रूपांतरीतही करण्यात आले होते.या ठिकाणी आपण मॅक्स वेबरच्या लिखाणाचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

१. द. मॅथडॉलॉजी ऑफ सोशल सायन्सेस (The Methodology of Social Sciences): हा वेबरचे पध्दतीशास्त्रावरील ग्रंथ मोठया प्रमाणात प्रसिध्दी पावलेला ग्रंथ असून यामध्ये वेबरने कोणत्याही सामाजिक शास्त्राचा अभ्यास करताना तो विशिष्ट पध्दतीनेच करणे कसे महत्वाचे व त्यामुळेच सामाजिक शास्त्राच्या संशोधनाचे अंतिम निष्कर्ष हे कसे अधिकाधिक योग्य येऊ शकतील हे या ग्रंथात स्पष्ट केले आहे.

२. द प्रोटेस्टंट इथिक्स अँण्ड द स्पिरिट ऑफ कॅपिटॅलिझम (The Protestant Ethics and the Spirit of Capitalism): हा वेबरचा दुसरा महत्वाचा ग्रंथ असून तो १९०५ साली प्रकाशित झाला होता. मॅक्स वेबर हा प्रोटेस्टंट पंथीय कुटुंबात जन्माला आला होता व त्यामुळे त्याला कौटुंबिक जीवन जगत असताना आलेल्या अनुभवातून व्यक्ती वर्तनातील नैतिकतेची जी आवश्यकता त्याला जाणवली त्यातूनच या ग्रंथाची निर्मिती झाली असे आपल्याला म्हणावे लागेल.

३. पहिल्या महायुध्दाच्या काळात वेबर आपल्या धर्मासंबंधीच्या विचारांवर शेवटचा हात फिरवत होता त्यातूनच १९१६ साली त्याची 'द. रिलीजन ऑफ चायना' (The Religion of China) आणि 'द रिलीजन ऑफ इंडिया' (The Religion of India) चीनचा धर्म व भारताचा धर्म या दोन ग्रंथांचे लिखाण त्याच्याकडून पूर्ण झाले होते.

४. यानंतर केवळ एक वर्षाच्या आतच त्याच्याकडून १९१७ मध्ये 'द एनशंट ज्युडाईजम' (Ancient Judaism) हा प्राचीन ज्युवादाचे स्पष्टीकरण करणारा ग्रंथ लिहून पूर्ण झाला होता.

५. पहिल्या महायुध्दाच्या समात्तीनंतर त्याने लगेच प्राचीन जगातील कृषी उत्पादनाचे परस्पर संबंध, सामांन्य अर्थशास्त्रीय इतिहास, समकालीन युरोप व जर्मनी यांच्या आथर्कि समस्या, जर्मनीच्या पूर्वेकडच्या प्रांतातील आर्थिक परिस्थितीचा शोध अशा अनेक विषयावरील लिखानांचे संकलन करून 'इकॉनॉमी अँण्ड

सोसायटी' (Economy and Society) हा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला. या महत्वाच्या ग्रंथा बरोबरीनेच मॅक्स वेबरने अनेक लेख तत्कालीन विविध नियतकालीतही प्रसिध्द केले होते.

### ४.३.१ मॅक्स वेबरने मांडलेले आदर्श प्ररूपांविषयीचे विचारः

वेबरकालीन जर्मन समाजातील विचारवंतांचे सामाजिक शास्त्रांच्या संशोधनाबाबत प्रचलित असलेले नैसर्गिक विज्ञान हे वैज्ञानिक पध्दतीवर आधारीत आहे परंतु सामाजिक विज्ञानात संशोधनासाठी मात्र वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब करणे शक्य नाही, हे मत वेबराला मांन्य नव्हते. त्याने या मताचा विरोध केला आणि नैसर्गिक विज्ञानात संशोधनासाठी केल्या जात असलेल्या वैज्ञानिक पध्दतीचाच अवलंब सामाजिक विज्ञानातही शक्य आहे असे मत मांडले. यासाठी त्याने नैसर्गिक विज्ञानांप्रमाणेच सामाजिक विज्ञानात वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब कसा करता येईल याचे स्पष्टीकरण करण्यासाठी, सामाजिक शास्त्रांतील संशोधनासाठी एका विशिष्ट संशोधन पध्दतीच्या विकास कसा करता येईल या विषयीची आपली मते मांडण्यासाठी एका विशिष्ट अध्ययन पध्दतीचा विकास करण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नातूनच त्याला आदर्श प्ररूपाविषयीची संकल्पना सुचली.

आपल्या या सामाजिक शास्त्राच्या अध्ययनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या पध्दतीशास्त्रा विषयीच्या विचारांची मांडणी त्याने आपल्या 'मेथडॉलॉजिकल ट्रीटिझ' (Methodological treatise) या ग्रंथात केली आहे. त्याच्या मते कोणत्याही वैज्ञानिक व्यवस्थेला स्पष्ट वास्तविकता पुनर्निर्मित करण्यात आजपर्यंत जरी यश आले नसले तरी विशिष्ट घटनांतील अमर्याद भिंन्नतेबाबतही कोणतीही वैज्ञानिक संज्ञा त्या घटनेच्या विश्लेषणाला पूर्ण न्याय देऊ शकली नाही. याचा अर्थ इतकाच होतो की कोणतेही विज्ञान आजपर्यंत तरी सर्वार्थाने पूर्णत्वाला पोहचलेले नाही. याचा अर्थ असाही होतो की, वैज्ञानिक संशोधन करत असताना संशोधकाला कांही गोष्टी विचारात घ्याव्या लागतात तर कांही गोष्टी टाळाव्या लागतात. मुख्यतः सामाजिक शास्त्रांमध्ये जेंव्हा एखादा संशोधक आपल्या संशोधनासाठी संकल्पनेची निवड करतो तेंव्हा त्याला सहजगत्या पेचात पकडणे शक्य असते. त्याने संशोधनासाठी निवडलेल्या संकल्पना जरी सर्वसामांन्य असल्या तरी सुध्दा त्यांचे विश्लेषण करताना त्याच्याकडून कांही गोष्टी सुटण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबीचे स्पष्टीकरण करताना तो म्हणतो की जेंव्हा एखादा संशोधक भांडवलशाहीवर आर्थिक दृष्टीकोणातून चर्चा करतो तेंव्हा न कळत त्याचे सामाजिक, राजकीय किंवा धार्मिक घटकांकडे दुर्लक्ष होते व परिणामी भांडवलशाहीचे वास्तव स्वरूप त्याला स्पष्ट करता येत नाही. विशेषतः सामाजिक शास्त्रांचे क्षेत्रच इतके व्यापक झाले आहे की कोणत्याही घटनेचा सर्वांगीण व परिपूर्ण अभ्यास करणे संशोधकाला शक्यच नसते. अशा संशोथनात कांही कमतरता निश्चितपणे राहण्याची शक्यता असते परिणामी त्याला टीकाकारांकडून अगर समिक्षकांकडून पेचात पकडले जाते. संशोधकाला यातून सहजगत्या सुटका मिळावी यासाठीच वेबरने 'आदर्श प्ररूपाची' संकल्पना विशद केली आहे.

आपल्या आदर्श प्रारूप या संकल्पनेचे स्पष्टीकरण करताना वेबर हे स्पष्ट करतो की त्याने विशद केलेली आदर्श प्ररूपाची संकल्पना हे संशोधकाच्या दृष्टीने कोणत्याही साकार घटनेतील समानता व विभिन्नता

मोजण्याचे एक साधन आहे. आदर्श प्रारूपे संशोधकाला तुलनात्मक अध्ययनासाठी मुलभूत पध्दतीची तजवीज करते. त्याच्या मते आदर्श प्रारूपे हे प्रत्यक्ष वैयक्तिक घटनेच्या अस्तित्वाशिवाय एखाद्या दुसऱ्याच दृष्टीकोणावर एकतर्फी भर देऊन तयार केली जातात. याचाच साध्या शब्दातील अर्थ असा की एखाद्या घटनेबाबत मांडण्यात आलेली आदर्श प्रारूपे दुसऱ्या घटनेच्या संबंधात योग्य ठरतीलच याची खात्री नाही. आदर्श प्ररूप याचा आणखी एक अर्थ असाही आहे की आदर्श प्रारूपे ही नैतिक आदर्श असतातच असे नाही. कारण जुगार खेळणे हे समाजाच्या नैतिक आदर्शात बसत नसले तरी जुगाऱ्यांच्या स्वतःच्या नैतिक आदर्शात मात्र त्याला नैतिक अधपतन न मानता एक आदर्शच मानले जाते परिणामी एक जुगारी दुसऱ्या जुगाऱ्याला जुगारात धोका देतना आढळत नाही, ते त्यांच्यात आढळणाऱ्या नेतिक आदर्शामुळेच. याबरोबरच वेबरला आदर्श प्रारूपाचा संबंध आकडेशास्त्राशीही जोडावयाचा नाही. सामांन्यपणे एखाद्या विशिष्ट कालावधीतील प्रोटेस्टंट पंथीय व्यक्ती प्रोटेस्टंट आदर्श प्ररूपात स्पष्ट केल्याप्रमाणे न वागता वेगळयाच पध्दतीने वागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

थोडक्यात, आदर्श प्रारूपांच्या सहाय्याने व्यक्तीने नेमके कसे वागावे हे स्पष्ट केले जाते.पण व्यक्ती त्याप्रमाणे वर्तन करीलच याची खात्री देता येत नाही. यावरून आदर्श प्रारूप म्हणजेच वास्तवता (जरी त्यामध्ये नैतिकतेचा समावेश असला तरी) दर्शवणारी संकल्पना नव्हे तर त्या वास्तवतेपासून दोन हात दूरच असतात हे स्पष्ट होते. व्यक्तीकडून स्वतःसाठी अगर समाजासाठी अशा आदर्श प्रारूपांची निर्मिती केली जाते पण त्या प्रत्यक्षात येण्याची शक्यता फारच कमी असते, उदाहरणार्थ 'समाजवादी समाजरचना' निर्माण करणे.हे भारतीय लोकशाहीचे एक आदर्श प्रारूप असले तरी अजून तरी समाजवादी समाज रचना प्रत्यक्षात अस्तित्वात आणणे भारतीय राज्यकर्त्यांना जमलेले नाही व यापुढेही त्यांना ते जमेल असे वाटत नाही. या आदर्श प्रारूपाबाबत अधिक विवेचन करताना डब्लू.एम. वाईन स्पष्ट करतात की आदर्श प्रारूपे ही कोणत्याही अर्थाने आदर्श नसतात. तर ती विशेषतः परिभाषिक तांत्रिक संरचना असतात; ज्यांचा उपयोग विश्लेषणासाठी केला जातो. याचाच अर्थ 'वास्तविक तथ्यांचे तार्किकतेच्या आधारावर संकल्पनेच्या स्वरूपता मांडणे' म्हणजेच आदर्श प्रारूप होय.

**आदर्श प्रारूपांची वैशिष्ट्ये** : वेबरने आदर्श प्रारूपाची संकल्पना मुख्यतः संशोधकांना संशोधनच्या कामी उपयोगी पडण्याच्या दृष्टीने वापरली होती. व्यावहारिक दृष्टीने विचार करता आदर्श प्रारूपांची सर्व वैशिष्टये ज्या ठिकाणी सुचीबध्द केली आहेत ती संशोधकांना साधन म्हणून वापरता येतील. वेबरने आदर्श प्ररूपाबाबत केलेल्या विवेचनाचा विचार करून आपल्याला त्याने मांडलेल्या आदर्श प्ररूपाची कांही वैशिष्टये खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१. आदर्श प्रारूपे ही विशिष्ट सामाजिक संबंधाच्या संचाची एक आदर्श प्रतिकृती असते** : आदर्श प्ररूपांची बांधणी अशा प्रकारे करण्यात येते की विशिष्ट सामाजिक संबंधाच्या संचाची ती एक आदर्श प्रतिकृतीच असते. अशा प्रकारे मांडण्यात आलेल्या आदर्श प्ररूपांमुळे सामाजिक व्यवस्थेचे आकलन होणे सहज शक्य होते.

**२. आदर्श प्रारूपे ही आत्मनिष्ठ असतात** : नैसर्गिक विज्ञान अथवा भौतिक विज्ञाने ही वस्तुनिष्ठ असतात त्यामध्ये संशोधकाच्या विचार, अभिप्राय अगर उद्देशाला महत्व दिले जात नाही, परंतु सामाजिक विज्ञानांमध्ये मात्र वेबरने विशद केलेल्या आदर्श प्रारूपाच्या संकल्पनेत संशोधकाच्या इच्छा, विचार, अभिप्राय यांना महत्व देण्यात आल्याचे आढळून येते. परिणामी आदर्श प्रारूपे ही वस्तूनिष्ठ नसून आत्मनिष्ठ असतात असे मानावे लागते. वेबरच्या मतानुसार आदर्श प्ररूपांची निर्मिती ही आत्मनिष्ठ विचारांच्या आधारावर केली जाते. अर्थातच आदर्श प्ररूपांची निर्मिती करताना संशोधकाच्या मनात त्याविषयी कोणता तरी विचार, अभिप्राय किंवा उद्देश लक्षात घेतला जातो. परिणामी संशोधकाच्या वास्तविक प्रयोजनाच्या आधारावर आदर्श प्रारूपांची मांडणी केली जाते. जर्मन भाषेत यास 'वेरस्टेहन' असे म्हंटले जाते. यामुळेच आदर्श प्रारूपांच्या या वैशिष्ट्यामुळे नैसर्गिक विज्ञान आणि सामाजिक विज्ञानामधील भेद अधिक स्पष्ट होतो.

**३. आदर्श प्रारूप भावात्मक असतात** : आपण जेंव्हा एखाद्या आदर्शाचे प्रारूपांमध्ये प्रतिपादन करतो; तेंव्हा आदर्शाबाबतच्या कांही विशिष्ट विचारांना आपल्याकडून लक्षात घेतले जाते आणि कांही विचारांना मुद्दाम सोडून दिले जाते. परिणामी आदर्श प्रारूपांमध्ये एका विशिष्ट दिशेने, एक विशेष प्रकारची अमूर्तता येते.वेबर हे स्पष्ट करतो की, 'आदर्श प्ररूपांमध्ये कोणत्याही क्रियेच्या केवळ प्रतिमानांची तार्किक तथ्यांवर व्याख्या करून ज्या बाबी अतार्किक आहेत किंवा तार्किकतेला बाधा आणू शकतील अशा बाबींचा त्याग केला जातो. यावरून येथे एक बाब स्पष्ट होते की समाजशास्त्रात निरर्थक घटकांचे अध्ययन केले जात नाही. वेबरच्या मते, 'सामाजिक शास्त्रांनी उद्देशपूर्ण सामाजिक क्रियांचेच अध्ययन केले पाहिजे कारण आदर्श प्ररूपेही भावनात्मक असली तरी ती सार्थकच ठरतात.'

**४. आदर्श प्रारूपे ही परिवर्तनशील असतात** : वेबरच्या मतानुसार समाजशास्त्राचे अंतिम उद्दिष्ट केवळ सामांन्यीकृत आदर्श प्रारूपांची निर्मिती करणे हेच नाही. वेबर असे स्पष्ट करतो की आदर्श प्रारूपांची निर्मिती ही केवळ ऐतिहासिक घटनांचे संशोधन करण्यासाठी केली जाते. परिणामी आदर्श प्रारूपे ही स्थितीशील नसतात. तो पुढे हे ही स्पष्ट करतो की, 'संशोधकाचे कार्य हे स्थिर स्वरूपाच्या आदर्श प्ररूपांची निर्मिती करण्यापुरतेच मर्यादित नसते तर अशा आदर्श प्ररूपांची संशोधनात साधन मानून सामाजिक क्रिया, सामाजिक व्यवहाराचा अर्थ, त्याबाबतचा अभिप्राय, उद्देश, गती आणि त्यांचा परिणाम या सर्व गोष्टींचे अध्ययन करून त्यांचे स्पष्टीकरण करणे व त्या समजून घेणे हा आहे.' अशाप्रकारे समाजशास्त्राच्या संशोधकाचा उद्देश हा केवळ आदर्श प्ररूपांची निर्मिती करणे हा नसून त्यांच्या सहाय्याने त्यातील परिवर्तनशिलता स्पष्ट करणे हा ही आहे. म्हणूनच आदर्श प्रारूपे ही गतिशील अगर परिवर्तनशील असतात.

**५. आदर्श प्रारूपे ही एकांगी प्रतिकृती असतात** : आदर्श प्रारूपे ही एकांगी प्रतिकृती असून त्यामध्ये मुद्दाम कांही अयोग्य अगर सदोष विचारांना स्थान दिले जाते. याच्या सहाय्याने संशोधकाला संशोधन करताना कांही चाचण्या घेणे शक्य होते. या दृष्टीने विचार करावयाचा झाल्यास आदर्श प्ररूपांची मुद्दाम निवड करून त्याआधारे आपल्या संशोधनासाठी गृहितकांची मांडणी करणे शक्य होते, इतकेच नव्हे तर त्यांच्या प्रयोगाचे स्वरूपही निश्चित करावे लागते. अयोग्य विचारांना आदर्श प्रारूपांमध्ये कसे स्थान दिले जाते याचे एक उदाहरण याठिकाणी आपल्याला लक्षात घ्यावे लागेल जेणेकरून त्या आधारे वेबरचे आदर्श प्ररूपाची

संकल्पना सहजगत्या आपल्याला स्पष्ट करता येऊ शकेल. हिंदू धर्माने स्त्रीयांसाठी 'पती हा परमेश्वर आहे' हे आदर्श प्रारूप मांडले असले तरी हिंदू धर्मातील सर्वच अनुयायी स्त्रियांकडून हे आदर्श प्रारूप योग्य मानले जाईलच असे आपणास म्हणता येत नाही.

**६. आदर्श प्रारूपांना सदोष अर्थ प्रदान करून त्यांची निर्मिती केली जाते** : कांही आदर्श प्रारूपांची निर्मिती करत असताना त्यांना सदोष अर्थ प्रदान केला जातो, ज्यामुळे संशोधकासमोर संशोधन क्षेत्राचे सुस्पष्ट चित्र उभा राहते. ज्यामुळे मांडण्यात आलेली सामाजिक आदर्श प्रारूपाची संकल्पना (मूल्यांबाबत पूज्यभाव बाळगतात) सत्य आहे आणि वस्तूनिष्ठ दृष्टीकोणातून संशोधन करणे शक्य आहे की नाही हे स्पष्ट करतात. परिणामी संशोधनासाठी गृतिहकांची मांडणी करताना संशोधकाकडून अशीच आदर्श प्रारूपे निश्चित केली जावीत की ज्यांची सत्यासत्यता त्याला पडताळून पाहणे शक्य होईल.

**७. आदर्श प्रारूपांची निर्मिती बाह्य प्रकरणांचे मर्यादित स्पष्टीकरण करण्यासाठी केलेली असते** : आदर्श प्ररूपामध्ये 'सर्वसामांन्य कायदे' तुलनात्मक आधार या उद्देशाने तयार केली जात नाहीत तर, आदर्श प्रारूपे विशिष्ट बाह्य प्रकरणांचे मर्यादित प्रमाणात स्पष्टीकरण करण्यासाठी तयार करण्यात येतात. तुलनात्मक चाचण्या या विशिष्ट स्वरूपाच्या बाहय घटकांवर प्रकाशझोत टाकण्यासाठी व त्या आधारे विशिष्ट आदर्श प्रारूपे ही योग्य आहेत की नाही हे तपासण्यासाठी घेण्यात येतात. वेबर यांनी धर्माच्या आपल्या सखोल अध्ययनात विविध धर्मातील धार्मिक नीतितत्वे आणि आर्थिक विकास याचे परीक्षण कले आहे. परंतु त्यांच्या अध्ययनाचा उद्देश धार्मिक नीतितत्वे आणि आर्थिक विकास यांच्या परस्परसंबंधाविषयी सर्वसामांन्य कायदे प्रस्थापित करणे हा नव्हता तर त्यांनी मांडलेली प्रोटेस्टंट नैतिकता आणि औद्योगिक भांडवलशाहीचा परिणाम पश्चिम युरोपमध्ये उदय झाला त्याची आवश्यकता वा खरेपणा तपासून पाहणे हाच होता.

अशा प्रकारे आपल्या आदर्श प्रारूपांच्या वैशिष्टयांचे, विवेचन केल्यानंतर वेबरने मांडलेल्या आदर्श प्रारूपाच्या प्रकारांचे स्पष्टीकरण लक्षात घेणे, त्याची आदर्श प्रारूपाची संकल्पना विस्ताराने समजण्यासाठी आवश्यक ठरते. त्याने आदर्श प्रारूपाच्या प्रकारांबाबतचे केलेले स्पष्टीकरण आपणास पुढीलप्रमाणे स्पष्ट करावे लागेल.

**आदर्श प्रारूपाचे प्रकार**

मॅक्स वेबर पुढे हे स्पष्ट करतात की, 'आदर्श प्रारूपे ही एखाद्या संशोधकाला सिध्दांत कल्पना तयार करण्यासाठी सहाय्यभूत ठरतात. या सिध्दांत कल्पनेची सांगड आपणास विविध घटकांशी घालता येते. जर आपल्याला आधुनिक भांडवलशाहीतील धार्मिकतेचा अभ्यास करावयाचा असेल तर वेबर असा सल्ला देतात की आपली आदर्श परूपे ही प्रोटेस्टंटसंबंधी असली पाहिजेत कारण सामाजिक सुधारणा चळवळीतून ख्रिश्चन धर्मात जे विविध पंथ निर्माण झाले, त्यात प्रोटेस्टंट पंथाचा समावेश होतो. तो पुढे असही म्हणतो की, या आदर्श प्ररूपाच्या सहाय्याने आपल्याला १७ व्या शतकातील प्रोटेस्टंटपंथीयांचे स्वरूप कसे होते हे स्पष्ट करता येईल. आपल्या स्वअध्ययनाच्या आधाराने वेबरने प्रोटेस्टंट पंथीय व कॅथॉलिक पंथीय व्यक्तीच्या

वर्तनातील भेद स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या आदर्श प्रारूपांबाबतच्या प्रकारांचे स्पष्टीकरण करताना त्याने खालील तीन प्रकार विशद केले असून ते आपल्यास खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१. ऐतिहासिक तपशीलाची आदर्श प्रारूपे :** या प्रकारच्या आदर्श प्रारूपांमध्ये वेबरने 'पाश्च्यात शहर, आधुनिक भांडवलशाही आणि प्रोटेस्टंट नैतिकता यांचा समावेश केला असून तो म्हणतो की यांचा संबंध विशिष्ट ऐतिहासिक काळातील आणि विशिष्ट सांस्कृतिक विभागातील कांही घटनांशी जोडता येतो. वेबरच्या आदर्श प्रारूपाच्या या प्रकाराबात अधिक स्पष्टीकरण करताना रेमण्ड ॲरॉन म्हणतात की, या वर्गाची वेबरने दिलेली उदाहरणे एकीकडे पृथ्वीवरील पुर्नरचेनेचा विचार स्पष्टपणे मांडतात तर दुसरकिडे विशिष्ट ऐतिहासिक वास्तवतेचा. भांडवलशाही ही संपूर्ण आर्थिक कारकिर्दीचे चित्र स्पष्ट करते. ऐतिहासिक तपशीलाची आदर्श प्ररूपे कांही प्रमाणात पुर्नरचनेचे कार्य करतात. एखाद्या वस्तूचे स्वरूप स्पष्ट होण्यासाठी अनेक गुणविशेष इतिहासाकडून घेतलेले असतात, अनेक संभाव्य पुर्नरचनेपैकी ही फक्त एक पुर्नरचना आहे. याचाच साध्या शब्दातील अर्थ असा की इतिहासाच्या आधाराने समाजशास्त्रज्ञ आजच्या समाजासाठी 'आदर्श प्रारूप' निर्माण करतात. इतिहासाच्या अध्ययनाच्या आधारे पूर्वीच्या चूका टाळून समाजाची पुर्नरचना करणे शक्य होते. युध्दाचे अध्ययन केल्यामुळे समाजाची युध्द टाळण्याकडे प्रवृत्ती होणे सहज शक्य आहे. दुसऱ्या महायुध्दाच्या समाजावर झालेल्या विघातक परिणामांमुळे अनेक नवीन शस्त्रांत्रांची निर्मिती होऊन देखील युध्द टाळण्याकडेच बडया राष्ट्रांची प्रवृती निर्माण झाली आहे याचे एकमेव कारण इतिहास हेच आहे.

**२. सामाजिक वास्तवाचे अमूर्त घटक दर्शवणारी आदर्श प्ररूपे :** सामाजिक वास्तवाचे दर्शन घडवणाऱ्या आदर्श प्रारूपांमध्ये वेबरने प्रामुख्याने 'नोकरशाही' किंवा 'सरंजामशाही' या दोन संकल्पनांचा समावेश केला आहे.नोकरशाही आणि सरंजामशाहीचे अस्तित्व वेगवेगळे होते. ऐतिहासिक व सांस्कृतिक संदर्भातील नोकरशाही व सरंजामशाहीच्या आधाराने आजच्या नोकरशाही व सरंजामशाहीचे आपणास सहजगत्या विश्लेषण करता येते.

**३. विशिष्ट प्रकारच्या वर्तनाची संयुक्तिक पुर्नरचना करणारी आदर्श प्रारूपे :** मॅक्स वेबरच्या मतानुसार ही तिसऱ्या प्रकारची आदर्श प्ररूपे मानवाच्या विशिष्ट प्रकारच्या वर्तनाची संयुक्तिक किंवा योग्य प्रकारे पुर्नरचना करण्याचे कार्य करतात. वेबरच्या विशिष्ट मतानुसार आर्थिक सिध्दांतील सर्व योजना या, जर मनुष्य हा शुध्द आर्थिक विषयाच्या अधीन झाला तर मनुष्याने कसे वागावे या संबंधीच्या पुर्नरचनात्मक आदर्श प्रारूप निर्माण करतात. तो पुढे असेही म्हणतो की आर्थिक सिध्दांत तीव्रपणे आर्थिक वर्तनाचे तत्व मानवात बिबवण्याचे कार्य करतात. थोडक्यात या प्रकारची आदर्श प्ररूपे मुख्यतः मानवाच्या आर्थिक क्रियांचे निर्धारण करतात.

थोडक्यात मॅक्स वेबरने वरील प्रमाणे त्याच्या संकल्पनांपैकी एक महत्वाची संकल्पना विषद केली आहे. आदर्श प्रारूप ही संकल्पना समाज आणि विज्ञान यांच्या विविध वैशिष्टयांना एकत्र बांधणारा दुवाच आहे. तसेच या संकल्पनेच्या सहाय्याने आपणास ऐतिहासिक घटना किंवा घटनाक्रमाचे योग्य प्रकारे

आकलन होऊ शकते. शेवटी वेबरने हे स्पष्ट केले आहे की इतिहास आणि समाजशास्त्र यांचे परस्परावलंबन आदर्श प्ररूपाच्या सहाय्याने स्पष्ट करता येते.

**✻ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून वाक्य परत लिहाः

१. मॅक्स वेबर यांनी आपले पध्दतीशात्र विषयक विचार ............ या ग्रंथात मांडले आहेत.

अ) द प्राटेस्टंट इथिक्स ब) द मेथॉडॉलॉजी ऑफ द सोशल सायन्सेस

क) द रिलिजन ऑफ चायना ड) एन्शन्ट ज्युडाईझम

२. साम्यवादी समाजरचना स्थापन करणे हे .................. या राष्ट्राचे ध्येय आहे.

अ) अमेरिका ब) इंग्लंड क) भारत ड) रीशया

३. नैतिक आदर्श प्ररूपांची मांडणी करणे म्हणजे ................. आदर्श नव्हेत.

अ) नैतिक ब) सामाजिक क) धार्मिक ड) सांस्कृतिक

४. वेबरच्या मते सामाजिक चळवळीतून ................. धर्मात जे विविध पंथ निर्माण झाले त्यात भांडवलशाहीच्या विकासातील आदर्श प्ररूपे मांडण्यासाठी महत्वपूर्ण ठरतात.

अ) हिंदू ब) मुस्लिम क) यहुदी ड) ख्रिश्चन

५. वेबरच्या मतानुसार, मानव जर शुध्द ............. विचारांच्या अधीन झाला तर मनुष्याने कसे वागावे या संबंधीच्या आदर्श प्ररूपाची निर्मिती करता येते.

अ) आर्थिक ब) धार्मिक क) सांस्कृतिक ड) राजकीय

६. आदर्श प्ररूपांच्या सहाय्याने आपल्याला .............. घटनाक्रमाचे आकलन होऊ शकते.

अ) सामाजिक ब) धार्मिक क) सांस्कृतिक ड) ऐतिहासिक.

७. पति हाच पस्मेश्वर आहे अशी कल्पना ............. धर्माने समाज सदस्यांसमोर मांडली होती.

अ) हिंदू ब) ख्रिश्चन क) मुस्लिम ड) शिख

८. वेबर यांच्या मते, आदर्श प्ररूपे ................ ही असतात.

अ) आत्मनिष्ठ ब) वस्तुनिष्ठ क) काल्पनिक ड) संवेदनशील

## ४.३.२ सामाजिक क्रियेचा सिध्दांतः

**प्रस्तावना** : मॅक्स वेबरच्या समाजशास्त्रीय विचारांचा आढावा घेत असताना त्याने मांडलेल्या सामाजिक क्रियेच्या सिध्दांताचा सविस्तर आढावा घेणे अत्यंत महत्वाचे आहे. वेबरने सामाजिक क्रियेच्या सिध्दांतास

आपल्या चिंतनाचा मूळ आधार मानला होता. समाजिक क्रियेचे स्पष्टीकरण देताना तो म्हणतो की 'प्रत्येक व्यक्ती आपल्या आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी कोणत्या ना कोणत्या प्रकारचे कार्य करत असते. अशा प्रकारे व्यक्तीद्वारे करण्यात आलेले कोणत्याही प्रकारचे कार्य म्हणजेच क्रिया होय.' समाजशास्त्राची व्याख्या करतानाच त्योने असे मत मांडल्याचे अढळून येते की 'समाजशास्त्र हे असे एक सामाजिक शास्त्र आहे जे सामाजिक व्यवस्थेतील सामाजिक क्रियांचे स्पष्टीकरणात्मक आकलन करण्याचा प्रयत्न करते. ज्यामुळे पुढे त्या संबंधीच्या मार्गांचे व निष्कर्षांचे कारणात्मक स्पष्टीकरण देणे शक्य होते.'

वेबरने मांडलेली सामाजिक क्रियेची व्याख्या समजून घेण्यासाठी आपल्याला सामाजिक क्रिया म्हणजे नेमके काय हे ही लक्षात घ्यावे लागेल. वेबरच्या मताने कोणत्याही क्रियेला सामाजिक क्रिया ही संज्ञा अशाच वेळी प्राप्त होते जेंव्हा व्यक्ती आत्मनिष्ठ दृष्टीकोनातून दुसऱ्या व्यक्तींचे वर्तन लक्षात घेऊन आपला वर्तन मार्ग बदलते. याबातचे अधिक स्पष्टीकरण लक्षात घेण्यासाठी आपल्याला सामाजिक क्रिया कशाला म्हणता येईल हे लक्षात घ्यावे लागेल. याचे स्पष्टीकरण देत असताना वेबरने खालिल चार मुद्दे लक्षात घेण्याची सूचना केली आहे ज्यातून सामाजिक क्रियेची लक्षणे आपपल्याला स्पष्ट करता येतील.

**सामाजिक क्रियेची लक्षणे किंवा वैशिष्टये :**

**१. सामाजिक क्रिया या भूत, वर्तमान अगर भविष्य काळातील क्रियेने प्रभावित झालेल्या असतात.**

सामाजिक क्रिया ज्यामध्ये क्रियेतील अपयश आणि निष्क्रियता समाविष्ट असतात. या क्रिया इतरांच्या भूत, वर्तमान व भविष्यकालीन वर्तनातून साकारलेल्या असतात. उदा. एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीने पूर्वी केलेल्या क्रियेचा बदला घेण्यासाठी तिच्यावर केलेल्या हल्ल्याची क्रिया होय.कारण ती व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीने केलेल्या हल्ल्याचा सूड घेण्यासाठी क्रिया करत असते. कारण ती व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीने केलेल्या क्रियेने प्रभावीत झालेली असते.याबरोबरच विद्यार्थ्यांकडून वर्गात प्राध्यापकांकडून शिकवत असताना देण्यात येत असलेल्या नोटस लिहून घेण्याची होत असलेली क्रिया ही वर्तमानशी निगडीत क्रियाच ठरते कारण भविष्यात त्याला द्यावयची असलेली परीक्षा विचारात घेऊन अशी क्रिया करण्यासाठी ते प्रवृत्त झालेले असतात, अशा वेळी अशा क्रियांत सामाजिकता असते. या सर्व क्रिया या समाजिक क्रियांत समाविष्ट करता येतात कारण अशा क्रिया सामाजिक जीवन जगत असताना आपला असंख्य व्यक्तींशी जो संबंध येतो त्यातून कळत न कळत आपल्याकडून घडून येत असतात. परिणामी अशा क्रियांना सामाजिक क्रिया म्हणता येईल.

**२. सर्व प्रकारच्या क्रिया सामाजिक क्रिया नसतातः**

व्यक्तीकडून घडून येणारी प्रत्येक (मग ती अगदी उघड स्वरूपातली) क्रिया सुध्दा सामाजिक क्रियाच असतेच असे नाही कारण अशा सामाजिक क्रिया जर कोणत्या तरी निर्जिव वस्तूच्या संदर्भात घडत असतील तर त्या असामाजिक क्रियांत समाविष्ट कराव्या लगतात. उदाहरणार्थ माणसाकडून घडणारे धार्मिक वर्तन हे केवळ चिंतनाच्या स्वरूपाचे अगर वैयक्तिक प्रार्थनेच्या स्वरूपाचे असेल तर त्यांचा समावेश सामाजिक क्रियांमध्ये करता येणार नाही. अशा क्रिया या पूर्णपणे आत्मनिष्ठ स्वरूपाच्या असतात कारण त्या निर्जिव वस्तूंच्या संदर्भात घडून येत असतात.

**३. प्रत्येक मानवी संपर्क सामाजिक क्रिया नाही :**

मानवामानवात घडून येणारा प्रत्येक संबंध हा सामाजिक स्वरूपाचा असतोच असे नाही. जेंव्हा मानवी संपर्क आल्यानंतर क्रिया करणाऱ्या व्यक्तीचा व्यवहार हा दुसऱ्याच्या व्यवहाराशी अर्थपूर्णरित्या संबंधित आणि प्रभावीत होत असेल तरच त्या क्रियांना सामाजिक क्रियांत समाविष्ट करता येईल. उदाहरणार्थ होऊ घातलेल्या अपघातापासून परस्परांना वाचवण्यासाठी व्यक्तीकडून होणारा प्रयत्न व नंतर ते आपापल्या मार्गाने निघून जातात तेंव्हा तीचा समावेश सामाजिक क्रियेत करता येत नाही, पण अपघातामुळे त्यांच्यात भांडण झाल्यास त्याचा आपणास सामाजिक क्रियेत समावेश करता येईल.

**४. अनेक व्यक्तींकडून होणाऱ्या एकसारख्या क्रिया म्हणजे सामाजिक क्रिया नव्हेत :**

वेबर यांच्या मते अनेक व्यक्तींद्वारा होणाऱ्या एकसारख्या क्रियांचा समावेश आपल्याला सामाजिक क्रियांत करता येणार नाही, कारण अशा प्रकारच्या व्यक्तीकडून घडणाऱ्या क्रिया या इतर व्यक्तीच्या क्रियांमुळे प्रभावित झालेल्या नसतात. उदा. रस्त्यावरून अनेक लोक ये जा करत असताना अचानक आलेल्या पावसामुळे बहुसंख्य लोक आपल्या जवळच्या छत्र्या उघडतात. पाऊस आल्यावर अनेक व्यक्तीकडून घडणारी ही क्रिया एकसारखी असली तरी ती सामाजिक क्रिया ठरणार नाही कारण ती व्यक्तींच्या परस्पर संबंधातून झालेली असत नाही.याबरोबरीनेच इतर व्यक्तींच्या क्रियेचे केवळ अहेतुकपणे अनुकरण करणे ही देखील सामाजिक क्रिया ठरणार नाही, कारण व्यक्तीकडून होणाऱ्या अशा केवळ दुसऱ्या व्यक्तीच्या अनुकरणाच्या मागे कोणत्याही प्रकारचे स्वतःचे हीत व्यक्तीला साधायचे नसते तर ती व्यक्ती केवळ स्वतःचाच विचार करते. अशा क्रियेत कुठेही सामाजिकता दिसून येत नाही. उदा. एखादा तरूण महाविद्यालयात जात असताना जवळच्या मार्गाचा अवलंब करत असेल आणि इतरांनांही त्याचेच अनुकरण करायला सुरूवात केली तर त्यात सामाजिकतेचा लवलेषही नसतो तर या ठिकाणी केवळ मुलांची सोय असते येथे कुठेही सामाजिकता आढळून येत नाही.

सामाजिक क्रियेविषयीच्या या चार लक्षणांच्या सहाय्याने मॅक्स वेबरने सामाजिक क्रियांमध्ये नेमक्या कोणत्या क्रिया समाविष्ट करता येतील हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्या मतानुसार व्यक्तीकडून घडून येणाऱ्या भूत, वर्तमान, अगर भविष्यकाळाशी निगडीत क्रियांचाच समावेश आपणास सामाजिक क्रियांत करता येईल. केवळ इतरांच्या अनुकरणातून व्यक्तीकडून घडून येणाऱ्या क्रिया असोत अगर प्रत्येक मानवी संपर्कातून घडून येणाऱ्या अगर इतरांच्या वर्तनाचे केवळ अनुकरणातून घडलेल्या क्रिया म्हणजे सामाजिक क्रिया नव्हेत.

**सामाजिक क्रियांचे प्रकार :**

वेबरने सामाजिक क्रियांचे अधिक सविस्तर वर्णन लक्षात येण्यासाठी सामाजिक क्रियांचे खालील चार प्रकार स्पष्ट केले आहेत.

१. बुध्दीप्रामांण्यवादी किंवा तर्कसंगत क्रिया

२. मूल्यमापनात्मक किंवा मूल्यात्मक क्रिया

३. संवेगात्मक किंवा भावनात्मक क्रिया

४. परंपरावादी किंवा परंपराधिष्ठित क्रिया.

**१. बुध्दीप्रामाण्यवादी किंवा तर्कसंगत क्रिया :**

व्यक्तीकडून घडणारी बुध्दीप्रामांण्यवादी अगर तर्कसंगत क्रिया म्हणजे अशी क्रिया की जेंव्हा व्यक्ती आपली साधने आणि ध्येये यामध्ये जाणीवपूर्वक समायोजन स्थापन करून क्रिया करते. उदाहरणार्थ एखाद्या व्यक्तीला नवा व्यवसाय सुरू करावयाचा असेल तर त्यासाठी आपल्याजवळ असलेले भांडवल, त्यासाठी लागणारी यंत्रे, मनुष्यबळाची उपलब्धता, त्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची उपलब्धता, बाजारपेठांमध्ये उत्पादीत वस्तूची सध्याच्या काळातील मागणी व भविष्यकाळातील उत्पादित करावयाच्या वस्तूसाठी उपलब्ध होणारी बाजारपेठ, तंत्रज्ञानात होऊ घातलेला बदल. या सर्व बाबींचा सविस्तर विचार करून जेंव्हा एखादी व्यक्ती आपला उद्योग उभा करण्याचा निर्णय घेते तेंव्हा ती तर्कसंगत अगर बुध्दीप्रामाण्यवादी सामाजिक क्रिया ठरते. थोडक्यात कोणतीही क्रिया करण्यापूर्वी त्यासंबंधी योजनाबध्द रीतीने सर्वांगीण विचार करूनच क्रिया करण्याच्या दृष्टीने व्यक्तीने केलेला प्रयत्न म्हणजे व्यक्तीकडून घडणारी बुध्दीप्रामांण्यवादी अगर तर्कसंगत क्रिया होय.

**२. मूल्यमापनात्मक किंवा मूल्यात्मक क्रियाः**

व्यक्तीच्या सौंदर्यात्मक, धार्मिक अगर नैतिक वर्तणुकीचा समावेश ज्या क्रियेत केला जातो त्या क्रियेला मूल्यमापनात्मक अगर मूल्यात्मक क्रिया असे म्हंटले जाते. शिवाय असे वर्तन अगर क्रिया कोणत्याही प्रकारचे संयुक्तिक कारण न देता केवळ सौंदर्यात्मक, धार्मिक आणि नैतिक आधारावर प्रत्यक्षात आलेली असते. वेबर यांच्या मते 'अशी एखादी क्रिया केवळ मूल्यात्मक शिष्टाचाराला प्रमाण मानून पार पाडली जाते. समाजमांन्य असलेले धार्मिक किंवा नैतिक आदर्श टिकून रहावेत या एकमेव हेतूने कांही क्रिया व्यक्तीकडून पार पाडल्या जातात तेंव्हा त्यांचा मूल्यमापनात्मक अगर मूल्यात्मक क्रियांत समावेश करता येतो. शिवाय अशा क्रियांमध्ये अंतिम मूल्यांविषयी प्रश्नही उपस्थिती केले जात नाहीत तर अशा प्रकारची क्रिया व्यक्तीकडून केली गेली पाहिजे असे गृहितच धरले जाते. उदा. व्यक्तीकडून पार पाडली जाणारी पूजा अर्चा, ही क्रिया करीत असताना आपणास यापासून नेमका कोणता फायदा होईल याचा व्यक्तीकडून विचार केला जात नाही, तर अशी क्रिया पार पाडण्यामागे समाजमांन्य धार्मिक मूल्यांचाच व्यक्तींवरील प्रभाव असल्याचे आपणास दिसून येते. अशा समाजमांन्य मूल्यांना प्रमाण माणून व्यक्तीकडून अनेक क्रिया पार पाडल्या जात असल्याचे दिसून येते.

उदा. संक्रांतीला तीळगुळ वाटायची किंवा दसऱ्याच्या दिवशी आपट्याची पाने 'सोने' म्हणून का वाटायची याची कोणतिही संयुक्तिक कारणे अगर शास्त्रीय उत्तरे आपल्याला माहिती असत नाहीत तरी देखील समाजातील व्यक्ती त्या त्या दिवशी अगदी आनंदाने अशा क्रिया करताना आढळतात. यामागे केवळ

समाजाने मान्य केलेल्या मूल्यांचे जतन करणे किंवा इतर समाज सदस्यांनी आपल्याला नावे ठेवायला नको म्हणूनच व्यक्तीकडून अशा क्रिया पार पाडल्या जातात.

**३. संवेगात्मक किंवा भावनिक सामाजिक क्रिया :**

संवेगात्मक क्रिया म्हणजे भावनाप्रधान क्रिया असून इतरांच्या प्रेम, हेवा, द्वेष व राग यांनी भरलेल्या क्रियेला प्रतिसाद देण्यासाठी व्यक्तीकडून पार पाडली जाणारी क्रिया सामाजिक क्रियांत समाविष्ट करता येते. आपल्यावर प्रेम करणाऱ्या व्यक्तीवर आपणही प्रेम करतो. या बरोबरच आपल्या मुलाचा आपल्याला राग आल्यास आपणाकडून त्याला प्रसंगी होणारी मारहाण ही देखील भावनेच्या अतिरेकापोटी घडून येणारी क्रिया असते. आपल्या शत्रूवरही आपण प्रेम करावे हे तत्व म्हणून कितीही चांगले वाटत असले तरी शत्रू हा शेवटी शत्रूच असतो असे माणून व्यक्तीकडून शत्रूत्वाचीच भावना व्यक्त करणारी क्रिया घडत असते. कित्येक वेळा भावनेच्या अतिरेकापोटी व्यक्तीकडून घडून येणारी क्रिया ही इतकी पराकोटीची असते की अशी क्रिया घडून गेल्यानंतर व्यक्तीला आपल्या अशा क्रियेविषयी शरम वाटू लागते व ती त्याबद्दल खंतही व्यक्त करते.

**४. परंपरावादी किंवा परंपराधिष्ठित क्रिया :**

ज्या क्रिया व्यक्तीकडून केवळ परंपरने चालत आलेला वारसा म्हणून पार पाडल्या जातात त्यांचा समावेश या प्रकारात करता येईल. अशा प्रकारच्या क्रिया व्यक्तीकडून पार पाडल्या जातात त्यामागे अशा प्रकारची क्रिया समाजातील इतर अनेक लोकांकडून पार पाडली जाते हेच एकमेव कारण असते. शिवाय अशी क्रिया व्यक्तीकडून पार पाडली जावी यासाठी पुष्कळ वेळा व्यक्तीवर इतर समाज सदस्यांकडून दबावही आणला जातो. मुख्यतः समाज मांन्य रूढी, प्रथा, परंपरा या संदर्भातील क्रिया व्यक्तीकडून पार पाडल्या जाव्यात असा समाजाचा व्यक्तीवर दबाव असतो आणि या दबावापोटी व्यक्तीकडून रूढी, प्रथा, परंपरांचे पालन व्हावे अन्यतः समाज सदस्यांचा आपल्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलेल या भिती पोटी व्यक्तीकडून अशा क्रिया पार पाडल्या जातात. उदा. एखाद्या कुटुंबातील व्यक्तीचे निधन झाले तर अशा दुखःद प्रसंगी कुटुंबतील व्यक्तींकडून कोणत्या क्रिया पार पाडल्या पाहिजेत या विषयी समाजाने कांही रूढी, प्रथा अगर परंपरा निश्चित केलेल्या असतात. त्याप्रमाणे व्यक्तीकडून क्रिया पार पाडल्या जातात.

थोडक्यात मॅक्स वेबरने सामाजिक क्रियेचा सिध्दांत स्पष्ट करत असताना सर्वप्रथम सामाजिक क्रिया नेमके कशाला म्हणता येईल त्यात व्यक्तीकडून पार पाडल्या जाणाऱ्या क्रिया नेमक्या कोणत्या वैशिष्टयांनी युक्त असतात आणि सामाजिक क्रियांचे कोणते प्रकार स्पष्ट करता येतील हे सोदाहरण स्पष्ट केले असल्याचे आपल्याला दिसून येते. याबरोबरच सामाजिक क्रियेचा सिध्दांत हा सामाजिक आकलन पध्दतीशी संबंधीत असल्यामुळे आपल्याला या अंगानेही अगदी थोडक्यात का असेना त्याने दिलेले याबाबतचे स्पष्टीकरण समजून घेणे सामाजिक क्रियेविषयीच्या वेबरच्या सिध्दांताचे महत्व जाणून घेण्यासाठी महत्वाचे किंवा आवश्यक वाटते. वेबरने हे स्पष्ट केले आहे की प्रत्येक व्यक्तीच्या क्रियांना कांही उद्देश असतात. याचाच अर्थ असा की कोणतातरी निश्चित हेतू अगर उद्देश डोळ्यासमोर ठेवूनच व्यक्तीडून क्रिया घडत असतात.

**⁕ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–२**

योग्य पर्यायाची निवड करून वाक्य पूर्ण कराः

१. व्यक्तीकडून घडून येणाऱ्या क्रियेत जेंव्हा आपली ध्येये व साधने यांचा योग्य विचार करून व्यक्तीकडून घडून येणारी क्रिया ................. प्रकारची सामाजिक क्रिया बनते.

अ) बुध्दीप्रामांन्यवादी ब) परपराधिष्ठित क) संवेगात्मक ड) मूल्यमापनात्मक

२. व्यक्तीच्या सौंदर्यात्मक, धार्मिक अगर नैतिक वर्तणुकीचा समावेश ज्या क्रियेत केला जातो त्या क्रियेला .................... क्रिया असे म्हंटले जात.

अ) बुध्दीप्रामांन्यवादी ब) मूल्यात्मक क) संवेदात्मक ड) परंपारावादी

३. संक्रांतीला तीळगुळ वाटायची व्यक्तीकडून केली जाणारी क्रिया .............. प्रकारची क्रिया आहे.

अ) बुध्दीप्रामांन्यवादी ब) संवेगात्मक क) मूल्यात्मक ड) परंपरावादी

४. कित्येक वेळा भावनेच्या अतिरेकापोटी व्यक्तीकडून घडून येणारी क्रिया म्हणजे .......... क्रिया होय.

अ) संवेदनात्मक ब) मूल्याभिमूख क) बुध्दीप्रामांण्यवादी ड) परंपराावादी

५. व्यक्तीवर जेंव्हा सामाजिक क्रिया पार पाडण्यासाठी समाजाकडून दबाब आणला जातो तेंव्हा व्यक्तीकडून घडून येणारी क्रिया म्हणजे ............... प्रकारची क्रिया ठरते.

अ) परंपरावादी ब) बुध्दीप्रमांन्यवादी क) मूल्याभिमुख ड) संवेदनात्मक

**४.३.३ अधिकाराचा सिध्दांत**

**प्रास्ताविक** : मॅक्स वेबर यांच्या समाजातील सत्तेचा सिध्दांताचे स्वरूप स्पष्ट करत असताना या सिध्दांताची मुळे त्याच्या नोकरशाहीविषयी असलेल्या विचारांमधून कशी विकसित झाली आहेत याचे स्पष्टीकरण प्रथम करणे गरजेचे आहे. मॅक्स वेबरने नोकरशाहीसंबंधीचे आपले विस्तृत विचार स्पष्ट करत असताना ते साामाजिक अधिकार किंवा शक्तींच्या संदर्भात केल्याचे दिसून येते. वास्तवात नाकरशाही ही एक प्रकारची प्रशासकिय व्यवस्था असून ज्यामध्ये 'सत्तेचे वितरण, वर्गिकरण आणि सत्तेचे हस्तांतरण एका विशिष्ट प्रकारे होत असते असे मत मांडून त्यांनी नोकरशाहीची वैशिष्टये स्पष्ट केली आहेत. नोकरशाहीमध्ये अवैयक्तिक नियमांचे महत्व, स्पष्ट आणि निश्चित कार्यक्षेत्र, पदांची श्रेणीरचना, नियंत्रणात्मक नियमांचे अस्तित्व, पदाधिकारी आणि मालकी हक्क यामध्ये आढळणारे अलगिकरण, एकाधिकारशाहीचा अभाव, नियम, आदेश आणि निर्णयांचे लिखित स्वरूप ही वैशिष्टये स्पष्ट केली आहेत. या आधारावर मॅक्स वेबरने मांडलेल्या नोकरशाहीबाबतच्या विचारांचे एका बाजूला कांही लोकांकडून स्वागत झाल्याचे तर त्याचवेळी कांहींकडून त्यावर प्रचंड टिकाही केली गेल्याचे दिसून येते. 'एडेजियोनी' यांनी त्याच्या विचारांचे खंडन करताना समाजातील अधिकारांचे स्पष्ट स्वरूपात विभाजन करणे असंभवनीय असून कोणत्याही प्रकारचे अधिकार कधही स्थिर असत नाहीत आणि वेबर यांच्या मतानूसार चमत्त्कृतीजंन्य अधिकार उच्च पादावर

विराजमान असलेल्या व्यक्तीच्या जवळच असतात असे मत मांडले असले तरी, कित्येक वेळा निम्न पदावरील व्यक्तीजवळ देखील अधिकाराशी संबंधीत असामांन्य गुण आढळून येतात असे मत मांडले होते. ही बाब अधिक विस्ताराने समजावी यासाठी वेबरने मांडलेला अधिकाराविषयीचा सिध्दांत विस्ताराने स्पष्ट करणे गरजेचे बनते.

**अ) अधिकारांच्या वैधतेचे आधारः**

समाज मग तो कोणत्याही प्रकारचा असो त्यात अधिकार संबंध आढळून येतात. यापैकी राजकीय शक्तीवर आधारीत संबंधांमध्ये अधिक स्थायीत्व पहायला मिळते. राजकीय संस्था या सामाजिक संर्घष दूर करण्याचे महत्वपूर्ण कार्य करतात. अशा प्रकारे राजकीय अधिकारांचे महत्व स्पष्ट करतानाच कित्येक वेळा राजकीय अधिकार आर्थिक अधिकारांद्वारे नियंत्रित होत असल्याचेही दिसून येते. परिणामी राजकीय सत्तेबरोबरच आर्थिक अधिकार ही तितकेच महत्वाचे ठरतात. हे ही दिसून येते कारण राजकीय सत्ता स्थोपन करण्यासाठी ज्या प्रकारचे आर्थिक पाठबळ लागते ते कित्येक वेळा त्या समाजातील आर्थिक सत्ता स्थाने बळकावलेल्या लोकांकडून राजकीय पक्षांना मिळत असते. हे ही लक्षात घेणे घेणे येथे गरजेचे ठरते.याशिवाय राजकीय अधिकार हे कांही ठिकाणी चमत्तकृतीजंन्य सत्तेच्या सहाय्याने मिळवण्याचा प्रयत्नही केला जातो किंवा अशा प्रकारचे चमत्कार करण्याची क्षमता असलेल्या लोकांकडूनही अधिकार मिळवल्याचे दिसून येते. याचाच अर्थ असा होतो की, कोणत्याही समाजातील अधिकार कधीही स्थिर असत नाहीत. अत्यंत थोडक्यात अधिकारांच्या वैधतेचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी आपल्याला अधिकाराचे खालील मूलाधार विचारात घ्यावे लागतील.

**१. अधिकारसंबंधः** अधिकारा संबंधाबाबत आपणास असे दिसून येते की एका बाजूला अधिकारी आणि दुसरीकडे अधिकार वाहकांशी संबंधीत असून जे की अधिकारांना वैधता पाप्त झाल्यानंतर स्थिर स्वरूपात स्थापित होतात.

**२. कमीत कमी साधनांचा वापरः** ज्याप्रमाणे राज्यामध्ये अधिकारांची स्थापना करण्यासाठी कमित कमी साधनांचा वापर केला जातो त्याचप्रमाणे अधिकार स्थापन करण्यासाठी कमित कमी साधनांचा वापर करणे अपेक्षित असते.

**३. मान्यता :** अधिकारांबाबतचा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे अधिकाराला मांन्यता मिळणे होय.ही मांन्यता विधायक अगर निषेधात्मक अशा दोन्ही प्रकारची असू शकते. यापैकी विधायक मांन्यता ही पुरस्काराच्या स्वरूपातील असू शकते तर निषेधात्मक मांन्यता ही शिक्षेच्या स्वरूपातील असू शकते. सत्ताधारी व्यक्ती पुरस्कार व दंड या दोन्ही माध्यमातून आपला अधिकार स्थापित करू शकते. तरी प्राचिन काळी दंडात्मक स्वरूपातील अधिकारांना अधिक मांन्यता मिळत होती. पण वर्तमान काळात रॉबर्ट दहल यांच्या मतानुसार अधिकारांच्या द्वारे शासन  करणे अधिक महत्वापूर्ण ठरते आहे.

**४. संघटित प्रयत्नः** अधिकाराबाबतची वैधता सर्व काळात स्वाभानिकपणे प्राप्त होतच असे नाही. यासाठी लोकांना संघटित करण्याचा प्रयत्न केला जातो. अशा प्रकारे लोकांना संघटित करण्यासाठी विविध

साधनांचा वापर केला जातो ज्यामध्ये प्रचार हे एक महत्वाचे साधन ठरते.वेगवगेळी सरकारे आपल्या क्षेत्रामधील विविध अनुकूल विचार आणि मूल्ये यांचा प्रचार करत असतात अशा प्रकारे संघटित झालेल्या विविध विचारप्रणालीचे लोक संघटित होऊन आपला अधिकार स्थापन करताना आढळतात.

**५. विचारधारा:** आधुनिक काळात राजकीय अधिकारांचे मूळ विचारधारेतच असते. 'रॉबर्ट ई. हाऊस' व 'जॉन ए. ह्यूगस' यांच्या शब्दात जर असे मानले की मनुष्य विविध परिस्थितींमध्ये विवेकशील विचार करतात तरी देखील विचारधारा या तथ्यांवर अतिक्रमन करण्याचे एक साधन बनू शकते. ज्यामुळे व्यक्ती आपले स्वहीत विसरून समाजाच्या तत्कालीक हीतासाठी सुरू असलेल्या आंदोलनामध्ये सहभागी होते. याचे एक उदाहरण म्हणून आपल्याला साम्यवादी विचार धारेच्या प्रभावाबात चर्चा करता येईल. ज्या ठिकाणी अधिकारांमध्ये स्थिरता आहे अशा ठिकाणी अधिकारांची वैधता आवश्यक असते, कारण अशा ठिकाणी विचारधारेचा प्रभाव जलद गतीने उत्पन्न होतो. यामुळेच आपणास विकासशील देशांमध्ये वैचारिक आंदालने अधिक प्रमाणात होताना दिसून येतात, याऊलट विकसीत देशांमध्ये अशा आंदोलनांचा फारसा प्रभाव दिसून येत नाही. या ठिकाणी ही बाब लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे की वैचारिक आंदोलनेही जशी सत्ता पक्षांमध्ये होतात त्याप्रमाणेच विरोधी पक्षांमध्ये होत असतात. प्रत्यक्षात विचारधारा ही सत्ताधारी आणि सत्तावाहक या दोहोंसाठी एक नियमनात्मक व्यवस्था निर्माण करत असते. एकीकडे अधिकारांचे वहन करणाऱ्यांना अधिकारी व्यक्तीकडून दिल्या जाणाऱ्या आज्ञांचे पालन करण्यास भाग पाडले जाते तर दुसरीकडे अधिकार लाभलेल्यांसाठी आवश्यक त्या नियमनांची तरतूद केलेली असते. जर अधिकारी व्यक्तीकडून या नियमनांचे पालन केले गेले नाही तर ज्यांनी त्याच्या अधिकारांना वैधता प्राप्त करून दिलेली असते त्यांच्या कडुन अधिकारी व्यक्तीच्या अधिकारांनाच ग्रहण लागते व कालांतराने त्यांचे अधिकार संपुष्टात येतात. अशा परिस्थितीत कोणतिही विचारधारा आपल्या विरोधी विचारधारेचा विकास सहन करत नाही. मुळातच एकाच विचारधारेच्या अंतर्गत त्याच्या विरोधी विचारधारेची बिजे दिसून येत असतात ज्यातून नविन विचारधारा अस्तित्वात येऊ शकते. अशा विचारधारेला अनुसरून राजकीय अधिकारी व्यक्ती जर आपल्या विचारधारेत बदल घडवून आणण्यात यशस्वी झाले तरच ती आपल्या अधिकारांची वैधता टिकवून ठेवण्यात यशस्वी होते पण याबाबत ती अयशस्वी झाली तर तिला प्राप्त झालेल्या अधिकारांची वैधता संकटात सापडते. जर एखाद्या देशात एकच विचार व्यवस्था शक्तीशाली असेल तर तेथे एकच शक्तिशाली सरकार स्थिर राहते. पण जर विचार व्यवस्थेमध्ये कोणाचीही विचाराधारा एकमेकांपेक्षा कमी नसेल तर राजकीय क्षेत्रात सतत परिवर्तने घडून येणे स्वाभाविक बनते, यामुळेच एका विचारधारेप्रमाणेच दुसऱ्या विचारधारेशी अनुरूप सत्ता अस्तित्वात येते. आधुनिक कालचा विचार केला तर राजकीय क्षेत्रात साम्यवादी आणि भांडवलवादी विचारधारांचा विशेष प्रभाव असल्याचे दिसून येते. ज्या देशांमध्ये साम्यवादी विचाराधारा प्रभावशाली असते तेथून भांडवलवादी विचाराचे समूळ उच्चाटन करण्याचा प्रयत्न होताना आढळून येतो आणि तेथे भांडवलवादी विचारसरणीबाबत कोणत्याही विचारांचे स्तोम माजणार नाही याची संपूर्ण दक्षता घेतली जाते. दूसरीकडे भांडवलवादी विचारधारा प्रभावी असलेले देश भांडवलवादी विचारांवरच संपूर्ण भर देतात आणि साम्यवादी विचारधारेच्या प्रचार, प्रसाराला अजिबात स्थान देत नाहीत. ज्या देशांमध्ये या दोन्ही विचारधारांपासून वेगळी

मध्यममार्गी विचारधारा अवलंबली जाते अशा देशांमध्ये संघर्षाची तिव्रता इतकी आढळत नाही. याप्रमाणेच कांही मुस्लिम देशांमध्ये धार्मिक विचारधारेचा प्रभाव राजकीय विचारधारेवर आढळून येतो. अशा देशांमध्ये केवळ इस्लाम विरोधीच नव्हे तर इतर कोणत्याही विरोधी विचारधारेवर कठोर प्रतिबंध घाताले जातात आणि संपूर्ण व्यक्तीजीवनावर शरयत संमत विचारधाराच कठोरपणे लादली जाते. वास्तवात केवळ एकाच विचारधारेच्या प्रभावी अंलबजावणीमुळे सरकारला स्थिरता प्राप्त होते पण यामुळे कांही अमानवीय परिस्थीती निर्माण होतात. भारतासारख्या लोकशाही देशांमध्ये परस्पर विरोधी विचारधारांच्या प्रचार, प्रसारला मांन्यता दिली जाते.अशा प्रकारच्या विरोधी विचारधारेच्या प्रचार, प्रसाराला परवानगी दिली गेल्यामुळे कांही वेळा सरकारी कामांमध्ये कमतरता निर्माण होण्याची शक्यता असते. हे वास्तव असले तरी लोकशाही मूल्यांचे जतन करण्यासाठी इतकी किंमत मोजावी लागणे निश्चितच भाग पडते.

**अधिकारांचे प्रकार**

अधिकारांच्या वैधतेबाबत स्पष्टीकरण करताना मॅक्स वेबरने तीन प्रकारांचे अगर उगमस्थानांचे वर्णन केले आहे. त्याने मांडलेल्या अधिकारांच्या प्रकाराचे स्वरूप हे त्याच्या आदर्श प्ररूपाच्या कल्पनेवर आधारीत असून ते तीन प्रकार आपल्याला खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१. संयुक्तिक अगर कायदाधिष्ठित वर्चस्व

२. पारंपारिक अधिकार अगर वर्चस्व

३. विभूतीमत्वाचे अधिकार किंवा वर्चस्व

**१. संयुक्तिक अगर कायदाधिष्ठित वर्चस्वः**

सत्तेच्या या प्रकारामध्ये कोणत्याही पदाचे अधिकार आणि कर्तव्य या बाबत जाणीवपूर्वक निर्धारित केलेल्या नियमांच्या अंतर्गत निश्चित केलेले असतात. समाज सदस्यांकडून होणारे अधिकारी व्यक्तीच्या आदेशांचे पालन हे त्या अधिकारी व्यक्तीसाठी न होता कायदेशीररित्या स्थापन करण्यात आलेल्या व्यवस्थेमुळे होते. अधिकाराच्या या प्रकाराची व्याख्या करत असताना वेबर म्हणतात की, 'पदाचा वापर करणाऱ्या व्यक्ती जोपर्यंत त्या पदावर कार्यरत असतात तोपर्यंतच त्यांना त्या पदाशी निगडित असलेल्या अधिकारांचा वापर करून इतरांना आदेश देण्याचा अधिकार प्राप्त झालेला असतो आणि इतर लोक व्यक्ती जोपर्यंत त्या पदावर कार्यरत असते तोपर्यंतच अशा अधिकारी व्यक्तीकडून दिलेल्या आदेशांचे पालन करतात'. अधिकारी व्यक्ती ज्यावेळी तीला लाभलेल्या पदावरून पायउतार होते तेंव्हापासून तीला मिळालेले पदाचे अधिकार संपूष्टात येतात आणि अशा व्यक्तीला इतरांना आदेशांचे पालन करण्याबाबत सक्तीही करता येत नाही किंवा अशा व्यक्तीच्या आदेशांचे पालन इतरांकडून केले जात नाही. कारण व्यक्तीला लाभलेली अधिकार हे त्याची व्यक्तीगत अधिकार असत नाहीत तर ते त्या पदाशी निगडीत असतात. उदाहरणार्थ राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री, न्यायाधीश, कुलगुरू, महापौर इत्यादी. पंतप्रधानांना लाभलेले अधिकार त्यांचे व्यक्तीगत अधिकार असत नाहीत. जोपर्यंत व्यक्ती त्या पदावर कार्यरत असते तोपर्यंतच तीला पदाशी

निगडीत बाबींबाबत लाभलेल्या अधिकारांचा वापर करता येतो कारण त्यांच्या या अधिकाराला संविधानाची मान्यता लाभलेली असते. अर्थात प्रत्येक पदाच्या अधिकाराचे कार्यक्षेत्र निश्चित असते.त्या पदाच्या कार्यक्षेत्रातील अधिकारी व्यक्तीलाच पदाला लाभलेले अधिकार येतात.याबरोबरीनेच प्रत्येक पदाचे अधिकार सारखे नसतात. कांही पदे अधिकाराच्या दृष्टीने मोठी असतात; तर कांही पदे कनिष्ठ असतात. याचाच अर्थ पदांमध्ये स्तरिकरण आढळते.परिणामी समाजात श्रेष्ठ-कनिष्ठ प्रकारचे अधिकार आढळतात. भारतीय समाजाचा विचार करायचा झाला तर असेही आढळून येते की पंतप्रधान इंदिरा गांधीनी देशाच्या कलेल्या नेतृत्वात त्यांना पंतप्रधान म्हणून कायद्याने अगर संविधानाने मिळालेल्या अधिकाराबरोबरीनेच कांही प्रमाणात चमत्कृतीजंन्य अधिकारांचा अंश ही आढळून येतो.हीच बाब पंतप्रधान पंडित जवाहरला नेहरू आणि सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबतही म्हणता येईल.

थोडक्यात, कायदाधिष्ठित अधिकारामध्ये व्यक्तीला कायदा किंवा नियमांच्या आधारावर विशिष्ट प्रकारची पात्रता पूर्ण केल्यावरच विशिष्ट पद प्राप्त होते आणि त्या पदानुसार व्यक्तीला अधिकार मिळतात व ती व्यक्ती जोपर्यंत त्या पदावर विराजमान असते तोपर्यंतच तिला लाभलेल्या अधिकारांचा वापर करता येतो.

**२. पारंपारिक अधिकारः**

अधिकाराच्या या प्रकारात समाविष्ट असलेल्या नावाप्रमाणेच अधिकाराचा आधार परंपरागत नियम हाच असतो. हे अधिकार व्यक्तीला कांही कायदेशीर नियमांच्या आधारावर पद मिळाल्यामुळे प्राप्त होत नाहीत तर परंपरेद्वारे स्विकृत पदाची प्राप्ती झाल्यामुळे मिळत असतात. लोक अशा प्रकारच्या अधिरांना केवळ परंपरेने प्राप्त झालेले अधिकार म्हणूनच  मांन्यता देत असतात. हे अधिकार अशा विश्वास, परंपरा  आणि आदर्शानुसार प्राप्त होतात की, जे पूर्वीपासून समाजाद्वारे स्वीकृत केलेले आहेत. मॅक्स वेबर यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे 'या अधिकाराच्या प्रकारामध्ये आदेशांचे पालन करण्याची सक्ती परंपरागत कर्तव्यांच्या क्षेत्रांच्या अधिन राहून अधिाकारी व्यक्तीच्या आदेशांचे पालन करण्यावर अवलंबून असते.' या अधिकाराचा विचार करताना वेबरने पितृसत्ताक व वंशानुक्रमित अधिकारांचा विचार केला आहे. याप्रमाणेच कुलपतीला लााभलेल्या अधिकारासही त्याने परंपराधिष्ठीत अधिकाराचे विशुध्द स्वरूप मानलेले आहे. कुलप्रमुखास किंवा कुलपतीस कुलातील सर्व सदस्यांवर अधिकार गाजविता येतो.भारतीय जातीव्यवस्थेत कांही जाती उच्च तर कांही कनिष्ठ पदावर आढळतात.या व्यवस्थेच्या आधारावर उच्च जातींना कांही अधिकार प्राप्त झाले आहेत.शेकडो वर्षांपासून उच्च जातीचा अधिकार चालत आला असून कनिष्ठ जातीचे सदस्य उच्च जातींचे अधिकार मांन्य करताना आढळतात. पूर्वी राजेशाही पध्दती होती.राजाचा वारसदार हा त्याचा मोठा मुलगा असायचा. राजेशाही पध्दती सुध्दा परंपराधिष्ठीत सत्तेचेच उदाहरण होय. तिबेटमधील 'लामा' हा बौध्द भिक्षू असतो. लामा हा परंपरागत धार्मिक सत्तेप्रमाणेच राजकीय सत्तेचा देखील प्रमुख असतो. त्याची निवड कांही विशिष्ट लक्षणांच्या आधारावर परंपरागत पध्दतीने केली जाते. प्राचीन काळी अधिकाराचा हा प्रकार मोठ्या प्रमाणात प्रचलित होता पण आधुनिक काळामध्ये मात्र कोणत्याही देशांमध्ये अधिकाराचा हा प्रकार फारसा अस्तित्वात असल्याचे आढळत नाही.

थोडक्यात परंपरागत अधिकार प्रकार हा केवळ परंपरेने मान्यता दिली म्हणूनच एखाद्या व्यक्तीला अधिकार मिळवून देतो आणि अशी व्यक्ती आपल्याला लाभलेल्या अधिकाराच्या जोरावर इतरांवर आपला अधिकार गाजवतात व इतर लोकही त्यानी असा अधिकार गाजवणे हा त्याचा अधिकार असल्याचे मान्य करतात.

**३. विभूतिमत्वाचे अधिकार किंवा वर्चस्व :**

या प्रकारचे अधिकार व्यक्तीला जनतेकडून त्या व्यक्तीच्या अंगी असलेल्या विलक्षण सद्‌गुणांमुळे स्वयंप्रेरणेने प्राप्त होत असतात. व्यक्तीच्या अंगी असलेले कांही दैवी गुण किंवा तीला लाभलेले अलौकिक व्यक्तीमत्व यामुळेच हे अधिकार व्यक्तीला प्राप्त होत असतात. व्यक्ती जवळ असलेले हे सद्‌गुण त्या व्यक्तीपुरतेच मर्यादित असतात. व्यक्तीजवळ असलेले सद्‌गुण अगर दैवी शक्तीचे अस्तित्व हे केवळ त्या व्यक्तीपुरतेच मर्यादित असते.व्यक्तीच्या अंगी असलेल्या या सद्‌गुणांवर अगर दैवी शक्तीवर समाजातील इतर लोकांचा असलेला विश्वास हाच या अधिकारांचा मुख्य आाधार असतो. परिणामी दैवी गुणांामुळे अगर विभूतिमत्वामुळे प्राप्त झालेले अधिकार हे केवळ त्या व्यक्तीपुरतेच मर्यादित असतात. अशा सद्‌गुणांचे अगर दैवी शक्तीचे अवैयक्तिकतेत रूपांतर होऊन विभूमत्वाचे अधिकार व्यक्तीला इतरांकडून बहाल केले जातात. विभूतिमत्वाच्या अगर दैवी अधिकारांचा उगम अचानक होतो कारण समाजात अस्तित्वात असलेले कायदेशीर अगर परंपरागत अधिकार समाजव्यवस्था टिकवून ठेवण्यात असमर्थ ठरतात. अर्थात अशा वेळी उदयाला येणारी नेतृत्व करणारी व्यक्ती सामांन्य गुणांनी युक्त असत नाही. महात्मा गांाधींचे नेतृत्व भारतीयांनी स्विकारले ते त्यांच्या निस्वार्थी वृत्तीमुळे आणि नैतिक श्रेष्ठतेमुळेच. याबरोबरच क्रिकेटच्या जगतात सचिन तेंडुलकर व एम.एस. धोनीने जे विश्व विक्रम स्थापित केले त्यामुळे क्रिकेट जगतातील त्याचे श्रेष्ठत्व अगर अधिकार लोकांकडून स्वतःहून मांन्य केला गेला.यामागे त्याने क्रिकेटच्या क्षेत्रात केलेल्या चमत्काराचे वलय आहे हे मान्य करावे लागेल.याबरोबरीनेच गौतम बुध्द, संत तुकाराम, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, इत्यादींचे अधिकार पूर्वीच्या लोकांनी मांन्य केलेले होते. आजही ख्रिश्चन धर्मगुरू, पोप, भारतातील मुस्लिमांचे इमाम, आचार्य रजनीश किंवा सत्य साईबाबा यांचा अधिकार आजही मानतात ते त्यांच्या सभोवती असलेल्या चमत्काराच्या वलयामुळेच. या प्रकारचे अधिकार कायदेशीर अगर परंपरागत नसतीलही परंतु ते लोकांनी स्वखुशीने स्वीकारालेले असतात आणि हेच या प्रकारच्या अधिकाराचे मुख्य वैशिष्टय आहे.

**परिक्षणः** मॅक्स वेबरच्या या तीन प्रकारच्या अधिकारांवर भाष्य करताना प्रा. कोझर म्हणतात की वेबरने हे तीन शुध्द अधिकार प्रकार प्रतिपादन कले आहेत.याबात एक गोष्ट आपण लक्षात ठेवणे जरूरीचे आहे ती ही की या अधिकारांमध्ये कांही प्रमाणात संमिश्रता आढळते. याचे उदाहरण देताना कोझर म्हणतात की जर्मनीत हिटलरचे वर्चस्व प्रामुख्याने विभूती तत्वावर आधारित असले तरी या वर्चस्वाला त्याचबरोबर कायदेशीर अधिकाराची जोड लाभली होती हे नाकारता येत नाही व त्या आधारानेच त्याने जर्मन कायद्याची रचना केली होती. मॅक्स वेबरच्या या तीन अधिकाराच्या प्रकारांवर चर्चा करताना रेमंड अरॉ यांनी असे प्रतिपादन केले आहे की वर्चस्वाचे किंवा अधिकाराचे हे तीन प्रकार वेबरच्या अतिसूक्ष्म विचाराचे द्योतक आहे. सुस्पष्ट राजकीय कारकिर्दीचे आकलन होण्यासाठी व पुर्नरचनेसाठी या विचारांचा वापर केला जातो

कारण हे वर्चस्व प्रकार वास्तविकतेच्या दृष्टीने विचार करता वरवर जरी वेगवेगळे वाटत असले तरी ते एकमेकाविरूध्द नाहीत. क्वचित प्रसंगी ते एकत्रितपणे येतात.याचाच साध्या शब्दात अर्थ असा की एकाच व्यक्तीत दोन विविध प्रकारचा वर्चस्व वा अधिकार प्रकारचा आढळ दिसून येतो. पुढे रेमंड अरॉ असेही म्हणतात की कांही वेळा वेबराने या प्रकारांचे केलेले विश्लेषण आपला गोंधळ उडविते परंतु याचे कारण त्या विश्लेषणाकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन सदोष असतो हे होय.

**※ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा

१. .................. ही एक प्रकारची प्रशासकिय व्यवस्था आहे.

अ) परंपरा पालन ब) धार्मिक व्यवस्था क) नोकरशाही ड) राजेशाही

२. नोकरशाहीमध्ये ..................... नियमांचे महत्व असते.

अ) अवैयक्तिक ब) पारंपारीक क) धार्मिक ड) सांस्कृतिक

३. मुख्यमंत्री या पदाला लाभलेले अधिकार ...................... प्रकारचे असतात.

अ) कायदाधिष्ठीत ब) परंपराधिष्ठित क) धर्माधिष्ठित ड) सांस्कृतिक

४. लोक ................ प्रकारच्या अधिरांना केवळ परंपरेने प्राप्त झालेले अधिकार म्हणूनच मांन्यता देत असतात.

अ) कयदाधिष्ठित ब) परंपराधिष्ठित क) धर्माधिष्ठित ड) संस्कृतीधिष्ठित

५. राजपूत्र म्हणून मिळालेले अधिकार................ प्रकारचे असतात.

अ) कायदेशीर ब) पारंपारिक क) धार्मिक ड) विभुतीमत्वाचे

६. भारतीय जातीव्यवस्थेमुळे उच्च जातीतील व्यक्तीला .............. प्रकारचे अधिकार लाभतात.

अ) धार्मिक ब) पारंपारिक क) चमत्कृतीजन्य ड) सामाजिक

७. दलाई लामा यांना लाभलेले अधिकार .............. प्रकारचे आहेत.

अ) पारंपारिक ब) चमत्कृतिजंन्य क) धार्मिक ड) सांस्कृतिक

८. सचिन तेंडूलकरला क्रिकेट जगतातील विक्रमी कामगिरीमुळे मिळालेले अधिकार म्हणजे ............... प्रकारच्या अधिकाराचे उदाहरण आहे.

अ) कायदेशीर ब) विभूतीजंन्य क) पारंपारिक ड) धार्मिक

## ४.४ सारांश :

पाश्चात्य समाजशास्त्रीय विचारवंतांची व त्यांनी मांडलेल्या सिध्दांतांची या पेपरमध्ये आपण सविस्तर आकलन करून घेतले आहे. यापैकी मॅक्स वेबर हा एक महत्वाचा समाजशास्त्रज्ञ असून समाजशास्त्राचा वैज्ञानिक पध्दतीच्या सहाय्याने अभ्यास करता यावा व समाजशास्त्राला वैज्ञानिक शास्त्राचा दर्जा मिळावा यासाठी वैज्ञानिक शास्त्रात ज्या पध्दतीचा संशोधकांकदून अध्ययनासाठी वापर केला जातो त्या तोडीचे पध्दतीशास्त्र समाजशास्त्रीय संशोधनासाठी मांडण्याचा प्रयत्न मॅक्स वेबर यांनी आपल्या पध्दतीशास्त्रीय लिखाणाच्या सहाय्याने स्पष्ट केला आहे. त्यामुळेच त्यांना समाजशास्त्राच्या अभ्यासात एक अढळ असे स्थान प्राप्त झाले असून, आजही त्यानी मांडलेल्या सिध्दांताना तितकेच महत्वाचे स्थान असल्याचे आपणास मान्य करावे लागेल. समाजशास्त्रात संशोधन करण्याची ईच्छा असलेल्या संशोधकाने सर्वप्रथम संशोधनासाठी निवडलेल्या अध्ययन विषयाशी संबंधीत आदर्श प्ररूपांची मांडणी करणे कसे अत्यावश्यक आहे हे वेबरने आपले आदर्श प्ररूपाबाबतच्या विचारांच्या सहाय्याने विशद केले आहे. अशा प्रकारची आदर्श प्ररूपे संशोधकाला संशोधनात साधन म्हणून कशी वापरता येतील व या साधनांच्या सहाय्याने केलेले अध्ययन कसे वैज्ञानिक कसोटीला सत्य ठरू शकते हे स्पष्ट करण्यासाठी त्याने प्रथम आदर्श प्ररूपाची व्याख्या केली असून आदर्श प्ररूपाची वैशिष्टये व त्याचे प्रकार याबातची आपली मते सविस्तरपणे विशद केली आहेत. या आदर्शप्ररूपाच्या मूलभूत संकल्पनेच्या आधारावरच त्याने व्यक्तीकडून केल्या जाणा–या सामाजिक क्रियांचे सविस्तर स्पष्टीकरण केले असून हे विशद करताना वेबरने सामाजिक क्रिया नेमके कोणत्या क्रियेला म्हणता येईल हे स्पष्ट करत असताना व्यक्तीकडून घडून येणाऱ्या सामाजिक क्रियांचे चार प्रकारांमध्ये वर्गिकरण कसे कारावे हे स्पष्ट केले आहे. या साामाजिक क्रियेच्या प्रकारांवरून व्यक्तीकडून घडून येणारी प्रत्येक क्रिया ही सामाजिक क्रियेत समाविष्ट होत नाही हे स्पष्ट केले आहे. याबरोबरच समाजात व्यक्तीला नमके कोणते अधिकार मिळातात ते कशा प्रकारांत विभाजित करता येतील हे ही स्पष्ट केले असून या सामाजिक अधिकारांची वैशिष्टयेही स्पष्ट केली आहेत. अशा प्रकारे मॅक्स वेबरने समाजशास्त्राच्या विकासात अत्यंत मोलाचे योगदान केले आहे हे आपल्याला मान्य करावे लागते.

## ४.५ स्वयंअध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे :

**※ स्वयंअध्ययन प्रश्न –१ ची उत्तरे**

१. ब. द मेथॉडॉलॉजी ऑफ द सोशल सायन्सेस

२. ब. भारत

३. अ. नैतिक

४. ड. ख्रिश्चन

५. अ. आर्थिक

६. ड. ऐतिहासिक.

७. अ. हिंदू

८. अ. आत्मनिष्ठ

*** स्वयंअध्ययन प्रश्न –२ ची उत्तरे**

१. अ. बुध्दीप्रामांन्यवादी

२. ब. मूल्यात्मक

३. ब. परंपरावादी

४. अ. संवेदनात्मक

५. अ. परंपरावादी

*** स्वयंअध्ययन प्रश्न –३ ची उत्तरे**

१. क. नोकरशाही

२. अ. अवैयक्तिक

३. अ. कायदाधिष्ठीत

४. ब. परंपराधिष्ठित

५. ब. पारंपारिक

६. ब. पारंपारिक

७. ब. चमत्कृतिजंन्य

८. ब. विभुतीजन्य

## ४.६ सरावासाठी प्रश्न

१. मॅक्स वेबरने सामाजिक क्रियेचे स्पष्ट केलेले प्रकार सविस्तर विशद करा

२. मॅक्स वेबरच्या आदर्श प्ररूपाच्या वैशिष्टयांचे सविस्तर स्पष्टीकरण करा

३. मॅक्स वेबरने स्पष्ट केलेले सत्तेच्या अधिकाराचे प्रकार स्पष्ट करा.

४. मॅक्स वेबरने स्पष्ट केलेली सामाजिक अधिकाराची वैशिष्टये सविस्तर स्पष्ट करा.

५. समाजशास्त्राच्या विकासातील मॅक्स वेबरची भूमिका विशद करा.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. 'सामाजिक विचार प्रवाह', प्रा. पी.के. कुलकर्णी, श्री मंगेश प्रकाशन नागपूर, चौथी आवृती, २००८, पान नं २९३ ते ३४४

२. 'समाजशास्त्रीय विचारवंत', डॉ. प्रदीप आगलावे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर २००७, पान नं ९० ते १२१

३. 'प्रमुख समाजशास्त्रीय विचारक', रामनाथ शर्मा व राजेंद्र शर्मा, एटलांटिक पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, २००१, पा नं १५८ ते १८०


❑❑❑

# घटक – १
# डॉ. जी. एस. घुर्ये (१८९३–१९८३)

**घटक संरचनाः**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ डॉ. घुर्ये यांचे राष्ट्रीय एकता आणि एकात्मीकरण यासंबंधीचे विचार

स्वयं–अध्ययनासाठीचे प्रश्न–१

१.२.२ डॉ. घुर्ये यांचा जाती व्यवस्थेबद्दलचा अभ्यास

स्वयं–अध्ययनासाठीचे प्रश्न–२

१.२.३ डॉ. घुर्ये यांचा भारतातील जमातीबद्दलचा अभ्यास

स्वयं–अध्ययनासाठीचे प्रश्न–३

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक संज्ञा

१.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी प्रश्न

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्टे

बी.ए.भाग ३ मधील विद्यार्थ्यांनी समाजशास्त्र विषय घेवून सत्र क्र.५, पेपर नं.७ ''पाश्चात्त्य समाजशास्त्रीय विचारवंत'' यामध्ये 'घटक–१ : फ्रेंच विचारवंत ऑगस्त कॉम्त, घटक–२ : एमिल डुरखीम, घटक–३ : जर्मन विचारवंत कार्ल मार्क्स आणि घटक–४ : मॅक्स वेबर यांच्या विविध समाजशास्त्रीय विचारांचा मागोवा घेतला. यानंतर आपण सत्र क्र. ६, पेपर नं. १२ ''भारतीय समाजशास्त्रीय विचारवंत'' (Indian Sociological Thinkers) यामध्ये खालील घटकांचा विस्तृतपणे अभ्यास करणार आहोत. घटक–१ : डॉ. जी. एस. घुर्ये, घटक–२ : डॉ. एम. एन. श्रीनिवास, घटक–३ : डॉ. ए. आर. देसाई आणि घटक–४ : डॉ. इरावती कर्वे इत्यादी भारतीय प्रमुख समाजशास्त्रीय विचारवंतांचे विचार समजावून घेणार आहोत.

घटक क्र. १ मध्ये डॉ. जी. एस. घुर्ये यांचे राष्ट्रीय एकता व एकात्मीकरण, तसेच जातीसंस्था आणि भारतातील जमातींचा अभ्यास समजावून घेणार आहोत. अर्थातच वरील विचारांचा मागोवा घेतल्यानंतर आपणांस भारतीय समाजशास्त्रीय विचारवंत अथवा समाजशास्त्रज्ञ म्हणून डॉ. घुर्ये यांचे यासंदर्भातील योगदान किती महत्त्वाचे आहे ते समजून येण्यास फार मोलाची मदत होणार आहे.

❒ **डॉ. जी. एस. घुर्ये यांचा जीवन परिचय**

''**भारतातील समाजशास्त्राचे जनक**'' (Father of Indian Sociology) म्हणून डॉ. जी. एस. घुर्ये (गोविंद सदाशिव घुर्ये) यांचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो. ब्रिटिश कालावधीमध्ये ज्या अनेक प्रमुख समाजशास्त्रज्ञांनी भारतीय समाजशास्त्राचा पाया घालण्याचा प्रयत्न केला त्यामध्ये डॉ. घुर्ये, डॉ. राधाकमल मुखर्जी, डॉ. डी. पी. मुखर्जी, डॉ. एस. सी. दुबे, डॉ. ए. आर. देसाई, डॉ. इरावती कर्वे यासारख्या विविध भारतीय समाशास्त्रज्ञांचा फार मोठा वाटा आहे.

डॉ. जी. एस. घुर्ये यांचा जन्म १२ डिसेंबर १८९३ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या कोकणातील मालवण या ठिकाणी झाला. डॉ. घुर्ये यांचे आजोबा संस्कृत भाषा आणि धार्मिक विधी करण्यामध्ये पारंगत होते, त्याचाच परिणाम म्हणून डॉ. घुर्ये यांना संस्कृत भाषा चांगल्या प्रकारे अवगत झाली. डॉ. घुर्ये यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण मालवण येथे झाले, तर महाविद्यालयीन शिक्षण गुजरात येथे झाले. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी मुंबई विद्यापीठात त्यानी संस्कृत आणि इंग्रजी विषय निवडले होते. या अभ्यासक्रमासाठीचा असणारा "Chancellor's Medal" हा किताब डॉ. घुर्ये यांना मिळाला होता.

इ.स.१९१९ मध्ये मुंबई विद्यापीठाची बाहेरील देशात समाजशास्त्र विषयाचे प्रशिक्षण घेण्यासंबंधीची जाहिरात प्रसिद्ध झाली होती, त्याचा फायदा घेवून डॉ. घुर्ये यांनी लंडनला प्रशिक्षणासाठी जाण्याचा निर्णय घेतला. या ठिकाणच्या प्रसिद्ध अशा ''**लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स**'' या संस्थेत डॉ. घुर्ये यांना प्रवेश मिळाला. या ठिकाणी त्यांचा अनेक नामवंत मानवशास्त्रज्ञांशी (Anthropologists) संपर्क आला. डॉ. घुर्ये यांनी १९२३ साली "Ethnic theory of Caste" या विषयावर केंब्रिज विद्यापीठातून पीएच.डी. ही बहुमानाची पदवी संपादन केली. १९२४ ला भारतात परत आल्यानंतर त्यांची मुंबई विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात समाजशास्त्र विभागप्रमुख या पदावर नियुक्ती झाली. डॉ. घुर्ये यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. एम. एन. श्रीनिवास, डॉ. पंढरीनाथ प्रभू, डॉ. के. एम. कपाडिया, डॉ. इरावती कर्वे इ. विचारवंतांनी पीएच.डी. संपादन केली. ११ डिसेंबर, १९५१ मध्ये डॉ. जी. एस. घुर्ये यांनी "The Indian Sociological Society" ची स्थापना केली. १९५१ ते १९६६ पर्यंत स्वत: त्यांनी या सोसायटीचे अध्यक्षपद भूषविले. पुढे या सोसायटीला "All India Sociological Conference" या नावाने ओळखले जावू लागले. या संस्थेच्या माध्यमातून प्रतिवर्षी देशाच्या कोणत्याही भागात समाजशास्त्र परिषद भरविण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. विद्यापीठ आणि महाविद्यालयामध्ये समाजशास्त्र विषय शिकविणारे बहुसंख्य प्राध्यापक या परिषदेचे आजीव सदस्य झालेले आहेत.

## ❒ डॉ. घुर्ये यांची ग्रंथसंपदा :–

भारतीय समाजशास्त्राबद्दलची डॉ. घुर्ये यांची विद्वत्ता त्यांच्या खालील विविध महत्त्वपूर्ण ग्रंथनिर्मितीमधून स्पष्ट होते.

1. Caste and Race in India, 1932.
2. The Aborigines so called and Their Future, 1943.
3. The Indian Sadhus, 1953.
4. Family and Kin in Indo European Culture, 1955.
5. Caste, Class and Occupation, 1961.
6. Gods and Men, 1962.
7. Social Tensions in India, 1968.

डॉ. घुर्ये यांची वरील ग्रंथसंपदा विचारात घेता असे निदर्शनास येते की, या महान भारतीय समाजशास्त्रज्ञाने आपल्या विविध ग्रंथांच्यामधून भारतीय समाजाचे वास्तव चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला, समाजशास्त्राच्या अनेक संशोधकांना मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे त्यांनी भारतातील जातीसंस्था, धर्मसंस्था इत्यादींचा अभ्यास करून 'विषमतावादी समाजव्यवस्था हा भारतीय समाज व्यवस्थेचा मूलभूत पाया आहे' असे प्रांजळ मत मांडले, याचा परिणाम म्हणून डॉ. घुर्ये यांचा आदर्श नंतरच्या पिढीतील अनेक अभ्यासकांनी घेतल्याचे दिसून येते.

## १.१ प्रस्तावना

ज्यावेळी तुम्ही (बी. ए. भाग ३ च्या विद्यार्थ्यांनी) सत्र क्र. ५ पेपर क्र. ७ मध्ये पाश्चात्त्य विचारवंतांचा अभ्यास केला. त्यानंतर तुम्हाला सत्र-६ पेपर क्र. १२ मध्ये भारतीय समाजशास्त्रीय विचारवंतांचा अभ्यास करावा लागणार आहे. उदा. डॉ. जी. एस. घुर्ये, डॉ. एम. एन. श्रीनिवास, डॉ. ए. आर. देसाई आणि डॉ. इरावती कर्वे इत्यादींनी भारतीय समाजाचे अभ्यासपूर्ण विवेचन कसे केले? हे समजावून घ्यावे लागणार आहे.

## १.२ विषय विवेचन

बी.ए.भाग ३ समाजशास्त्र विषयाच्या 'भारतीय समाजशास्त्रीय विचारवंत' या सत्र-६ पेपर क्र. १२ मध्ये आपणास एकूण चार घटकांचा अभ्यास करावा लागणार आहे. प्रथम घटकामध्ये डॉ. जी. एस. घुर्ये यांनी विषद केलेले एकूण तीन उपघटक अभ्यासावे लागणार आहेत. उदा. (I) राष्ट्रीय ऐक्य आणि एकात्मता. (II) भारतातील जातीव्यवस्थेबद्दलचा अभ्यास आणि, (III) भारतातील जमाती अथवा आदिम समाजाचा अभ्यास इत्यादी. या प्रत्येक उपघटकांचा सविस्तर अभ्यास अथवा विवेचन डॉ. घुर्ये यांनी खालीलप्रमाणे केले आहे.

### १.२.१ डॉ. घुर्ये यांचे राष्ट्रीय एकता आणि एकात्मीकरण (National Unity and Integration) यासंबंधीचे विचार

भारत हा देश अनेक धर्म, जाती, वंश आणि रूढीपरंपरांनी जोडलेल्या 'लोकांचे राष्ट्र' म्हणून ओळखला जातो. या देशामध्ये विविध प्रकारची विविधता असून देखील देशाभिमानामुळे लोकांच्या ठिकाणी ऐक्याची भावना दिसून येते. डॉ. घुर्ये यांच्या मते, भारतीयांच्यामध्ये राष्ट्रीय ऐक्य अथवा 'आम्ही'ची भावना आढळून येत असल्यामुळे भारत हे एक **खंडप्राय राष्ट्र** निर्माण झाले. भविष्यामध्ये देखील हे राष्ट्र अखंड राहावे या दृष्टिकोणातून भारतीय घटनेने धर्म निरपेक्षता किंवा नि:धर्मीपणाचे तत्त्व (Principle of Secularism) स्वीकारले. विविधतेने नटलेल्या या देशामध्ये राष्ट्रीय ऐक्य आणि एकात्मता कशी निर्माण होईल? याचा समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून अभ्यास करणे आवश्यक आहे.

**डॉ. घुर्ये यांच्या मते, राष्ट्रीय ऐक्याची व्याख्या किंवा अर्थ :** "National Unity" या इंग्रजी शब्दाचा अर्थ 'राष्ट्रीय ऐक्य' असा असून त्याचा अर्थ वंश, लोकाचा समूह असा होतो. ''जेव्हा राष्ट्रासारख्या व्यापक समूहात ऐक्याची जाणीव पसरलेली असते अथवा ज्या लोक समुदायामध्ये आपण सर्वजण एक आहोत, या राष्ट्रीय भावनेचा उदय होतो, तेव्हा त्याला राष्ट्रीय ऐक्य असे संबोधिता येईल.'' डॉ. घुर्ये यांच्या मते, भारत हे एक राष्ट्र असून जरी या देशात प्राचीन काळापासून अनेक प्रकारची विविधता दिसून येत असली तरी लोकांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात एकसंघ भावना आढळून येते. यातूनच या खंडप्राय देशामध्ये राष्ट्रीय ऐक्य निर्माण झाल्याचे दिसून येते.

भारत देशामध्ये भौगोलिक, धार्मिक, जातीय, वांशिक, भाषीक, सांस्कृतिक आणि वर्गीय विविधता आढळते. तरी देखील अशा विविधतेत राष्ट्रीय ऐक्य आढळून येते. त्यामुळेच भारत देशाला **विविधतेने नटलेला परंतु एकसंघ भावना असलेला देश** म्हणून ओळखले जाते. उदा. भाषिक विविधतेत जीवनातील सुख-दु:खे कमी करणे शक्य झाले. जातीय विविधतेत 'जगा व जगू द्या' हा मंत्र जपला जात होता. धार्मिक विविधतेत समाजाचे संघटन टिकविण्यात आले तर सांस्कृतिक विविधतेत विविध काळाच्या माध्यमातून मांडले जाणारे विषय सर्व भारतीयांच्या जिव्हाळ्याचे बनले. याचा चांगला परिणाम म्हणून या देशात राष्ट्रीय ऐक्य वाढीस लागले, तसेच चांगल्या प्रकारे या राष्ट्राची बांधणी अथवा उभारणी करणे शक्य झाले.

**❐ डॉ. घुर्ये यांचे 'राष्ट्रीय एकात्मता' संदर्भातील विचार :**

राष्ट्रीय ऐक्य याप्रमाणेच डॉ. घुर्ये यांनी राष्ट्रीय एकात्मतेसंदर्भात आपल्या लिखाणामध्ये संस्कृतीवर भर दिला. तसेच हिंदू धर्मातील प्रमुख विचारवंत 'मानिनी', 'पतंजली', 'तुलसीदास' इत्यादींचे विवेचन केले. त्याच्या मते, भारतातील सांस्कृतिक एकतेचा पाया हा पाठीमागील शंभर वर्षामध्ये त्या काळातील राज्यकर्त्यांच्या कृतीमध्ये घातला गेला. व्यक्तीचे जीवन हे समाजाशिवाय असूच शकत नाही. व्यक्ती समाजामध्ये सामाजिक संबंध निर्माण करते आणि समूहाबरोबरच राहते. यालाच डॉ. घुर्ये यांनी समूहाची समाजातील एकात्मतेची प्रक्रिया असे संबोधिले. त्यांच्या मते, या देशातील बहुजिनसी समाजात राष्ट्रीय

एकात्मता (National Integration) निर्माण करणे हे भारतीय समाज संघटन आणि समाजाची निरंतरता यासाठी खूपच आवश्यक बाब आहे. जेव्हा लोकांच्यामध्ये 'आपण सर्वजण एक आहोत' ही भावना प्राबल्याने आढळते, तेव्हा अशा समाजाचे संघटन सुदृढरित्या टिकविले जाते. समान हिताची उद्दिष्ट्ये गाठण्यासाठी सर्व व्यक्ती प्रयत्नशील असतील तर अशा राष्ट्रामध्ये निश्चितच राष्ट्रीय एकात्मता वाढत जाते.

डॉ. घुर्ये यांनी भारत देशाच्या संदर्भातील राष्ट्रीय एकात्मता यावर भाष्य करताना शेवटी असे म्हटले आहे की, जर या देशातील विविध घटकांच्यामध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि प्रादेशिक पैलूंचा समान विकास झाला तर निश्चितच भारतासारख्या खंडप्राय देशात सर्वार्थाने राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागेल आणि त्याचा फायदा या देशातील सर्व समूहाना होऊ शकेल.

**❒ राष्ट्रीय एकात्मतेचा अर्थ किंवा व्याख्या**

स्थूलमानाने विचार करता राष्ट्रीय एकात्मतेचा अर्थ संबंधित देशातील अथवा राष्ट्रामधील सर्व लोकांच्यामध्ये **आपण सर्वजण एक आहोत** अशी भावना आढळून येत असेल तरच अशा देशात 'राष्ट्रीय एकात्मता' (National Integration) असते असे म्हणता येईल.

डॉ. घुर्ये यांनी राष्ट्रीय एकात्मतेची व्याख्या पुढीलप्रमाणे सांगितली. त्यांच्या मते,

''जेव्हा समाजात व्यक्ती आपले सामाजिक संबंध निर्माण करतात आणि समूहाबरोबर सामंजस्याने राहतात, तेव्हा अशा समाजात जी प्रक्रिया उदयास येते तिला राष्ट्रीय एकात्मता म्हणून संबोधले जाते.'' उदा. प्रादेशिक भाषा अथवा धर्मनिरपेक्षता.

थोडक्यात, राष्ट्र सुखी, समृध्द आणि वैभवशाली बनविण्यासाठी तसेच अशा देशाची प्रगतीकडे वाटचाल करण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेशिवाय अन्य पर्याय नाही.

राष्ट्रीय एकात्मतेचे निश्चित स्वरूप समजावून घेण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेच्या विविध विचारवंतांनी सांगितलेल्या व्याख्या, राष्ट्रीय एकात्मतेतील अडथळे आणि राष्ट्रीय एकात्मतेसंदर्भात विविध उपाय किंवा मार्ग इत्यादीचा खालील आढावा घेणे आवश्यक आहे.

**❒ राष्ट्रीय एकात्मतेच्या व्याख्या :-**

**१. डॉ. ब्रिज मोहन :** ''राष्ट्रीय एकात्मता म्हणजे सर्व समूहांनी आपल्या संकुचित निष्ठा ओलांडून राष्ट्राने स्वीकारलेली ध्येये साध्य करण्याच्या कार्यात समान सहभाग घेण्याची मानसिक व सामाजिक प्रक्रिया होय.''

("National integration is a Psycho-social process that involves beyond parochial loyalties, a common participation of all groups towards the accocomplishment of nationally accepted goals" - **Dr. Brij Mohan**)

**२. राष्ट्रीय एकात्मता परिषद :** ''राष्ट्रीय एकात्मता ही एक मानसिक व शैक्षणिक प्रक्रिया असून तिच्यामध्ये लोकांच्या हृदयात एकतेच्या व सामंजस्याच्या भावनेचा विकास होणे, समान नागरिकत्वाची जाणीव होणे आणि राष्ट्रनिष्ठेची भावना निर्माण होणे अभिप्रेत आहे.''

("National integration is a Psychological and educational process involving the development of a feeling of unity solidarity and cohesion in the harts of people, a sense of common citizenship and a feeling of loyalty to the Indian." - **National Integration Conference**)

**३. एल. पी. मायर :** ''ज्या समाजात प्रस्थापित संस्था व त्यांच्याशी संबंधित असलेले हक्क आणि मूल्ये यांचा सर्वसाधारणपणे स्वीकार केला जातो तो समाज एकात्म होय.''

**४. महात्मा गांधी :** ''समान हेतू, समान ध्येये आणि समान दु:खे असणे व ती परस्पर सहकार्याने वाटून घेणे आणि त्यासाठी सहनशीलता दाखविणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता होय.''

**५. जयप्रकाश नारायण :** 'देश अथवा राष्ट्राच्या हितासमोर धर्म, प्रांत, भाषा यासारख्या निष्ठा निष्प्रभ ठरल्या पाहिजेत अशी व्यवस्था म्हणजे राष्ट्रीय एकात्मता होय.''

राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भातील वरील विविध महत्त्वपूर्ण व्याख्या अभ्यासल्यानंतर असे स्पष्ट होते की, राष्ट्रीय एकात्मता निर्माण होण्यासाठी पुढील गोष्टींची आवश्यकता आहे. उदा. राष्ट्रीय एकात्मतेसाठी राष्ट्रातील सर्व घटकांच्या मनात **ऐक्याची भावना** निर्माण होणे आवश्यक आहे. राष्ट्राची ध्येये साध्य करण्यासाठी **सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता** असते. राष्ट्रातील विविध घटकांमध्ये **परस्परांशी भावनिक एकात्मीकरण** झाले पाहिजे. तसेच राष्ट्रीय एकात्मता निर्माण होण्यासाठी आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि प्रादेशिक अशा पैलूंचा **समान विकास** झाला पाहिजे. या सर्व गोष्टी जर एखाद्या राष्ट्रामध्ये अथवा देशामध्ये घडून आल्या तर निश्चितच अशा राष्ट्रात राष्ट्रीय एकात्मता सर्वार्थाने घडून येऊ शकेल. त्याचा फायदा अशा राष्ट्रातील सर्व समूहांना होऊ शकेल.

### ❐ राष्ट्रीय एकात्मतेतील अडथळे (राष्ट्रबांधणीच्या मार्गातील अडथळे)

भारतात भाषा, धर्म, जात, वंश इत्यादी बाबतीत विविधता असल्याचे दिसून येते. अशावेळी या खंडप्राय देशातील राष्ट्रीय भावना म्हणजे 'आम्ही सर्व जण एक आहोत' ही भावना प्रत्यक्षात राबविताना अनेक अडचणी उद्‌भवतात. अशा अडचणींना समाजशास्त्रीयदृष्ट्या राष्ट्रीय एकात्मतेतील अडथळे अथवा राष्ट्रबांधणीच्या मार्गातील अडचणी म्हणून ओळखले जाते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्रीय एकात्मतेसाठी शासकीय पातळीवर विविध प्रयत्न करण्यात आले. मात्र त्यामध्ये अपेक्षित असे यश मिळू शकले नाही.

या पार्श्वभूमीवर आपणास राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गामध्ये निदर्शनास येणारे प्रमुख अडथळे खालीलप्रमाणे सांगता येतील की, ज्यामुळे राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे हे अवघड कार्य वाटते.

## १. जातिभेद अथवा जातियता :–

भारत देशात प्राचीन काळापासून मोठ्या प्रमाणात आढळून येणारी जातीयता अथवा जातिभेद हा राष्ट्रबांधणीच्या मार्गातील सर्वात ठळक आणि अतिशय गंभीर स्वरूपाचा अडथळा म्हणून ओळखला जातो. या जातीयतेने भारत देशाचे खंडात्मक विभाजन केले तसेच स्पृश्य–अस्पृश्य, श्रेष्ठ–कनिष्ठ, सवर्ण–असवर्ण अशा अनेक घृणास्पद गोष्टींची निर्मिती केली. याचा गंभीर परिणाम म्हणजे हा देश अनेक श्रेष्ठ–कनिष्ठ गटात विभागला गेला आहे. स्थानिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक व शासकीय पातळीवर असंख्य गंभीर प्रश्न निर्माण झाले. यामधून जातीय दंगली, जाळपोळ, लुटालूट, स्त्रियांवर बलात्कार, सामुदायिक हत्या, दलितांवर अन्याय यासारख्या समाजविघटित अशा अनेक घटना किंवा मानवी वर्तन प्रकार घडून येत आहेत.

अशावेळी प्रत्येक जातीतील व्यक्ती आपले हितसंबंध जोपासण्यासाठी अधिक संघटित होत आहेत. अन्य जातींच्या व्यक्तींकडे असहकार्यांच्या भावनेतून पाहत आहेत. याचा सर्वात गंभीर परिणाम म्हणजे जीवनाच्या सर्व क्षेत्रांत सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणात वाढतच चालली आहे. अशावेळी राष्ट्रीय एकात्मता घडून येणे अवघड आहे.

## २. भाषावाद :–

राष्ट्रबांधणीच्या मार्गातील जातिभेद ह्या अडथळ्याप्रमाणे भारतात भाषावाद अथवा भाषिक संघर्ष हा एक अत्यंत गंभीर स्वरूपाचा अडथळा आढळून येतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर घटनेच्या ३४३ व्या कलमानुसार १५ वर्षे कार्यालयीन कामकाजाची भाषा इंग्रजी होती. त्यानंतर राज्यभाषा म्हणून हिंदीचा स्वीकार करण्यात आला. उत्तरेकडील राज्यांनी हिंदी भाषेला संमत्ती दर्शविली तर दक्षिणेकडील राज्यांनी हिंदी भाषेला कडवा विरोध केला. यातून फार मोठ्या प्रमाणात भाषिक दंगली घडून आल्या. राजकारणी लोकांनी भाषावादाला एक प्रकारे खतपाणी घातले.

थोडक्यात, भाषावाद अथवा भाषांधतेच्या अतिरेकातून आपलीच भाषा श्रेष्ठ अशी लोकांची प्रवृत्ती वाढत गेली आणि त्यामुळे राष्ट्रहिताकडे दुर्लक्ष झाले. अशा भाषिक अस्मितेतून भाषिक संघर्ष किंवा भाषिक दंगली वाढत जातात आणि अशावेळी राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येते.

## ३. धर्मांधता :–

जातिवाद, भाषावाद याप्रमाणे धर्मांधता हादेखील एक भारतातील राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गातील गंभीर अडथळा आढळून येतो. धर्मांधता याचा अर्थ या देशात अनेक धर्मांचे लोक राहतात आणि त्यांच्यामध्ये आपला धर्म व त्याची तत्त्वे हीच श्रेष्ठ अशी प्रवृत्ती आढळून येते. अशा वेळी इतर धर्मांबद्दल त्यांच्या मनामध्ये द्वेष, मत्सर, शत्रुत्वाची भावना दिसून येते. उदा. भारतात हिंदू, मुस्लीम, जैन, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, पारशी इत्यादी विविध धर्म आणि या धर्मांच्या व्यक्ती राहत असल्यामुळे त्यांच्यामध्ये अन्य धर्मांबद्दल

संघर्ष अथवा द्वेषयुक्त भावना आढळून येते. धर्मांध व्यक्ती तसेच राज्यकर्ते धार्मिक संघर्षाला खतपाणी घालतात. त्यातून अनेक विध्वंसक कृती घडून येतात.

सध्या भारत, पाकिस्तान या दोन राष्ट्रांमध्ये धर्मांधतेमुळे सतत धार्मिक संघर्ष सुरू असल्याचे दिसून येते. एकमेकांविषयी प्रकर्षाने वैमनस्य वाढल्याचे आढळते. अलीकडील काळात पंजाबमधील अकाली शीख धर्मीयांनी स्वतंत्र खलिस्तानची मागणी केली. यातूच अमृतसर येथील सुवर्ण मंदिरातील लष्करी कारवाईचा सूड म्हणून त्या वेळचे लष्करप्रमुख अरुण वैद्य आणि पंतप्रधान इंदिरा गांधींची हत्या केली. त्यातून हिंदू-शीख दंगली झाल्या. देशाची मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी झाली. थोडक्यात, धर्मांधता यामुळे देशाची राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येते.

**४. भाषावार राज्यनिर्मिती व प्रादेशिक वाद :-**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात १९५६ साली प्रशासकीय कारभारामध्ये सुव्यवस्था यावी आणि सामान्य लोकांना राज्यकारभारात सहभाग घेता यावा यासाठी राज्य पुनर्रचना आयोगाच्या शिफारशीनुसार भाषिक राज्यांची निर्मिती करण्यात आली. मात्र प्रत्यक्षात यामुळे राज्याराज्यांमध्ये स्वत:च्या भाषेबद्दल फाजील अभिमान निर्माण होऊन त्यातून प्रादेशिक वाद वाढत गेला. अशा वेळी मोठ्या प्रमाणात भाषिक दंगली उसळल्या आणि त्यातून देशाची प्रचंड वित्तहानी झाली. उदा. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न, महाराष्ट्रात स्वतंत्र विदर्भाची मागणी, गुजरातमध्ये सौराष्ट्राची मागणी तर आंध्र प्रदेशात तेलंगण भागाची मागणी वाढत आहे. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने ही बाब अतिशय चिंताजनक ठरत आहे.

थोडक्यात, भाषावार राज्यनिर्मिती आणि प्रादेशिकवाद यामुळे राज्याराज्यांमध्ये अन्य भाषिकांविषयी अतिशय कटुतेची भावना वाढत जाते आणि त्यातून उग्र स्वरूपाच्या दंगली निर्माण होतात, याचा गंभीर परिणाम म्हणजे देशाची राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येते.

**५. आर्थिक विषमता व दारिद्र्य :-**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आर्थिक प्रगतीचा लाभ सर्वच भारतीयांना सारख्या प्रमाणात मिळाला नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे या देशात मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता व दारिद्र्य आढळून येते. आर्थिक विकासासाठी सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून आर्थिक विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला. परंतु एकाच राज्याच्या विविध भागांचा समतोल आर्थिक विकास झाला नाही. उदा. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा व कोकण या ठिकाणचा विकास अतिशय कमी झाला. जमीनदार, भांडवलदार आणि उच्चपदस्थ राजकीय व्यक्ती यांचाच अधिक आर्थिक विकास झाला. याउलट, भूमिहीन शेतमजूर, कामगार हा वर्ग मात्र सतत आर्थिक विवंचनेत जीवन जगत आहे.

थोडक्यात, समाजातील आर्थिक विषमता व दारिद्र्य यामुळे भूमिहीन शेतमजूर आणि बडे बागायतदार तसेच भांडवलदार व कामगार यांच्यामध्ये वर्गीय संघर्ष वाढत आहेत. एकमेकांकडून परस्परांविषयी डावपेच

आखले जातात की, ज्यामधून संप, घेराव, मोर्चा, जाळपोळ, लुटालूट यासारख्या अयोग्य कृतींचा अवलंब केला जात आहे, अशा वेळी देशाची राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येते.

**६. स्वार्थी अथवा गलिच्छ राजकारण :-**

भारत देशाच्या संदर्भात विचार करता असे आढळून येते की, या देशात प्रचंड प्रमाणात दारिद्र्य, अज्ञान आणि वाढते जननप्रमाण या गोष्टी राजकीय गैरवर्तनास पोषक ठरतात. यातूनच जातिभेद, धर्मांधता, भाषावाद, प्रादेशिकवाद इत्यादींना संघटितपणे खतपाणी घातले जाते, तसेच समाजविघातक कृत्ये करणाऱ्यांना हाताशी धरले जाते. अशा गलिच्छ राजकारणामुळे गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत गेल्याचे निदर्शनास येते. साहजिकच यामुळे समाजात भ्रष्टाचार, जातीय निवडणूका, जातीय दंगली आणि राजकीय पक्षाच्या नेत्याचे अपहरण यासारखे अयोग्य वर्तन केले जाते.

थोडक्यात, अशा स्वार्थी व गलिच्छ राजकारणामुळे राष्ट्रीय एकात्मतेस बाधा निर्माण होते. सत्ता मिळविणेसाठी राजकीय पक्ष लोकशाही मूल्ये पायदळी तुडवितात आणि जातिधर्मांच्या आधारे निवडणूका जिंकतात. अशा वेळी इतर जातिधर्मांच्या व्यक्तींच्या मनात द्वेषयुक्त भावना निर्माण हाते. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला तडे जातात. राष्ट्रबांधणीच्या मार्गातील गलिच्छ राजकारणात हा गंभीर स्वरूपाचा अडथळा समजला जातो.

**७. वाढती सामाजिक असुरक्षितता :-**

समाजशास्त्रीयदृष्ट्या विचार करता, आजच्या संमिश्र अथवा गुंतागुंतीच्या समाजरचनेमध्ये दिवसेंदिवस गुन्हेगारी, भ्रष्टाचार आणि समाजमान्य मूल्यांचे उल्लंघन केले जात आहे. त्यामुळे विश्वसनीय पोलीस यंत्रणेवरचा विश्वास कमी होत चालला आहे. अशावेळी समाजातील बहुसंख्य व्यक्तींची आर्थिक व सामाजिक असुरक्षितता बळावत चालल्याचे दिसून येते. याचा गंभीर परिणाम म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेची भावना कमी झाली आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेच्या वाटचालीत अशी असुरक्षितता अडथळा बनली आहे.

**८. परकीय शक्तींची राजकीय नीती :-**

आंतरराष्ट्रीय राजकारणात भारत देशाकडून अलिप्त राष्ट्रांच्या गटाचे नेतृत्व केले जात आहे. त्यामुळे हा देश शक्तिशाली राष्ट्र होत चालल्याचे दिसून येते. अर्थात, भारत देशाने अलिप्ततावादी राष्ट्रांच्या गटाचे नेतृत्व करावे हे बलाढ्य राष्ट्रांना मान्य नाही. त्यामुळे अमेरिकेसारखा देश भारताच्या शत्रू देशाला म्हणजेच पाकिस्तानला शस्त्रपुरवठा, आर्थिक आणि इतर सर्व प्रकारचे साहाय्य करीत आहे. अशा विघटनवादी शक्ती, एक प्रकारे परक्या देशांच्या फुटीरतावादी कारवायांना निमंत्रण देत आहेत त्यामुळे भारतातील राष्ट्रीय एकात्मतेमध्ये अडथळा निर्माण झाल्याचे स्पष्ट होते.

थोडक्यात, अतिरेक्यांच्या घातपाती कृत्यांमागे परकीय शक्तींचा हात आहे हे उघड झाले आहे. उदा. पंजाब, काश्मिर, आसाम आणि देशातील महानगरे या ठिकाणच्या सर्वसामान्य व्यक्तींचे जीवन अस्थिर होत असल्याचे आढळून येते. याचा विपरीत परिणाम म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेमध्ये अडथळा निर्माण होतो.

**९. सदोष शिक्षणपद्धती :–**

राष्ट्रीय एकात्म भावना वृद्धिंगत करण्यामध्ये शिक्षणाचा फार मोठा वाटा असल्याने शिक्षण हे सर्वात प्रभावी साधन समजले जाते. परंतु दुर्दैवाने भारत देशातील शिक्षणपद्धती अत्यंत दोषयुक्त आहे. भारतात शिक्षणसंस्था जातिधर्मांच्या प्रभावाखाली असल्याचे दिसून येते. शाळेतील प्रवेश, शिक्षकांच्या नेमणुका या शिक्षण संस्थाचालकांकडून जात, धर्म, प्रदेश या घटकांच्या आधारे केल्या जातात. साहजिकच विद्यार्थ्यांच्या मनामध्ये राष्ट्रीय एकात्मभावना वाढण्याऐवजी संकुचित अशा जातीय व धार्मिक निष्ठा वाढत आहेत.

अलीकडे तर व्यावसायिक शिक्षणासाठी खाजगी संस्थाचालक स्वत:च्या इच्छेनुसार शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून भरमसाठ देणग्या घेत आहेत. श्रीमंतांची मुले दर्जेदार खाजगी शिक्षणसंस्थेत प्रवेश मिळवितात आणि बुद्धिमान मुले मात्र निम्न शैक्षणिक दर्जा असलेल्या शाळेत शिक्षण घेतात. अशा वेळी सामाजिक वर्गातील अंतर कमी न होता उलट ते वाढतच जात असल्याचे दिसून येते. सुशिक्षित बेकारीचे प्रमाण वाढत आहे. लोकांच्या मनात राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रीय ऐक्य निर्माण होण्यात अडथळा येत चालला आहे.

राष्ट्रबांधणी अथवा राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गातील प्रमुख अडथळे वरीलप्रमाणे सांगता येतील. हे सर्व अडथळे जोपर्यंत कमी होणार नाहीत तोपर्यंत भारतासारख्या खंडप्राय देशात राष्ट्रीय एकात्म भावना वाढीस लागणे कठीण आहे.

### ❒ राष्ट्रीय एकात्मतेसंदर्भात उपाय किंवा मार्ग

भारतासारख्या खंडप्राय देशात राष्ट्रीय एकात्मता जोपासणे तसेच ती वाढविणे हे अत्यंत आवश्यक आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात भारत देशात राष्ट्रीय भावना प्रखर स्वरूपाची होती. मात्र स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी देशाची फाळणी झाली. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रीय एकात्म भावनेला तडा गेला. यातूनच जातीयवाद, भाषावाद, प्रादेशिकवाद इत्यादी उफाळून आले. हिंसात्मक आंदोलने अथवा विध्वंसक कृत्ये केली जाऊ लागली.

अशा वेळी राष्ट्रीय एकात्मतेची भावना पुन्हा प्रज्वलित व स्थिर करण्याची आत्यंतिक निकड निर्माण झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ही राष्ट्रभावना सुदृढ राहण्यासाठी अनेक उपाय अथवा मार्गांचा अवलंब करण्यात आला आहे. त्यासंबंधीचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**१. घटनात्मक तरतुदी :–**

संविधानकार अथवा देशाची घटना तयार करणाऱ्यांनी राष्ट्रीय एकात्मतेला पोषक ठरतील अशा खालील अनेक घटनात्मक तरतुदी केल्या की, ज्यामुळे साहजिकच राष्ट्रीय एकात्म भावना वाढीस लागली.

**(अ) स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या मूल्यांवर आधारित समाजरचना :** संविधानाच्या उद्देशपत्रिकेत सार्वभौम आणि लोकशाही राजकीय व्यवस्था निर्माण करून स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या मूल्यांवर आधारित समाजरचना निर्मितीचे ध्येय देशापुढे ठेवण्यात आले. साहजिकच यामुळे भारतातील विविधतेत एकतेचे सूत्र गुंफणे शक्य झाले. त्यासाठी स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन, महात्मा गांधी जन्मदिन यासारखे राष्ट्रीय महत्त्वाचे दिवस समारंभपूर्वक आजदेखील साजरे केले जात आहेत. १५ आक्टोबर हा दिवस भारताचे माजी राष्ट्रपती कै. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन 'वाचन दिन' म्हणून साजरा करण्यात आला.

**(ब) धर्मनिरपेक्ष तत्त्वाचा स्वीकार :** भारताच्या संविधानामध्ये राष्ट्रीय एकात्मतेसाठी स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या मूल्यांच्या स्वीकृतीबरोबर धर्मनिरपेक्ष तत्त्वाचा स्वीकार करण्यात आला. धर्मनिरपेक्षता याचा अर्थ 'सर्वधर्मसमभाव' असा असून या देशात अनेक धर्म व अनेक पंथ असले तरी प्रत्येकाला आपापल्या धार्मिक तत्त्वानुसार जीवन जगण्याचा कायदेशीर अधिकार प्राप्त करून देण्यात आला. घटनेतील कलम २५ ते २८ नुसार लोकांना आपल्या आवडीच्या धर्माचा स्वीकार करण्याची हमी देण्यात आली. साहजिकच यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात, "**सर्व भारतभूमी आम्हा सर्वांची आहे व तिचे संवर्धन करणे हे आमचे कर्तव्य आहे**" ही भावना वृद्धिंगत झाली. त्यातूनच विभिन्न जाती-धर्मांच्या व्यक्तींमध्ये राष्ट्रीय भावना जागृत झाली.

**(क) संविधानातील मार्गदर्शक तत्त्वे :** राष्ट्रबांधणी अथवा राष्ट्रीय एकात्म भावनेच्या निर्मितीसाठी संविधानात कलम ३६ ते ५१ मध्ये राज्यकर्त्यांसाठी अनेक मार्गदर्शक तत्त्वे समाविष्ट करण्यात आली. उदा. सर्वांची उन्नती करणे हे नैतिक बंधन मानावे, संपूर्ण भारतभूती सर्व भारतीयांची आहे, घटक राज्यांनी संघराज्यातून फुटून निघू नये, सर्वांसाठी एकच संविधान, एकेरी नागरिकत्व आणि एकेरी न्यायदान व्यवस्था यासारखी मार्गदर्शक तत्त्वे राष्ट्रीय ऐक्याला पोषक ठरली.

**२. सामाजिक समता :-**

राष्ट्रबांधणी अथवा राष्ट्रीय एकात्मता यासाठी संविधानात्मक तरतुदींप्रमाणे देशात सामाजिक समता निर्माण करणे तसेच समाजातील जातिव्यवस्थेचे स्वरूप बदलणे अतिशय आवश्यक आहे. जातीमधील श्रेष्ठ-कनिष्ठ भावना बाजूला सारून सर्व जातींना समान स्थान दिले गेले पाहिजे. सार्वजनिक जीवनात जातीयतेचे महत्त्व कमी करून जातीय तणाव निर्माण होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. विकासाची संधी सर्वांना उपलब्ध करून दिली पाहिजे. या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून आर्थिक व सामाजिक विकासाचे अनेक कार्यक्रम राबविले आहेत. उदा. बँका, विमा कंपन्या यांचे राष्ट्रीयीकरण केले आहे. ग्रामीण पुनर्रचना करण्यासाठी समुदाय विकास योजना, पंचायतराज्य पद्धत इत्यादी उपक्रम राबविले आहेत. साहजिकच यामुळे राष्ट्रीय एकात्म भावना वाढीस लागली आहे.

**३. आर्थिक सुरक्षितता :-**

सामाजिक समता याप्रमाणेच राष्ट्रीय एकात्म भावनेच्या निर्मितीसाठी लोकांना आर्थिक स्थैर्य अथवा आर्थिक सुरक्षितता प्राप्त होणे अत्यंत आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर १९५१ पासून पंचवार्षिक योजनांच्या आधारे संपूर्ण भारताच्या एकत्रित आर्थिक प्रगतीला अग्रस्थान देण्यात आले. सार्वजनिक क्षेत्रात

अवजड उद्योगधंदे सुरू करण्यात आले. लोकांना व्यावसायिक स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यात आले. साहजिकच यामुळे सामान्य जनतेमधील आर्थिक वैफल्याची भावना नष्ट होऊन त्यांना आर्थिक सुरक्षितता प्राप्त झाली. अशावेळी राष्ट्रीय एकात्म भावना वाढीस लागली.

**४. राजकीय एकसंधता :–**

कोणत्याही देशाची राष्ट्रीय एकात्मता दृढ होण्यासाठी राज्यांमधील परस्परसंबंध राष्ट्र हितकारक असले पाहिजेत. भारताच्या संदर्भात विचार करता असे दिसून येते की, या देशात जात, धर्म, भाषा, वंश इत्यादी बाबतीत विविधता असून देशाची लोकसंख्या एकजिनसी नसून ती विविध रीतींनी विभागली गेली आहे. भाषिकवाद, सीमावाद, नद्यांचे पाणीवाटप आदी प्रश्नांवरून विविध राज्यांनी एकमेकांविरुध्द आक्रमक भूमिका घेतल्याचे दिसून येते. हिंसात्मक आंदोलने अथवा जातीय दंगली वाढत आहेत. अशा वेळी देशाची एकात्म भावना एकसंघ होण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत राष्ट्रीय वृत्तीला मारक असा फाजील आत्मविश्वास वाढू देता कामा नये.

**५. भाषिक सामंजस्यता :–**

राष्ट्रीय एकात्मता बळकट करण्यासाठी राजकीय एकसंधता आणि सामाजिक समता याचप्रमाणे देशातील विविध भाषिकांमध्ये भाषिक सामंजस्यांची नितांत आवश्यकता आहे. भारत हा देश बहुभाषिक असल्याने मोठ्या प्रमाणात भाषिक वाद निर्माण झाल्याचे दिसून येते. प्रत्येक राज्य आपलीच भाषा श्रेष्ठ मानते आणि या भाषेतूनच देशाचा राज्यकारभार केला जावा अशी अपेक्षा करते. उदा. उत्तरेकडील राज्ये हिंदी भाषेला खूपच महत्त्व देतात तर दक्षिणेकडील राज्ये इंग्रजी भाषेला महत्त्व देतात. अशावेळी विविध राज्यांच्या वेगवेगळ्या भाषांमुळे भाषिक तणाव वाढत जातो. असा भाषिकवाद कमी करून राष्ट्रीय एकात्म भावना वाढीसाठी सर्व भारतीय भाषांकरिता देवनागरी या समान लिपीचा वापर सुरू केला पाहिजे. त्यासाठी विविध भाषिकांमध्ये सामंजस्याचे वातावरण निर्माण झाले पाहिजे.

**६. शैक्षणिक उपक्रमशिलता किंवा शिक्षणप्रसार :–**

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या मते, शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेचे संस्कार लोकांच्या मनावर रुजविता येतात. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेचे सर्वात प्रभावी साधन म्हणजे शिक्षण हे होय. भारताला अभिप्रेत असणारी नवी लोकशाही आणि समाजवादी समाजरचना दृढ होण्यास 'लोकशिक्षणाची सामाईक शाळा पद्धत' (Common School System of Public Education) फार उपयुक्त ठरणार आहे. शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या मनावर स्वातंत्र्य, समता व बंधुत्व तसेच मानवता व धर्मनिरपेक्षता यासारख्या उच्च मूल्यांचे संस्कार बिंबविले पाहिजेत. ही शैक्षणिक उपक्रमशीलता देशात राष्ट्रीय एकात्मता दृढ होण्यास अत्यंत उपयोगी आहे. यामुळे लोकांच्या मनामध्ये राष्ट्रप्रेम, सहिष्णुता, सामाजिक ऐक्य वाढण्यास मदत होते.

**७. लोकजागृती :–**

समाजशास्त्रीयदृष्ट्या विचार करता, राष्ट्रीय एकात्मतेसाठी लोकजागृती हा सर्वात प्रभावी आणि परिणामकारक असा उपाय आहे. भारतीयांच्या मनामध्ये अद्यापही श्रेष्ठ–कनिष्ठत्त्वाची भावना आढळून येते. तसेच माझी जात, माझा धर्म आणि माझी भाषा हीच श्रेष्ठ असून इतरांची जात, धर्म व भाषा कनिष्ठ मानली जाते. यामुळे भारतीयांच्या मनामध्ये भेदभाव, पूर्वग्रह दोष आणि इतरांविषयी द्वेषयुक्त भावना आढळून येते. जर या देशात राष्ट्रीय एकात्म भावना वाढावी असे वाटत असेल तर लोकांचे सतत प्रबोधन केले पाहिजे. तसेच राष्ट्रहिताचे संस्कार लोकांच्या मनावर बिंबविले गेले पाहिजेत. यासाठी त्यांच्यामध्ये लोकजागृती घडवून आणली पाहिजे. '**जगा आणि जगू द्या**' हा भारताच्या सांस्कृतिक परंपरेचा महामंत्र सर्वांनी मनापासून अंगीकारला पाहिजे.

वरील उपायांखेरीज स्वच्छ प्रशासकीय कारभार, सुरक्षिततेची हमी, लोकसंख्या रोखण्यासाठी कायदेशीर तरतूद, भौगोलिक सलगता, शालेय व महाविद्यालयीन शिक्षणक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचा (N.S.S.) अंतर्भाव यासारखे अनेक प्रभावी उपाय सुचविता येतील.

**१.२.१.१ स्वयं–अध्ययनासाठीचे प्रश्न**

**(अ) बहुपर्यायी प्रश्न सोडवा किंवा योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१. डॉ. घुर्ये यांच्या मते, भारतात विविधता असून देखील कोणत्या कारणाने लोकांच्या ठिकाणी ऐक्याची भावना आढळते.

(अ) देशाभिमान (ब) देशद्रोह (क) जातीसंघर्ष (ड) वंशभेद.

२. भविष्यामध्येदेखील भारत हे खंडप्राय राष्ट्र अखंड रहावे या दृष्टिकोणातून भारतीय घटनेने कोणते तत्त्व स्वीकारले?

(अ) वर्णभेद (ब) धर्मनिरपेक्षता

(क) वांशिक भेद (ड) विघटानात्मक प्रक्रिया.

३. सर्व समूहांनी आपल्या संकुचित निष्ठा ओलांडून राष्ट्राने स्वीकारलेली ध्येये साध्य करण्याच्या कार्यात समान सहभाग घेण्याची मानसिक व सामाजिक प्रक्रिया म्हणजे काय?

(अ) वर्ग कलह (ब) दहशतवाद (क) जागतिकीकरण (ड) राष्ट्रीय एकात्मता.

४. डॉ. घुर्ये यांच्या मते, भारतासारख्या खंडप्राय देशातील लोकांच्याठिकाणी कोणती भावना आढळून येत असल्यामुळे राष्ट्रीय ऐक्य निर्माण झाले?

(अ) आम्ही अथवा एकसंघ भावना (ब) स्पर्धात्मक भावना

(क) संघर्षात्मक भावना (ड) वरीलपैकी एकही नाही.

५. डॉ. जी. एस. घुर्ये यांच्या मते, राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात भारतात कोणता घटक घातक ठरला आहे?

(अ) व्यवसाय स्वातंत्र्य (ब) भाषण स्वातंत्र्य

(क) भाषिक संघर्ष (ड) नि:धर्मीपणाचे तत्त्व.

६. ''प्रादेशिक भाषा'' हे कोणत्या प्रक्रियेचे प्रतिक असते?

(अ) राष्ट्रीय एकात्मता (ब) कार्यात्मवाद

(क) संस्कृती संघर्ष (ड) वर्णव्यवस्था.

७. डॉ. घुर्ये यांच्या मते, जातीय विविधतेत खालीलपैकी कोणता मंत्र जपला जात होता?

(अ) 'जगा व जगू द्या' (ब) साम्यवाद

(क) श्रमविभाजन (ड) सांस्कृतिक पाश्चायन.

८. डॉ. घुर्ये यांच्या मते, राष्ट्रीय एकात्मतेसाठी कोणत्या गोष्टीची नीतांत गरज असते?

(अ) समूहाबरोबर सामंजस्याने राहणे (ब) धार्मिक मतभेद

(क) भाषिकवाद (ड) जातीय संघर्ष.

९. राष्ट्रीय एकात्मतेसाठी खालील कोणत्या गोष्टीची गरज भासते?

(अ) भाषावार राज्यनिर्मिती (ब) परकीयशक्तीचा प्रभाव

(क) आर्थिक स्थैर्य अथवा सुरक्षितता (ड) वरीलपैकी एकही नाही.

१०. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या मते, राष्ट्रीय एकात्मतेचे सर्वात प्रभावी साधन कोणते?

(अ) शिक्षण (ब) बेकारी

(क) वाढते जनन प्रमाण (ड) प्रदूषण.

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. 'आपण सर्वजण एक आहोत' अशी राष्ट्रीय भावना कोणत्या देशात आढळून येते?

२. डॉ. घुर्ये यांच्या मते, भारतात कोणकोणती विविधता आढळते?

३. डॉ. घुर्ये यांनी आपल्या लिखानामध्ये राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात कोणत्या बाबीवर अधिक भर दिला?

४. भारतातील विविध घटकांच्यामध्ये राष्ट्रीय एकात्मतेसाठी कशाची गरज भासते?

५. भारत आणि पाकिस्तान या दोन शत्रू राष्ट्रांमध्ये कोणत्या गोष्टीमुळे सतत धार्मिक संघर्ष सुरू असल्याचे दिसून येते?

६. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात १९५६ साली राज्य पुनर्रचना आयोगाच्या शिफारशीनुसार कशाची निर्मिती करण्यात आली?

७. देशाची घटना तयार करणाऱ्यांनी राष्ट्रीय एकात्मतेला पोषक ठरतील अशा कोणत्या महत्त्वपूर्ण घटनात्मक तरतुदी केल्या?

## १.२.२ डॉ. घुर्ये यांचा जातीव्यवस्थेबद्दलचा विचार

भारतातील समाजशास्त्राचे जनक डॉ. जी. एस. घुर्ये यांनी जे अनेक महत्त्वपूर्ण विचार मांडले, त्यामध्ये त्यांचा भारतातील जातीव्यवस्थेसंबंधीचा विचार सर्वात महत्त्वाचा म्हणून ओळखला जातो. डॉ. घुर्ये यांनी लिहिलेल्या "Caste and Race in India" या ग्रंथामध्ये भारतातील जातीव्यवस्थेवर सविस्तर असे विचार मांडले आहेत. उदा. भारतातील विविध जातीसमूहांचे स्वरूप, वैदिक कालखंडापासून ब्रिटीश कालखंडापर्यंत जातीव्यवस्थेच्या रचनेमध्ये घडत आलेले परिवर्तन आणि भारतातील जातीव्यवस्थेची ठळक वैशिष्ट्ये इत्यादींचा अभ्यास केलेला दिसून येतो.

जातीव्यवस्था ही जन्माधिष्ठित असून भारतीय समाजव्यवस्थेत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार पुरक जाती किंवा वर्ण असून त्याअंतर्गत हजारो उपजाती, पोटजाती आहेत. त्यामुळेच या सामाजिक व्यवस्थेकडे भारतातील **सामाजिक स्तरीकरणाचा एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकार** म्हणून पाहण्यात येते.

❐ **जातीव्यवस्थेची व्याख्या :–**

मूळ पोर्तुगीज भाषेतील Casta म्हणजे वंशाची शुध्दता, प्रजाती किंवा जन्मभेद या अर्थाच्या शब्दावरून इंग्रजीत 'Caste' हा शब्द रूढ झाला. अनेक समाजशास्त्रज्ञांनी जातीच्या खालीलप्रमाणे ठळक व्याख्या सांगितल्या आहेत. त्या अभ्यासल्या असता आपणास भारतातील जातीव्यवस्थेचे निश्चित स्वरूप समजू शकेल.

१. **डॉ. जी. एस. घुर्ये :** ''स्तरीकरणाचा एक बंदिस्त प्रकार म्हणजे जातीव्यवस्था होय.''

२. **मदन व मुजुमदार :** ''जाती म्हणजे एक बंद वर्ग होय.''

३. **चार्लस् कुले :** ''अनुवंशिकतेच्या तत्त्वावर आधारलेल्या वर्गास जाती असे म्हणतात.''

४. **डॉ. इरावती कर्वे :** ''जातीव्यवस्था म्हणजे एक विस्तारित कुटुंब होय.''

५. **ए. डब्ल्यू. ग्रीन :** ''जात ही सामाजिक स्तरीकरणाची अशी व्यवस्था आहे की, जिच्यामध्ये तत्त्वत: व्यक्तीला सामाजिक दर्जा बदलता येणे अशक्य असते.''

जातीच्या वरील सर्व ठळक व्याख्या अभ्यासल्या असता त्यावरून असे स्पष्ट होते की, जातीव्यवस्था ही एक प्रकारची वर्गव्यवस्थाच असून जातिनिष्ठ समाजरचनेत समाज हा निरनिराळ्या जातीमध्ये विभागलेला असतो. या जाती श्रेष्ठ-कनिष्ठ अशा उतरत्या श्रेणीमध्ये रचलेल्या असतात. डॉ. घुर्ये यांच्या मते, जातीव्यवस्था हे भारतीय समाजाचे खास वैशिष्ट्य असून जातीच्या आधारावर भारतीय समाजात अनेक श्रेष्ठ कनिष्ठ स्तर निर्माण झाले. जातीचे सदस्यत्त्व जन्माने प्राप्त होते आणि मृत्युपर्यंत व्यक्तीला आपली जात बदलता येत नाही. जातीव्यवस्था हिंदू धर्मांशी निगडीत असली तरी भारतातील मुस्लीम, जैन या इतर धर्मीयांतही जाती, उपजाती दिसून येतात. एकंदरीत भारतीय समाज व्यवस्थेवर जातीव्यवस्थेचा आजदेखील खूप पगडा असल्याचे दिसून येते.

## ❒ जातीसंस्थेची वैशिष्ट्ये

डॉ. जी. एस. घुर्ये हे जातीव्यवस्थेचे संशोधन केलेले भारतातील सुप्रसिद्ध संशोधक अथवा अभ्यासक म्हणून ओळखले जातात. सामाजिक स्तरीकरणाचा एक बंदिस्त प्रकार यादृष्टीने त्यांनी भारतातील जातीव्यवस्थेची खालील अनेक ठळक वैशिष्ट्ये अथवा लक्षणे विशद केली आहेत. त्याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

### १. समाजाची खंडात्मक विभागणी (Segmental Division of Society)

डॉ. घुर्ये यांच्या मते, भारतातील जातीसंस्थेचे सर्वात ठळक वैशिष्ट्य म्हणजे या व्यवस्थेने समाजाचे अनेक गटामध्ये विभाजन केले. ज्याप्रमाणे घराची भिंत ही विटांवर विटा रचून तयार होते आणि अनेक स्तरांची जशी भिंत बनते, त्याप्रमाणे संपूर्ण भारतीय समाजाची जातीव्यवस्थेमुळे अनेक स्तरात विभागणी झाली आहे. यातील प्रमुख जातींचे पुन्हा उपजातींच्या स्वरूपात स्तरीत अथवा खंडात्मक विभाजन झालेले आहे. या सर्व जातीमध्ये तसेच उपजातींमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेद आढळून येतो. प्रत्येक जातीचे स्वरूप इतर जातीपेक्षा वेगळे रहावे यासाठी जातीच्या अनेक नियमांचे पालन करणे हे प्रत्येक जातीसदस्याला बंधनकारक असते, जात पंचायतीकडून यासंबंधीचे नियंत्रण ठेवले जाते. याचा गंभीर परिणाम म्हणजे समुदाय निष्ठा रुजण्यापेक्षा संकुचित जातीनिष्ठा बळावत गेल्या आणि भारतीय समाजाचे अनेक जाती-उपजातीमध्ये विभाजन झाले.

### २. जन्माधिष्ठित सभासदत्व (Membership by Birth)

डॉ. घुर्ये यांनी भारतातील जातीव्यवस्थेचे जन्माधिष्ठित सभासदत्त्व हे दुसरे ठळक वैशिष्ट्य सांगितले. त्यांच्या मते, प्रत्येक जातीचे सभासदत्व जन्माने प्राप्त होते आणि ते आयुष्यभर बदलता येत नाही. याचाच अर्थ एखाद्या भारतीय जातीमध्ये जन्माला आलेली व्यक्ती आयुष्यभर त्याच जातीचा सभासद म्हणून ओळखली जाते. समाजशास्त्रीयदृष्ट्या विचार करता असे दिसून येते की, भारतातील कोणत्याही व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार जात बदलता येत नाही. त्यामुळेच भारतीय जाती संस्थेकडे एक बंदिस्त वर्ग (closed group) म्हणून पाहिले जाते.

## ३. उच्चनीचतेची क्रमवारी किंवा श्रेणीरचना (Hierarchy)

भारतातील जातीव्यवस्थेचा विस्तृत आढावा घेता असे निदर्शनास येते की, या देशातील विविध जातींना समाजव्यवस्थेत श्रेष्ठ-कनिष्ठ दर्जा लाभलेला असतो. उदा. पारंपारिक जातीव्यवस्थेत ब्राह्मण जातीचा दर्जा श्रेष्ठ, त्याखालोखाल क्षत्रिय, वैश्य आणि सर्वात कनिष्ठ दर्जा शुद्र जातीचा (मागासवर्गीय अथवा अस्पृश्य) समजला जातो. याचाच अर्थ भारतातील जाती आणि उपजातींची रचना श्रेष्ठ-कनिष्ठ तत्त्वावर झालेली आहे. त्यामुळे जाती-जातीमधील परस्पर संबंध हे अशा श्रेष्ठ-कनिष्ठ तत्त्वावर आधारलेले आहेत. अर्थात विशिष्ट प्रदेशात, वरचे स्थान नेमक्या कोणत्या जातीचे याबाबत मात्र भिन्नता दिसून येते.

## ४. अंतर्विवाही समूह (Endogamous Group)

डॉ. घुर्ये यांच्या मते, भारतातील जातीसंस्थेचे जन्माधिष्ठित सभासदत्त्व याप्रमाणेच अंतर्विवाही समूह हे एक ठळक वैशिष्ट्चे आढळून येते. ''अंतर्विवाही समूह याचा अर्थ जातीच्या सदस्याने विवाहाचा जोडीदार हा आपल्याच जातीमधून निवडावा असे प्रत्येक जातीचे कडक बंधन असते.'' पारंपारिक व्यवस्थेत जाती पंचायतीकडून या नियमाच्या संदर्भात आर्वजून लक्ष दिले जात होते. तसेच सदस्याच्यावर यासंदर्भात नियंत्रण ठेवले जाते आणि जातीबाहेर विवाह करणाऱ्या व्यक्तीला कडक शिक्षा केली जाते. आजदेखील भारताच्या ग्रामीण समाजामध्ये वरील नियमांचे काटेकोरपणे पालन केले जात असल्याचे दिसून येते.

## ५. व्यवसाय निवडीवर बंधन किंवा निर्बंध (Restrictions on Occupation)

भारतातील जातीव्यवस्थेचे व्यवसाय निवडीवर बंधन अथवा व्यवसाय स्वातंत्र्याचा अभाव हे देखील एक ठळक वैशिष्ट्य असल्याचा डॉ. घुर्ये यांनी उल्लेख केला. त्यांच्यामते, भारतातील पारंपारिक जातीव्यवस्थेत प्रत्येक जातीचा विशिष्ट व्यवसाय ठरलेला असे. जातीत जन्माला येणाऱ्या व्यक्तीला आपल्याच जातीचा व्यवसाय करण्याचे बंधन होते. यातूनच भारतात **बलुतेदारी पद्धत** प्रचलित झाली. याचाच अर्थ आपल्या जातीचा व्यवसाय सोडून इतर व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य नव्हते. एखाद्या व्यक्तीकडून आपल्या जातीबाहेरील व्यवसाय केला जावू लागला तर अशा व्यक्तीला स्वत:च्या जातीतील तसेच इतर जातीमधील लोकांच्याकडून विरोध केला जात असे. त्यामुळेच भारतात स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वी प्रत्येक जात आपला व्यवसाय श्रेष्ठ आहे असे मानीत असे. अनेक जातींची नावेदेखील त्यांच्या व्यवसायावरून पडलेली दिसतात. उदा. कुंभार, लोहार, सुतार, मांग, चांभार इत्यादी.

## ६. खानपान व सामाजिक व्यवहारावरील निर्बंध (Restrictions on Feeding and Social Intercourse)

पारंपारिक भारतीय जातीसंस्थेने समाजातील प्रत्येक जातीय गटात खानपान विषयक तसेच सामाजिक व्यवहारावर निर्बंध लादलेले आढळून येतात. उदा. भारताच्या पारंपारिक जातीव्यवस्थेत उच्च जातीमधील व्यक्ती कनिष्ठ जातीमधील व्यक्तींच्या हातचे अन्नपदार्थ खात नव्हत्या. तसेच कनिष्ठ जातीमधील लोकांचा स्पर्श होणे, त्यांची सावली अंगावर पडणे अमंगल अथवा अपवित्र मानत होत्या. सद्य परिस्थितीत

खानपानविषयक आणि सामाजिक व्यवहारावरील जातीची बंधने शिथील झाली असल्याचे दिसून येते. शहरी समुदायात तर ही बंधने पाळली जात नसल्याचे दिसून येते. याचा गंभीर परिणाम म्हणजे स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतात विटाळाची कल्पना प्रबळ होती. त्यामुळे मर्यादित प्रमाणात लोकांच्या आंतरक्रिया आपल्याच जातीपुरत्या घडून येत होत्या. लग्न समारंभांना स्वजातीय लोकांनाच बोलाविणेत येत होते. अशा विविध निर्बंधामुळे जातीजातीमध्ये अंतर निर्माण होते व प्रत्येक जात स्वतंत्र गट म्हणून ओळखली जात होती. सध्या मात्र ही बंधने खूपच शिथील झाल्याचे आढळून येते.

### ७. धर्माचा आधार (Basis of Religion)

डॉ. घुर्ये यांच्या मते, भारतीय पारंपारिक समाजात जातीव्यवस्थेला धर्माचा आधार देण्यात आलेला होता. उदा. हिंदू धर्मामध्ये जातीव्यवस्था ही ईश्वरनिर्मित आहे, असे समजून जातीची बंधने सर्वांनी पाळली पाहिजेत, असा समाजाचा कठोर दंडक होता. त्यामुळे साहजिकच प्रत्येक व्यक्तीने आपल्या जातीच्या नियमानुसार वर्तन करावे अशी समाजाची अपेक्षा होती. या जातीव्यवस्थेला धर्माचा आधार देण्यात आल्यामुळे वर्षानुवर्षे ही व्यवस्था टिकून राहिली असल्याचे दिसून येते. अलीकडील काळामध्ये मात्र जातीव्यवस्थेचा धर्माचा आधार हळूहळू शिथील झाल्याचे जाणवते.

### ८. सामाजिक व धार्मिक विशेष अधिकार (पवित्र-अपवित्रतेची भावना) (Specific Social & Religious Rights)

डॉ. घुर्ये यांच्या मते, भारताच्या पारंपारिक जातीव्यवस्थेत पवित्र-अपवित्रतेची भावना विचारात घेवून उच्च जातीना (उदा. ब्राम्हण) विशेष सामाजिक व धार्मिक अधिकार प्राप्त झाले होते. शुद्र अथवा अस्पृश्य या कनिष्ठ जातींना वरील प्रकारच्या अधिकारांपासून जाणीवपूर्वक वंचित ठेवण्यात आले होते. त्यांना गावाबाहेर राहावे लागत असे. मंदिर, पवित्र ठिकाणे, उच्चवर्णियांची वसती, सार्वजनिक विहिरी अथवा पाणवठा या ठिकाणी मनाई करण्यात आलेली होती. त्याचा गंभीर परिणाम म्हणजे जवळजवळ स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत भारतातील अस्पृश्यांची जीवनविषयक स्थिती अनेक व्यक्तीगत व सामाजिक समस्यांनी ग्रासलेली होती.

### ९. जाती-उपजातींच्या पंचायती (Caste Sub-Caste Panchayat)

स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतामध्ये जाती उपजातींच्या पंचायती अस्तित्वात होत्या. या पंचायतींमध्ये संबंधित जातीमधील वृध्द आणि अनुभवी व्यक्तींचा समावेश असे. अशा जातीपंचायतीकडून व्यक्तीच्या वर्तनावर प्रत्येक बाबतीत नियंत्रण ठेवले जात होते. उदा. प्रत्येकाने आपल्याच जातीचा व्यवसाय करावा, स्वजातीमधूनच वैवाहिक जीवन साथीदार निवडावा, श्रेष्ठ जातीमधील व्यक्तींशी संपर्क ठेवू नये, धार्मिक विधींच्या ठिकाणी जावू नये, विद्याग्रहण करू नये यासारखी बंधने जाती-उपजाती पंचायतीकडून पाळली जातात किंवा नाही हे पाहिले जात होते. आज मात्र भारतातील जातीव्यवस्थेची कठोर आणि अनावश्यक बंधने पूर्वीइतकी ताठर राहिलेली नाहीत, तरीदेखील शेवटी प्रांजळपणे असे म्हणता येईल की, या व्यवस्थेची मूलभूत चौकट भारताच्या खेड्यामध्ये आजही अभंग आहे.

**१.२.२.१ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न**

**(अ) बहुपर्यायी प्रश्न सोडवा किंवा योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१. भारतातील समाजशास्त्राचे जनक म्हणून खालीलपैकी कोणाचा उल्लेख केला जातो?

(अ) डॉ. इरावती कर्वे (ब) डॉ. जी. एस. घुर्ये

(ब) डॉ. धनागरे (ड) डॉ. विलास संगवे.

२. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठीचा मुंबई विद्यापीठाचा 'Chancellor's Medal' हा किताब कोणाला मिळाला?

(अ) डॉ. ए. आर. देसाई (ब) डॉ. राधाकमल मुखर्जी

(क) डॉ. पंढरीनाथ प्रभू (ड) डॉ. जी. एस. घुर्ये.

३. डॉ. जी. एस. घुर्ये यांना उच्चशिक्षणासाठी कोणत्या संस्थेत प्रवेश मिळाला?

(अ) लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स.

(ब) इकोल नॉर्मल सुपीरियर डी पॅरीस.

(क) दि इंडियन सोशियालॉजीकल सोसायटी.

(ड) रॉयल ॲन्थ्रॉपॉलॉजीकल सोसायटी.

४. "Caste and Race in India" या ग्रंथाचे लेखक कोण?

(अ) डॉ. इरावती कर्वे (ब) डॉ. ए. आर. देसाई

(क) डॉ. एम. एन. श्रीनिवास (ड) डॉ. जी. एस. घुर्ये.

५. डॉ. जी. एस. घुर्ये यांनी १९६८ मध्ये खालीलपैकी कोणता ग्रंथ लिहिला?

(अ) Social Tensions in India (ब) Rural Sociology

(क) India's Village (ड) Kinship Organization in India.

६. भारतातील सामाजिक स्तरीकरणाचा वैशिष्ट्यपूर्ण प्रकार म्हणून कोणत्या सामाजिक संस्थेचा उल्लेख केला जातो?

(अ) विवाहसंस्था (ब) कुटुंबसंस्था

(क) जातीसंस्था (ड) नातेसंबंध व्यवस्था.

७. डॉ. जी. एस. घुर्ये यांनी भारतातील जातीव्यवस्थेचे खालील कोणते ठळक वैशिष्ट्य सांगितले?

(अ) समाजाची खंडात्मक विभागणी (ब) गतिशीलतेला वाव

(क) संस्कृतीकरण (ड) जागतिकीकरण.

८. 'Scheduled Tribes' या पुस्तकामध्ये डॉ. घुर्ये यांनी कोणत्या समाजाचे विस्तृत विवेचन केले आहे?

(अ) ग्रामीण (ब) आदिम किंवा आदिवासी

(क) शहरी (ड) पाश्चात्त्य.

९. डॉ. जी. एस. घुर्ये यांच्या मते, कोणत्या धर्मातील स्विकारामुळे आदिवासी विकासात सकारात्मक पाऊल पडलेले आहे?

(अ) हिंदू (ब) मुस्लीम (क) जैन (ड) बौध्द.

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. इ. स. १९२३ मध्ये डॉ. जी. एस. घुर्ये यांनी "Ethnic Theory of Caste" या विषयावर कोणत्या विद्यापीठामधून पीएच.डी. ही बहुमानाची पदवी संपादन केली?

२. "The Indian Sadhus" हा ग्रंथ कोणी लिहिला?

३. डॉ. जी. एस. घुर्ये यांना कशाचे जनक म्हणून ओळखले जाते?

४. भारतातील स्तरीकरणाचा एक बंदिस्त प्रकार म्हणून कोणत्या व्यवस्थेचा उल्लेख केला जातो?

५. डॉ. घुर्ये यांच्या मते, भारतातील जातीच्या आधारे कोणते स्तर निर्माण झाले?

६. 'अंतर्विवाही समूह' (Endogamous Group) हे भारतातील कोणत्या व्यवस्थेचे ठळक लक्षण आढळते?

७. डॉ. घुर्ये यांनी भारतातील आदिवासींचा उल्लेख कसा केला?

### १.२.३ डॉ. घुर्ये यांचे भारतातील जमातीबद्दलचे विचार

डॉ. जी. एस. घुर्ये या प्रथम घटकातील घुर्ये यांचा भारतातील जमातीबद्दलचा अभ्यास हा तिसरा उपघटक असून त्यांनी यासंदर्भातील आढावा खालीलप्रमाणे घेतला आहे.

ज्याप्रमाणे डॉ. घुर्ये यांनी राष्ट्रीय ऐक्य आणि एकात्मता व भारतातील जातीव्यवस्था यासंदर्भात सविस्तर विवेचन केले त्याप्रमाणे 'भारतातील जमाती' यावर देखील भाष्य केले. डॉ. घुर्ये यांचे जमातीसंबंधीचे लेखन महत्त्वपूर्ण मानले जाते, त्यांनी ''अनुसूचित जमाती'' (Scheduled Tribes) या पुस्तकामध्ये भारतीय आदिवासींचे ऐतिहासिक, प्रशासकीय आणि सामाजिक दृष्टिकोणातून विवेचन केले आहे. त्यांचे आदिवासी संबंधीचे लेखन हे विशेषत: महाराष्ट्रातील 'कोळी' जमातीसंबंधीचे आहे.

डॉ. जी. एस. घुर्ये यांच्या मते, बहुतांशी आदिम जमाती या हिंदू धर्माच्या संपर्कामध्ये होत्या. त्यामुळे त्यांचे हिंदूकरण झालेले दिसून येते. या पार्श्वभूमीवर डॉ. घुर्ये यांनी आदिवासींना अथवा जमातींना ''मागासलेले हिंदू (Backward Caste Hindus) असे संबोधिले, त्यांच्या मते, आदिवासी समाजाच्या मागासलेपणाचे प्रमुख कारण म्हणजे हिंदू समाजातील सदोष अशी एकात्मता हे होय. उदा. दक्षिणमध्ये भारतातील संथाल, भिल्ल, गोंड यासारख्या जमाती विकासाच्या बाबतीत मागासलेल्या राहिल्या.

याठिकाणी प्रथम आपणास जमाती अथवा आदिम समाज कोणाला म्हटले जाते? यासंदर्भातील काही ठळक व्याख्या अभ्यासणे गरजेचे आहे. विविध मानवशास्त्रज्ञांनी साधा, सरळ, बोलीभाषेचा वापर करणारा, निसर्गाच्या सान्निध्यात राहणारा, भटके जीवन जगणारा परंतु निरक्षर असा समाज म्हणून आदिवासींचा अथवा जमातींचा उल्लेख केला. भारताच्या तीनही विभागामध्ये (उत्तर, मध्य व दक्षिण) अनेक आदिम जमातींचे वास्तव असल्याचे आढळून येते.

❐ **आदिवासी समाज अथवा आदिम जमातीच्या व्याख्या :–**

विविध मानवशास्त्रज्ञांनी आदिम जमातीच्या खालील ठळक व्याख्या सांगितल्या.

**१. डॉ. रिव्हर्स :** ''जो समाज साधा व सरळ असतो, दैनंदिन व्यवहारात बोलीभाषेचा वापर करतो आणि समान उद्दिष्ठांच्या पूर्ततेसाठी एकत्रित येवून कार्य करतो, त्याला आदिम समाज किंवा जमाती म्हणून ओळखले जाते.

**२. डॉ. गिलीन व गिलीन :** ''एका विशिष्ठ अथवा निश्चित भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा, समान सांस्कृतिक जीवन जगणारा परंतु अक्षर ओळख नसलेल्या स्थानीय गटाचे एकत्रीकरण म्हणजे आदिम समाज अथवा जमाती होय.''

**३. डॉ. डी. एन. मुजुमदार :** ''आदिम जमाती म्हणजे समान नाव धारण करणाऱ्या, विशिष्ठ भूप्रदेशावर निवास करणाऱ्या, एकाच प्रकारची बोलीभाषा बोलणाऱ्या आणि व्यवसाय व विवाह यासंदर्भात समान निषेध नियमांचे पालन करणाऱ्या कुटुंबाचा समूह होय.''

आदिवासी समाज अथवा आदिम जमातींच्या संदर्भातील वरील महत्त्वपूर्ण व्याख्या विचारात घेता असे दिसून येते की, आदिम जमाती या ग्रामीण आणि शहरी समाजातील व्यक्तींच्या पेक्षा वेगळ्या असून एकूण लोकसंख्येमध्ये त्यांची संख्या कमी आहे. या जमाती बोलीभाषेचा वापर करतात आणि निसर्गाच्या सान्निध्यात राहून आपल्या मुलभूत गरजा पूर्ण करतात, त्यामुळे अर्थातच अशा जमाती मागासलेल्या व निरक्षर अशा राहिल्या. या पार्श्वभूमीवर आदिम समाजाची अथवा जमातींची खालील ठळक वैशिष्ट्ये किंवा लक्षणे दिसून येतात. उदा. (१) प्रमाणलघुता किंवा मर्यादित लोकसंख्या (२) निश्चित भू-प्रदेश (३) बोलीभाषेचा वापर (४) साधी अर्थव्यवस्था (५) मर्यादित तंत्रविद्या (६) धर्मश्रद्धा व जादूचा प्रभाव (७) जमात केंद्रित आत्मीयता इ.

जमातींची ही ठळक लक्षणे खालीलप्रमाणे थोडक्यात विशद करता येतील की, ज्यामुळे जमातींचे वेगळेपण समजू शकेल.

**१. प्रमाणलघुता (मर्यादित लोकसंख्या) :–**

ग्रामीण आणि शहरी समाजाशी तुलना करता आदिम समाज म्हणजेच जमातींची लोकसंख्या अगदीच मर्यादित असल्याचे दिसून येते. उदा. एकूण लोकसंख्येच्या तुलनेत अंदाजे ती ९% इतकी जाणवते. त्यामुळे त्यांच्या सामाजिक संपर्काचे प्रमाण देखील अत्यंत मर्यादित राहते.

**२. निश्चित अथवा विशिष्ठ भूप्रदेश :–**

सामान्यत: विविध जमातींचे अथवा आदिम समाजाचे वास्तव्याचे ठिकाण हे डोंगराळ प्रदेश किंवा जंगल असल्याचे दिसून येते. जरी या जमाती भ्रमंती करून म्हणजेच भटक्या स्वरूपाचे जीवन जगत असल्या तरी प्रत्येक जमातीचा स्वत:चा असा विशिष्ठ भू–प्रदेश असतो. त्यामुळे त्यांचे भटकण्याचे क्षेत्र विशिष्ठ भू–प्रदेशच असतो. उदा. कुकी, खासी, नागा, थारू यासारख्या जमाती कायम निसर्गाच्या सान्निध्यात म्हणजेच जंगलामध्ये राहतात. परिणामत: त्यांचा बाह्य जगाशी फारसा संपर्क येत नसतो.

**३. बोलीभाषेचा वापर (लिखीत भाषेचा अभाव) :–**

जमातीचे अथवा आदिम समाजाचे सर्वात ठळक लक्षण म्हणजे त्याची बोलीभाषा (Dialect) हे होय. या बोलीभाषेतूनच जमातीमधील व्यक्तींची परस्परांमध्ये विचारांची देवाण–घेवाण होत असल्याचे दिसून येते. याचा चांगला परिणाम म्हणजे त्यांच्यामध्ये समूहभावना दृढ होत जाते आणि इतर जमातीपासून त्यांना त्यांचे सांस्कृतिक वेगळेपण ठेवता येते. मात्र लिखित भाषेच्या अभावामुळे त्यांचे ज्ञान, कला, धर्म, साहित्य इत्यादीबाबतीत प्रगतीवर मर्यादा पडल्या.

**४. साधी अर्थव्यवस्था (मुद्राप्रधान अर्थव्यवस्थेचा अभाव) :–**

इव्हान्स प्रिचर्ड यांनी जमातींचे साधी अर्थव्यवस्था हे ठळक लक्षण सांगितले. त्यांच्या मते, विविध जमाती अथवा आदिवासी हे निसर्गाच्या सान्निध्यात राहून तिथे उपलब्ध असणाऱ्या साधनसामग्रीवर आपला उदरनिर्वाह करतात. उदा. खाद्य संकलनाने अन्नाची गरज, झाडांची वल्कले परिधान करून वस्त्राची गरज तर गुहेमध्ये राहून निवाऱ्याची गरज पूर्ण करतात. पैसा हे विनिमयाचे माध्यम जमातीमध्ये आढळत नाही. अर्थातच वस्तुविनिमय पद्धतीच्या आधारे परस्परांच्या आर्थिक गरजांची पूर्तता केली जाते. थोडक्यात, लिंगभेदावर आधारित आणि केवळ उपभोगापुरते उत्पादन अशीच जमातींची अर्थव्यवस्था असते.

**५. मर्यादित तंत्रविद्या :–**

साध्या अर्थव्यवस्थेप्रमाणे जमातींचे मर्यादित तंत्रविद्या हे देखील एक ठळक वैशिष्ट्य जाणवते. अनेक वर्षे जमाती या बाह्य संपर्कापासून अलग पडल्याने त्यांच्यामध्ये प्रगत संस्कृतीची देवाण–घेवाण फारशी झाली नाही. त्याचा परिणाम म्हणजे वर्षानुवर्षे अत्यंत पुरातन पध्दतीचीच तंत्रविज्ञा त्याना अवगत आहे. उदा.

सरोवरातून जाळ्यांच्या साहाय्याने मासेमारी, तिरकामठा अथवा धनुष्यबाणाच्या साहाय्याने जंगली प्राण्यांची शिकार, शेतीच्या मशागतीसाठी झाडांच्या टोकदार फांद्याचा वापर, पशुपक्ष्यांच्या पालनासाठी बंदिस्त जागा अशी जमातींची मर्यादित तंत्रविद्या आढळून येते.

**६. धर्मश्रध्दा व जादूटोणा याचा प्रभाव :-**

आदिम जमातींना निसर्गातील घडामोडी का घडतात? याची शास्त्रीय माहिती कळत नाही. अलौकिक शक्तीचा कोप हेच त्यांच्या दृष्टीने विविध घटनाना कारण जबाबदार असते, असे मानले जाते. त्यांच्याकडून निसर्ग, पूर्वज तसेच धार्मिक परंपरा यांची पूजाअर्चा केली जाते. अनाकलनीय घडामोडींवर आपले नियंत्रण राहावे आणि आपल्या विविध कार्यामध्ये यश यावे म्हणून विविध जमातींच्याकडून जादूटोणा, मंत्रतंत्र, धर्मश्रध्दा यांचा मनोभावे वापर केला जातो.

**७. जमात केंद्रित आत्मीयता :-**

प्रमाणलघुता, निश्चित भू-प्रदेश, बोलीभाषेचा वापर, साधी अर्थव्यव्था यासारख्या ठळक वैशिष्ट्यांप्रमाणे जमात केंद्रित आत्मीयता हे आदिम समाजाचे अथवा जमातींचे वेगळेपण दर्शविणारे ठळक वैशिष्ट्य दिसून येते. त्याचा चांगला परिणाम म्हणजे सर्व जमातींच्या आचार-विचारात, जीवनविषयक दृष्टिकोणामध्ये एकवाक्यता दिसून येते. ग्रामीण आणि शहरी समाजात मात्र अशी आत्मीय भावना अथवा सामाजिक एकजिनसीपणा आढळत नाही.

जमातींची वरील अनेक ठळक वैशिष्ट्ये विचारात घेता सद्यपरिस्थितीत असा निष्कर्ष काढता येईल की, २१व्या शतकामध्ये शहरी समाजाशी संपर्क आणि कष्टाचा मोबदला पैशामध्ये मिळू लागल्याने जमातींच्या ऱ्हासाला सुरुवात झाल्याचे जाणवते. पांढरपेशीय समाजाकडून या साध्या-सरळ परंतु निरक्षर समाजाचा अधिकाधिक गैरफायदा घेतला जात आहे.

या पार्श्वभूमीवर डॉ. जी. एस. घुर्ये यांनी आदिवासींचे अथवा विविध जमातींचे हिंदू जातींबरोबर एकात्मीकरण (Integration) झाले आहे असे म्हटले आहे. तसेच हिंदू धर्मातील मूल्ये आणि नियमनांच्या स्वीकारामुळे निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या जमातींच्या विकासामध्ये सकारात्मक पाऊल पडलेले आहे. सातत्याने हिंदू समूहांच्या संपर्कात आल्यामुळे भारतातील आदिवासींनी (जमातीनी) हिंदूंच्या जीवन जगण्याचा मार्गांचा व समाजातील मूल्यांचा अवलंब केला आहे. परिणामत: भारतातील मध्य आणि दक्षिण विभागामध्ये आढळून येणाऱ्या विविध आदिम जमाती हिंदू समाजाचाच एक भाग आहे असे मत मांडले.

शेवटी भारतातील जमातींच्या संदर्भात डॉ. जी. एस. घुर्ये असे सूचित करतात की, हिंदू समाजाच्या प्रभावामुळे काही आदिम जमातींनी शिक्षण व शेतीमध्ये प्रगती केली आहे. उदा. हिंदू स्वयंसेवी संघटनांनी आदिम जमातींच्या अथवा आदिवासी समाजाच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडल्याचे दिसून येते. यासंदर्भात डॉ. घुर्ये यांनी मध्य भारतातील कोरकू, गोंड, भुईया यासारख्या आदिवासींच्या संबंधी महत्त्वपूर्ण

माहिती एकत्रित करून या जमाती आज हिंदू धर्मानुसारच आपले आचरण करीत आहेत असा विचार व्यक्त केला.

याउलट व्हेरिअर एल्वीन यांनी आपल्या "Loss of Nerve" या ग्रंथामध्ये आदिम जमाती या इतर समाजापासून अलग किंवा वेगळ्या प्रकारच्या आहेत असे मत मांडले. शेवटी आपणास आदिम जमाती अथवा आदिवासी समाजाच्या संदर्भात असा निष्कर्ष काढता येईल की, भारत हा जगातील इतर देशांपेक्षा आदिम जमातींची संख्या अधिक असलेला देश आहे. ओरिसा, मध्यप्रदेश, बिहार, आसाम, उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये आजदेखील आदिम जमातींची संख्या सुपीक भूप्रदेशांमुळे सर्वात जास्त असल्याचे दिसून येते.

**१.२.३.१ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न**

**(अ) योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१. डॉ. जी. एस. घुर्ये यांनी खालील कोणत्या पुस्तकामध्ये भारतीय आदिवासींचे ऐतिहासिक, प्रशासकीय आणि सामाजिक दृष्टिकोणातून विवेचन केले आहे?

(अ) Indian Village (ब) Indian Social System

(क) Scheduled Tribes (ड) Handbook of Sociology.

२. डॉ. घुर्ये यांनी भारतातील जमातीच्या मागासलेपणाचे खालील कोणते प्रमुख कारण सांगितले?

(अ) सदोष एकात्मता (ब) सामाजिक गतीशीलता

(क) धर्म निरपेक्षता (ड) वरीलपैकी एकही नाही.

३. साधा, सरळ, बोली भाषेचा वापर करणारा परंतु निरक्षर असा समाज म्हणून कोणाचा उल्लेख केला जातो?

(अ) ग्रामीण समाजाचा (ब) शहरी समाजाचा

(क) आदिम समाजाचा (ड) औद्योगिक समाजाचा.

४. आदिम समाजाची अर्थव्यवस्था कशी आढळून येते?

(अ) निर्वाहप्रधान स्वरूपाची (ब) गतीशील

(क) अमर्यादित (ड) आधुनिक यंत्रोत्पादनाची.

५. डॉ. घुर्ये यांच्या मते, विविध जमातींच्याकडून मनोभावे कशाचा वापर केला जातो?

(अ) स्वार्थी प्रवृत्तीचा (ब) जादूटोणा, धर्मश्रध्दांचा

(क) शहर-ग्राम स्थलांतराचा (ड) वरीलपैकी एकही नाही.

६. डॉ. घुर्ये यांच्या मते, खालील कोणत्या हिंदू स्वयंसेवी संघटनांनी भारतातील जमातींच्या विकासामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडली?

(अ) सत्यशोधक समाज (ब) भूदान चळवळ

(क) रामकृष्ण मिशन व आर्य समाज (ड) दलित संघटना.

७. व्हेरिअर एल्वीन यांनी आपल्या खालील कोणत्या ग्रंथामध्ये जमाती या इतर समाजापासून अलग आहेत असे मत मांडले?

(अ) Les Suicide (ब) Class struggle

(क) Scheduled Tribes (ड) Loss of Nerve.

८. जगामध्ये सर्वात अधिक जमातींची अथवा आदिवासींची संख्या असलेला कोणता देश आहे?

(अ) अमेरिका (ब) इंग्लंड (क) फ्रान्स (ड) भारत.

९. भारतात किती विभागात आदिम जमातींचे वास्तव्य आढळून येते.

(अ) दोन (ब) तीन (क) चार (ड) पाच.

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. आदिम जमातीची भाषा कशी असते?

२. जमातीमध्ये अनुभवी व वयोवृध्द लोकांचे जे मंडळ असते त्याला काय म्हणतात?

३. डॉ. जी. एस. घुर्ये यांच्या मते, भारतातील बहुसंख्य जमाती या कोणाच्या संपर्कामध्ये होत्या?

४. समान सांस्कृतिक जीवन जगणारा आणि अक्षर ओळख नसलेला स्थानिय गट म्हणजे काय?

५. प्रमाणलघुता म्हणजे काय?

६. कोणत्या समाजात वस्तुविनिमय पध्दतीच्या आधारे आर्थिक गरजांची पूर्तता केली जाते?

७. जमात केंद्रित आत्मीयता हे कशाचे वेगळेपण दर्शविणारे ठळक वैशिष्ट्य दिसून येते?

८. २१ व्या शतकामध्ये विविध जमातींच्या कोणत्या समाजाशी संपर्क आल्याने जमातींच्या ऱ्हासाला सुरुवात झाली?

९. डॉ. घुर्ये यांच्या मते, हिंदू धर्मातील मूल्ये आणि नियमनांच्या स्वीकाराने जमातींच्या विकासामध्ये कोणते पाऊल पडलेले आहे?

१०. भारतातील कोणत्या विभागामध्ये जमातींची (आदिवासींची) संख्या सर्वाधिक आढळते?

## १.३ सारांश

भारतातील समाजशास्त्राचे जनक (Father of Indian Sociology) म्हणून डॉ. जी. एस. तथा गोविंद सदाशिव घुर्ये यांच्या प्रमुख समाजशास्त्रीय विचारांचा वरीलप्रमाणे आढावा घेतला असता असे दिसून येते की, डॉ. घुर्ये यांनी मुंबई विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात अनेक वर्षे समाजशास्त्र विभागप्रमुख या पदाची जबाबदारी अतिशय चांगल्या प्रकारे पार पाडली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली भारतातील डॉ. एम. एन. श्रीनिवास, डॉ. के. एम. कपाडिया, डॉ. ए. आर. देसाई, डॉ. पंढरीनाथ प्रभू, डॉ. इरावती कर्वे इत्यादींनी पीएच.डी. ही बहुमानाची पदवी संपादन केली. त्यावरून आपणांस डॉ. घुर्ये यांचे समाजशास्त्रातील योगदान किती महत्त्वपूर्ण आहे हे कळू शकेल.

डॉ. घुर्ये यांनी मांडलेल्या प्रमुख समाजशास्त्रीय विचारामध्ये राष्ट्रीय ऐक्य आणि एकात्मता, जातीव्यवस्था तसेच जमाती अथवा आदिम समाज इत्यादी महत्त्वूपर्ण विचारांचा त्यांनी या घटकामध्ये आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांना मुंबई विद्यापीठाचा इंग्रजी व संस्कृत अभ्यासक्रमासाठीचा 'Chancellor's Medal' हा किताब मिळाला.

डॉ. घुर्ये यांनी त्यांच्या "Social Tensions in India", "Caste and Race in India", "Scheduled Tribes" या महत्त्वपूर्ण ग्रंथांच्याद्वारे भारतीय समाजाचे वास्तव चित्र रेखाटले. तसेच भारतातील विषमतावादी समाजव्यवस्थेचा अभ्यास करून अशी व्यवस्थाच राष्ट्रीय एकात्मतेला अडथळा ठरली असे मत मांडले आहे. देशाभिमानामुळे भारतातील लोकांच्या ठिकाणी एकत्वाची म्हणजेच 'आम्ही'ची भावना दिसून येते. त्यातूनच भारत हे एक खंडप्राय राष्ट्र निर्माण झाले. देश विकासाच्या दृष्टीने अशा एकात्मतेची नितांत गरज भासते.

राष्ट्रीय ऐक्य आणि एकात्मता या विचाराप्रमाणेच डॉ. घुर्ये यांनी आपल्या "Caste and Race in India" या ग्रंथांच्या माध्यमातून भारतातील जातीव्यवस्थेवर सविस्तर विवेचन केले. जातीव्यवस्था ही जन्माधिष्ठित असून भारतीय समाजव्यवस्थेत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार पूरक जाती किंवा वर्ण असून त्याअंतर्गत अनेक उपजाती, पोटजाती आहेत. सामाजिक स्तरीकरणाचा एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकार म्हणून या जातीव्यवस्थेकडे पाहण्यात येते. डॉ. घुर्ये यांनी समाजाची खंडात्मक विभागणी, जन्माधिष्ठित सभासदत्व, उच्चनीचतेची क्रमवारी किंवा श्रेणीरचना, अंतर्विवाही समूह, व्यवसाय निवड व जीवन साथीदार निवड निर्बंध यासारखी जातीव्यवस्थेची ठळक वैशिष्ट्ये सांगितली. अर्थात ही सर्व वैशिष्ट्ये भारतीय देशाला विशिष्ट चौकटीत ठेवण्याच्या दृष्टीने खूपच घातक ठरली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र जातीव्यवस्थेचे ताठर स्वरूप घटनात्मक तरतुदीमुळे बदलल्याचे दिसून येते.

डॉ. जी. एस. घुर्ये यांनी राष्ट्रीय ऐक्य व एकात्मता आणि जातीव्यवस्थेच्या विचाराप्रमाणेच भारतातील विविध जमाती किंवा आदिवासी समाजाच्या संदर्भात देखील भाष्य केले. त्यांनी आपल्या "Scheduled Tribes" या ग्रंथामध्ये जमातींसंदर्भात आढावा घेतला. विशेषत: महाराष्ट्रातील कोळी जमातीसंबंधी सविस्तर अभ्यास केला. त्यांच्या मते, बहुतांशी आदिम जमाती या हिंदू धर्माच्या संपर्कामध्ये होत्या. त्यामुळे

त्यांचे हिंदूकरण झालेले दिसून येते. तसेच अनेक जमाती हिंदू समूहांच्या सातत्याने संपर्कात आल्यामुळे भारतातील या जमातीनी अथवा आदिवासींनी हिंदू समाजातील मूल्ये आणि जीवन जगण्याच्या मार्गांचा अवलंब केला आहे.

जमातींची अथवा आदिम समाजाची निश्चित भू-प्रदेश, समान बोलीभाषा, निरक्षरता, जादूटोणा व धार्मिक श्रध्दांच्यावर दृढ विश्वास, मुद्राप्रधान अर्थव्यवस्थेचा अभाव (वस्तुविनिमय पद्धत) जमातकेंद्रित आत्मीयता यासारखी त्यांचे वेगळेपण दर्शविणारी अनेक ठळक वैशिष्ट्ये आढळून येतात. भारताच्या उत्तर-मध्य आणि दक्षिण विभागाच्या विविध राज्यांच्यामध्ये आजदेखील अनेक जमाती निसर्गाच्या सान्निध्यात अथवा जंगलामध्ये रहात असलेल्या दिसून येतात.

## १.४ पारिभाषिक संज्ञा

- **एकात्मता :** आपण सर्वजण समान आहोत असा विचार.
- **संस्कृतीचे अनुकरण :** इतरांच्या विचाराचा अथवा जीवनप्रणालीचा स्वीकार.
- **राष्ट्रीय ऐक्य :** संबंधित राष्ट्रातील विविधतेतून एकात्मपणाची भावना.
- **बोलीभाषा :** लिखित भाषेचा अभाव.
- **भ्रमंती :** भटक्या स्वरूपाचे जीवन.
- **अंतर्विवाही समूह :** आपल्याच समूहामध्ये अथवा जमातीमधून जीवन साथीदारांची निवड करण्याचे बंधन.
- **जमाती :** आदिवासी समाज.
- **अनुसूचित :** घटनात्मक तरतुदीनुसार यादी केलेल्या जमाती.
- **मागासलेले :** अविकसित अथवा अप्रगत.

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**१.२.१.१ अ) योग्य पर्याय.**

१. = (अ) देशाभिमान.

२. = (ब) धर्मनिरपेक्षता.

३. = (ड) राष्ट्रीय एकात्मता.

४. = (अ) आम्ही अथवा एकसंघ भावना.

५. = (क) भाषिक संघर्ष.

६. = (अ) राष्ट्रीय एकात्मता.

७. = (अ) ‘जगा व जगू द्या’.

८. = (अ) समूहाबरोबर सामंजस्याने राहणे.

९. = (क) आर्थिक स्थैर्य अथवा सुरक्षितता.

१०. = (अ) शिक्षण.

**(ब) एका वाक्यात उत्तरे :–**

१. भारत.

२. धार्मिक, जातीय, वांशिक, भाषिक.

३. संस्कृतीवर.

४. विविध पैलूंचा समान विकास अथवा सामूहिक प्रयत्न.

५. धर्मांधता.

६. भाषिक राज्याची.

७. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व.

**१.२.२.१ अ) योग्य पर्याय.**

१. = (ब) डॉ. जी. एस. घुर्ये.

२. = (ड) डॉ. जी. एस. घुर्ये.

३. = (अ) लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स.

४. = (ड) डॉ. जी. एस. घुर्ये.

५. = (अ) Social Tensions in India.

६. = (क) जातीसंस्था.

७. = (अ) समाजाची खंडात्मक विभागणी.

८. = (ब) आदिम किंवा आदिवासी.

९. = (अ) हिंदू.

**(ब) एका वाक्यात उत्तरे :–**

१. केंब्रिज.

२. डॉ. जी. एस. घुर्ये.

३. भारतीय समाजशास्त्राचे.

४. जातीव्यवस्था.

५. श्रेष्ठ–कनिष्ठ.

६. जातीव्यवस्था.

७. मागासलेले हिंदू.

**१.२.३.१ (अ) योग्य पर्याय :–**

१. = (क) Scheduled Tribes.

२. = (अ) सदोष एकात्मता.

३. = (क) आदिम समाजाचा.

४. = (अ) निर्वाहप्रधान स्वरूपाची.

५. = (ब) जादूटोणा, धर्मश्रध्दांचा.

६. = (क) रामकृष्ण मिशन व आर्य समाज.

७. = (ड) Loss of Nerve.

८. = (ड) भारत.

९. = (ब) तीन विभागात.

**(ब) एका वाक्यात उत्तरे :–**

१. समान बोलीभाषा.

२. जमात पंचायत.

३. हिंदू धर्माच्या.

४. आदिम समाज किंवा जमाती.

५. जमातीची लोकसंख्या मर्यादित.

६. आदिम समाजात.

७. जमातीचे किंवा आदिम समाजाचे.

८. शहरी समाजाशी.

९. सकारात्मक.

१०. मध्य विभागात.

## १.६ सरावासाठी प्रश्न

❒ **थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. राष्ट्रीय ऐक्य आणि एकात्मता यासंदर्भात सखोल चर्चा करा.

२. राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक असणाऱ्या बाबी स्पष्ट करा.

३. राष्ट्रीय एकात्मतेतील अडथळे विशद करा.

४. भारतातील जातीव्यवस्थेचे स्वरूप आणि तिची ठळक वैशिष्ट्ये लिहा.

५. भारतातील आदिम जमाती अथवा आदिवासी समाजाची व्याख्या सांगून या समाजाची ठळक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

❑❑❑

# घटक – २
# ए. आर. देसाई

**घटक संरचनाः**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ अभ्यास विषयाची मांडणी

२.२.१ भारतातील खेड्यांच्या रचनेचा अभ्यास

स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्न-१

२.२.२ भारतीय राष्ट्रवादाचा अभ्यास

स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्न-२

२.२.३ मार्क्सवादी दृष्टिकोनातून भारतीय समाजाचे विश्लेषण

स्वयं-अध्ययन प्रश्न-३

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक संज्ञा

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ संदर्भग्रंथ

## २.० उद्दिष्ट्ये

भारतीय समाजशास्त्रीय विचारवंताच्या अभ्यासामध्ये, ए. आर. देसाई यांच्या समाजशास्त्रीय विचारांची ओळख करून घेत असताना प्रामुख्याने,

अ) ए. आर. देसाई यांनी, भारतातील ग्रामीण समाज रचनेचा मार्क्सवादी दृष्टिकोनातून आढावा घेत असताना भारतीय खेड्यांची सामाजिक संरचना कशा प्रकारे अभ्यासली आहे, यासंबंधीचा आढावा घेणे.

ब) ए. आर. देसाई यांनी, ऐतिहासिक दृष्टिकोनातून, भारतातील 'राष्ट्रवादा'संबंधीची सामाजिक पार्श्वभूमी अभ्यासण्याचा प्रयत्न केला. त्यासंबंधीचा अभ्यास करणे.

क) ए. आर. देसाई यांनी, भारतीय समाजरचनेची मांडणी आणि विश्लेषण करण्यासाठी मार्क्सवादी दृष्टीकोनाचा अवलंब करून त्यांनी केलेले विश्लेषण अभ्यासणे.

याखेरीज, ए. आर. देसाई यांचे समाजशास्त्रीय लेखन, त्यांचा एकूण जीवन परिचय आणि, त्यांच्या एकूण समाजशास्त्रीय विचारांचा आढावा घेण्याचा प्रयत्न या घटकांमध्ये करणार आहोत. ए. आर. देसाई यांचे ग्रामीण समाजशास्त्रातील योगदान अतुलनीय समजले जाते. त्यांच्या एकूण अभ्यासामध्ये त्यांनी उपयोगात आणलेल्या मार्क्सवादी दृष्टीकोनांचा आढावा घेणे आवश्यक आहे.

## २.१ प्रस्तावना

बी.ए.भाग-३ वर्गासाठी पहिल्यांदाच 'समाजशास्त्रीय विचारवंत' या पेपरमध्ये सत्र-६ साठी, 'भारतीय समाजशास्त्रीय विचारवंत : पेपर क्र. १२' सुरू करण्यात आला आहे. यापूर्वीच्या अभ्यासामध्ये, केवळ पाश्चात्त्य विचारवंतांचा अभ्यास केला जात होता. पाश्चात्त्य विचारवंतांच्या सोबतच काही महत्त्वाच्या भारतीय समाजशास्त्रज्ञांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी या उद्देशाने हा नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. ज्याप्रमाणे समाजशास्त्र हा विषय फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड, अमेरिका, इटली सारख्या प्रमुख पाश्चात्त्य देशातील विचारवंतांच्यामुळे उदयास आला, त्याप्रमाणे भारतातील समाजशास्त्राची सुरुवात देखील मुंबई, कलकत्ता, म्हैसूर, लखनऊमध्ये असणाऱ्या विद्यापीठातील समाजशास्त्रीय अभ्यासकांच्या समाजशास्त्रीय अभ्यासातून झालेली दिसून येते.

मूळातच समाजशास्त्र विषयाची उभारणी पाश्चात्त्य समाजरचनेच्या पार्श्वभूमीवर झाली असल्याकारणाने समाजशास्त्रीय अभ्यासावरती पाश्चात्य विचारवंतांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात आढळतो. भारतीय समाज रचनेचा स्वतंत्रपणे अभ्यास करण्यासाठी म्हणून, "Sociology of India" किंवा "Indian Sociology" ही एक स्वतंत्र अभ्यासशाखा असावी, असे कांही भारतीय समाजशास्त्रज्ञ मत मांडत होते. त्यांच्या मते, पाश्चात्त्य समाजरचना, त्याचे एकूण सामाजिक जीवन आणि त्यानुसार समाजशास्त्रात तयार झालेल्या संकल्पना आहेत. त्यामुळे भारतीय समाजाच्या अभ्यासासाठी त्यांचा आहे तसा उपयोग करणे योग्य ठरणार नाही म्हणून, भारतीय समाजशास्त्रज्ञांनी "Sociology of India" या अभ्यासशाखेअंतर्गत कांही नवीन भारतीय समाजशास्त्रीय संकल्पनांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये जी. एस. घुर्ये, एस. सी. दुबे, एम. एन. श्रीनिवास, आर. के. मुखर्जी, डी. पी. मुखर्जी, इरावती कर्वे, ए. आर. देसाई यासारख्या अभ्यासकांचे योगदान महत्त्वाचे समजले जाते. यातील कांही अभ्यासकांनी प्राचीन दृष्टिकोनातून भारतीय समाजरचना अभ्यासली तर कांही अभ्यासकांनी रचनात्मक-कार्यात्मक दृष्टिकोनाचा अवलंब केला, तर ए.आर.देसाई यांनी मार्क्सवादी दृष्टिकोनातून भारतीय समाजाचे अध्ययन केले.

ग्रामीण समाजशास्त्र ही समाजशास्त्राची एक महत्त्वपूर्ण शाखा समजली जाते. किंबहुना सुरुवातीच्या कालखंडात भारताची अधिकेतर लोकसंख्या ग्रामीण समाजातील होती. भारतातील आजच्या खेड्यांची रचना आणि प्राचीन कालखंडातील खेड्यांची रचना पूर्णत: भिन्न स्वरूपाची आहे. ब्रिटिश कालखंडात भारतातील खेड्यांचे सामाजिक जीवन, त्यांच्या जीवन पध्दतीवर ब्रिटिश शास्त्र व्यवस्थेचा पडलेला प्रभाव आणि

त्यामधून खेड्यांची अर्थव्यवस्था आणि दारिद्र्याचे प्रमाण यासंबंधीचा सखोल अभ्यास ए.आर.देसाई यांच्या ग्रामीण समाजशास्त्राच्या अभ्यासातून करून घेता येतो. या स्वरूपाचा अभ्यास करताना देसाई यांनी मार्क्सवादी दृष्टिकोनातून कशा प्रकारे, ग्रामीण समाजाचे अध्ययन केले आहे. या विषयी आपण माहिती घेणार आहोत.

## २.२ अभ्यास विषयाची मांडणी

Akshay Ramanlal Desai ए. आर. देसाई यांचा जन्म गुजरात राज्यातील 'नंदियाड' या ठिकाणी १६ एप्रिल १९१५ रोजी झाला. त्यांचे वडिल रमणलाल वसंतलाल देसाई एक-उत्कृष्ठ साहित्यिक होते, की ज्यांचा प्रभाव ए. आर. देसाई यांच्यावर सुरुवातीच्या कालखंडात पडलेला होता. ए. आर. देसाई यांनी मुंबई, बडोदा, सुरत याठिकाणी झालेल्या विद्यार्थी चळवळींच्यामध्ये सहभाग घेतला होता. मुंबई विद्यापीठातून आपले पदवी शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याच विद्यापीठातून १९४६ मध्ये डॉ. जी. एस. घुर्ये यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. आणि कायदेशास्त्राची (Law) पदवी देखील संपादन केली. त्यानंतर त्यांनी मुंबई विद्यापीठामध्ये अध्यापनाचे काम सुरू केले आणि कही दिवसात विभाग प्रमुख म्हणून पदभार संभाळला. १९४७ मध्ये ए. आर. देसाई यांचा विवाह नीरा देसाई यांच्याशी झाला, की ज्या महिलांच्या अभ्यास क्षेत्रात काम करीत होत्या. १९५३ मध्ये ए. आर. देसाई यांनी, एका क्रांतिकारी समाजवादी पक्षाचे सदस्यत्त्व स्वीकारले होते परंतु १९८१ मध्ये त्यांनी त्या सदस्यत्वाचा त्याग केला होता.

भारतातील समाजशास्त्रीय अभ्यास मांडणीमध्ये असणाऱ्या समाजशास्त्रज्ञांपैकी ए. आर. देसाई हे एक असे अभ्यासक आहेत की, ज्यांनी आपल्या समाजशास्त्रीय अभ्यासामध्ये मार्क्सवादी दृष्टिकोनाची पायाभरणी करत असताना या दृष्टिकोनाचा सातत्याने उपयोग केलेला दिसतो. त्यांनी 'कार्ल मार्क्स' आणि 'फ्रेड्रीक एंजल्स' या दोन विचारवंताच्या लिखानाचा सखोल अभ्यास करून त्यांचा द्वंद्वात्मक-ऐतिहासिकवादाचा वापर आपल्या अभ्यासामध्ये करून घेतला होता. त्यामुळे भारतीय समाजशास्त्रज्ञांमध्ये ते एक असे पहिले समाजशास्त्रज्ञ आहेत की, ज्यांनी समाजशास्त्रीय संशोधनामध्ये आधुनिक मार्क्सवादी दृष्टिकोनाचा उपयोग करून समाजशास्त्रीय अभ्यासाची मांडणी केली होती.

ए. आर. देसाई हे एक एकमेव असे भारतीय समाजशास्त्रज्ञ आहेत की, ज्यांनी भारतीय समाजाची रचना आणि तिच्या उभारणीची प्रक्रिया अभ्यासताना सातत्याने मार्क्सवादी दृष्टिकोन समोर ठेवून अभ्यास केलेला होता. ते एक मार्क्सवादी विचारवंत होते. भारतीय समाजरचनेचे विश्लेषण करताना त्यांनी धर्म, कर्मकांड किंवा धार्मिक उत्सवांच्या दृष्टिकोनातून अभ्यास न करता धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनातून आर्थिक क्षेत्रातील संकल्पनांचा अभ्यास केला. तसेच कुटुंब, खेडी आणि सामाजिक संस्थांच्या मधील आर्थिक क्रियांच्या अभ्यासावर आपले लक्ष केंद्रित केले. त्यांनी भारतीय परंपरेचा पाश्चात्त्य संस्कृतीच्या माध्यमातून अभ्यास करण्याचा प्रयत्न न करता भारतातील राष्ट्रवादाच्या विविध सामाजिक पैलूंचा शोध घेतला. तसेच भारतातील खेड्यांचा आर्थिक विकास अभ्यासताना, समुदाय विकास कार्यक्रमांचे विश्लेषण केले. भारतीय समाज व्यवस्था आणि शासन पध्दती यांच्यातील परस्पर संबंधाचे स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

शहरातील झोपडपट्ट्या आणि तेथील लोकसंख्यात्मक समस्या तसेच शेतमजूर चळवळींचा अभ्यास हा कार्ल मार्क्सच्या द्वंद्वात्मक ऐतिहासिक दृष्टिकोनातून केला आहे. त्यांच्या मते, भारतामध्ये घडून येत असलेल्या सामाजिक बदलाच्या प्रक्रियेने मुख्यत: भारतातील भांडवलशाहीकडे होणारी वाटचाल कारणीभूत आहे. कारण या व्यवस्थेशी संबंधित असणारे बडे भांडवलदार आणि ग्रामीण स्तरावर असणारे लहान भांडवलदार यांच्याशी शासनव्यवस्थेच्या विविध घटकांचा असणारा परस्पर संबंध वाढत गेल्याने, तसेच कारखान्यातील कामगार आणि खेड्यातील मजूर यांच्या वाढत्या अपेक्षांच्यामुळे, राजकीय सत्तेचा ताबा मिळवण्यातील स्पर्धा वाढलेली दिसते. त्यामुळे भांडवलदार आणि मजूर यांच्यातील संघर्ष कमी झाला नसून, सामाजिक चळवळीच्या रूपातून त्याने नवीन रूप धारण केले आहे. त्यामुळे भांडवलशाहीच्या माध्यमातून भारतामध्ये सुरू झालेल्या विकास प्रक्रियेच्या मुळाशी भारतातील असंतोषाची कारणे असलेली दिसतात, आणि त्यातूनच भारतामध्ये राष्ट्रीय चळवळीचा उगम झालेला दिसतो. अशाप्रकारे, ए. आर. देसाई यांच्या अभ्यास मांडणीमध्ये मार्क्सवादी विचारांचा प्रभाव दिसून येतो.

**❒ ए. आर. देसाई यांचे समाजशास्त्रीय ग्रंथ –**

भारतातील परिवर्तनाचा अभ्यास जाणून घेण्याच्या दृष्टिकोनातून मार्क्सवादी दृष्टिकोन एक नवीन स्वरूपाचा अभ्यास होता. डॉ. जी. एस. घुर्ये यांचे विद्यार्थी असलेले ए. आर. देसाई यांनी भारतीय समाज रचनेच्या विविध पैलूंचा अभ्यास करण्यासाठी म्हणून,

१. १९४८ मध्ये 'The Social Background of Indian Nationalism' चा अभ्यास केला.

२. १९६९ मध्ये 'Issues and Problems of Rural Sociology in India' चा अभ्यास केला.

३. १९७०, १९७२ मध्ये 'Slums and Urbanization in India' चा अभ्यास केला.

४. १९७९ मध्ये 'Peassant struggle in India', 'Rural India in Transition' आणि, 'India's Path of Development' या विषयांवर त्यांनी लिखाण केले.

१९६९ मध्ये त्यांचे ग्रामीण समाजशास्त्रावरील पुस्तक प्रकाशित झाले ते म्हणजे, "Rural Sociology in India". ज्यावेळी समाजशास्त्राच्या अभ्यासामध्ये सामाजिक चळवळींचा अभ्यास दुर्लक्षित केला जात होता, त्यावेळी ए. आर. देसाई यांनी १९४८ मध्ये "Indian National Movements" वर लिखाण केले.

### २.२.१ भारतातील खेड्यांच्या रचनेचा अभ्यास

भारतीय खेड्यांच्या अभ्यास पाहणीनुसार, ब्रिटिश-पूर्व कालखंडातील भारतीय खेडी स्वयंपूर्ण स्वरूपाची होती व खेड्यातील लोकसंख्येचा शेतमजूर हा एक मोठा हिस्सा होता. खेड्यांच्यामध्ये

शेतजमिनीवरील मालकीहक्क हा शेतीवर आधारित कुटुंबामध्ये पिढ्यान्पिढ्या वंश-परंपरागत पध्दतीने चालत आलेला होता. खेड्यांच्यामधील शेती व्यवसाय हा अत्यंत मागासलेल्या शेती तंत्रज्ञानावर आधारित होता, त्यामध्ये बैलगाडी, नांगर आणि मनुष्यबळाचा वापर होत होता.

ग्रामपंचायत ही ग्रामीण समुदायाचे प्रतिनिधीत्व करणारी अशी संस्था होती की, जी खेड्यातील शेती जमिनीवरील मालकी सिध्द करणारा घटक होता. खेड्यातील शेतमजूर मुख्यत: आपल्या खेड्यांच्या गरजा पूर्ण होण्याइतकेच शेती उत्पादन घेत असत. बाहेरच्या बाजारपेठांच्यासाठी आर्थिक नफा मिळवण्याच्या उद्देशातून शेती उत्पादनाचा विचार केला जात नव्हता. तसेच ब्रिटिशपूर्व ग्रामीण व्यवस्थेमध्ये जाती समुदाय, ग्रामपंचायत आणि संयुक्त कुटुंब पध्दतीमध्ये व्यक्तीला गौण स्थान होते. थोडक्यात, ब्रिटिश-पूर्व कालखंडात ग्रामीण समाज हा सरंजामदार संस्कृती आणि गूढवादी स्वरूपाचा होता. त्यामुळे ग्रामीण समुदाय हा आर्थिकदृष्ट्या कमी विकसित असलेला, अस्थिर आणि ताठर स्वरूपाचा होता. तसेच ग्रामीण समुदायात घडून येणारा बदल हा संख्यात्मक स्वरूपाचा होता तो गुणात्मक स्वरूपाचा नव्हता.

### ❐ ब्रिटिश-पूर्व ग्रामीण खेड्यातील बदलाची प्रक्रिया -

ब्रिटीश-पूर्व कालखंडात असणाऱ्या भारतीय खेड्यांच्या मधल्या सरंजामशाही अर्थव्यवस्थेकडून त्यांचे भांडवलशाही अर्थव्यवस्थेकडे होणाऱ्या परिवर्तनास प्रामुख्याने ब्रिटीश शासन व्यवस्था जबाबदार आहे, कारण त्यांनी भारतामध्ये आगमन केल्यानंतर या ठिकाणच्या व्यापार, उद्योग आणि आर्थिक स्तरावर ज्या कांही राजकीय आणि आर्थिक धोरणांच्यामध्ये बदल घडवण्याचा प्रयत्न केला त्यामध्ये त्यांना खेड्यांची अर्थव्यवस्था भांडवलशाहीच्या मार्गाने विकसित करावयाची होती.

अशाप्रकारे भारतीय खेड्यांच्यामध्ये, नव्याने सुरु झालेल्या आर्थिक सुधारणांचा परिणाम म्हणून त्यांची असणारी जुनी अर्थव्यवस्था मोडकळीस येवू लागली होती. शहरातील आधुनिक उद्योगधंद्याच्या उभारणीमुळे आणि शेतजमिनीमधल्या कायदेविषयक बदलांच्यामुळे, पारंपारिक शेती व्यवसाय आणि त्यावर आधारित असणाऱ्या भिन्न-भिन्न इतर व्यावसायिक कला-कुसर करणाऱ्या समुदायांच्यामधील संबंधाचे स्वरूप हळू-हळू संपुष्टात येवू लागले. खेड्यातील सामूहिक शेतीवरील मालकी करणाऱ्या ग्रामपंचायतीची जागा आता, खाजगी मालकी असणाऱ्या 'जमिनदार' वर्गाने घेतली. आधुनिक उद्योगधंद्याच्यामुळे खेड्यातील कारागीर वर्ग नष्ट होत चालला. नवीन स्वरूपाचे वर्ग उदयास येवू लागले. त्यामध्ये भांडवलदार, औद्योगिक कामगार, कुळे आणि व्यापारी यांचा समावेश होता. अशाप्रकारे ब्रिटीश शासनव्यवस्थेच्या आगमनामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवरच विपरीत परिणाम होऊन आर्थिक कणा मोडला होता तर त्याचे काही सामाजिक परिणामसुध्दा दिसून येतात. ब्रिटीशांचे नवीन शेत महसूलविषयक धोरण, शेतीबद्दलचा त्यांचा असणारा व्यापारी दृष्टिकोन आणि शेतजमिनीचे तुकडीकरण इत्यादीमुळे भारतीय खेड्यांच्यामध्ये बदलाची प्रक्रिया सुरू झाली होती.

## ❒ भारतीय समाजव्यवस्थेच्या व्यापक स्तरावरील बदलाची प्रक्रिया –

ब्रिटीश आगमनामुळे घडून आलेल्या बदलांचा व्यापक पातळीवर विचार केला तर असे दिसून येते की, खेड्यांच्यामध्ये एका बाजूला मोठ्या प्रमाणावर जमिनीवर मालकी असणारा जमिनदाराचा वर्ग हा दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या ग्रामीण लोकसंख्येची पिळवणूक करीत होता. भारतातील शेती व्यवसायावर आधारित समाजरचनेमध्ये नवीन प्रकारची वर्गव्यवस्था निर्माण होत होती, त्यामध्ये जमिनदार, मध्यम स्वरूपाची मालकी असणाऱ्या जमिनदारांचा वर्ग, कुळे, शेतमजूरांचा वर्ग, सावकार, व्यापारी आणि दलालांचा वर्ग यांचा समावेश होतो. याच धर्तीवर शहरांच्यामध्ये भांडवलशाहीतून निर्माण झालेला औद्योगिक कामगारांचा वर्ग, व्यापाऱ्यांचा वर्ग, डॉक्टर, वकील आणि इंजिनिअर्स यांचा व्यावसायिक वर्ग निर्माण होत होता.

ब्रिटीश आगमनानंतर ब्रिटीशांनी केवळ ग्रामीण शेती व्यवसायामध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला नाही तर, त्यांनी भारतामध्ये नव्याने स्थापन केलेली पोष्ट-ऑफीसची व्यवस्था, सर्वांच्यासाठीची एकच कायदे व्यवस्था, इंग्रजी शिक्षण पध्दती. आधुनिक उद्योग आणि इतर काही महत्त्वपूर्ण सुधारणा केल्यामुळे भारतीय समाजरचनेमध्ये गुणात्मक पातळीवर बदल घडून येवू लागले. त्यामुळे ब्रिटीश कालखंडात झालेल्या बदलांच्यामुळे जरी या ठिकाणच्या ग्रामीण लोकसंख्येची पिळवणूक झाली असली तरी, ब्रिटीश कालखंडात झालेल्या सुधारणांच्यामुळे अप्रत्यक्षरित्या भारतीय समाजामध्ये ऐक्य निर्माण झालेले दिसते. ब्रिटीशांनी त्यांच्या कालखंडात छपाई आणि रेल्वे मार्गाची जी सुधारणा केली त्यामुळे दूरपर्यंत विखुरलेला भारतीय समुदाय या सुधारणांच्यामुळे सामूहिकरित्या एकत्र येवू लागला आणि एकत्रित आलेला भारतीय समुदाय सामाजिक चळवळी, सामूहिक आंदोलन, राष्ट्रीय चळवळी आणि राष्ट्रीय भावना व्यक्त करू लागल्याने त्यांच्यामध्ये ऐक्य निर्माण होऊ लागले. त्यामुळे, ज्या उद्देशाने ब्रिटीशांनी भारतात पायाभूत सुधारणांची उभारणी केली, त्याच सुधारणा भारतीयांच्यामध्ये राष्ट्रवादाची भावना चेतावण्यास उपयुक्त ठरल्या आणि त्यातूनच राष्ट्रवादाची भावना वाढीस लागली.

**स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्न-१**

**❒ जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. भारतीय खेडी (ब्रिटीश-पूर्व) | अ) शेतीचा व्यापारी दृष्टिकोन. |
| २. ग्रामीण लोकसंख्येचा मोठा हिस्सा | ब) भारतीय राष्ट्रवादाला अप्रत्यक्ष मदत. |
| ३. ब्रिटीशांचे भांडवलशाही धोरण | क) ग्रामीण वर्ग रचनेतील वर्ग. |
| ४. ब्रिटीशांची रेल्वे सुधारणा | ड) स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था. |
| ५. शेतमजूर | इ) शेतमजूर. |

## २.२.२ भारतीय राष्ट्रवादाचा अभ्यास

ब्रिटीशांच्या आगमनानंतर भारतीयांच्यामध्ये जागृत होत असलेल्या राष्ट्रप्रेमाची भावना किंवा राष्ट्रवादाची भावना कशाप्रकारे निर्माण होत होती? याबद्दलचे स्पष्टीकरण देण्यासाठी ए. आर. देसाई यांनी मार्क्सवादी दृष्टिकोनांचा अवलंब केला होता.

❒ **कार्ल मार्क्सचा ऐतिहासिक द्वंद्वात्मक भौतिकवादाचा दृष्टिकोन –**

कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक-द्वंद्वात्मक भौतिकवादाचा थोडक्यात संदर्भ घेतला तर, त्यामध्ये कार्ल मार्क्स यांनी एकूण मानवी समाजाच्या आर्थिक प्रगतीचा इतिहास विचारात घेवून अगदी आरंभीच्या आदिवासी कालखंडातील अर्थ-व्यवस्थेपासून ते आजपर्यंतच्या आधुनिक भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या बदलांच्या पाठीमागच्या कारणांचा शोध घेताना, विविध अवस्थांच्यामधील आर्थिक उत्पादनाची साधने आणि त्या साधनांच्या उत्पादन प्रक्रियेचे स्वरूप, आणि उत्पादन साधनांच्या मालकीवरून निर्माण होणारी वर्गव्यवस्था ही त्या-त्या वेळी असणाऱ्या, आर्थिक घटकांचा परिणाम असतो, असे मत मार्क्स यांनी मांडले. त्यांच्यामते, विविध ऐतिहासिक कालखंडात निर्माण झालेल्या वर्गसंघर्षाचे स्वरूप एकसारखे नसून ते त्यावेळच्या आर्थिक वर्गातील विषमतेमधून निर्माण झालेले आहे. त्यामुळे विविध ऐतिहासिक कालखंडात मानव ज्या प्रकारच्या आर्थिक क्रिया आणि आर्थिक उत्पादन पद्धतीचा अवलंब करतो, त्याचाच परिणाम म्हणून वेगवेगळ्या स्वरूपाची वर्गरचना आणि वर्ग संघर्ष आकाराला येत असतो. त्यामुळे इतिहास म्हणजे अशा मानवी क्रिया होय की, ज्या इतिहास निर्माण करीत असतात.

**भारतीय समाजरचनेच्या अभ्यासासाठी ए. आर. देसाई यांनी केलेला मार्क्सवादी दृष्टिकोनाचा उपयोग:-**

ए. आर. देसाई यांनी ब्रिटीश-ऐतिहासिक कालखंडातील समाजरचनेचा अभ्यास करताना, भारतातील विविध सामाजिक चळवळींचे स्वरूप, ग्रामीण-शहरी समुदायांच्या मधल्या सामाजिक-आर्थिक जीवनातील विरोधाभास, जाती आणि वर्ग रचनेचे स्वरूप, सामाजिक गतिशीलता, भारतातील शिक्षण व्यवस्था व इतर कांही घटकांचे विश्लेषण करताना कार्ल मार्क्सच्या दृष्टिकोनाचा अवलंब करून अभ्यास केलेला दिसतो.

१९४८ मध्ये, ए. आर. देसाई यांनी लिहिलेल्या "The Social Background of Indian Nationalism" या ग्रंथामध्ये, मार्क्सवादी दृष्टिकोनातून भारतीय समाजरचनेचा केलेला अभ्यास हा समाजशास्त्र आणि इतिहास या दोन विषयांच्या मधल्या परस्पर संबंधाचा त्यांनी उपयोग केलेला होता. देसाई यांनी, भारतामध्ये ब्रिटीश कालखंडात ब्रिटीश शासन विरोधात जी एक राष्ट्रवादाची चळवळ सुरू झाली होती त्या राष्ट्रवादापाठीमागील कारणांचा आढावा घेताना, त्यांनी मुख्यत: त्यावेळच्या आर्थिक उत्पादन प्रणालीचे स्वरूप विचारात घेतले होते. त्यांनी राष्ट्रवादाचा संघर्षात्मक दृष्टिकोणातून केलेला अभ्यास महत्त्वपूर्ण स्वरूपाचा होता. ए. आर. देसाई यांच्या मते, ब्रिटीश साम्राज्यशाही व्यवस्थेमधून भारतामध्ये ज्या प्रकारची आर्थिक विषमतेची परिस्थिती निर्माण केली होती, त्याचाच परिणाम म्हणून भारतातील आर्थिक संबंधांच्यामध्ये कमालीचे बदल घडून येत होते. वास्तविक भारतातील शेती अर्थव्यवस्थेवर आधारित

असणाऱ्या पारंपारिक समाजव्यवस्थेमधील स्थिरता ही आर्थिक संबंधांवर टिकून होती, परंतु त्याच आर्थिक संबंधामध्ये, नंतरच्या काळात बदल घडून येवू लागले. उदा. ए. आर. देसाई यांनी भारतातील जाती-व्यवस्थेमधील बदलांचे कारण देत असताना, ब्रिटीशांच्या कालखंडात झालेल्या औद्योगिक, शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीचा परिणाम म्हणून जातीजातींच्या मधल्या ऐक्याला तडा गेला. व्यवसायानुसार जातीचे स्वतंत्र विभाग निर्माण झाले.

ए. आर. देसाई यांच्या भारतीय परंपरेच्या मांडणीसंदर्भात, 'परंपरेचा अभ्यास करणारे समाजशास्त्रज्ञ योगेंद्रसिंग यांनी आक्षेप घेत असताना, ए. आर. देसाई यांनी परंपरा ही संज्ञा केवळ आर्थिक दृष्टिकोनातून विचारात घेत असताना, जाती-धर्म आणि धार्मिक विधीसारख्या घटकांतून अभ्यासलेली नाही. त्यामुळे तात्त्विक पातळीवर मार्क्सवादी दृष्टिकोनातून भारतीय परंपरेचा अभ्यास बरोबर असला तरी अनुभवाच्या पातळीवर तो चुकीचा ठरतो.

ए. आर. देसाई यांचे बहुतांशी समाजशास्त्रीय लेखन, त्यांच्या समाजसेवेच्या कार्यात असणाऱ्या आवडीतून मांडले गेले आहे. भारतीय समाजव्यवस्थेमध्ये मूळ धरत असलेल्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा त्यांनी मार्क्सवादी दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे. त्यांनी ब्रिटीश साम्राज्यवादाच्या संदर्भात, भारतीय समाजामध्ये, अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्थांच्यामध्ये परिवर्तन घडवून आणणाऱ्या शक्तींचा कशा प्रकारे उदय होत आहे, याबद्दलचे मत मांडले. भारतामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळातसुध्दा ज्या स्वरूपाची शासनपध्दती उदयास येईल, तीसुध्दा भांडवलशाही अर्थव्यवस्थाच असेल असे मत त्यांनी व्यक्त केले होते. त्यांनी त्यांच्या एकूण अभ्यासमांडणीमध्ये भांडवलदारांचा वर्ग आणि शासनव्यवस्था यांच्यामधल्या परस्परसंबंधाचे स्वरूप स्पष्ट केले होते. त्यांच्या मते, प्रशासकीय पातळीवर काम करताना शासन व्यवस्था दोन प्रकारची भूमिका पार पाडत होती, ती म्हणजे, एका बाजूला भांडवलदार वर्गाचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी वंचित वर्गांच्या चळवळींचे दमन करण्याचे कार्य शासन करीत होते. १९८४ मध्ये "In India's Path of Development" या अभ्यास मांडणीमध्ये ए. आर. देसाई यांनी भारतामध्ये कोणत्या प्रकारची अर्थव्यवस्था स्वातंत्र्योत्तर कालखंडात अंमलात आणावी, याबद्दल कम्युनिस्ट पार्टीचा असणारा दृष्टिकोन आणि भांडवलदारांचे भारतीय समाजावरील वर्चस्व एका बाजूला चालू राहिले तर क्रांतीकारक स्वरूपाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. तर दुसऱ्या बाजूला भारतीय शासनव्यवस्था समाजवादी अर्थव्यवस्थेचा मार्ग निश्चित करू शकते.

अशाप्रकारे ए. आर. देसाई यांनी, ग्रामीण समाजशास्त्र, नागरीकरण, कामगार चळवळी, शेतमजूरांच्या चळवळी, आधुनिकीकरण, धर्म आणि घटनात्मक अधिकार अशा विविध पैलूंवर समाजशास्त्रीय लेखन केलेले आढळते. त्यामुळे समाजसुधारक, संशोधक आणि विद्यार्थी यांना ए. आर. देसाई यांचे लेखन अत्यंत उपयुक्त असा संदर्भ म्हणून उपयोगात आणता येतो.

## ❐ शेतमजूरांचा संघर्ष –

ए. आर. देसाई यांनी ब्रिटीश कालखंड आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शेतमजूरांच्या संघर्षाबद्दलची अत्यंत उपयुक्त आणि महत्त्वपूर्ण अशी माहिती त्यांनी त्यांच्या १९७९ आणि १९८६ मध्ये लिहिलेल्या अनुक्रमे "Peasent Struggles in India" आणि "Agrarian Struggles in India after Independence" या ग्रंथात आढळते. त्यांनी या ग्रंथातून शेतमजूरांचा संघर्ष ब्रिटीश आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडात कसा वेगळ्या स्वरूपाचा होता किंवा त्या दोन कालखंडातील संघर्षामध्ये असणारा फरक त्यांनी विचारात घेतला आहे. त्यांच्यामते, ब्रिटीश कालखंडामध्ये शेतमजूरांचा संघर्ष हा प्रामुख्याने नव्याने स्थापित होत असलेल्या उद्योजक वर्गामुळे आणि शेतमजूरांच्या मधल्या दारिद्र्यामुळे निर्माण होणारा होता, तर स्वातंत्र्योत्तर कालखंडातील संघर्ष हा शेतमजूरांना विकास प्रक्रियेमध्ये मिळणारा सहभाग किती दिला जात होता. त्यावरून संघर्ष निर्माण होत होता. भारतामध्ये द्रारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या वर्गामध्ये शेतमजूर आणि कामगार हे कनिष्ठ जाती समुदाय आणि आदिवासी समाजातील होते की, जे आपल्याला किमान चांगल्या राहणीमानाचा दर्जा मिळावा म्हणून संघर्ष करीत होते. ए. आर. देसाई यांच्या मते, अशा स्वरूपाचा बदल केवळ भांडवलदारी व्यवस्थेमध्ये व्यापक बदल घडवून आणल्यानंतरच होऊ शकतो. त्यांनी त्यांच्या एकूण अभ्यास मांडणीमध्ये शासनव्यवस्था ही केवळ पिळवणूक करणारी व्यवस्था म्हणूनच मत मांडलेले दिसते.

## ❐ समाज आणि शासन व्यवस्था –

१९७५ मध्ये लिहिलेल्या "State and Society in India" या अभ्यासामध्ये समाजशास्त्रामध्ये, आधुनिकीकरणाचा सिध्दांत मांडणाऱ्या अभ्यासकांवर त्यांनी टीका केलेली दिसते. त्यांच्या मते, भांडवलवादाच्या दिशेने जाणारी 'आधुनिकीकरण' ही प्रक्रिया, एक विचार सरणी म्हणून शासन व्यवस्थेमध्ये असणाऱ्या सत्ताधारी वर्गांनी भांडवलशाहीचा विकास व्हावा म्हणून स्वीकारलेली आहे. त्यांच्या मते, स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मार्क्सवादी अभ्यासकांनी भारतातील वर्गव्यवस्था, त्याची वैशिष्ट्ये, अर्थव्यवस्था आणि वर्गाची भूमिका, वर्गाची पिळवणूक इ. संबंधाचा रीतसर अभ्यास केला नसल्याबद्दलचे त्यांचे मत होते. त्यांच्या एकूण अभ्यास मांडणीमध्ये शासन व्यवस्था ही कशा प्रकारे चळवळींना दाबून टाकण्याची भूमिका एका बाजूला बजावत असताना दुसऱ्या बाजूला अशा शासन व्यवस्थेविरुध्दचा विरोध वाढत असतो हे मत त्यांनी मांडले. त्यांच्या एकूण मांडणीमध्ये शासन संस्थेकडून नागरी समुदायातील, अल्पसंख्यांक समुदाय, महिला आणि झोपडपट्ट्यांमधील रहिवाश्यांच्या घटनात्मक अधिकारांचे उल्लंघन कशाप्रकारे होते व प्रसार माध्यमांच्या स्वातंत्र्यावर देखील शासन व्यवस्था बंधने घालण्याचा प्रयत्न करते.

एकूणच ए. आर. देसाई यांच्या राष्ट्रवादासंबंधीच्या विचारांमध्ये किंवा ग्रामीण समाज रचनेच्या विश्लेषणात किंवा भारतीय समाजातील परिवर्तनासंबंधात असणारे आर्थिक अथवा सामाजिक धोरण ठरविण्यामध्ये समाज आणि शासन व्यवस्था यांच्यातील परस्पर संबंधाबद्दलची मांडणी करताना, त्यांनी सातत्याने, शासन आणि समाज यांच्यामधल्या विरोधात्मक संबंधाचा आणि भांडवलदार व शासन यांच्या

अंतर्गत हितसंबंधातून, भारतीय समाजाची ध्येय धोरणे आणि सामाजिक आर्थिक परिवर्तनाबद्दलचे निर्णय कशा प्रकारे निश्चित होत असतात, याविषयी मत स्पष्ट केलेले आढळते. ए. आर. देसाई यांच्या मते, समाजातील उच्चभ्रू वर्गाचे हितसंबंध जोपासण्यासाठीच्या उद्देशातून भारतीय समाजामध्ये आधुनिकीकरणाचा विचार केला जात होता. अर्थात कोणत्याही वर्ग रचनेअंतर्गत अशा स्वरूपाचा संघर्ष हा अंगभूत असतोच.

अशाप्रकारे ए. आर. देसाई यांनी भारतातील राष्ट्रवादाची मांडणी त्यांनी त्यांच्या मार्क्सवादी दृष्टिकोनातून केलेली आढळते.

**स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्न-२**

❑ **जोड्या जुळवा.**

| | **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|---|
| १. | ऐतिहासिक द्वंद्वात्मक भौतिकवाद | अ) आदिवासी आणि कनिष्ठ जाती |
| २. | The Social Background of Indian Nationalism | ब) भांडवलदारांच्या हितसंबंधाची जोपासना. |
| ३. | शेतमजूर आणि कामगार | क) कार्ल मार्क्स |
| ४. | भारतीय शासन व्यवस्था | ड) शासन व्यवस्थेमधल्या सत्ताधाऱ्यांची विचारसरणी |
| ५. | आधुनिकीकरण | इ) ए. आर. देसाई |

## २.२.३ मार्क्सवादी दृष्टिकोनातून भारतीय समाजाचे विश्लेषण

समाजशास्त्रीय अभ्यासासाठी म्हणून समाजशास्त्रामध्ये वेगवेगळ्या दृष्टिकोनांचा उपयोग करून समाज जीवनासंबंधीचे अध्ययन केले जाते. पाश्चात्त्य समाजशास्त्रज्ञांपैकी टालकॉट पारसन यांचा रचनात्मक-कार्यात्मक दृष्टिकोन, मानववंशशास्त्रातील कार्यात्मकवाद, उत्क्रांतीवादी दृष्टिकोन, इ. सारखे काही प्रमुख अभ्यास दृष्टिकोन महत्त्वाचे समजले जातात. परंतु या सर्व दृष्टिकोनांच्यावरती साम्राज्यवादी किंवा ब्रिटीश शासनव्यवस्थेचा प्रभाव असल्याने, ए. आर. देसाई यांनी या दृष्टिकोनांचा उपयोग न करता भारतीय समाजावरील आपले विचार मांडण्यास सुरुवात केली.

❑ **मार्क्सवादी दृष्टिकोनासंबंधी ए. आर. देसाई यांचे मत -**

अखिल भारतीय समाजशास्त्र परिषदेच्या १५व्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदाच्या आपल्या वक्तव्यामध्ये, भारतीय समाजशास्त्राबद्दलचे (Indian Sociology) आपले मत स्पष्ट केले. त्यांच्या मते, भारतीय समाजशास्त्राच्या अभ्यासामध्ये, ज्या समाजशास्त्रीय दृष्टिकोनांचा आधार घेवून भारतीय समाज जीवनाचे अध्ययन केले जाते, असे सर्व दृष्टिकोन बिगर-मार्क्सवादी (Non-Marxist) असून त्याचे

अभ्यासकांमध्ये वर्चस्व आढळून येते. मार्क्सवादी दृष्टिकोन हा पूर्वनिर्धारित, मूल्याआधारित आणि दूराग्राही म्हणून अभ्यासकांच्यामध्ये त्याचा वापर होत नाही.

परंतु, शासनाचे धोरण आणि शासकीय प्रभावाखाली असणाऱ्या अर्थव्यवस्था व शासनाच्या विविध घटकांच्यामध्ये, भारतातील वेगवेगळ्या वर्गसमुदायातील व्यक्तींची दयनीय अवस्था जाणून घेण्यासाठी मार्क्सवादी दृष्टिकोन उपयुक्त ठरतो. त्यामुळे ए. आर. देसाई यांनी भारतीय समाजशास्त्रांच्या अभ्यासकांना आव्हान करताना असे म्हटले आहे की, मार्क्सवादी दृष्टिकोनाचा अवलंब न करण्याबद्दलचा सामाजिक शास्त्रज्ञांच्यामध्ये जो एक गैरसमज झाला आहे. तो दूर करून त्यांनी, भारतीय समाज जीवनाच्या विविध अंगाचा, शासन व्यवस्थेमधील वर्गरचनेचा आणि त्यांनी निवडलेला विकास मार्गाचा अर्थ जाणून घेण्यासाठी, मार्क्सवादी दृष्टिकोनाच्या वापरासाठीचे पोषक वातावरण निर्माण करावे.

❒ **भारतीय समाजाच्या अभ्यासातील मार्क्सवादी दृष्टिकोनाची उपयुक्तता –**

देसाई यांच्या मते, मार्क्सवादी दृष्टिकोन, एखाद्या सामाजिक प्रश्नांचा अभ्यास करतेवेळी अभ्यासकास त्या सामाजिक प्रश्नांच्या अनुषंगाने निर्माण होणारे उपयुक्त असे प्रश्न विचारण्यास प्रवृत्त करतो, अभ्यासकास संशोधनाची योग्य दिशा मिळवून देतो, संशोधनासाठी उपयुक्त असणारी गृहीतके मांडण्यास उपयोगी ठरतो, नव-नवीन समाजशास्त्रीय संकल्पनाची निर्मिती करतो तसेच अभ्यासाच्या अनुषंगाने उपयुकत ठरणाऱ्या संशोधन साधनासंबंधीची माहिती देतो.

ए. आर. देसाई यांच्या मते, आजच्या आर्थिक उत्पादन पद्धतीमध्ये तांत्रिक आणि आर्थिक घटकांच्या आधारावर असणारी गुंतागुंतीची श्रमविभाजन पद्धत, तिचे स्वरूप आणि प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेशी संबंधित असणाऱ्या श्रमिक वर्गाचा उत्पादन प्रक्रियेतील भूमिका या सर्वांचा सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठी मार्क्सवादी दृष्टिकोन उपयुक्त ठरतो. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये, ज्या प्रकारची अर्थव्यवस्था स्थापित करण्यात आली, त्या अर्थव्यवस्थेमधील भांडवलदार आणि कामगार यांच्या संबंधाचा अर्थ, त्याचवेळी निश्चित झाला होता. त्यामुळे भारतीय समाजव्यवस्थेच्या अभ्यासामध्ये, शासन व्यवस्थेच्या माध्यमातून भांडवलदारी व्यवस्था भारतामध्ये प्रवेश करू लागल्यानंतर या ठिकाणच्या आर्थिक संबंधाचा, वर्गरचनेचा आणि शासनामार्फत विशिष्ट वर्गाचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी म्णून हाती घेतलेल्या विकास कार्यक्रमाचा अर्थ जाणून घेण्यासाठी मार्क्सवादी दृष्टिकोन उपयुक्त ठरतो.

देसाई यांच्या मते, कोणत्याही अर्थव्यवस्थेमधल्या आर्थिक उत्पादन प्रक्रियेशी संबंधित असणाऱ्या आर्थिक संबंधाचा अर्थ जाणून घेणे महत्त्वाचे असते. कारण आर्थिक उत्पादनाचा हेतू, त्याचे स्वरूप, त्याचे नियंत्रण करणारी व्यवस्था, त्याची दिशा आणि उद्दिष्ट्ये इत्यादी सर्व घटकांच्यामुळे आर्थिक संबंध प्रभावित होत असतात. तसेच आर्थिक उत्पादनातील हिस्सा कोणास आणि किती मिळावा? इत्यादी संबंधीचा देखील अभ्यास महत्त्वाचा ठरतो. देसाई यांच्या मते, मार्क्सवादी दृष्टिकोनाचा आधार घेवून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय समाजव्यवस्थेमध्ये ज्या प्रकारच्या आर्थिक उत्पादन संबंधाचा स्वीकार शासन व्यवस्थेच्यामार्फत स्वीकारून शासन संस्थेने कोणत्या प्रकारच्या धोरणांचा अवलंब विकासासाठी केला? तसेच कोणत्या

प्रकारची शासकीय नियमावली स्वीकारण्यात आली? त्यांचे स्वरूप समजून घेण्यासाठी मार्क्सवादी दृष्टिकोन उपयुक्त ठरतो.

थोडक्यात, मार्क्सवादी दृष्टिकोनामध्ये, भारतीय समाजव्यवस्थेच्या आर्थिक संरचनेच्या अभ्यासाला मध्यवर्ती स्थान दिले आहे. तसेच एका विशिष्ट ऐतिहासिक कालखंडाचा आधार घेवून, सर्व सामाजिक घटनांचा अर्थ जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. अशाप्रकारे, या दृष्टिकोनाच्या आधारे, भारतीय समाजाची एका विशिष्ट ऐतिहासिक कालखंडात, झालेली उत्क्रांती आणि त्या समाजाच्या सामाजिक-आर्थिक जडणघडणीचे बदलते स्वरूप अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे. अशा प्रकारे, ए. आर. देसाई यांनी, कार्ल मार्क्सच्या विचारांना समाजशास्त्रामध्ये स्थान देत असताना समाजशास्त्रामध्ये परिवर्तनासंबंधी अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना प्रोत्साहन देण्याचे काम करून त्यांनी मार्क्सवादी दृष्टिकोनातून त्यांच्या अभ्यासाचे क्षेत्र अधिक विस्तृत करावे असे सांगितले.

### ❒ भारतीय समाजरचना आंणि मार्क्सवादी दृष्टिकोन –

कार्ल मार्क्सच्या मते, कोणत्याही मानवी समाजव्यवस्थांच्या मधल्या उपव्यवस्थांचा अर्थ जाणून घेण्यासाठी, त्यांचे ऐतिहासिक पातळीवर स्वरूप जाणून घेणे आवश्यक असते. मार्क्सवादी विचारसरणी ज्यावेळी मानवी समाजरचनेचा अभ्यास करते त्यावेळी त्या समाजरचनेत बदल घडवून आणण्यासाठी असणाऱ्या विविध शक्ती कोणत्या आहेत, याचा शोध घेते. मानवाच्या अंगी ऐतिहासिक कालखंडापासून चालत आलेली सृजनशीलता किंवा उपजिवीकेसाठी मानव करत आलेल्या विविध आर्थिक क्रियांपासून ते आजच्या भांडवलशाहीसारख्या आर्थिक क्रियांचा अर्थ समजून घेण्यासाठी, मानवाच्या विविध कालखंडातील आर्थिक उत्पादनाचे स्वरूप अभ्यासणे महत्त्वाचे ठरते.

भारतीय समाजरचनेच्यासंदर्भात मार्क्सवादी दृष्टिकोन भारतातील अर्थव्यवस्थेमधील आर्थिक संबंधाच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करतो तसेच आर्थिक घटकांच्यामुळे भारतीय समाजामध्ये घडून येणाऱ्या सामाजिक परिवर्तनाच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करतो. मार्क्सवादी दृष्टिकोन प्रत्येक घटकांचे आर्थिक पातळीवर स्पष्टीकरण करण्याचा आग्रह करीत नाही, उलट प्रत्येक मानवी समाजाची असणारी वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक पार्श्वभूमी विचारात घेवून घटनांचे विश्लेषण करतो. ए. आर. देसाई यांच्या मते, भारतीय समाजाच्या संदर्भात या ठिकाणची जाती संस्था, धर्म, भाषा, आदिवासी समुदाय व इतर सांस्कृतिक समुदायांचा संदर्भदेखील या ठिकाणी महत्त्वाचा ठरतो. मार्क्सवादी दृष्टिकोन विस्तृत स्वरूपात असणाऱ्या भारतीय समाजातील, परिवर्तनाची दिशा जाणून घेत असताना, त्या समाजात असणाऱ्या पारंपारिक आर्थिक संबंधाच्यामध्ये, आर्थिक सुधारणांच्यामध्ये घडून येणाऱ्या बदलांचे स्वरूप विचारात घेतो. ए. आर. देसाई यांच्या मते, मार्क्सवादी दृष्टिकोनातून केवळ औद्योगिक संबंधाचा अभ्यास केवळ व्यवस्थापन आणि कामगार यांच्या संबंधाचा अर्थ जाणून घेण्यासाठी नसतो तर, भांडवलदार आणि कामगार, तसेच शासन आणि भांडवलदार यांच्यातील परस्परसंबंधाचे स्वरूपदेखील त्यामधून स्पष्ट होत असते. थोडक्यात, भांडवलशाहीच्या पार्श्वभूमीवर, त्या ठिकाणच्या ग्रामीण, शहरी, शैक्षणिक आणि इतर स्वरूपाचा विकास करताना शासनाची

भूमिका कशा स्वरूपाची राहते, तसेच शासनमान्य शिक्षणसंस्था, ज्या शासकीय अनुदानावर कार्य करतात अशा संस्थांच्या मधून विशिष्ट अभ्यास दृष्टिकोन अभ्यासावर बंदी आणतात. कारण अशा दृष्टिकोनांच्या माध्यमातून शासन संस्थेच्या वास्तवतेचा परिचय लोकांपर्यंत गेल्यानंतर त्यांच्या पक्षपाती धोरणाची ओळख होते. म्हणून काही संस्थाच्यामधून अशा अभ्यासक्रमाला विरोध होतो. भारतीय शासनव्यवस्था, मुख्यता भांडवलशाहीच्या पार्श्वभूमीवर उदयास आलेली व्यवस्था आहे की, ज्यामध्ये भांडवलदार वर्गाला अभय देण्यात आले असून त्यांच्यासाठीच विकास केला जातो. 'समाजवादी अर्थव्यवस्था' ही केवळ एक दिशाभूल करण्यासाठीची घोषणा आहे. परंतु प्रत्यक्षात भांडवलशाहीच्या पार्श्वभूमीवरच आर्थिक संस्था कार्य करीत आहेत.

ए. आर. देसाई यांच्या मते, भारतीय अर्थव्यवस्था भांडवलशाही स्वरूपाची असून भांडवलदार हा त्या ठिकाणचा उच्च वर्ग आहे. त्यामुळे भांडवलदार वर्गाची संस्कृती भारतीय समाजामध्ये अधिक प्रभावी आढळते. वास्तविक अर्थाने विचार करता, ज्यावेळी भांडवलशाही म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खऱ्या पाश्चात्त्य समाजातून, भांडवलशाहीच्या संकटामुळे, भांडवलशाहीचा प्रभाव कमी-कमी होत असतानाच्या कालखंडात, भारतीय समाजात मात्र भांडवलशाहीचा उदय होत असलेला दिसतो. पाश्चात्त्य समाज भांडवलशाहीमधल्या संकटामुळे धार्मिक गूढवादी विचारांकडे जाण्याच्या प्रयत्नात असताना दुसरीकडे भारतामध्ये मात्र भांडवलशाहीला प्रोत्साहन मिळत होते. ए. आर. देसाई यांच्या मते, भारतामध्ये ज्या आर्थिक वर्गाकडे भांडवलशाहीची सूत्रे होती, या वर्गाने धर्मनिरपेक्ष लोकशाहीच्या माध्यमातून, वैज्ञानिक आणि तांत्रिक शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्था सुरू केल्या, परंतु देसाई यांच्यामते, हा वर्ग अशा स्वरूपाचा होता की, जो भारतीय संस्कृतीमधल्या धार्मिक कल्पनांचा देखील प्रसार करण्याचा प्रयत्न करीत होता. थोडक्यात भारतीय संस्कृतीमधला भांडवलदार हा वर्चस्वधारी वर्ग असल्याकारणाने त्यांच्या विचारसरणीमधून भारतातील भांडवलशाहीची उभारणी झालेली दिसते. ए. आर. देसाई यांच्या मते, भारतीय समाजव्यवस्थेमधल्या ज्या आर्थिक वर्गाकडे भांडवलशाही व्यवस्थेची जबाबदारी होती, तो वर्ग एकाचवेळी गूढवादी आणि वास्तववादी पातळीवर आर्थिक संकटाचे विश्लेषण देण्याचा प्रयत्न करून जनमानसाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत होता व सर्वसामान्यांचे लक्ष विचलित करून आपली उद्दिष्टे साध्य करून घेण्याच्या प्रयत्नात होता किंवा भांडवलदारीत निर्माण होणाऱ्या संकटापासून लोकांचे लक्ष दुसरीकडे केंद्रित करण्याचा प्रयत्न करीत होता.

**स्वयं-अध्ययन प्रश्न-३**

❑ **जोड्या जुळवा.**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
| --- | --- |
| १. कार्यात्मक वाद | अ) भारतीय अर्थव्यवस्था. |
| २. भांडवलशाही अर्थव्यवस्था | ब) आदिवासी, जाती, धर्म भाषांचा अभ्यास. |

३. सामाजिकशास्त्रांवरील प्रभाव — क) भारतीय समाजशास्त्र.

४. मार्क्सवादी दृष्टिकोनाचे महत्त्व — ड) मानववंशशास्त्रातील दृष्टिकोन.

५. भारतीय समाजरचनेचा अभ्यास — इ) गैर-मार्क्सवादी दृष्टिकोन.

## २.३ सारांश

भारतीय समाजशास्त्र (Indian Sociology) किंवा भारतीय समाजजीवनाचे समाजशास्त्र (Sociology of Indian Society) ही एक समाजशास्त्राची अशी शाखा आहे की, ज्यामध्ये भारतीय समाज-जीवनासंबंधीच्या जाती-व्यवस्था, संस्कृती, ग्रामीण आणि आदिवासी जीवन इ. संकल्पनाचा अभ्यास करते. असा अभ्यास करण्यासाठी कोणत्या स्वरूपाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोन उपयोगात आणावा यासंबंधीची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी म्हणून बी. ए. भाग-३ (सेमी. ६) साठी भारतीय समाजशास्त्रीय विचारवंत हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. यामध्ये डॉ. जी. एस. घुर्ये, एम. एन. श्रीनिवास, डॉ. ए. आर. देसाई आणि डॉ. इरावती कर्वे या भारतीय समाजशास्त्रज्ञांच्या समाजशास्त्रीय मांडणीचा विचार केलेला आहे.

ए. आर. देसाई यांच्या, एकूण समाजशास्त्रीय विचार मांडणीमध्ये, मुख्यत: त्यांनी भारतातील ग्रामीण समाज जीवनाचा सखोल अभ्यास केलेला आहे. तसेच त्यांनी सर्वप्रथम कार्ल मार्क्स या पाश्चात्त्य समाजशास्त्रज्ञांच्या विचारसरणीचा अवलंब करून मार्क्सवादी दृष्टिकोनातून भारतातील ब्रिटिश कालखंडामध्ये असलेल्या ग्रामीण आर्थिक जीवनाचा त्यानी टीकात्मक अभ्यास केला आहे. त्यांच्या मते, ब्रिटिशांच्या कालखंडात खऱ्या अथाने भारतात भांडवलशाही अर्थव्यवस्था मूळ धरू लागली. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारताचे शासन भांडवलशाही अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देणारे होते. कारण, भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये ज्या प्रकारचे आर्थिक विकास कार्यक्रम आणि आर्थिक निर्णय घेतले जात होते. ते सर्व भारतातील विशिष्ट आर्थिक वर्गाचे हितसंबंध जोपासणारे होते. शिवाय भारतातील शिक्षण, संस्कृती, कला इ. सारख्या क्षेत्रामध्ये देखील भांडवलशाहीचा परिणाम दिसून येत होता. त्यामुळे ए. आर. देसाई यांनी त्यांच्या मार्क्सवादी दृष्टिकोनातून भारतातील आर्थिक संबंधाचे विश्लेषण केलेले आढळते.

ए. आर. देसाई यांनी त्यांच्या "Social Background of Indian Nationalism" या अभ्यासामध्ये भारतातील राष्ट्रवादाच्या चळवळीचा संबंध हा भांडवलशाही अर्थव्यवस्थेशी जोडताना ब्रिटिश कालखंडात ब्रिटीश शासन व्यवस्था व त्यांनी सुरू केलेले औद्योगिक धोरण, शिक्षण किंवा शेतीविषयक धोरण हे केवळ, भारतातील विशिष्ट आर्थिक वर्गाचे किंवा भांडवलदाराचे हितसंबंध जोपासणारे होते. त्यामुळे भारतातील ग्रामीण समाजामध्ये निर्माण झालेली आर्थिक विषमता आणि ग्रामीण भारतातील दारिद्र्य याला ब्रिटिशांचे भांडवलशाही धोरण हेच प्रमुख कारण कारणीभूत होते. शेवटी ए. आर. देसाई यांनी त्यांच्या अभ्यास मांडणीमध्ये समाजशास्त्रीय अभ्यासामध्ये मार्क्सवादी दृष्टिकोनाचे असणारे महत्त्व स्पष्ट केले आहे. त्यांच्यामते, मार्क्सवादी दृष्टिकोन हा एक वस्तुनिष्ठ स्वरूपाचा दृष्टिकोन असून त्याच्या साहाय्याने भारतीय समाजरचनेमधल्या शास्त्रीय ध्येयधोरणांचा, त्यांच्या आर्थिक विकास कार्यक्रमांचा आणि भारतातील वेगवेगळ्या आर्थिक स्तरावर असणाऱ्या समूहांच्या मधल्या आर्थिक संबंधाचा अभ्यास करता येतो.

## २.४ पारिभाषिक संज्ञा

- **मार्क्सवादी दृष्टिकोन :** कार्ल मार्क्सच्या विचारसरणीचा अवलंब करून सामाजिक घटनांचा अभ्यास करण्यासाठी वापरलेली अभ्यास पध्दती.
- **राष्ट्रवाद दृष्टिकोन** (Nationalism) **:** राष्ट्रवाद म्हणजे स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ब्रिटिश शासन व्यवस्थेविरोधात भारतीयांनी राष्ट्रप्रेमातून उभारलेला लढा किंवा चळवळ.
- **आर्थिक संबंध :** अर्थव्यवस्थेमुळे निर्माण होणाऱ्या समाजातील वेगवेगळ्या आर्थिक स्तरातील व्यक्तींच्यामधील संबंध.
- **बिगर–मार्क्सवादी :** ज्या अभ्यासकांनी मार्क्सवादी विचारसरणीचा वापर त्यांच्या समाजशास्त्रीय अभ्यास मांडणीमध्ये केलेला नाही.
- **ऐतिहासिक–द्वंद्वात्मक भौतिकवाद :** कार्ल मार्क्स याचा विविध कालखंडातील आर्थिक उत्पादन प्रणालीनुसार दोन आर्थिक वर्गातील विरोधाभास किंवा संघर्ष.

## २.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न १ ची उत्तरे**

१. = (ड) स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था.

२. = (इ) शेतमजूर.

३. = (अ) शेतीचा व्यापारी दृष्टिकोन.

४. = (ब) भारतीय राष्ट्रवादाला अप्रत्यक्ष मदत.

५. = (क) ग्रामीण वर्ग रचनेतील वर्ग.

**स्वयं अध्ययन प्रश्न २ ची उत्तरे**

१. = (क) कार्ल मार्क्स.

२. = (इ) ए. आर. देसाई.

३. = (अ) आदिवासी आणि कनिष्ठ जाती.

४. = (ब) भांडवलदारांच्या हितसंबंधाची जोपासना.

५. = (ड) शासन व्यवस्थेमधल्या सत्ताधाऱ्यांची विचारसरणी.

**स्वयं अध्ययन प्रश्न ३ ची उत्तरे**

१. = (ड) मानववंशशास्त्रातील दृष्टिकोन.

२. = (अ) भारतीय अर्थव्यवस्था.

३. = (इ) गैर-मार्क्सवादी दृष्टिकोन.

४. = (ब) आदिवासी, जाती, धर्म भाषांचा अभ्यास.

५. = (क) भारतीय समाजशास्त्र.

## २.६ सरावासाठी प्रश्न

❑ **खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. ए. आर. देसाई यांचा भारतीय खेड्यांच्या रचनेचा अभ्यास स्पष्ट करा.

२. ए. आर. देसाई यांचा भारतीय राष्ट्रवादाचा अभ्यास विशद करा.

३. ए. आर. देसाई यांचा 'मार्क्सवादी दृष्टिकोन' यावर भाष्य करा.

## २.७ संदर्भग्रंथ


१. **Nagala B. K.**, *"Indian Sociological thought"*, Rawat Publication, Jaipur, 2008.

२. **C. N. Shankarrao**, *"Sociology of Indian Society"*, S. Chand & Company Ltd., New Delhi, 2009.r r r


❑❑❑

# घटक – ३
# डॉ. एम. एन. श्रीनिवास
# (इ.स. १९१६–१९९९)

**घटक संरचना:**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ एम. एन. श्रीनिवास यांची संस्कृतीकरणाची संकल्पना

  ३.२.२ एम. एन. श्रीनिवास यांची पाश्चात्त्यीकरणाची संकल्पना

  ३.२.३ प्रभावी जाती

  ३.२.४ स्वयं–अध्ययन प्रश्न

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक संज्ञा

३.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर खालील गोष्टी साध्य होणार आहेत. त्याअनुषंगाने पुढील उद्दिष्ट्ये :–

१. एम. एन. श्रीनिवास यांची संस्कृतीकरणाची संकल्पना माहित करून घेणे.

२. एम. एन. श्रीनिवास यांची पाश्चात्त्यीकरणाची संकल्पना जाणून घेणे.

३. प्रभावी जातीची संकल्पना माहित करून घेणे.

## ३.१ प्रस्तावना

भारतातील समाजशास्त्राचा इतिहास आणि विकास जाणून घेत असताना लखनौ, दिल्ली आणि मुंबई विद्यापीठांशी संबंधित असलेल्या एम. एन. श्रीनिवास, जी. एस. घुर्ये, आर. के. मुखर्जी, डी. पी. मुखर्जी, टी. के. वूमन, इरावती कर्वे, ए. आर. देसाई इत्यादी काही भारतीय समाजशास्त्रज्ञांनी समाजशास्त्रीय अभ्यासामध्ये मोलाचे योगदान केले आहे याचा परिचय विद्यार्थ्यांना होणे गरजेचे आहे.

या अगोदरच्या पाश्चात्त्य विचारवंतांच्या अभ्यासामधून-युरोपियन समाजाशी संबंधित मांडलेले सिद्धांत, विचार आणि विविध संकल्पना या त्या वेळच्या सामाजिक परिस्थितीमधून पाश्चात्त्य विचारवंतांनी मांडल्या होत्या. थोडक्यात, समाजशास्त्रीय सिद्धांत, संकल्पना अथवा विचार विशिष्ट कालखंडातल्या सामाजिक परिस्थितीशी अनुरूप असतात. उदा. युरोपियन समाजव्यवस्थेमध्ये आधुनिक भांडवलशाहीचा उदय झाल्यामुळे त्या प्रकारची सामाजिक परिस्थिती उद्‌भवली. त्यासंबंधीचा विचार पाश्चात्त्य समाजशास्त्रज्ञांनी त्यांच्या विचारातून स्पष्ट केला. याच पध्दतीने भारतीय समाजव्यवस्थेच्या संदर्भात देखील ब्रिटिश राजवटीचा भारतीय समाजव्यवस्थेवरील परिणाम आणि त्यामधून निर्माण झालेली सामाजिक परिस्थिती व भारतीय समाजव्यवस्थेशी संबंधित इतर बाबींचा अभ्यास करण्याच्या उद्देशातून भारतीय समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक विचारांची मांडणी केलेली दिसून येते. याठिकाणी आपण भारतीय समाजशास्त्रज्ञ डॉ. एम. एन. श्रीनिवास यांच्या समाजशास्त्रीय विचारांचा आढावा घेणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

भारतीय समाजशास्त्राचे जनक म्हणून डॉ. गोविंद सदाशिव घुर्ये यांचा उल्लेख केला जातो. त्याचप्रमाणे भारतीय समाजशास्त्राचे आधारस्तंभ म्हणून डॉ. घुर्ये, डॉ. राधाकमल मुखर्जी व डॉ. डी. पी. मुखर्जी यांचा प्रामुख्याने उल्लेख केला जात असला तरी भारतीय समाजशास्त्राच्या विकासात सिंहाचा वाटा असणारे डॉ. एम. एन. श्रीनिवास यांचाही उल्लेख महत्त्वाचा ठरतो.

भारतीय समाजशास्त्राला आधुनिकीकरणाकडे नेण्यात त्यांनी भगीरथ प्रयत्न केले. भारतीय खेड्यांचा अभ्यास, प्रभावी जातींचा अभ्यास, जातीनिष्ठ समाजाचा अभ्यास, सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन, अस्पृश्यता निवारण, जातीव्यवस्थेचा राजकारणावरील प्रभाव, विवाह व कुटुंबव्यवस्था, लोकरूढी व लोकगीते, ग्रामीण समाजातील धर्म अशा अनेक विषयांवर त्यांनी संशोधन केले, ग्रंथ लिहिले व डॉ. घुर्ये यांचे शिष्य म्हणून आपले श्रेष्ठत्त्व समाजशास्त्र परिवारात दाखवून दिले.

या घटकामध्ये एम. एन. श्रीनिवास यांनी मांडलेल्या समाजशास्त्रीय संकल्पनांचा अभ्यास केला जाणार आहे. पहिल्या भागामध्ये एम. एन. श्रीनिवास यांचा जीवनइतिहास मांडला जाणार आहे. दुसऱ्या भागामध्ये त्यांनी जातीचा अभ्यास करून संस्कृतीकरण संकल्पनेचे केलेले विवेचन अभ्यासले जाणार आहे. तिसऱ्या भागामध्ये ब्रिटिश राजवटीमुळे भारतीय समाजावर परिणाम होवून सामाजिक परिवर्तनाची सुरवात कशी

झाली? यावर आधारित पाश्चात्तीकरणाची मांडलेली संकल्पना प्रस्तुत केली जाणार आहे. चौथ्या भागामध्ये त्यांनी अभ्यास करून प्रभावी जातीबद्दल जे विचार मांडले त्याचे विवेचन केले जाणार आहे.

### ❒ डॉ. एम. एन. श्रीनिवास यांचा जीवनइतिहास –

म्हैसूर नृसिंगाचार्य श्रीनिवास अर्थात एम. एन. श्रीनिवास यांचा जन्म ६ नोव्हेंबर १९१६ मध्ये झाला. प्रारंभिक शिक्षणानंतर ते मुंबई विद्यापीठात आले. म्हैसूर विद्यापीठातून त्यांनी १९३६ मध्ये सामाजिक तत्त्वज्ञान विषयातून (Social Philosophy) पदवी शिक्षण पूर्ण केले. १९३९ मध्ये समाजशास्त्र विषयातून एम. ए. चे शिक्षण पूर्ण केले. त्याचप्रमाणे १९४५ मध्ये मुंबई विद्यापीठातून समाजशास्त्र विषयातील पीएच.डी. ची पदवी संपादन केल्यानंतर पुढे ते परदेशात पुढच्या अभ्यासक्रमासाठी गेले. ज्यावेळी ते ऑक्सफर्ड, मँचेस्टर किंवा अमेरिकन विद्यापीठामध्ये शिक्षण घेत होते, त्यावेळी त्यांना संशोधनकार्यासाठी म्हणून अनेक प्रकारच्या शिष्यवृत्त्या मिळत होत्या.

डॉ. श्रीनिवास हे मुळात प्राच्यविद्येचे पुरस्कर्ते होते. जातीने ते ब्राम्हण होते. डॉ. घुर्ये यांच्या विचारांनी ते अधिक प्रभावी झाले होते. डॉ. श्रीनिवास भारतीय समाजशास्त्रज्ञांमध्ये अग्रणी समजले जातात. याचे मुख्य कारण म्हणजे श्रीनिवास यांनी ग्रामीण जनजीवनाला आपल्या अध्ययनाचे केंद्रस्थान मानले. दुसरे म्हणजे त्यांचे **रामपुरा गावाचे अध्ययन** हे भारतीय समाजशास्त्रातील मैलाचा दगड ठरते. त्यांची अध्ययनपध्दती ही प्रकार्यात्मक होती. महिनोन्महिने एकाच गावात वास्तव्य करून सहभागी निरीक्षणाद्वारे वस्तुनिष्ठ तथ्ये मिळविणे व रचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोणाच्या आधारे त्याचे विवेचन करणे, निष्कर्ष काढणे यामुळे भारतीय समाजशास्त्रात ते अग्रगण्य गणले गेले.

एम. एन. श्रीनिवास यांनी अनेक पदांवर काम केले होते. १९४८ ते १९५१ या कालखंडात त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठांमध्ये भारतीय समाजशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले होते. १९५२ ते १९५९ या कालावधीत महाराजा सयाजीराव विद्यापीठ, बडोदा या ठिकाणी समाजशास्त्र विषयाचे प्रोफेसर म्हणून काम पाहिले. १९५९ ते १९७२ या काळात दिल्ली विद्यापीठामध्ये प्रोफेसर म्हणून काम पाहिले. त्याचप्रमाणे १९७२ ते १९७३ या काळात त्यांनी 'Institute of Social and Economic Change' बेंगलोर या संस्थेचे सहसंचालक म्हणून जबाबदारी पार पाडली. अशाप्रकारे शिक्षण क्षेत्राशी निगडीत अनेक महत्त्वपूर्ण पदावर त्यांनी काम केले.

अनेक सन्मान व पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले होते. त्यामध्ये १९५५ मध्ये 'Rivers Memorial Medal' तर १९५८ मध्ये 'S. C. Roy Memorial Medal' १९७१ मध्ये सामाजिक शास्त्रासाठी असणारा दादाभाई नौरोजी मेमोरियल पुरस्कार (अर्थशास्त्र) मिळाले होते. तसेच १९६६ ते १९६९ या काळात ते 'Indian Sociological Society' चे अध्यक्ष होते. त्यांच्या एकूण समाजशास्त्रीय अभ्यासाचा केंद्रबिंदू दक्षिण भारतातल्या स्थानिक संस्कृतीचा अभ्यास होता. त्या ठिकाणच्या धर्मसंस्थेचा आणि सामाजिक परिवर्तनाचा देखील त्यांनी विशेष अभ्यास केला होता.

**श्रीनिवास यांचे समाजशास्त्रीय लेखन (Shrinivas's Sociological Writings)**

एम. एन. श्रीनिवास यांनी खालील समाजशास्त्रीय पुस्तकांचे लेखन केले आहे.

1. Marriage and Family in Mysore (1942).
2. Religion and Society among Coorgs of South India (1952).
3. India's village (1955)
4. Caste in Modern India (1962)
5. The Remembered Village (1966)
6. Dimensions of Social Change in India (1977)
7. The Dominant Caste and Other essages (1986)
8. Caste its Seventeenth Century (1996)
9. Indian Society Threw Personal Writtings (1996).
10. Social Change in Modern India.

अशाप्रकारे डॉ. श्रीनिवास यांनी जवळपास २५ च्या वर पुस्तकांचे लेखन केले. त्यांनी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमधून समाजशास्त्रीय संशोधनपर लेख लिहिले होते. एम. एन. श्रीनिवास यांच्यादृष्टीने कर्नाटकातील म्हैसूर हे ठिकाण सामाजिक मानववंशशास्त्राचे एक प्रमुख संशोधन केंद्र होते. एम. एन. श्रीनिवास यांनी प्रथम 'Social Organization of Mysore' या विषयावर लिहिलेल्या पीएच.डी. प्रबंधाचे प्रकाशन नंतर 'Marriage and Family in Mysore' या शिर्षकाखाली १९४२ साली झाले. याशिवाय त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात 'Religion and Society among Coorgs of South India' या विषयावरील प्रबंध सादर केला. त्याचेही नंतर त्याच शिर्षकाखाली पुस्तकरूपाने प्रकाशन झाले. या संशोधन कार्याच्या निमित्ताने रामपुरा खेड्याला एम. एन. श्रीनिवास यांनी वारंवार भेटी दिल्या होत्या. म्हैसूरच्या दक्षिण-पूर्व दिशेला २५ कि.मी. अंतरावर रामपुरा खेडे वसलेले आहे. त्यांचा रामपुरा गावाच्या संदर्भातील अनुभव बोलका आहे. त्या गावाशी सहभागी निरीक्षण तंत्राद्वारे ते इतके एकरूप झाले होते की, संशोधन कार्य झाल्यानंतर त्यांचा निरोपसमारंभ त्या लोकांनी अतिशय हृदयसोहळ्याने केला. डॉ. श्रीनिवास हे चालते-बोलते प्रत्यक्ष अनुभूती घेतलेले खऱ्या अर्थाने **कृतिशील भारतीय समाजशास्त्रज्ञ** होते. इ. स. १९९९ मध्ये या थोर भारतीय समाजशास्त्रज्ञाचे निधन झाले.

### ३.२.१ एम. एन. श्रीनिवास यांची संस्कृतीकरणाची संकल्पना

भारतीय समाजशास्त्रज्ञ डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी इ. स. १९५२ मध्ये दक्षिण भारतातील 'कुर्ग' लोकांच्या सामाजिक व धार्मिक जीवनाचे विश्लेषण करताना संस्कृतिककरण ही संकल्पना मांडली. त्यांच्या मते, समाजव्यवस्थेत असणाऱ्या हिंदू, आदिवासी अथवा इतर समूहातील ज्या कनिष्ठ जाती होत्या, त्यांचा

समाजातील दर्जा हलक्या प्रतीचा असल्याने त्या 'द्विजा जाती' किंवा वरिष्ठ जातींच्या रूढी-परंपरा, धार्मिक विधी, त्यांची विचारसरणी आणि त्यांच्या एकूणच जीवनपध्दतीचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करीत होत्या. सामान्यत: अशा प्रकारचे बदल हे मुख्यत: समाजात सद्यस्थितीत असणाऱ्या जातीश्रेणी रचनेमधील उच्च क्रमांकाचे स्थान मिळविण्याच्या प्रयत्नामुळे घडून येत असतात. परंतु प्रत्यक्षामध्ये ज्यावेळी वरिष्ठ जातींचा दर्जा मिळविण्याचा प्रयत्न कनिष्ठ जाती करतात, त्यावेळी दोन्ही समुदायांमध्ये मतभेद निर्माण झाल्याचे दिसून येते. उदा. म्हैसूरमध्ये लोहार या स्पृश्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जातीसमुदायाकडून हरिजन जातीसमुदायातील व्यक्ती शिजवलेले अन्न अथवा पाणी स्विकारत नसत. त्याचपध्दतीने ब्राम्हण जातीसमुदायातील व्यक्तींकडून धनगर अथवा शेती करणारे समुदाय शिजवलेले अन्न किंवा पाणी स्वीकारत नसत. त्याच पध्दतीने ब्राम्हण जाती समुदायातील व्यक्तींकडून धनगर अथवा शेती करणारे समुदाय शिजवलेले अन्न किंवा पाणी स्विकारत नसत. कुर्गसारख्या जंगली म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समुदायातील व्यक्ती स्वत:चा उल्लेख क्षेत्रीय किंवा आर्यवंशज म्हणून करीत असत. एम. एन. श्रीनिवास यांनी अशाप्रकारचे संदर्भ हे सामान्यत: म्हैसूर राज्यातील आणि देशातील इतर भागांत आलेल्या अनुभवाच्या आधारे दिले आहेत. कारण प्रत्येक ठिकाणी समाजातील जातीव्यवस्थेमधील श्रेणीरचना आणि सामाजिक दर्जाचे स्वरूप या दोन घटकांमधून अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होत होती.

### ❒ संस्कृतीकरणाची व्याख्या –

सुरुवातीस संस्कृतीकरणाच्या संदर्भात एम. एन. श्रीनिवास म्हणतात, ''ही गतिशीलतेची अशी प्रक्रिया आहे की, जिच्यामध्ये कनिष्ठ जाती शाकाहाराचा स्वीकार व मद्यपानाचा निषेध करून एक-दोन पिढ्यांनंतर जातीच्या अधिक्रमी रचनेत उच्च स्तरावर जाण्यासाठी गतिशील होतात.'' (The Process of mobility of lower castes by adopting vegetarianism and teetotalism to move in the caste hierarchy in a generation or two.)

याच व्याख्येत भर टाकून तिची पुर्नमांडणी करताना ते म्हणतात ''संस्कृतीकरण ही अशी प्रक्रिया आहे की, जिच्याद्वारे एखादी कनिष्ठ जात किंवा आदिम जमात किंवा एखादा अन्य समूह आपल्या प्रथा, कर्मकांड, विचारसरणी व जीवनपध्दती यामध्ये द्विज जातीच्या दिशेने बदल घडवून आणतो.'' (A process by which a low caste or a tribe or other group changes its customs, rituals, ideology and way of life in the direction of a high twice-born caste.) ही दुसरी व्याख्या अधिक विस्तृत स्वरूपात मांडण्यात आलेली आहे.

### ❒ संस्कृतीकरणाची वैशिष्ट्ये –

**१. ब्राम्हणीकरणापेक्षा व्यापक –**

श्रीनिवास यांच्या मते, संस्कृतीकरण ही ब्राम्हणीकरणापेक्षा व्यापक संज्ञा आहे. उदा. वैदिक काळात ब्राम्हण-मांसभक्षण व मद्यसेवन करीत. पशुबळी देत असत. उत्तरवैदिक काळात मात्र त्यांनी या गोष्टीचा त्याग केला. बौध्द व जैन धर्माच्या प्रभावामुळे त्यांनी तसे केले असावे. आज बहुसंख्य ब्राम्हण शाकाहारी

असून ते मद्यपानाचा निषेध करतात. फक्त काश्मिरी, बंगाली व सारस्वत ब्राम्हण मांसाहार करतात. 'ब्राम्हणीकरण' ही संज्ञा वापरावयाचे ठरविल्यास नेमक्या कोणत्या ब्राम्हणांचा संदर्भ आहे हे सांगावे लागेल. दुसरे असे की, 'ब्राम्हणीकरण' या संकल्पनेत कनिष्ठ जाती केवळ ब्राम्हणांचे अनुकरण करताना आढळतात. याउलट संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेत संदर्भ समूह नेहमी ब्राम्हण असतोच असे नाही. कारण देशाच्या कानाकोपऱ्यातील विविध कनिष्ठ जाती जाट, राजपूत, लिंगायत, मराण, नायर, गौंड यासारख्या ब्राम्हणेतर जातींचे अनुकरण करताना आढळतात. म्हणून ब्राम्हणीकरणापेक्षा संस्कृतीकरण ही संकल्पना व्यापक आहे.

**२. प्रभावी जातीचे अनुकरण –**

श्रीनिवास यांच्या मते, ''संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेत कनिष्ठ जाती प्रभावशाली अशा ब्राम्हण अगर ब्राम्हणेतर जातींचे अनुकरण करताना आढळतात. अशा जातीकडे मोठ्या प्रमाणात शेतजमीन असते. त्यामुळे तिला या भागात प्रतिष्ठा व वर्चस्व लाभलेले असते. पंजाबात जाट, राजस्थान–जोधपूर येथील ठाकूर, महाराष्ट्रात परात, गुजरातमध्ये राजपूत, आंध्रप्रदेशात कम्मा व रेड्डी, कर्नाटकात लिंगायत, केरळात नायर इ. जाती प्रभावशाली असून निम्न जातींचे त्यांच्या प्रथा, विश्वास, जीवनपध्दती व विचारसरणीचे त्या–त्या भागात अनुकरण केलेले आढळते. त्यामुळे संस्कृतीकरणाचा नमुना वेगवेगळ्या क्षेत्रात वेगवेगळा असल्याचे आढळते.

**३. धार्मिक विधींचे अनुकरण –**

अनेकदा काही कनिष्ठ जाती आर्थिक व राजकीयदृष्ट्या सक्षम व संपन्न असतात. पण धार्मिकदृष्ट्या त्यांना सामाजिक स्थान प्राप्त झालेले नसते. अशावेळी त्या जातींचे संपूर्णत: संस्कृतीकरण झाले असे म्हणता येणार नाही, असे श्रीनिवास यांचे मत आहे. तात्पर्य, उच्च सामाजिक स्थान मिळविण्यासाठी केवळ आर्थिक व राजकीयदृष्ट्या शक्तीशाली असून चालत नाही तर धार्मिकदृष्ट्याही शक्तीशाली असावे लागते. त्यामुळे संस्कृतीकरणात धार्मिक विधीच्या अनुकरणास महत्त्व प्राप्त झालेले दिसते.

**४. दुहेरी प्रक्रिया –**

संस्कृतीकरण ही एकमार्गी प्रक्रिया नसून दुहेरी प्रक्रिया आहे. संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेत कनिष्ठ जाती उच्च जातीकडून जशा काही गोष्टी स्वीकारतात तसेच त्यांना काही गोष्टी प्रदानही करतात. उदा. ब्राम्हण मंडळी भारतभर पूजनीय असणाऱ्या महान हिंदू देवतांच्याबरोबरच काही अशा स्थानिक देवतांचीही पूजा करताना आढळतात. ज्या जाती आरोग्य, संपत्ती व संतती यांच्या रक्षक मानल्या जातात. उदा. ब्राम्हण आपल्या ब्राम्हणेतर मित्रांच्याद्वारे देवतांना पशूबळी देतात. अर्थात संस्कृतीत देण्यापेक्षा घेण्याची प्रवृत्ती अधिक दिसून येते. असे असले तरी सांस्कृतिक हिंदुत्वाने स्थानिक व लोकतत्वे आत्मसात केलेली आहेत.

**५. अनिश्चित कालावधी –**

संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेत एखाद्या जातीला उच्च स्थान व दर्जा आपोआप प्राप्त होत नाही. त्यासाठी काही निश्चित काळ जावा लागतो किंवा उच्च स्थान प्राप्तीचा दावा निरंतर करावा लागतो. या दाव्याच्या

स्वीकृतीसाठी अनेकदा एक-दोन पिढ्यांचा काळ लागू शकतो. तर अनेकवेळा दीर्घकाळानंतरही एखाद्या जातीचा दावा स्वीकारला जात नाही. पण दुसऱ्या ठिकाणी मात्र स्वीकारला जातो.

**६. भारतीय संविधान –**

संस्कृतीकरण प्रक्रियेत 'मद्यनिषेध' अत्यावश्यक मानला जातो. भारतीय संविधानानेसुध्दा संसदीय लोकशाही स्वीकारून दारूबंदीचे तत्त्व स्वीकारले. आंध्र प्रदेशासारख्या घटक राज्यांनी तर पूर्णत: किंवा अंशत: खाऊपान दारूबंदी केली आहे. अशाप्रकारे श्रीनिवास यांच्या मतानुसार स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाने संस्कृतीकरणाचा प्रसार करण्यास काही अंशी परिणामकारक हातभार लावल्याचे चित्र आढळते.

**७. जनगणना –**

ब्रिटिश शासनाच्या जनगणना मोहिमेत अनेक कनिष्ठ जातींनी आपली 'उच्च जात' म्हणून नोंद करून ठेवलेली आहे. परिणामी, अप्रत्यक्षरित्या का होईना अनेक कनिष्ठ जातींना स्वत:चे स्थान उंचावण्याची संधी प्राप्त झाली आहे. या लेखी नोंदीमुळे कनिष्ठ जातींना 'उच्च जात' म्हणून कायदेशीररित्या मान्यता मिळण्यास मदत झाली.

**८. ब्रिटिश राजवट –**

ब्रिटिशांनी केलेल्या नागरीकरण, औद्योगिकरण, साक्षरतेचा प्रसार, दळणवळणाची प्रगत साधने आणि अत्याधुनिक पाश्चात्त्य तंत्रज्ञान इत्यादीचा प्रचार व प्रसार दुर्गभ भागापर्यंत केला. विशेषत: कनिष्ठ जातींना त्यांचा दर्जा उंचावता यावा म्हणून ब्रिटिशांनी काही विशेष सोयी-सवलती जाहीर करून त्यांच्यावरील पारंपारिक निर्बंध उठविले. परिणामी, कनिष्ठ जातींना खानपान, आचारविधी, पूजापध्दती आणि मूल्ये इत्यादीत सुयोग्य बदल घडवून आणणे सहजशक्य झाले. अशाप्रकारे संस्कृतिकरणाचा मार्ग सुकर होण्यास मदत झाली.

**९. तीर्थक्षेत्रे –**

तीर्थाच्या ठिकाणी अनेक जाती, धर्माचे व पंथांचे लोक दर्शनाला जातात व एकत्र निवास करतात. अशा ठिकाणी उच्चनीचता, श्रेष्ठ-कनिष्ठ, श्रीमंत-गरीब आणि सबल-दुर्बल असा कोणताच भेदभाव पाळला जात नाही. तीर्थक्षेत्राच्या निमित्ताने का होईना, कनिष्ठ जातीतील लोकांना तेथे राहून उच्च जातींच्या आचार-विचारांचे अनुकरण करण्याची संधी प्राप्त झाली. म्हणूनच श्रीनिवास यांच्या मते, भारतातील तीर्थक्षेत्रांचा संस्कृतीकरणातील सहभाग अधिक मोलाचा आहे.

**१०. कर्मकांडापासून वेद मंत्राची विभक्तता –**

श्रीनिवास यांच्या मते, ''धार्मिक विधी व कर्मकांडापासून वेदमंत्रांची फारकत करण्यात आल्यामुळे कनिष्ठ जातींना ब्राम्हणासारख्या उच्चवर्णीय जातीचे संस्कार, आचार, विचार, रूढी, प्रथा आत्मसात करणे सहजशक्य झाले आणि संस्कृतीकरण अधिक व्यवहार्य बनले.

### ११. आर्थिक स्थितीशी संबंध नाही –

आर्थिक उन्नती होणे ही संस्कृतीकरणाची आवश्यक अट नाही. तसेच आर्थिक उन्नतीबरोबर संस्कृतीकरण झालेच पाहिजे असेही नाही. यासंदर्भात श्रीनिवास यांनी म्हैसूरजवळील रामपूरा खेड्यातील अस्पृश्यांचे उदाहरण दिले आहे. ज्यांचे खूपच संस्कृतीकरण झाले आहे. तथापि, त्यांच्या आर्थिक स्थितीत मात्र कोणताही बदल झालेला नाही. काही श्रीमंत जातीचा धार्मिक दर्जा कनिष्ठ असू शकतो तर उच्च जातीचा सांपत्तिक दर्जा कनिष्ठ असू शकतो.

### १२. आदिम जमातीचे संस्कृतीकरण –

संस्कृतीकरणाची प्रक्रिया आदिम जमातीमध्येही दिसून येते. आदिम जमातींच्या शेजारी हिंदू धर्माचे लोक असल्यामुळे त्यांच्या सहवासाचा परिणाम होवून आदिम जमातींनी संस्कृतीकरणाद्वारे हिंदूंच्या श्रध्दा व कर्मकांडांचा स्वीकार केलेला आढळतो. उदा. हिमालयातील थारू व खासा या जमातींनी हिंदू धर्मातील कर्मसिध्दांत, पापपुण्य, संस्कार, कर्मकांड, सण, उत्सव व हिंदू आडनावे इत्यादींचा स्वीकार करून हिंदू धर्मात समाविष्ठ होण्याची प्रक्रिया गतिमान केलेली आहे.

संस्कृतीकरण कनिष्ठ जातीला उच्च स्थान प्राप्तीसाठी जरी सहाय्यक ठरले नाही तरी ते मांसभक्षण, मद्यपान, अशुध्द व्यवसाय इत्यादीचा त्याग करण्यास रोखू शकत नाही. अशाप्रकारे गतीशीलतेचा उद्देश सफल न होताही संस्कृतीकरणाची प्रक्रिया लोकप्रिय होऊ शकते.

### ❒ संस्कृतीकरणाचे परिणाम –

भारतातील बहुतांशी ग्रामीण जीवनामध्ये संस्कृतीकरणाचा प्रभाव आढळून येत होता. बिहार राज्यातील राजवार या अनुसूचित जातीसमुदायातील व्यक्ती स्वत:ला राजवंशीय क्षत्रिय म्हणून असल्याचा दावा करीत होत्या. तसेच कोयनस सारख्या मागासलेल्या जातीसमुदायातील व्यक्ती स्वत:चा उल्लेख 'खुश्वारा' क्षत्रीय म्हणून करीत असत. याच प्रांतामध्ये 'सिंग' आणि 'ठाकूर' अशा आडनाव असणाऱ्या कनिष्ठ जातींची आडनावे राजपूत उच्च जातीसमुदायाची असलेली आढळतात. कोयनस या जातीसमुदायातील व्यक्ती सुरवातीला गळ्यामध्ये पवित्र धागा बांधत नव्हत्या. त्यानंतरच्या काळात पवित्र धागा बांधू लागल्या. अशाप्रकारे केवळ हीच एक कनिष्ठ जात नव्हे तर अशाप्रकारच्या अनेक हिंदूंच्या कनिष्ठ–जाती ब्राम्हण उच्च जातीच्या जीवनपध्दतीचे अनुकरण करू लागल्या होत्या. त्याचप्रमाणे कनिष्ठ जातींनी त्यांचा अस्वच्छ समजला जाणारा व्यवसाय सोडून देऊन मांसाहारदेखील वर्ज केला होता. देवपूजा व स्नानसंध्या झाल्यानंतरच ते भोजन करीत असत. रामायण व हनुमानचालीसा ग्रंथांचे वाचन ते करू लागले. अनेकजण दाढी ठेवून कपाळावर गंध लावीत असत. स्वत:चा उल्लेख क्षत्रिय म्हणून करीत व दुसऱ्या बाजूला ब्राम्हण उच्च जातीप्रमाणे धार्मिक विधी परंपरादेखील पार पाडू लागले.

उर्ध्वगामी गतिशीलतेमध्ये कनिष्ठ जातीच्या संस्कृतीकरणाची प्रक्रिया गणली जाते. परंतु एखाद्या विशिष्ट समुदायाची गतिशीलता संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेशिवाय इतर अनेक सामाजिक कारणांमुळे देखील

घडून येऊ शकते. त्यामुळे संस्कृतीकरणातून घडून आलेल्या गतिशीलतेचा परिणाम म्हणून कनिष्ठ जातींमधल्या व्यक्तीचा समाजव्यवस्थेमधल्या स्थानामध्ये बदल घडून येत असतो. समाजामध्ये प्रचलित असणाऱ्या जातींच्या श्रेणीरचनेमध्ये विविध जातीसमुदाय परंपरांमध्ये वरच्या स्थानावरून खालच्या स्थानावर किंवा खालच्या स्थानावरून वरच्या स्थानावर वरखाली होऊ शकतात. परंतु त्याचा परिणाम म्हणून समाजव्यवस्था बदलत नसते.

### ३.२.२ एम. एन. श्रीनिवास यांची पाश्चात्त्यीकरणाची संकल्पना (Concept of Westernization)

एम. एन. श्रीनिवास यांनी भारतीय समाजव्यवस्थेमधील जातीव्यवस्थेची गतिशीलता आणि भारतीय समाजव्यवस्थेमधील परिवर्तनाचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी संस्कृतीकरण, पाश्चात्त्यीकरण, प्रभावी जातीची संकल्पना आणि धर्मनिरपेक्षतेसारख्या संकल्पनांचा उपयोग केला आहे. अशा संकल्पनांपैकी संस्कृतीकरणाची आणि पाश्चात्त्यीकरणाची संकल्पना या भारतीय समाजव्यवस्थेच्या संपूर्ण ऐतिहासिक कालखंडात घडून येणाऱ्या प्रक्रिया असून त्या आजअखेरपर्यंत चालू असलेल्या दिसून येतात.

❒ **पाश्चिमात्यीकरणाचा अर्थ –**

ब्रिटिशांनी आपल्यावर दीडशे वर्षे राज्य केले. या ब्रिटिश सत्तेमुळे भारतीय समाजात आमुलाग्र स्वरूपाचे परिवर्तन घडून आलेले दिसून येते. पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रभावामुळे आधुनिक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, नवीन संस्था व मूल्ये इत्यादींचा भारतीय समाजावर प्रभाव पडून परिवर्तनास चालना मिळाली. या प्रक्रियेस श्रीनिवास यांनी पाश्चिमात्यीकरण असे म्हटले आहे. श्रीनिवास म्हणतात– ''पाश्चिमात्यीकरण हा शब्द तांत्रिक, संस्थात्मक, वैचारिक व मूल्यात्मक स्तरांमध्ये झालेल्या परिवर्तनाचे द्योतक आहे. १५० वर्षांपेक्षा अधिक काळ टिकलेल्या ब्रिटिश राजवटीचा परिणाम म्हणून भारतीय समाज व संस्कृतीत घडून आलेल्या परिवर्तनासाठी मी ही संज्ञा वापरली आहे.'' (I have used the term Westernization to characterise the changes of over 150 years of British rule and term subsums changes occuring at different levels technology, institutions, ideology and values.)

वरील विवेचनाच्याआधारे असे म्हणता येते की, जेव्हा एखाद्या बिगर पाश्चात्त्य राष्ट्राचा अनेक वर्ष पाश्चात्त्य राष्ट्राशी सतत संपर्क येतो व त्या संपर्कामुळे बिगर पाश्चात्त्य राष्ट्रातील तंत्रज्ञान, संस्था, विचारधारा व मूल्ये यामध्ये जे परिवर्तन होते त्या परिवर्तनास उद्देशून पाश्चिमात्यीकरण असे म्हटले जाते.

❒ **पाश्चिमात्यीकरणाची वैशिष्ट्ये –**

**१. अनुकरणात्मक प्रक्रिया :** पाश्चिमात्यीकरण ही एक प्रकारची अनुकरणात्मक प्रक्रिया आहे. भारतीय समाजात घडून आलेले परिवर्तन हे पाश्चात्त्य संस्कृतीच्या अनुकरणाचे फलित आहे. यामधूनच परिवर्तनास गती मिळाली.

**२. नैतिक तटस्थता :** पाश्चिमात्यीकरण ही नैतिकदृष्ट्या तटस्थ संकल्पना आहे. त्यामुळे तिच्याद्वारे योग्य अयोग्य, चांगले वाईट, असा अर्थ अभिप्रेत केला जात नाही. पाश्चिमात्यीकरणात चांगले-वाईट अशा दोन्ही घटकांचा समावेश होतो.

**३. पाश्चात्य संस्कृतीहून वेगळी :** पाश्चिमात्त्यीकरण व पाश्चात्य संस्कृती यामध्ये फरक आहे. पाश्चात्य संस्कृतीतील सर्वच घटकतत्त्वे कही पाश्चात्त्य समाजात उदयास आलेली नाहीत. उदा. ख्रिश्चन धर्माचा उदय आशिया खंडात झालेला आहे. दशमान पध्दतीची निर्मिती भारतात झालेली आहे. चीनमध्ये बंदुकीची दारू, मुद्रणकला व कागद निर्मितीचा शोध लागला. या सर्व गोष्टी इतर देशांमध्ये उदयास आल्या असल्यातरी आज मात्र या सर्व पाश्चात्य संस्कृतीतील महत्त्वपूर्ण घटकतत्त्वे बनल्या आहेत. भारतातील पाश्चिमात्त्यीकरणावर ब्रिटिशांचा प्रभाव अधिक जाणवतो.

**४. नागरीकरणाहून वेगळी :** पाश्चिमात्त्यीकरण व नागरीकरण या दोन संकल्पना समान नसून त्या भिन्न आहेत. काही खेड्यांवर पाश्चिमात्त्यीकरणाचा प्रभाव पडलेला आहे. व्यापारी पिके घेणाऱ्या व लष्करी केंद्राशी संबंधित असणाऱ्या काही खेड्यांवर तर शहरापेक्षा अधिक पाश्चिमात्त्यीकरणाचा प्रभाव पडलेला आढळतो. म्हणून पाश्चिमात्त्यीकरण व नागरीकरण एकच आहे किंवा पाश्चिमात्त्यीकरण हा नागरिकरणाचा परिणाम आहे असे अनुमान करणे योग्य नाही.

**५. पाश्चिमात्त्यीकरण म्हणजे आधुनिकीकरण नव्हे :** आधुनिकीकरण ही संज्ञा पाश्चीमात्त्यीकरणापेक्षा अधिक व्यापक आहे. पाश्चात्त्यांच्या प्रभावामुळे सर्वच बिगर पाश्चात्य देश काही आधुनिक बनले नाहीत. काही देश जपान, रशिया, तुर्कस्तान यांच्या प्रभावामुळे आधुनिक बनले आहेत. दळणवळणाच्या साधनात झालेली वाढ, अधिक नागरिकत्व, शिक्षणप्रसार, दरडोई उत्पन्नात वाढ, प्रौढ मताधिकार इत्यादींचा समावेश आधुनिकीकरणात केला जातो. पाश्चात्त्यीकरणामुळे मुख्यत: सांस्कृतिक मूल्ये बदलतात. मानवतावादी मूल्यांचा इतर सर्व मूल्यांवर प्रभाव पडतो. त्यामुळे जात, धर्म, वर्ण, वंश, आर्थिक व सामाजिक दर्जा इत्यादी निरपेक्ष असे मानवी कल्याण महत्त्वाचे मानले जाते. त्यासाठी बिगर पाश्चात्य राष्ट्रात घडून येणाऱ्या परिवर्तनास पाश्चिमात्त्यीकरणाऐवजी आधुनिकीकरण म्हणणे अधिक योग्य ठरेल असे डॅनियल लर्नर यांना वाटते. लर्नर यांना पाश्चिमात्त्यीकरण हा शब्दप्रयोग योग्य वाटत नाही. कारण काही राष्ट्रे युरोपियन राष्ट्रांचे अनुकरण करण्याचे टाळतात. पण श्रीनिवास यांच्यामते, मध्यपूर्व राष्ट्रांमध्ये असणाऱ्या स्वसमूह-श्रेष्ठतेच्या भावनेमुळे ही राष्ट्रे असे अनुकरण टाळतात.

**६. व्यापक, गुंतागुंतीची प्रक्रिया :** पाश्चात्त्यीकरणाची संकल्पना गुंतागुंतीची तसेच व्यापक स्वरूपाची आहे. या प्रक्रियेमुळे नवीन तंत्रज्ञान, संस्था, विचारसरणी व मूल्ये भारतात आली. त्याबरोबरच पारंपारिक संस्था व मूल्यांचा ऱ्हास होऊ लागला. पाश्चात्त्यीकरणामुळे भारताचा राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात राष्ट्रवाद, सुधारणावाद, समुदायवाद, जातीयवाद, प्रादेशिकवाद व सामाजिक-राजकीय जागृती इत्यादींचा उदय झाला.

**७. स्वरूप व गती यामध्ये भिन्नता :** भारतात पाश्चिमात्त्यीकरणाचे स्वरूप व गती विविध क्षेत्रात व लोकसंख्येच्या विविध गटात भिन्न-भिन्न असल्याचे आढळते. पाश्चिमात्त्यीकरणाच्या प्रक्रियेत इतर ठिकाणच्या लोकांपेक्षा समुद्रकिनाऱ्यावरील लोक अधिक संपर्कात आले. कलकत्ता, मुंबई, चेन्नई या बंदरातील वा शहरातील लोकांनी व्यापार, शैक्षणिक सोयीसुविधा याकडे अधिक लक्ष पुरविले. ग्रामीण लोकांपेक्षा नागरी लोकांवर पाश्चीमात्त्यीकरणाचा अधिक प्रभाव पडला. हिंदू-मुस्लीम धर्मांच्या लोकांपेक्षा अल्पसंख्यांक धर्माचे लोक अधिक नागरी बनले. श्रीनिवास यांच्या मते, हिंदूच्या दृष्टीने त्यावेळी व काही प्रमाणात आजही पारंपारिक जातीनिष्ठ व्यवसाय व आधुनिक पाश्चात्त्य व्यवसाय ह्यामध्ये व्यापक प्रमाणावरील साहचर्य फार थोड्या प्रमाणात आढळते.

❒ **पाश्चिमात्त्यीकरणाचा भारतीय समाजावर पडलेला प्रभाव –**

पाश्चात्त्यीकरणाचा भारतीय संस्कृतीवर पडलेला प्रभाव पुढीलप्रमाणे दिसून येतो.

१. **नव्या संस्थांचा उदय :–**

इंग्रजांच्या आगमनाबरोबरच पाश्चीमात्त्यीकरणाचा प्रभाव भारतीय समाजावर पडावयास सुरुवात झाली. त्यांनी भारतात हळूहळू आधुनिक राज्यनिर्मितीचा पाया घातला. जमीन मोजणी, कर आकारणी, कवायत सैन्य, पोलिस यंत्रणा, न्यायदान यंत्रणा, शाळा, महाविद्यालये, बँका याबरोबरच दळणवळणाची साधने उदा. रेल्वे, बस, ट्रक, मोटार, मोटारसायकल, स्कूटर, सायकल, ऑईल इंजिन इत्यादीमुळे सामाजिक परिवर्तनास गती प्राप्त झाली. वीजेचे पंप, शिलाई यंत्र, विमान, पंखे या नि अशा अनेक आधुनिक साधनांची रेलचेल सुरू झाल्याने भारताच्या पारंपारिकतेला तडा गेला. विजेचा दिवा आला आणि तेलाचा दिवा मागे पडला. म्हणजे या सगळ्या तंत्र व यंत्रविषयक ज्ञानामुळे भारतीय समाजात परिवर्तनाने गती घेतली. पारंपारिक विचारसरणीला ओहोटी लागली नि एक नवीन संस्कृती उदयास आली की, ज्यामुळे संपूर्ण समाज ढवळून निघाला.

२. **नवीन मूल्यांची ओळख :–**

पाश्चिमात्त्यीकरणामुळे व्यक्तीस्वातंत्र्य, समता, बंधुत्व, मानवता, धर्मनिरपेक्ष या मूल्यांचा भारतीयांवर प्रभाव पडला. मानवतेच्या मूल्यांमुळे जात, धर्म, वर्ण, लिंग, आर्थिक स्तर इ. विचारात न घेता सर्व मानवांची सेवा करण्याचे तत्त्व भारतीय समाजापुढे ठेवले गेले. अस्पृश्यासह प्रत्येक जातीच्या स्त्री-पुरुषांस पात्रतेनुसार नोकरीत प्रवेश मिळविण्यास मोकळीक मिळाली. वरिष्ठ जातीच्या लोकांना कनिष्ठ जातीच्या हाताखाली काम करण्याचे दिवस सुरू झाले. आधुनिक शिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळे वैज्ञानिक ज्ञानाचा प्रसार सुरू झाला. प्रत्येक बाबीला वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून महत्त्व देण्यास सुरवात झाल्याने रक्ताची शुध्द-अशुध्दता जन्मजात श्रेष्ठ-कनिष्ठ इ. कल्पना कालबाह्य ठरल्या गेल्या. विशिष्ट जातीचेच लोक हुशार व गुणवंत असतात या विचाराला तडा बसला. परंपरागत रुढी आणि अंधविश्वास यांना फाटा देण्यात आला. जन्म आणि कौटुंबिक पार्श्वभूमीच्या आधारावर व्यक्तीला श्रेष्ठ-कनिष्ठ ठरविण्याची विचारधारा ठिसूळ बनली. श्रेष्ठ जातीने कनिष्ठ व अस्पृश्य जातीची पिळवणूक केवळ जन्मावरून करावी हे अन्यायकारक आहे

असे वाटू लागते. एकंदरीत पाश्चिमात्त्य विचारसरणीमुळे पारंपारिक भारतीय मनाला जबरदस्त हादरा बसल्याने येथे सामाजिक परिवतृन घडून येण्यास सुरवात झाली.

### ३. अनिष्ठ प्रथांचे उच्चाटन :-

पाश्चिमात्त्यीकरणामुळे भारतातील अनिष्ठ प्रथांच्या उच्चाटनास चालना मिळाली. पाश्चिमात्त्यीकरणाचा प्रभाव विवाह, कुटुंब, शिक्षण, जात, धर्म, आर्थिक आणि धार्मिक संस्थावर पडल्याने भारतीय समाजात परिवर्तन घडून आले. हिंदू धर्मात विवाहाला पवित्र संस्कार समजले गेले असल्याने व स्त्रीला दुय्यम भूमिका वठवावी लागत असल्याने जी एक पारंपारिकता ठरून गेलेली होती, तिला धक्का बसला. स्त्रीला स्वातंत्र्य बहाल करण्यात आले ते इंग्रजांच्या काळातच. सतीप्रथा, बालविवाह, कुमार-जरठ विवाह, विधवा पुनर्विवाह इत्यादीसंबंधीच्या पारंपारिक विचारसरणीला पाश्चिमात्त्यीकरणामुळे शह बसला. संयुक्त कुटुंब पध्दतीचा अस्त होवून विभक्त कुटुंब पद्धती प्रचारात आली. शिक्षण सर्व जाती धर्म व स्त्रियांना दिले जाऊ लागले. आंतरजातीय विवाहाला चालना मिळाली.

### ४. सामाजिक संस्थांत परिवर्तन :-

पाश्चिमात्त्यीकरणामुळे विविध संस्थांच्या रचनात्मक परिवर्तनास वाव मिळाला. कौटुंबिक जीवनात व्यक्तिवाद बळावू लागला. स्त्रियांचा दर्जा सुधारला. जातीव्यवस्थेतही परिवर्तन घडून आले. जात पंचायतीच्या अधिकाराचा ऱ्हास झाला. खाणेपिणे, सामाजिक संपर्क, उच्चनीच, शिवाशिव, स्पृश्यास्पृश्य, व्यवसाय इत्यादीबाबतचे जातीचे निर्बंध शिथील होऊ लागले. पारंपारिक धार्मिक शिक्षणाचे महत्त्व कमी होवून वैज्ञानिक, तांत्रिक शिक्षणास महत्त्व आले. स्त्री शुद्रांसह बहुजन समाजात शिक्षण प्रसार होऊ लागला. धार्मिक क्षेत्रातील अंधश्रध्दा, दैववादी वृत्ती, कर्मकांड, पुरोहित वर्गाचे वर्चस्व इत्यादीचा हळूहळू अस्वीकार होऊ लागला. राजकीय व प्रशासकीय क्षेत्रात कायद्याचे राज्य निर्माण झाले. सर्व भारतावर एकछत्री अंमल सुरू झाला. त्यातूनच राष्ट्रवादाच्या निर्मितीस चालना मिळाली. पारंपारिक ग्रामपंचायतीचा ऱ्हास झाला. घरगुती उद्योगधंदे बंद पडून औद्योगिकरणास चालना मिळाली. व्यावसायिक गतिशीलता वाढीस लागली. आर्थिक क्रियेत बदल घडून आले. यंत्राद्वारे आर्थिक क्रिया सुरू झाल्याने श्रमविभागणीच्या तत्त्वाला शह बसून सामाजिक संबंधाचा व्याप व्यापक बनला. भेदाभेदीचे जीवन संपुष्टात येण्याची प्रक्रिया सुरू झाली.

थोडक्यात, पाश्चिमात्त्य विचारसरणीचा सगळ्या सामाजिक संस्थांवर प्रभाव पडल्याने त्यांच्या रचनात्मक कार्यात बदल घडून आला. लोकांत नवीन राजकीय जागृती निर्माण झाली. त्यांच्यात लोकशाही राजकारण करण्याची क्षमता वाढू लागली. स्त्रीला व कनिष्ठ जातींना राजकारणाचे क्षेत्र खुले झाले. नवीन राजकीय संघटना उदयास आल्या. पाश्चिमांत्त्यीकरणाच्या प्रभावाखाली सगळा भारतीय समाज आल्याने येथील पारंपारिक सामाजिक मूल्यात परिवर्तन घडून आले.

**५. सांस्कृतिक क्षेत्रात परिवर्तन :–**

पाश्चिमात्त्यीकरणामुळे वेशभूषा, केशभूषा, खाण्यापिण्याच्या पध्दती, शिष्टाचार, राहणीमान, कला, साहित्य यामध्येदेखील मोठ्या प्रमाणात बदल घडून आले आहेत. सूटबूट, टाय, हॅट, केसांची स्टाईल यासारखे बदल पुरुषांमध्ये झालेले आहेत. तर स्त्रियांनी केस कापणे, मद्यपान करणे, क्लबमध्ये जाणे, नृत्ये करणे, वाढदिवस साजरा करणे, पार्ट्या करणे, ब्रेड, बटर, बिस्कीट यांचा खाण्यामध्ये सर्रास वापर करणे, डायनिंग टेबलचा वापर जेवणासाठी करणे, काटे चमचे वापरणे, सिगारेट ओढणे, आई–वडिलांना मम्मी–डॅडी म्हणणे, गुडमॉर्निंग, गुडनाईट, शेकहँड इत्यादी शिष्टाचारांचा वापर आवश्यक समजला जाऊ लागला आहे.

**६. सुधारणा चळवळीचा उदय :–**

पाश्चात्त्य शिक्षणाच्या प्रभावाने पाश्चात्त्य विचारांनी व मूल्यांनी भारावलेल्या बुद्धिजीवी नेत्यांची, सुधारकांची व कार्यकर्त्यांची एक पिढीच परिवर्तनासाठी सरसावली. त्यांनी अनेक बदलांचा जणू विडाच उचलला होता. धार्मिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात क्रांतीकारक सुधारणा करण्यासाठी त्यांनी अनेक चळवळी उभ्या केल्या. राजाराममोहनरॉय यांचा ब्राम्हो समाज, दयानंद सरस्वती यांचा आर्य समाज, रानडे–भांडारकर यांचा प्रार्थना समाज, महात्मा फुले यांचा सत्यशोधक समाज, महात्मा गांधींची हरिजन उध्दाराची चळवळ व डॉ. आंबेडकरांचा दलितोद्धाराचा सर्वंकश लढा या सर्व प्रमुख चळवळी या पाश्चिमात्त्यीकरणाचाच परिणाम आहेत. याशिवाय रविंद्रनाथ टागोर, विवेकानंद, पंडित नेहरू अशा असंख्य नेत्यांनाही पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाने प्रेरित केले होते व त्यांनीही आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

तथापि, स्वातंत्र्यानंतर इंग्रजांच्या प्रभावाखाली जीवन जगणारा भारतीय समाज नंतर अमेरिका आणि रशिया यांच्या विचारसरणीने प्रभावित झाला. या दोन राष्ट्रांच्या तांत्रिक शोधाचा प्रभाव भारतावर पडला. म्हणजे इंग्लंड, अमेरिका, रशिया या सगळ्याच प्रगत राष्ट्रांच्या विचारसरणीचा प्रभाव भारतीय समाजावर पडू लागल्याने झपाट्याने परिवर्तन होऊ लागले आहे.

## ३.२.३ प्रभावी जाती (Dominant Caste)

एम. एन. श्रीनिवास यांचे कोणतेही संशोधन वा लेखनकार्य असो त्यात त्यांनी धर्माला विशेषत: हिंदू धर्माला केंद्रीय स्थान दिले आहे. हा धर्म विविध धार्मिक विधीद्वारे बनतो व या धार्मिक विधी भारतीय संरचनेशी निगडीत असल्यामुळे भारतीय संरचनेचा अभ्यास म्हणजे जातीव्यवस्थेचा अभ्यास होय व ही संरचना गतिशील असते याच दृष्टिकोनातून श्रीनिवास यांनी अध्ययन केले आहे. यातीलच एक भाग म्हणजे त्यांची 'प्रभुत्त्वशाली जाती ही संकल्पना' होय.

डॉ. श्रीनिवास यांना ग्रामीण समाजाच्या अभ्यासाची विशेष रुची होती. यासंदर्भात त्यांनी 'रामपुरा' गावाचे अध्ययन केले. डॉ. श्रीनिवास यांच्यामते, प्रत्येक खेड्यात नेहमीच एकापेक्षा अधिक जाती गुण्यागोविंदाने नांदत असतात, असे असताना या विविध जातींवर कोणत्या जातीचे प्रभुत्व असते? गावाचा

कारभार कोण चालवितो? गावाच्या लोकांवर कोणाची हुकमत चालते? कोणाचे वर्चस्व आढळते? अशा अनेक प्रश्नांच्या उत्तरासाठी श्रीनिवास यांनी 'रामपुरा' गावातील जाती व कुर्ग जातीत या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करून प्रभुत्वशाली जातीसंदर्भात पुढील निष्कर्ष काढले.

१. प्रभुत्त्वशाली जातीजवळ निर्णायक शक्ती असल्यामुळे त्यांना जेथे वाटेल तेथे ते आपला फासा टाकू शकतात.

२. प्रभुत्त्वशाली जातींजवळ बहुमताची प्रबलता असते. म्हणजे ग्रामीण स्तरावर ते बहुसंख्यांक असतात.

३. या प्रभुत्त्वशाली जाती जशा शक्तिशाली, बहुसंख्यांक असतात, तशाच त्या आर्थिकदृष्ट्या संपन्न असतात. म्हणजेच या खेड्यातील या जातीत जमिनीची मालकी मोठ्या प्रमाणात असते. त्यांचे उत्पादन अधिक असते. अनेक लोक तेथे काम करतात.

४. प्रभुत्त्वशाली जातींमध्ये संघर्ष हा असतोच. त्यांना सदैव संघर्षाशी सामना करावा लागतो.

५. धर्मविधीमध्ये प्रभुत्त्वशाली जातींचे उच्च स्थान असते.

वरील निष्कर्षाखेरीज श्रीनिवास यांनी रामपुरा गावाचे वर्णन करताना हेही स्पष्ट केले आहे की, शेतीयोग्य जमीन येथे असल्यामुळे शेती करूनच येथील लोक आपला उदरनिर्वाह चालवतात. येथे अधिकांश लोक हे जमीनदार असून शेतकऱ्यांकडून ते शेती करवून घेतात. परंतु सध्या वर्तमान स्थितीत विभिन्न जातीचे लोक आपले गाव सोडून शहराकडे स्थलांतरित झाले आहेत. रामपुरा गावात याव्यतिरिक्त कुंभार, धोबी, न्हावी हे लोक कृषकांची सेवा करतात तर येथील लिंगायत लोक पुजारी असून ते ज्या मंदिरात पूजा करतात तेथे ब्राम्हण लोक जात नाहीत. एकंदरीत येथील गावांची अर्थव्यवस्था ही शेती, लघुउद्योग व कुटिरोद्योग, मत्स्यपालन या आर्थिक क्रियांशी संबंधित आहे. रामपुरामध्ये आर्थिकदृष्ट्या दोन वर्ग असून हे वर्ग आश्रित व आश्रयदाता या स्वरूपाचे आहेत. आश्रयदाता वर्ग प्रभावशाली जातीत समाविष्ठ होतो. या प्रभुत्त्वशाली जातींमध्ये कधीच अस्पृश्य जातींना संधी मिळाली नाही. या जाती आपल्या गावातील व कधी-कधी शेजारील गावातील प्रश्न सोडवतात. याशिवाय विवाह, हुंडा, पवित्र पशू-पक्ष्यांची हत्त्या यासारख्या गुन्ह्यांच्या संदर्भात शिक्षा करतात, दंड आकारतात.

भारतीय समाजव्यवस्थेचा विचार केला तर गावाचे नेतृत्व आजही उच्च जातीच्या अथवा प्रमुख जातीच्या हातात आहे. उच्च जातींना परंपरेने लाभलेली प्रतिष्ठा त्यांच्या राजकीय नेतृत्त्वाखाली महत्त्वाची ठरते. प्रभुत्त्व जातीच्या नेत्यामध्ये इतर निम्न जातींविषयी अभिवृत्तीमध्ये अंतर पाहावयास मिळते. ते संपूर्ण ग्राम समुदायाला आपल्या अधिपत्याखाली ठेवण्याचा प्रयत्न करतात. प्रमुख जातींच्या नेत्यामध्ये जातीनिष्ठा अधिक असते. ग्रामीण नेतृत्त्वामध्ये जातीचे स्थान आजही महत्त्वपूर्ण मानले जाते. देशाच्या विधानसभा, लोकसभा यासारख्या निवडणुकीमध्ये कोणत्या पक्षाला मतदान करायचे हे बहुतांश निर्णय प्रभुत्त्व जातीच्या नेत्यावरच अवलंबून असतात. आज परिस्थिती शीघ्र गतीने बदलत आहे. लोकांमध्ये राजकीय जागृती निर्माण होत आहे. तुलनेने मोठ्या तसेच शहरालगतच्या व रस्त्याच्या बाजूच्या गावामध्ये प्रमुख जातीच्या नेत्याचे

महत्त्व कमी झाले असले तरी दुर्गभ भागातील व आदिवासी क्षेत्रातील खेड्यांमध्ये आजही प्रमुख जातीचे महत्त्व टिकून असल्याचे दिसून येते.

भारतीय समाजव्यवस्था ही जातीनिष्ठ समाजव्यवस्था आहे. जाती व्यवस्थेतील श्रेणीबध्दता, निर्दिष्ट कार्याची कल्पना, कार्याकार्यातील भेदभाव, रोटी–बेटी व्यवहारातील निर्बंध, श्रेष्ठत्त्व–कनिष्ठत्वाच्या समजुती यांच्यावर आजही सतत भर दिला जातो. जातींना लाभलेले दबाव गटांचे स्वरूप ही गेल्या शंभर वर्षातील वाढ आहे. ब्रिटिश सत्तेखाली हे दबावगट सामाजिक व्यवस्थेमध्ये आपल्यावर लादलेले निर्बंध दूर करण्यासाठी प्रयत्नशील दिसतात. पेहराव, खानपान, स्पृश्यास्पृश्यता, मंदीर प्रवेश, सार्वजनिक जागांचा वापर याबद्दल झालेल्या निरनिराळ्या प्रांतातील चळवळी केवळ समतेच्या निदर्शक नाहीत. केवळ समतेच्या तत्त्वावरच या चळवळी उभ्या असत्या तर कनिष्ठ वर्णीय जातींनी उच्चवर्णीय जातींचे अनुकरण करण्याची गरज पडली नसती. परंतु तसा प्रयत्न सर्वत्र झालेला आहे. ही प्रक्रिया समतेची असती तर वरिष्ठ वर्णियांनी कनिष्ठ वर्णियांनी हे अनुकरण करू देण्यात एकतर सहकार्य केले असते. अथवा आपण कनिष्ठ वर्णियांच्या संस्कृतीत सहभागी होण्याची तयारी दर्शविली असती. याउलट वरिष्ठ वर्णियांनी सर्वत्र पेहरावा पासून ते लग्नसंबंधांपर्यंत सर्वच बाबतीत कनिष्ठ वर्णीयांच्या अशा प्रयत्नांना संघटित विरोध केलेला व वेळप्रसंगी दंगलीही घडवून आणलेल्या दिसतील. महाराष्ट्रातील अगदी अलीकडील दंगली मराठे व नवबौध्द यांच्यातील असून त्या–त्या प्रक्रियेचे स्वरूप दर्शविणाऱ्या आहेत. कनिष्ठ जातींमध्येही वरिष्ठ मानल्या गेलेल्या जाती आपल्यापेक्षा कनिष्ठ असणाऱ्या जातींना समतेचे तत्त्व लागू करण्यास तयार नसतात. वस्तुत: ही प्रक्रिया कनिष्ठ श्रेणीमधून संघटितपणे वरिष्ठ श्रेणीत शिरण्याची प्रक्रिया आहे. अस्पृश्यांनी मंदीरप्रवेशाचा आग्रह धरणे हे एकेकाळी या प्रक्रियेचे स्वरूप होते. ज्यामुळे अनेक ठिकाणी दंगली झाल्या. स्पृश्यांच्या विहिरीवर पाणी भरणे हे आजचे या प्रक्रियेचे स्वरूप आहे. ज्यामुळे आजही अनेक ठिकाणी स्पृश्यास्पृश्यवादाला उजाळा मिळतो. शूद्रांनी आपण क्षत्रिय आहोत असा दावा करणे व त्याकरिता संघटित चळवळ उभी करणे ही प्रक्रिया अनेक प्रांतापासून चालत आलेली आहे. वरच्या वर्गातील रीतीभातींचे व आचारांचे अनुकरण करणे या स्वरूपात ही प्रक्रिया घडून आलेली आहे.

महाराष्ट्रात **जमीनधारक जात** ही नेहमीच प्रभावी जात राहिली आहे. या जातीच्या हाती आर्थिक नाड्या असत. त्यामुळे जातपंचायतीवरही त्यांचाच वरचष्मा असे. ग्रामदैवताचे गावातील सार्वजनिक सण, उत्सव हेही याच जातीच्या पुढाकाराने साजरे होत. पंचायत प्रमुख याच जातीचा असायचा. केंद्रीय सत्तेपर्यंत पोहोच याच जातीच्या माणसांची असे. नेतृत्त्वही याच जातीतून निर्माण होई. गावचा सारा वसूल करून सरकार दरबारी भरण्याचे कामही जमीनधारक करत. शेतीवर इतर जातीची माणसे कुळ म्हणून किंवा मजूरीने काम करीत. रोजगार पुरविणारे म्हणून या जातीच्या लोकांचे इतर लोक मिंधे असत. जमीनधारकाचे उत्पन्नही मर्यादित होते. पण इतरांपेक्षा ते अधिक असे. श्रध्दा कायम राखण्यासाठी पुरोहित वर्गाचे म्हणजे ब्राम्हण जातीचे सहाय्य घ्यावे लागे. त्यामुळे ब्राम्हणांना बरोबरची प्रतिष्ठा देणे त्यांना भाग होते.

संस्कृतीकरणाची किंवा कनिष्ठ जातींनी वरिष्ठ जातींचे आचारविचारांच्याबाबतीत अनुकरण करण्याची प्रक्रिया मंदावण्याची अनेक कारणे आहेत. एकतर याला वरिष्ठ जातीकडून सतत विरोध झाला व यातून

अपेक्षित सामाजिक मान्यता किंवा प्रतिष्ठा प्राप्त झाली नाही. सांपत्तिकदृष्ट्या समृध्द असूनही सामाजिकदृष्ट्या हीन मानले जाणे यातून वैफल्याची भावना निर्माण झाली. या प्रक्रियेतून कनिष्ठ जातींचा प्रत्यक्ष फायदा असा झालाच नाही. जे लोक शिक्षणामुळे किंवा वरिष्ठ वर्णीयांच्या संपर्कात आल्यामुळे संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेत पुढे गेले व ते एकंदरीत आपल्या जातीबांधवांपासून वेगळे तर झालेच, पण वरिष्ठ वर्णियांमध्ये समाविष्ट होऊ शकले नाहीत. मंदीर प्रवेशासारख्या चळवळींतून ती यशस्वी झाल्यास आपण हीन नाही ही भावना निर्माण होण्यास मदत होऊ शकते. परंतु आर्थिक दास्य व दैन्य कायमच राहते, याचीही जाणीव होऊ लागली. आज सार्वजनिक विहिरीवर पाणी भरू दिल्याने अस्पृश्यांना होणारा त्रास काही अंशी कमी होईल, पण त्यामुळे त्यांना वरिष्ठ जातींच्या बरोबरीचे स्थान मिळते असे समजण्याचे कारण नाही.

डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी रामपुरा खेड्याचा अभ्यास करून प्रभावी जातीचे वर्चस्व स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात देखील वरिष्ठ जातींचे वर्चस्व राहिले असून सत्ता काबीज करण्यात ते यशस्वी झालेले दिसून येते.

*** स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ***

**❒ बहुपर्यायी प्रश्न.**

१. संस्कृतीकरणाची संकल्पना ............ यांनी मांडली.

(अ) डी. पी. मुखर्जी (ब) ए. आर. देसाई

(क) पंढरीनाथ प्रभू (ड) एम. एन. श्रीनिवास.

२. रामपुरा खेड्यातील .............. जमातीचा अभ्यास एम.एन. श्रीनिवास यांनी केला.

(अ) गोंड (ब) वारली (क) कातकरी (ड) कूर्ग.

३. 'Social Change in Modern India' या पुस्तकाचे ............... हे लेखक आहेत.

(अ) इरावती कर्वे (ब) जी. एस. घुर्ये

(क) एम.एन. श्रीनिवास (ढ) एम.एस. कपाडिया.

४. ................ या प्रक्रियेत हिंदूच्या मधील कनिष्ठ जाती, आदिवासी आणि इतर समूह आपले समाजातील स्थान वरच्या दिशेने वाढविण्याचा प्रयत्न करतात.

(अ) संस्कृतीकरण (ब) अधोगामी गतिशीलता

(क) खाजगीकरण (ड) पाश्चात्त्यीकरण.

५. भारतीय समाजामध्ये ब्रिटिश राजवटीमुळे ज्या सामाजिक बदलांची प्रक्रिया सुरू झाली, त्या प्रक्रियेला .................. असे म्हटले जाते.

(अ) आधुनिकीकरण (ब) जागतिकीकरण

(क) पाश्चात्त्यीकरण (ड) उदारीकरण.

६. ............ जाती आर्थिकदृष्ट्या संपन्न असतात.

(अ) अस्पृश्य जाती (ब) आदिम जाती-जमाती

(क) प्रभुत्त्वशाली जाती (ड) अविकसित जाती.

## ३.३ सारांश

भारतीय समाजशास्त्रज्ञांमध्ये ज्या समाजशास्त्रज्ञांनी मोलाचे योगदान केले, त्यामध्ये प्रामुख्याने डॉ. जी. एस. घुर्ये, एम. एन. श्रीनिवास, इरावती कर्वे, ए. आर. देसाई, आर. के. मुखर्जी अशा अनेक समाजशास्त्रीय विचारवंतांचा उल्लेख करता येईल.

दुसऱ्या घटकामध्ये यामधीलच एक समाजशास्त्रीय विचारवंत डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी सामजशास्त्रीय अभ्यासामध्ये भर टाकलेल्या संस्कृतीकरण, पाश्चात्यीकरण व प्रभावी जाती या संकल्पनांचा अभ्यास केलेला आहे. यातील दोन संकल्पनांच्या माध्यमातून भारतीय समाजव्यवस्थेमधल्या विविध सामाजिक स्तरावर सामाजिक परिवर्तन कशा प्रकारे घडून आले यासंबंधीची माहिती मिळते. 'संस्कृतीकरणाची प्रक्रिया' हा समाजशास्त्रीय अभ्यासातील एक महत्त्वाचा अभ्यास आहे. इतर अनेक भारतीय समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी संस्कृतीकरणाचा टीकात्मक अभ्यास करताना या प्रक्रियेमुळे भारतामध्ये कसा रचनात्मक बदल घडून आला नाही. याचा देखील अभ्यास करून ब्रिटिश राजवटीमध्ये भारतीय समाज रचनेमध्ये कोण-कोणत्या स्वरूपाचे बदल घडून आले, यासंबंधीची चर्चा केलेली दिसून येते.

पाश्चिमात्यीकरणाची संकल्पना मांडत असताना भारतीय समाजावर ब्रिटिश राजवटीचा परिणाम होऊन सामाजिक परिवर्तनास गती कशी मिळाली हे त्यांनी स्पष्ट केले आहे. प्रामुख्याने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय समाजातील पाश्चात्त्यीकरण प्रक्रियेला अधिक गती प्राप्त झाल्याचे दिसून येते. या पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रभावावर आधारित पाश्चात्त्यीकरणाची संकल्पना त्यांनी मांडलेली दिसून येते.

प्रभावी जाती ही संकल्पना मांडत असताना डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी रामपुरा गावाचे अध्ययन करून काही निष्कर्ष मांडले आहेत. त्यांच्यामते, प्रत्येक खेड्यात एकापेक्षा अनेक जातीचे लोक रहात असतात. तरीदेखील त्यामधील काही जातींचे इतरांवर वर्चस्व असते. गावाचा कारभार, नेतृत्त्व त्यांच्याकडे असते. गावाच्या लोकांवर त्यांची हुकूमत चालते. असे वर्चस्व, प्रभुत्त्व असणाऱ्या प्रभावी जातींच्या संदर्भात त्यांनी रामपुरा खेड्यातील जाती व कुर्ग जाती यांचा अभ्यास करून आपले विचार मांडले आहते.

या घटकामध्ये भारतीय समाजशास्त्रज्ञ एम. एन. श्रीनिवास यांच्या समाजशास्त्रीय विचारांची ओळख करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## ३.४ पारिभाषिक संज्ञा

- **संस्कृतीकरण :** सामाजिक परिवर्तनाची अशी प्रक्रिया की, ज्यामध्ये हिंदूच्यामधील कनिष्ठ जाती, आदिवासी किंवा इतर समूहातील व्यक्ती, समाजातील आपले स्थान उंचावण्याच्या दिशेने करत असणाऱ्या कृती.
- **पाश्चात्त्यीकरण :** ब्रिटिश राजवटीमध्ये भारतीय समाजरचनेमध्ये घडून आलेल्या सामाजिक बदलांची प्रक्रिया.
- **प्रभावी जाती :** ग्रामीण समाजात अनेक जातीचे लोक रहात असतात. परंतु त्यामधील काही जाती इतरांवर वर्चस्व गाजवत असतात, त्यांना प्रभावी जाती म्हणतात.

## ३.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. डॉ. एम. एन. श्रीनिवास.

२. कूर्ग.

३. डॉ. एम. एन. श्रीनिवास.

४. संस्कृतीकरण.

५. पाश्चात्त्यीकरण.

६. प्रभुत्त्वशाली जाती.

## ३.६ सरावासाठी प्रश्न

**(अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. एम. एन. श्रीनिवास यांची संस्कृतीकरणाची संकल्पना विशद करा.

२. एम. एन. श्रीनिवास यांची पाश्चात्त्यीकरणाची संकल्पना स्पष्ट करा.

**(ब) टिपा लिहा.**

१. संस्कृतीकरणाची वैशिष्ट्ये.

२. पाश्चिमात्त्यीकरणाची वैशिष्ट्ये.

३. संस्कृतीकरणाचे परिणाम.

४. पाश्चात्त्यीकरणाचा भारतीय समाजावर पडलेला प्रभाव.

५. प्रभावी जाती.

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. **बेहेरे सुमन**, *'भारतीय सामाजिक संस्था'*, विद्या प्रकाशन, नागपूर, २००५.

२. **डोईफोडे ज्योती**, *'समाजशास्त्रीय विचारप्रवाह'*, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१२.

३. **कऱ्हाडे बी. एम.**, *'ग्रामीण व नागरी समाजशास्त्र'*, पिंपळापुरे ॲण्डकंपनी पब्लिशर्स, नागपूर, २००५.

४. **खंडागळे चंद्रकांत**, *'भारतीय समाजरचना आणि परिवर्तन'*, सौ.मायादेवी खंडागळे, २००६.

५. **खंडागळे चंद्रकांत**, *'भारतीय समाज'*, सौ. मायादेवी खंडागळे, १९९८.

६. **काचोळे दा. धो.**, *'उपोद्घातरुप समाजशास्त्र'*, कैलाश पब्लिकेशन्स, गोकुळवाडी, औरंगाबाद, २००८.

७. **मोहिते एस. एल., साळुंखे पी. एस.**, *'समाजशास्त्रीय विचारवंत'*, फडके प्रकाशन, २०१२.

८. **मुळे कमल**, *'भारतीय खेडी व जाती'*, विचार प्रकाशन, औरंगाबाद, १९७६.

९. **Patel Sujata**, *"On Srinivas Sociology"*, Sociological Bulletin, (Juornal of the Indian Sociological Society), Vol. 59, No. 1, Jan, April, 2005.


❑❑❑

# घटक – ४
# इरावती कर्वे
## (इ.स. १९०५–१९७०)

**घटक संरचनाः**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

    ४.२.० इरावती कर्वे यांचा व्यक्ती परिचय व त्यांचे वाङ्मयीन योगदान

    ४.२.१ आप्तसंबंधांची संकल्पना

    ४.२.२ हिंदू समाज : एक अन्वयार्थ

    ४.२.३ महाराष्ट्राविषयीचा दृष्टिकोन

    ४.२.४ स्वयं–अध्ययनासाठीचे प्रश्न

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक संज्ञा

४.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी प्रश्न

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## ४.० उद्दिष्ट्ये (Objectives)

१. इरावती कर्वे यांच्या जीवनविषयक चरित्राचा आढावा घेणे.

२. इरावती कर्वे यांच्या वाङ्मयीन कार्याची माहिती घेणे.

३. इरावती कर्वे यांची आप्तसंबंधाची संकल्पना लक्षात घेणे.

४. हिंदू संस्कृतीचा अन्वयार्थ समजावून घेणे.

५. महाराष्ट्राविषयी इरावती कर्वे यांचा दृष्टिकोन लक्षात घेणे.

## ४.१ प्रास्ताविक

भारतातील समाजशास्त्र व मानववंशशास्त्राच्या विकासात डॉ. इरावती कर्वे यांचे योगदान मोलाचे आहे. भारतीय समाजशास्त्राच्या उद्गात्यापैकी त्या एक आहेत. एक प्राच्यविद्या विशारद म्हणून त्यांच्या योगदानाचा विचार केला जातो. जात, कुटुंब, आप्तसंबंध, खेडे, हिंदू समाज आणि संस्कृती, स्त्रीजीवन, समाज जीवन अशा विविध घटकांचा भारतीय समाज व्यवस्थेच्या संदर्भात त्यांनी विचार मांडला आहे. केवळ समाजशास्त्राच्या क्षेत्रातच नव्हे तर मराठी साहित्याच्या क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. 'युगाना' सारखी कादंबरी लिहून साहित्याचे समाजशास्त्रही त्यांनी आकाराला आणले आहे.

## ४.२ विषय विवेचन

❒ **इरावती कर्वे यांचा व्यक्ती परिचय**

आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या **पहिल्या भारतीय महिला मानववंशशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ,** आदर्श प्राध्यापिका, उत्तम प्रशासक, व्यासंगी, विद्वान व संशोधिका, आदर्श पत्नी व माता, मराठी साहित्यातील मानबिंदू अशा अनेक विशेषणांनी मान्यता पावलेल्या डॉ. इरावती कर्वे यांचा जन्म १५ डिसेंबर १९०५ रोजी ब्रह्मदेशातील मिंज्यान या ठिकाणी एका मध्यमवर्गीय महाराष्ट्रीयन ब्राम्हण कुटुंबात झाला. तेथे त्यांचे वडील अभियंता म्हणून कार्यरत होते. त्याठिकाणी असणाऱ्या इरावती नावाच्या नदीची आठवण म्हणून आईवडिलांनी त्यांचे नांव 'इरावती' असे ठेवले. इरावती शब्दाचा अर्थ सतत वाहणारा, तेजस्वी असाही आहे. साहजिकच हे नाव त्यांनी सार्थ केले. एक अखंड वाहणारा ज्ञानाचा झरा आणि तेजस्वी विचारवंत म्हणून इरावती कर्वे दीर्घकाळ सर्वांच्या स्मरणात आहेत.

त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण ब्रम्हदेशात झाले. बी. ए. (तत्त्वज्ञान) पर्यंतचे शिक्षण पुण्यात रँग्लर परांजपे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. एम.ए. पदवी त्यांनी डॉ. जी. एस. घुर्ये यांच्या मार्गदर्शनाखाली संपादन केली, ती १९२८ साली. त्यासाठी त्यांनी 'चित्पावन कोकणस्थ ब्राम्हण' हा लघुशोध प्रबंध सादर केला होता. घुर्ये यांच्याच प्रेरणेने त्यांना उच्च शिक्षणासाठी जर्मनीला पाठविण्यात आले. बर्लीन विद्यापीठात त्यांनी 'माणसाच्या डोक्याच्या कवटीची असमप्रमाणता' (Unequal Size of Human Skull) या विषयावर शोध प्रबंध सादर करून मानवशास्त्रात १९३० साली पीएच.डी. म्हणजे डॉक्टरेट पदवी संपादन केली.

इरावती कर्वे यांचा अनेक भाषांचा गाढा अभ्यास होता. संस्कृत, मराठी, पाली, अर्धमागधी, हिंदी, इंग्रजी व जर्मन भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते.

१९२८ ते १९३९ या कालखंडात इरावतीबाईंची विद्यार्थी व संशोधक म्हणून जडणघडण होत गेली. त्यावेळी भारतात संशोधक विद्यार्थी निर्माण होणे ही एक कठीण गोष्ट होती. संशोधक होण्यासाठी आवश्यक अशी पार्श्वभूमी तेव्हा आपल्याकडे अभावानेच होती. त्यातून संधी लाभणे व ती मिळविण्याचा प्रयत्न करणे ही दुर्मिळच गोष्ट होती. अशी संधी ज्याना लाभली त्यापैकी काहीनी भारतीय समाज जीवनाच्या या ना त्या

क्षेत्रात उल्लेखनीय असे कार्य केले. इरावती कर्वे या अशा व्यक्तिमत्वापैकीच एक दुर्मिळ व्यक्तिमत्त्व म्हटले पाहिजे.

इरावती कर्वे समाजशास्त्राच्या अभ्यासिका, संशोधिका, प्राध्यापिका कशा बनल्या? व त्यांच्या व्यासंगाची सुरुवात व त्यांचा बौध्दिक परिपोष कसा झाला? याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करताना त्यानीच शब्दबध्द केलेल्या स्मृति, त्यांचे शास्त्रीय लेखन, संशोधन व ललित लेखन या कार्यात सहाय्यभूत होणारे आहे असे आढळते.

थोर समाजसुधारक महर्षि धोंडो केशव कर्वे यांच्या स्नुष्या व फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर कर्वे यांच्या इरावती या पत्नी होत्या. परंतु ही ओळख त्याना आवडत नसे. इथे त्यांच्या मनातील आत्मविश्वास आणि सक्षमपणा प्रकर्षाने जाणवतो. तसेच स्त्रीवादी प्रवृत्तीचाही अनुभव येतो. स्वातंत्र्यापूर्वीच्या त्या काळात त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील गंमती दाद विसंगतीमुळे त्यांच्या वर्तनाबद्दल 'काय अचाट बाई आहे' अशी स्वाभाविक प्रतिक्रिया उमटत असे. पण त्याचे त्यांना काहीच वाटत नसे. आश्चर्य म्हणजे, कुंकू, मंगळसूत्र यांचा जाणीवपूर्वक त्याग करणाऱ्या, नवऱ्याला सरळ, अरे-कारे म्हणणाऱ्या इरावतीनी आपल्या मुलीचे लग्न अगदी पूर्ण पारंपारिक पध्दतीने करण्याचा हट्ट धरला. आपले पहिले पुस्तक आपल्या पतीच्या चरणी अर्पण करण्यात पारंपारिक आर्य स्त्रीची आठवण करून दिली. पारंपारिकता आणि आधुनिकता याचे मोठ गंमतीशीर मिश्रण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होते.

इरावती कर्वे यांनी १९३३-१९३६ या काळात एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठात कुलसचिव (Registrar) पदाची जबाबदारी पार पाडली. १९३९ मध्ये विद्येचे माहेरघर म्हणून ओळखला जाणाऱ्या पुणे शहरात प्रसिध्द अशा डेक्कन कॉलेज व संशोधन केंद्रामध्ये मानवंशशास्त्र व समाजशास्त्र विषयाच्या प्रपाठक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. आयुष्याच्या अखेरपर्यंत म्हणजे ११ ऑगस्ट, १९७० पर्यंत त्यानी या विभागाचे विभाग प्रमुख पद भूषविले.

दिल्ली येथे १९४७ मध्ये भरलेल्या इंडियन सायन्स काँग्रेसच्या मानववंशशास्त्र विभागाच्या अध्यक्ष म्हणून त्यांची निवड करण्यात आली होती. याच कालखंडात 'प्राग (युगोस्लाव्हिया) येथे भरलेल्या जागतिक इतिहास काँग्रेसच्या अधिवेशनात त्यानी भारताचे प्रतिनिधित्व केले होते. १९५५ मध्ये लंडन विद्यापीठात व १९५८ मध्ये अमेरिकेतील कॅलिफोर्निया विद्यापीठात त्यानी मानववंशशास्त्राच्या अभ्यागत प्राध्यापिका (Visiting Professor) म्हणून योगदान दिले. समाजशास्त्र आणि मानववंशशास्त्रातील त्यांच्या योगदानाला आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त झाली होती. ब्रिटनमधील "Emsly Hormiman Scholarship" ही प्रतिष्ठेची शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या त्या पहिल्या भारतीय होत्या.

संस्कृत व इंग्रजी या दोन विषयावर इरावती कर्वे यांचे अधिक प्रभुत्त्व असल्याने भारतीय शिल्पकला, रामायण व महाभारतातील सामाजिक जीवन, प्राचीन काळातील कायदेशास्त्र या विषयांच्या अध्ययन व संशोधनाकडे त्यानी विशेष भर दिला. महाराष्ट्रातील ग्रामीण व आदिवासी समाजाचे अध्ययन करण्याकडे

त्यानी आपल्या विद्यार्थ्यांचे मन आकर्षित करून घेतले. त्यामध्ये डॉ. जे. एस. रणदिवे व डॉ. कैलासचंद्र मल्होत्रा यांची नांवे विशेषत्वाने घेतली जातात.

लाखो वारकऱ्यांसोबत त्यानी श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी पंढरीची वारी केली. दिंडीसोबत त्यानी पायी प्रवास केला. इथे त्यांची भक्तिमयता व श्रध्दाळूपणाही प्रकर्षाने जाणवतो. श्रीविठ्ठल हा आपला 'Boy Friend' आहे असे त्याचे वर्णन त्यानी केले आहे.

### ❐ डॉ. इरावती कर्वे यांचे वाङ्मयीन योगदान

भारतीय समाज व्यवस्थेतील व समाज जीवनातील सर्व अंगांना स्पर्श करणाऱ्या विषयांबाबत त्यानी जी विचारांची मांडणी केली ती तर्कशुध्दता विज्ञाननिष्ठा व वस्तुनिष्ठतेवर आधारित होती. सैध्दांतिक व सर्वेक्षणात्मक पातळीवर त्यानी आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले. समाजशास्त्र व सामाजिक मानववंशशास्त्र हे दोन स्वतंत्र विषय नसून ते परस्परपूरक व परस्परावलंबी आहेत असे त्यांचे मत होते. हे दोन्ही विषय पदवी व पदव्युत्तर पातळीवरील अभ्यासक्रमात त्यानी अंतर्भूत केले व मानववंशशास्त्राच्या सर्वच शाखांवर विशेष भर देण्याचा प्रयत्न केला.

समाजशास्त्र व मानववंशशास्त्रात त्यानी जे योगदान दिले त्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे घेता येते.

1. The Chitpavan Brahmins : M. A. Thesis; 1928.
2. Kinship Organisation in India, 1953.
3. Anthropometric measurements of Maharashtra : Monographic study with V. M. Dandekar, 1951.
4. Social education of scheduled tribes; in vanyajati, 1957.
5. The Indian Village : Bulletin of Deccan college, 1958.
6. What is Caste? Caste as an extended kin : The Economic weekly, 1958.
7. Hindu Society : An interpretation, 1961.
8. On the road to Maharashtrian Pilgrimage : journal of Asian studies, 1962.
9. Group relations in village community : Monographic study with Y. B. Damle, 1963.
10. Indian Women : Indian Journal of Public administration, 1966.
11. Maharashtra : Land and People, 1968.

या व्यतिरिक्त इरावती कर्वे यांनी मराठी वाङ्मयात जे योगदान दिले ते पुढीलप्रमाणे लक्षात घेता येते.

१. परिपूर्ती, १९४९.

२. मराठी लोकांची संस्कृती, १९५१ (संस्कृती म्हणजे काय?)

३. हिंदू समाजरचना, १९६४.

४. हिंदू समाज : एक अन्वयार्थ, १९७५.

५. महाराष्ट्रातील धनगर : एक संशोधन प्रकल्प, १९६९ (अपूर्ण).

६. भोवरा, १९६०.

७. युगांत, १९६७.

८. गंगाजल, १९७२.

याशिवाय इरावती कर्वे यांनी पुढील अहवालही प्रसिध्द केले.

१. महाराष्ट्रातील निरनिराळ्या जातींची समाजशास्त्रीय पाहणी.

२. जाती-जमातीतील स्त्री-पुरुषांची शरीरमापन व रक्त समूहाचे परीक्षण.

३. ग्रामनामाचा समाजशास्त्रीय अभ्यास.

या ग्रंथांच्या बरोबरच त्यानी Bulletin of Deccan College research institute, Journal of Anthropological Society, Economic and Political Weekly, Journal of Asian Study, Deccan college research monograph, The Anthropologists, साप्ताहिक वाटचाल इ. नियतकालिकांमध्ये जवळजवळ ८० शोधनिबंध प्रकाशित केले.

'युगान्त' या महाभारतावरील चिकित्सक ग्रंथाला साहित्य अकादमी व महाराष्ट्र शासन यांचा पुरस्कार लाभला आहे. इतकेच नव्हे तर, त्याचे इंग्रजी, कन्नड आणि हिंदीमध्ये भाषांतरही झाले आहे. मराठी साहित्यातील त्यांची ही कलाकृती म्हणजे एक मानदंडच मानला जातो.

केवळ समाजशास्त्र व मानववंशशास्त्रात उल्लेखनीय कामगिरी करून न थांबता इरावती कर्वे यांनी साहित्याच्या समाजशास्त्रातही तितकेच मोलाचे योगदान दिले आहे. ते त्यांच्या अनेक कथा-कादंबऱ्यातून स्पष्ट होते. म्हणूनच त्यांना दिलेली 'विदुषी' ही उपाधी सार्थ ठरते.

### ४.२.१ आप्तसंबंधाची संकल्पना (Concept of Kinship Relations)

१९५३ साली इरावती कर्वे यांनी प्रकाशित केलेल्या "Kinship Organisation in India" या ग्रंथामध्ये भारतातील आप्तसंबंधाची संकल्पना सविस्तर स्वरूपात मांडली आहे. आप्तसंबंध ही प्रामुख्याने सामाजिक-सांस्कृतिक संकल्पना आहे; आणि साहजिकच ती भारतातील कुटुंब, जात व भाषा या तीन

घटकाशी जोडली गेली आहे. कोणतीही सांस्कृतिक घटना लक्षात घेताना तीन गोष्टींची नितांत आवश्यकता असते असे इरावती कर्वे यानी स्पष्ट केले असून त्यामध्ये भाषिक संमिश्रता, जातींची संस्थात्मक घडण आणि कुटुंबाचे संघटन याना महत्त्व दिले आहे. यातील प्रत्येक घटक हा परस्पराशी पूर्णपणे निगडीत आहे. त्यांच्यात परस्परावलंबन आहे. ह्या तिन्ही फरकांच्या एकत्रीकरणातून अर्थपूर्ण अशा नवीन सांस्कृतिक गोष्टीची निर्मिती होते. ती म्हणजेच आप्तसबंध व्यवस्था होय. हे आप्तसंबंध भाषा, जात आणि कुटुंब या तिन्ही समूहात आढळतात. विविध भाषा बोलणाऱ्या आपल्या समाजात एकाच भाषिक समूहातील आप्तसंबंध व्यवस्था जशी एकात्म असते तशीच ती जात व कुटुंब या समाजघटकातही असते.

आप्तसंबंधाची एक परिभाषा (terminology) असते. अशा आप्तसंबंधीय परिभाषेची चर्चा इरावती बाईनी तीन भाषिक प्रदेशांच्या अनुषंगाने आपल्या ग्रंथात केली आहे. त्यामध्ये १) इंडो-युरोपियन, २) द्राविडीयन, ३) मुंडारी आप्तसंबंधीय संघटना. पण त्याहीपेक्षा अधिक सुटसुटीतपणे आप्तसंबंध संघटनेचे सादरीकरण त्यांनी भौगोलिक आधारावर केले आहे. उत्तर (Northern), मध्य (Central), दक्षिण (Southern) आणि पूर्व (Eastern) असे हे चार भौगोलिक विभाग भारतात असून त्या प्रत्येक भौगोलिक प्रदेशात आढळणाऱ्या आप्तसंबंध व्यवस्थेचे विश्लेषण इरावती कर्वे यांनी केले आहे. विभिन्न अशा भौगोलिक रचनेप्रमाणेच आप्तसंबंधातही आढळणाऱ्या विभिन्नतेचे स्पष्टीकरण त्यानी केले आहे. विभिन्न भौगोलिक प्रदेश व त्याप्रमाणे बदलत जाणारे भाषिक समूह आणि त्यांचा आप्तसंबंध रचनेशी असणारा परस्परसंबंध कसा आहे हे इरावती कर्वे यांनी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. भारतात विविध भाषिक समूहांचे म्हणजेच भाषिक कुटुंबाचे (Linguistic Families) भौगोलिक पातळीवर विभाजन झाले आहे. हे विभाजन म्हणजेच एक सांस्कृतिक विभाजन दुसऱ्या सांस्कृतिक स्वरूपाला म्हणजेच आप्तसंबंध व्यवस्थेला जोडण्याचा प्रयत्न इरावती कर्वे यांनी केला आहे.

भारताच्या विविध भागातील आप्तसंबंध व्यवस्थेची तुलना आणि वर्णन करण्यासाठी इरावती कर्वे यांनी आप्तसंबंध परिभाषेचा उपयोग केला आहे. तसेच या परिभाषा आकाराला आणण्यात जे घटक परिणामकारक ठरतात ते समजून घेण्याचाही प्रयत्न केला आहे. भाषिक समूह, आप्तसंबंधी समूह आणि चालीरिती समजून घेण्यासाठी त्या-त्या भौगोलिक विभागांचा संदर्भ त्यानी घेतला आहे. तसेच स्थलांतर प्रक्रिया, वसाहत अथवा वसतिस्थान, विशिष्ट जातीशी असणारे संबंध, कार्यात्मक सहयोग यासंदर्भातही त्यानी आप्तसंबंध व्यवस्था स्पष्ट केली आहे. तसेच धर्मशास्त्राच्या आधारे जातींचे हक्क व कर्तव्ये आणि आप्तसंबंधीय क्षेत्रामध्ये वारसाहक्काचे नियम कसे व कोणते आहेत याची त्यानी चर्चा केली आहे.

आप्तसंबंध संघटन जातीव्यवस्थेमुळे कसे सुदृढ व परिणामकारक झाले आहे, याचा ऊहापोह त्यानी केला आहे. तसेच त्या संदर्भात सामाजिक वर्तनाचे महत्त्वही त्यानी अधोरेखित केले आहे. त्या-त्या समाजरचनेवर तेथील भाषिक आणि भौगोलिक घटकांचा परिणाम कसा होतो हेदेखील आप्तसंबंधांच्या संदर्भात त्यानी स्पष्ट केले आहे.

आप्तसंबंध व्यवस्थेत डॉ. इरावती कर्वे यांनी आई आणि मुलगा यातील संबंधात्मक व्यवस्था स्पष्ट केली आहे. आई आणि मुलगा यांच्यातील संबंध हे सर्व भारतभर अत्यंत दृढ स्वरूपात असलेले दिसतात असे त्यांना आढळून आले. ही संबंधात्मक व्यवस्था अपरिवर्तनशील आणि परस्परावलंबी स्वरूपाची असते. हे एक पवित्र असे बंधन असते आणि ते अनेक वाङ्मय प्रकारात मांडलेले आढळून येते. आई हे आदराचे, श्रध्देचे स्थान असते आणि मातृत्वाचा सन्मान केला जातो. कौटुंबिक जीवनात मुलावरील मातेचा अधिकार हा त्याच्या लग्नानंतरही तसाच अबाधित असतो. महाभारताच्या संदर्भात कर्वे यांनी असे म्हटले आहे की, 'महाभारत म्हणजे एका मोठ्या संयुक्त पितृसत्ताक कुटुंबाची कथा असून एकत्रित कुटुंबाची बलस्थाने, वैगुण्य आणि कल्पना यांचे ते एक प्रकारे वर्णनच आहे.'

❒ **गोत्र संकल्पना :–**

गोत्र संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करताना गोत्र म्हणजे कुल (Clan) असे इरावती कर्वे यांनी म्हटले आहे. जाती व्यवस्थेमध्ये गोत्र हे बहिर्विवाही स्वरूपाचे असते असे त्यांचे मत आहे. अर्थात वस्तुस्थितीही तशीच आहे. कारण सगोत्र विवाह हा निषिध्दच मानलेला आहे. वैवाहिक संबंधांचे योग्य नियमन करणे हाच त्याचा प्रमुख उद्देश आहे. अर्थात प्रत्येक जात आणि प्रदेशात गोत्राची कार्ये भिन्न भिन्न स्वरूपाची असतात. वैवाहिक संस्कारांच्या बाबतीत गोत्राचा वापर हा केवळ विधींची ओळख लक्षात घेण्यासाठी केला जातो. एकाच गोत्रातील लोकांच्या देवदेवता आणि संस्कार सारखेच असतात. उत्तर भारतातील उच्च जातीमध्ये चार गोत्रांच्या बाबतीत विचार निषिध्द मानला आहे. स्वत:चे गोत्र, आईचे गोत्र, वडिलांच्या आईचे गोत्र आणि आईच्या आईचे गोत्र. कर्वे यांनी याला चार गोत्रांचा नियम म्हटले असून त्याचे काटेकोर पालन केल्यास प्रस्तावित वधू–वरांचा विवाह प्रतिबंधित होऊ शकतो.

इथे गोत्र हा एक समूह आहे हेही लक्षात घेतले पाहिजे.

तसेच इरावती कर्वे यांनी आप्तसंबंध व्यवस्थेचा अभ्यास करताना प्राच्यविद्येबरोबरच (Indology) संस्कृतीशास्त्राचा (Culturology) ही आधार घेतलेला आहे. कारण हे दोन्ही दृष्टिकोन परस्परपूरक असे आहेत.

## ४.२.२ हिंदू समाज : एक अन्वयार्थ (Hindu Society : An Interpretation)

१९६१ साली प्रसिध्द केलेल्या "Hindu Scoeity : An Interpretation" या आपल्या ग्रंथात इरावती कर्वे यांनी हिंदू समाजाचा अन्वयार्थ सामाजिक–सांस्कृतिक दृष्टिकोनातून स्पष्ट केला आहे. त्यांचा हा अन्वयार्थ प्राच्यविद्यात्मक दृष्टिकोनावर आधारित आहे. भारतातील सांस्कृतिक प्रतिमानाची प्रक्रिया त्यानी विशेषत्वाने यामध्ये विचारात घेतली आहे. तसेच आप्तसंबंध प्रणालीशी असणारी भाषिक जवळीकही त्यानी विशद केली आहे. भारतात प्रामुख्याने दोन सांस्कृतिक प्रभाग असल्याचे निर्दशनाला आणून त्यातील एक द्राविडीयन भाषासमुह की, ज्यामध्ये काही विशिष्ट आप्तसंबंधीय चालीरिती आढळतात की, ज्या दुसऱ्या प्रभागात आढळत नाहीत. दुसरा प्रभाग हा इंडो–आर्यन भाषासमूह म्हणून ओळखला जातो की, ज्यामध्ये वेगळ्याच आप्तसंबंधीय चालीरिती आढळतात. मानवशास्त्रीय परिमानांच्या आधारे कर्वे यांनी

भारतीय समाज आणि संस्कृतीचा अभ्यास केला आहे. भारतीय समाजाविषयीचे त्यांचे हे योगदान म्हणजे वाङ्मयीन ज्ञान आणि संदर्भीय समाजशास्त्रीय विश्लेषण यांचे एकत्रीकरण असल्याचे स्पष्ट होते.

'हिंदू सोसायटी : ॲन इंटरप्रिटेशन' या ग्रंथात प्रामुख्याने इरावतीबाईंचे जातिव्यवस्थेवरील विचार आपल्याला पहावयास मिळतात. आचारविचारातील विविधता हे भारतीय समाजाचे प्रमुख लक्षण आहे. कोणत्या प्रकारचे अन्न द्यावयाचे? कोणत्या प्रकारचे द्यावयाचे नाही? कोणत्या प्रकारच्या भांड्यांचा वापर करावयाचा? कोणत्या प्रकारचे आणि कोणत्या पध्दतीचे वस्त्र नेसावयाचे? कोणत्या देवांची पूजा करावयाची? आणि कोणत्या पध्दतीने करावयाची? जन्म-विवाह आणि मृत्यू यांच्याशी संबंधित असलेले निरनिराळे संस्कार इत्यादी अनेक बाबतीमध्ये भारतीय समाजात समूहासमूहात भिन्नता आढळते. ही वर्तनातील भिन्नता हा व्यक्ती स्वातंत्र्याचा परिपाक नसून विविध गटामध्ये असलेल्या आचारभिन्नतेचा परिणाम आहे. हा गट म्हणजे जात होय. ह्या जाती भारतीय समाजात कशा आणि केव्हा निर्माण झाल्या? त्यांचे स्वरूप कसे आहे? त्यांचा आणि व्यवसायाचा संबंध काय आहे? वर्णव्यवस्थेशी त्यांचे नाते काय आहे? भारतीयांच्या जीवनमूल्यांशी त्यांचे नाते कसे आहे? मानवी वंश आणि जात यांचे कांही संबंध आहेत का? इत्यादी प्रश्नावर त्यानी आपल्या जातीवरील संशोधनाद्वारे प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

संशोधनाची सुरुवात ही प्रस्थापित सिध्दांतातील त्रुटी आणि अपूर्णतेच्या जाणीवेतून होते. यादृष्टीने जातिसंस्थेचे स्वरूप, उत्पत्ती आणि विकास याविषयी घुर्ये व हर्बर्ट रिस्ले यांनी जे सिध्दांत मांडले आहेत, जातिसंस्थेच्या स्वरूपाविषयी जी नवीन माहिती कर्वे यांना उपलब्ध झाली. या सर्वांचा परामर्श घेऊन त्यांनी स्वत:चा वेगळा सिध्दांत मांडला आहे.

जातिसंस्थेच्या निर्मितीचे प्रचलित सिद्धांत असे गृहीत धरतात की, जातिव्यवस्था ही गौरवर्णी आर्यांच्या भारतातील आगमनामुळे निर्माण झाली. आर्यामध्ये वर्णव्यवस्था होती व ती व्यवसायावर आधारलेली होती. आर्यांनी वांशिक शुध्दता टिकविण्याच्या दृष्टीने अंतर्विवाहाचे नियम समाजात लागू केले. यातून विभाजनाच्या प्रक्रियेतून अनेक जातींची निर्मिती झाली. म्हणजेच 'जातिव्यवस्था ही आर्यांची निर्मिती आहे' या सिध्दांताशी इरावती कर्वे सहमत नाहीत. त्यांच्या मतानुसार हा सिध्दांत जातीवरील अलिकडील संशोधनात जी माहिती प्राप्त झाली आहे, त्याच्याशी चालत आलेला एक पैलू आहे. त्याची निर्मिती ब्राम्हणांनी केली नाही तर ब्राम्हणांच्या म्हणजेच आर्यांच्या भारतातील आगमनापूर्वी ती अस्तित्त्वात होती. ब्राम्हणांनी त्याच्या अस्तित्वाची दखल घेतली; ती जाणून घेतली आणि तिचा उपयोग केला. ब्राम्हण हे जातिसंस्थेचे निर्माते नव्हते, तर जातिसंस्थेने त्याना घडविले.

इरावती कर्वे यांनी जातीविषयीचा मांडलेला सिध्दांत व त्यातील **ठळक वैशिष्ट्ये** पुढीलप्रमाणे आहेत.

जात म्हणजे अंतर्विवाही समूह होय. जातीत समाविष्ट असणारे लोक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे एकमेकांचे नातेवाईक असतात. हे नाते विवाहबंधनातून अथवा रक्तसंबंधातून निर्माण झालेले असते. आप्तसंबंधीय गट म्हणजे ज्याला समाजशास्त्रीय भाषेत उपजात अथवा पोटजात म्हटले जाते. उदा. ब्राम्हण ही जात नसून देशस्थ ब्राम्हण, कोकणस्थ ब्राम्हण, कऱ्हाडे ब्राम्हण या अंतर्विवाही जाती आहेत. या सर्वांनी

मिळून ब्राम्हण हा जातीसमुच्चय अथवा Caste Cluster तयार झाला आहे. इरावतीबाईंच्या मते, विवाहसंबंध प्रस्थापित करण्याची पात्रता हा जातीचा महत्त्वाचा निकष आहे आणि अशा जाती म्हणजे ज्याला आपण पोटजाती म्हणतो त्या होत. सामाजिक परंपरा, रूढी, धार्मिक चालीरिती, वांशिक एकजिनसीपणा ह्याबाबतीत प्रत्येक पोटजात ही अधिक एकजिनसी व दुसऱ्या पोटजातीहून भिन्न असते. उदा. वांशिकदृष्ट्या देशस्थ, कोकणस्थ, सारस्वत या ब्राम्हण पोटजाती एकमेकांपासून भिन्न आहेत. हीच गोष्ट आपल्याला मराठा, कुंभार, महार इत्यादी जातीतही दिसते. कोकणातील मराठा हा देशावरील मराठ्यापेक्षा भिन्न आहे. हीच गोष्ट पश्चिम महाराष्ट्रातील महार आणि पूर्व महाराष्ट्रातील महार यांच्याबाबतीतही दिसते.

डॉ. इरावती कर्वे यांच्या मते, जाती या सामान्यपणे एक भाषा बोलणाऱ्या विशिष्ट भूप्रदेशामध्ये मर्यादित असतात. त्याचप्रमाणे हे अंतर्विवाही गट विभेदनाच्या प्रक्रियेतून निर्माण झाले नाहीत तर त्यांचे स्वतंत्र अस्तित्व आहे. या मताच्या पुष्ठ्यर्थ त्यानी महाराष्ट्रातील मराठा-कुणबी हा जाती समुच्चय, तसेच ब्राम्हण आणि कुंभार हे जाति समुच्चय उदाहरणासाठी घेऊन या जाती समुच्चयात अंतर्भूत असणाऱ्या निरनिराळ्या जातींच्या सामाजिक व सांस्कृतिक परंपरा आणि आचार यामध्ये भिन्नता कशी दिसते हे स्पष्ट केले आहे.

**इरावती कर्वे यांनी मांडलेली जातीसंस्थेची वैशिष्ट्ये**

- प्रत्येक जातीचा परंपरागत आणि वंशपरंपरेने चालत आलेला व्यवसाय असतो. तसेच काही जातीवर आपला परंपरागत व्यवसाय पाळण्याचे बंधनही असते. परंतु एक जात-एक व्यवसाय असे समीकरण मात्र आपल्याला दिसत नाही.
- अनेक अंतर्विवाही जातीसमूह एकच व्यवसाय करताना आपल्याला दिसतात. उदा. अहीर सोनार, लाड सोनार, दैवज्ञ सोनार किंवा मराठा कुंभार, परदेशी कुंभार, लाड कुंभार, कच्छी कुंभार इत्यादी.
- प्रत्येक जातीला स्वतंत्र अस्तित्त्व असते, पण त्याचबरोबर काही बाबतीत जाती-जातीत सहकार्यही असते.
- कनिष्ठ जातीना वरिष्ठ जातींचे व्यवसाय करण्यास मुभा नव्हती. तसेच आपला सामाजिक दर्जा खालावेल या भीतीने वरिष्ठ जातीचे लोक खालच्या जातीतील व्यवसाय करण्यास धजावत नसत.
- व्यवसाय आणि जात यांचा संबंध जेवढा दृढ मानला जातो तेवढा तो कधीच नव्हता.
- जाती व्यवस्थेशी दर्जाची कल्पना निगडीत आहे. भारतीय समाजात दर्जा ठरविताना वर्ण व्यवस्था आणि जातीव्यवस्था अशा दोन व्यवस्था आपल्याला दिसतात. वर्णव्यवस्था ही देशपातळीवर तर जातीव्यवस्था ही गावपातळीवर क्रियाशील दिसते.

- जाती व्यवस्थेमुळे नवीन सामाजिक गटाना समाजात सामावून घेण्याची व्यवस्था होती. त्यामुळे एकेकाळचे वांशिक आणि आदिवासी गट कालांतराने जाती संस्थेचे आणि त्याद्वारे भारतीय समाज व्यवस्थेचे घटक झाल्याचे आपल्याला दिसते. हे समावेशन अशा तऱ्हेने होत असे की, त्यामुळे प्रत्येक जाती-जमातींना आपापल्या सामाजिक-सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरा जतन करण्याचे आणि इतर जातींशी आवश्यक तेवढे संबंध ठेवण्याचे स्वातंत्र्य होते.

- भारतीय समाजरचनेत प्रत्येक जाती समूहाला आपली जीवन प्रणाली, संस्कृती, धार्मिक चालीरिती जोपासण्याची मुभा होती. याबाबतीत कोणत्याही एका जातीसमूहाचे दुसऱ्या जातीसमूहावर बंधन नसे. कोणतीही गोष्ट दुसऱ्यावर लादण्याची प्रवृत्ती नव्हती. त्यामुळे येथे सामाजिक-सांस्कृतिकदृष्ट्या एकजिनसी समाज निर्माण होऊ शकला.

- सर्वाभूती परमेश्वर ही भारतीय तत्त्वज्ञानाची महत्त्वाची शिकवण. देवदेवता भिन्न-भिन्न असल्या तरी परमेश्वर एकच आहे हा प्रभावी दृष्टिकोन या तत्त्वज्ञानात दिसतो. हे तत्त्वज्ञान जातीसंस्थेच्या अस्तित्त्वास आणि विकासास पूरकच ठरले. सर्वाभूती परमेश्वर पाहण्याच्या या दृष्टिकोणामुळे भारतीय समाज जीवनात निरनिराळ्या सामाजिक समूहांचा समावेश नैसर्गिकपणे होत गेला.

- स्वतंत्ररित्या जात हा जरी स्वयंपूर्ण गट नसला तरी निरनिराळ्या परस्परावलंबी जातींचा मिळून झालेला ग्रामीण समूह हा स्वयंपूर्ण असल्याचे आपल्याला दिसते. या ग्रामीण समूहाच्या अस्तित्वामुळे परकीय आक्रमणापासून जातीसंस्था बऱ्याच प्रमाणात अलिप्त राहिली.

- वरिष्ठ जातींशी निगडीत असणारी सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक मूल्ये कनिष्ठ जातीतील लोकांना परिचित होऊन त्याचे अनुकरण होऊ लागले. या अनुकरण प्रक्रियेमुळे किंवा संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेमुळे जातीजातीत सामाजिक-सांस्कृतिक व धार्मिक एकात्मतेचा बंध तयार झाला. अशा तऱ्हेचा एक महत्त्वाचा बंध म्हणजे प्रादेशिक भाषेचा विकास होय.

थोडक्यात, इरावती कर्वेंच्या मते, जातिसंस्था ही आर्यांच्या आगमनापासून भारतात होती. आर्यांनी ती आपल्या वर्ण संस्थेच्या चौकटीत बसवण्याचा प्रयत्न केला. जातिसंस्थेच्या स्वरूपामुळे सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेसही विशिष्ट स्वरूप प्राप्त झाले.

इरावती कर्वे यांनी शारीरिक मानवशास्त्रातील संशोधनाचा आधार घेऊन ज्याला आपण पोटजाती म्हणतो त्या वांशिकदृष्ट्या, तसेच सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरेच्या दृष्टीने वेगळ्या आहेत हे त्यानी दाखवून दिले. त्याचप्रमाणे, त्यानी आपल्या ग्रंथात जातिसंस्थेच्या स्वरूपातले आणि कार्याचे जे संरचनात्मक आणि प्रकार्यात्मक विश्लेषण केले आहे, त्यामुळे संपूर्ण समाजरचनेच्या संदर्भात जातिसंस्थेच्या स्थानाचे आणि कार्याचे यथार्थ आकलन होण्यास मदत झाली आहे.

डॉ. इरावती कर्वे यांनी नागपूर विद्यापीठात १ ते ४ मार्च, १९६३ या कालावधीत चार व्याख्याने दिली, तीही "Hindu Society : An Interpretation" या ग्रंथावरच आधारित होती. त्यातील विषय होते.

१. आचारातील विविधता.

२. जात ह्या समूहाची कांही वैशिष्ट्ये.

३. जातींच्या इतिहासाचे अवलोकन.

४. भारतीय तत्त्वज्ञान आणि जातिव्यवस्था.

अर्थात, इरावती कर्वे यांनी प्रस्थापित केलेला सिध्दांत हा प्रामुख्याने महाराष्ट्रातील काही जातींच्या शारीरिक-मानवशास्त्रीय अध्ययनाच्या पायावर आधारलेला आहे. त्यामुळे त्यानी मांडलेली गृहीतके इतर प्रदेशामध्ये पडताळून पाहणे आवश्यक आहे.

### ४.२.३ महाराष्ट्रविषयक दृष्टिकोन (Views on Maharashtra)

इरावती कर्वे या मानवशास्त्रातील प्रख्यात विदुषी होत्या. त्यानी 'आपली संस्कृती', 'मराठी लोकांची संस्कृती', 'आमची संस्कृती' इत्यादी पुस्तकातून संस्कृती व महाराष्ट्राची संस्कृती यावर संशोधनात्मक असे विस्तृत विवेचन केले आहे. संस्कृतीचा अर्थ स्पष्ट करताना त्या म्हणतात, 'मनुष्य समाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती आणि डोळ्यांना न दिसणारी, पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजेच संस्कृती. संस्कृती ही समाजाची असते. संस्कृती ही व्यक्तिसापेक्ष असते. माणसे संस्कृती व परंपरा यामध्ये इतकी बुडालेली असतात की, व्यक्तीचे जीवनच सांस्कृतिक जीवनाचे एक अंग होते.

मराठी लोकांच्या संस्कृतीविषयी मानवशास्त्रीय दृष्टिकोनातून संशोधन करून विवेचन करताना त्या म्हणतात की, मराठी लोक हे मिश्र वंशाचे आहेत. दीर्घमस्तक लोकांच्या वस्तीत मध्यम, रूंद डोक्याचे लोक येऊन हे मिश्रण झालेले आहे. डोक्याचे आकारमान, नाकाचे प्रमाण, चेहरेपट्टी इत्यादी घटकांचा अभ्यास करताना महाराष्ट्रात विविध गटांची वांशिक सरमिसळ झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील पहिले घराणे सातवाहनांचे आणि ते पश्चिमेकडून येणाऱ्या शकांच्या आक्रमणाला तोंड देत होते. असा इतिहास असला तरी त्याहीपूर्वी महाराष्ट्रात वस्ती नांदत होती.

मराठी लोकांची कुटुंबसंस्था, नातीगोती यांच्याबाबतीत कर्वे म्हणतात, उत्तर व दक्षिण भारतीय संस्कृतीची जडणघडण होत असताना मराठी माणसांची उत्तर-दक्षिण भारतीय माणसाशी केवळ सांस्कृतिक देवाणघेवाण झाली नाही, तर रोटीबेटी व्यवहारही झाले. त्यामुळेच उत्तर-दक्षिण संस्कृती संगम महाराष्ट्रात पाहता येतो. या बाबतीत विवाहाची प्रथा नाही. याउलट दक्षिणेत नात्यातील विवाहाची प्रथा आहे. आतेमामे भावंडांचा विवाह तर होतोच, पण मामा-भाची विवाहदेखील होतो. उत्तर भारतात विधवा स्त्री धाकट्या दिराशी विवाह करते. पण ही प्रथा दक्षिणेत नाही. महाराष्ट्रात दक्षिण व उत्तर भारत येथील दोन्ही प्रथा दिसतात. येथे सगोत्र विवाह, एकाच कुळातील विवाह टाळला जातो. महाराष्ट्रात पुरुष व स्त्री दोघांनाही महत्त्व आहे. येथे पुरुषही स्त्री वाचक होतो. (संत ज्ञानेश्वरांचा उल्लेख माऊली असा केला जातो.) तर स्त्री पुरुषवाचक होते. (जैनांचा १९ वा तीर्थंकार मल्ली स्त्री असूनही उल्लेख मात्र मल्लिनाथ असा केला जातो.) महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाद्वारे एका विठ्ठलाने ब्राम्हण, मराठा, कुणबी, कुंभार, चांभार, महार इत्यादी

सर्वांना एकत्र गोवलेले आहे. तेव्हा कर्वे यांनी मराठी संस्कृतीविषयी सविस्तर स्वरूपात चर्चा केली आहे हे स्पष्ट होते.

Maharashtra Land and its People (महाराष्ट्र : एक अभ्यास) ह्या विषयावरील इरावती कर्वे यांचे पुस्तक १५ ऑगस्ट, १९६८ साली प्रकाशित झाले. महाराष्ट्र राज्याच्या गॅझेटियर मालिकेतील सात पुस्तकांपैकी एक असे ह्या पुस्तकाचे स्वरूप आहे. हे पुस्तक प्रकाशित होताच त्याच्या सर्व प्रती लगेचच संपल्या. नंतर त्याचे पुनर्मुद्रणही झाले. महाराष्ट्र समजून घ्यायचा तर त्याच्या आजूबाजूचे प्रांत व हिंदूस्थान याचा अभ्यास करायला हवा. आता जी भारतीय संस्कृती आहे, त्यामध्ये अनेक भाषा व अनेक संस्कृतींचे योगदान आहे असे त्यांनी मत मांडले.

इरावती कर्वे यांच्या मते, भारतीय संस्कृतीत प्रामुख्याने तीन भाषा कुटुंबे आहेत.

१. **संस्कृतीद्‌भव भाषा :** उत्तरेकडचा भाग, पश्चिमेकडचा भाग.

२. **द्राविडीयन भाषा कुटुंब :** हिंदुस्थानच्या दक्षिणेकडील भाषा.

३. **मुंडादी भाषा बोलणारे :** हिमालयाचा पूर्वेकडील भाग, आंध्रचा पूर्वभाग, बंगाल, ओरिसा.

यानंतर, त्यांनी (१) महाराष्ट्राची भूमी, (२) महाराष्ट्रातील लोक-शारीरिक मोजमापे, (३) महाराष्ट्रातील प्रादेशिक उच्च विभाग व त्यांचे कार्य, (४) महाराष्ट्रातील सामाजिक संस्था, (५) जीवसृष्टीच्या भौतिक परिस्थितीचा विचार, (६) महाराष्ट्रातील कुटुंबव्यवस्था, (७) महाराष्ट्रातील धर्म आणि दैवते, (८) सद्य:स्थितीतील महाराष्ट्र यांचा क्रमाने विचार केला आहे.

**१. महाराष्ट्राची भूमी :-**

हिंदुस्थानचा १/१० भूभाग महाराष्ट्राने व्यापलेला आहे. तसेच भारताच्या लोकसंख्येच्या १/११ हिस्सा महाराष्ट्रातील लोकसंख्या आहे. महाराष्ट्राच्या उत्तरेला गुजरात व मध्य प्रदेश असून १७२५ कि.मी. भूभाग उत्तरेकडे व्यापलेला आहे. पश्चिमेला ८२५ कि.मी. अरबी समुद्र आहे. पूर्वेला ५० कि.मी. मध्यप्रदेशाची सरहद्द आहे. दक्षिणेला आंध्र व कर्नाटक राज्यसीमा आहेत. त्यामुळे द्राविडीयन संस्कृतीशी महाराष्ट्रीयन संस्कृतीचा मिलाफ झालेला आहे. नर्मदा नदीमुळे उत्तर भारत महाराष्ट्रापासून वेगळा झालेला आहे. पश्चिमेला अरुंद अशी किनारपट्टी आहे. कृष्णा, भिमा व गोदावरी नद्याही निम्म्या महाराष्ट्रात तर निम्म्या आंध्रमध्ये वाहतात. शिवाजी महाराज गनिमी काव्याने औरंगजेबाशी लढत देऊ शकले याचे कारण महाराष्ट्राची भौगोलिक रचना होय.

इरावतीबाईंनी (१) वऱ्हाड उर्फ विदर्भ, (२) तापीचे खोरे म्हणजे खानदेश, (३) वर्धावेनगंगेचे खोरे म्हणजे नागपूर, (४) नाशिक, (५) नगर, औरंगाबाद, परभणी, नांदेड व (६) कृष्णेचे खोरे म्हणजेच पुणे, सोलापूर, सातारा असे सहा विभाग कल्पिलेले आहेत.

२. **महाराष्ट्रातील लोक–शारीरिक मोजमापे :–**

शारीरिक मोजमापे देताना कर्वे यांनी डोक्याचे वर्णन लहान डोके, मध्यम डोके अथवा मोठे डोके ह्यावर बुध्दीचे प्रमाण अवलंबून नाही हे स्पष्ट केले आहे. पश्चिम किनाऱ्यावर जाड ओठ व कुरळे केस असलेले काही लोक आहेत ते निग्रॉईड वंशाचे असावेत. महाराष्ट्र हा मुख्यत: ऑस्ट्रोलॉईड युरोपॉईड वंशाचा आहे. महाराष्ट्रीयन लोकांचा रंग काळसर व सर्वसाधारणपणे उंची ४ फूट ९ इंच ते ५ फूट ६ इंचापर्यंत असते. महाराष्ट्रीन लोकांचे डोळे काळे किंवा तपकिरी असतात. महाराष्ट्रात O आणि B रक्तगट जास्त प्रमाणात आहेत. तसेच मराठा आणि देशस्थ त्यांचे मूळ कदाचित एक असेल इतके त्यात साम्य आहे.

३. **महाराष्ट्रातील प्रादेशिक उच्च विभाग व त्यांचे कार्य :–**

महाराष्ट्रातील उपविभाग व तेथील बोलीभाषा पुढीलप्रमाणे आहेत. खानदेशात अहिराणी ही बोली भाषा आहे. उत्तर कोकणात म्हणजे ठाणे, कुलाबा, रत्नागिरी येथे कोकणी, दक्षिणेकडे गोव्याच्या बाजूला कोकणी ही स्वतंत्र भाषा, नागपूरकडे वऱ्हाडी, कृष्णेच्या खोऱ्यात 'कोल्हापुरी' ही बोली भाषा. पुणे ही सांस्कृतिक राजधानी.

४. **महाराष्ट्रातील सामाजिक संस्था :–**

वैदिक काळापासून आतापर्यंत वर्ण, जाती, वेगवेगळे व्यवसाय, व्यवसायावरून जाती,जित आणि जेते संबंध, ब्रिटीशकालीन व ब्रिटीशोत्तर समाज अशा अनेक गोष्टींचे सविस्तर विवेचन या प्रकरणात केले आहे. हे विवेचन करताना त्यानी संख्याशास्त्रीय परिगणन व सरकारी उपलब्ध आकडेवारीचा आधार घेतला आहे. त्यासाठी अभ्यासपूर्ण असा निष्कर्ष, आराखडे दिले आहेत. जातींच्या वैशिष्ट्यंबाबत त्यानी लिहिले आहे की,

- जातीमध्ये आपापसात लग्नसंबंध होतात.
- जाती लहान भागात पसरलेल्या असतात.
- जाती ठरावीक व्यवसायामध्ये व त्यातील लोकांशी संबंधित असतात.
- जातीत श्रेणीरचना असते. जातीतून पोटजाती निर्माण झाल्या.

कर्वे यांनी हे स्पष्ट केले की, ब्राम्हण हे जातीचे निर्माते नाहीत.

५. **जीवसृष्टीच्या भौतिक परिस्थितीचा विचार :–**

जीवसृष्टीच्या भौतिक परिस्थितीचा विचार करून इरावती बाईंनी दोन नकाशे दिलेले आहेत. समुद्रसपाटीपासूनची उंची आणि अंतर ह्या दोन गोष्टींचा विचार त्यानी केला. कोकणकिनाऱ्यांची अरुंद पट्टी, सह्याद्री आणि सातपुड्याचे डोंगर, सह्याद्री लगतचा मावळ भाग, दुष्काळी प्रदेश, गोदावरीचे मध्यवर्ती खोरे हे पाच विभाग पर्जन्यवृष्टीचा विचार करून केलेले आहेत. महाराष्ट्राला 'दगडांचा देश' म्हटले जाते. काळ्या

कातळाचा दगड तसेच लेणी, किल्ले बलुतेदारी हे महाराष्ट्राचे वैशिष्ट्य त्यानी सांगितले आहे. गल्ली, आळी हे जातीसाठीचे व व्यवसायासाठीचे विभाजन असते असेही त्यांनी म्हटले आहे.

### ६. महाराष्ट्रातील कुटुंबव्यवस्था :–

कुटुंब व्यवस्था या विषयावरील डॉ. कर्वे यांचा अधिकार आंतरराष्ट्रीय दर्जाचा मानला गेला आहे. भारतीय कुटुंब व्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी भारतातील सर्व प्रदेशात प्रत्यक्ष जाऊन त्यानी पाहणी केली आहे. कुटुंबव्यवस्थेचा विचार मांडताना त्यानी रामायण, महाभारत, वेदवाङ्मय, उपनिषदे, लोकवाङ्मय, संस्कृत, बौध्द व जैन वाङ्मय, तसेच शारिरीक मापनपध्दती, रक्तगट तपासणी अशा अनेक पद्धती वापरल्या आहेत. महाराष्ट्रातील कुटुंब पध्दतीवर उत्तर हिंदुस्थानातील कुटुंबपध्दतीचा तसेच दक्षिणेकडील पद्धतीचा परिणाम झालेला आहे. चालीरिती, लग्नसंबंध, वारसा पध्दती यामुळे ते स्पष्ट होते. महाराष्ट्रातील सर्व ब्राम्हण जातीना गोत्र असते, सर्व कुटुंबांना आडनाव असते. मराठा व इतर खालच्या जातीत देवकाची पध्दत असते. समान देवक असणाऱ्यांच्यात लग्न होऊ शकत नाही. कुटुंबातील वारसा पुरुष वंशजाकडे जातो. महाराष्ट्रात पितृप्रधान–पुरुषप्रधान संस्कृती आहे. एकत्र कुटुंब, विभक्त कुटुंब याविषयी त्यानी विवेचन केले आहे. तसेच कौटुंबिक चालिरीतींचाही आढावा घेतला आहे.

### ७. महाराष्ट्रातील धर्म आणि दैवते :–

महाराष्ट्र हा बहुधर्मीय असला तरी प्रामुख्याने हिंदुधर्मीय आहे. कृष्णपूजेवर आधारित आणि गुरु महात्म्य मानणारा पंथ म्हणून महानुभाव पंथाचा उल्लेख कर्वे यांनी केला आहे. वारकरी पंथाचे सविस्तर विवेचन त्यांनी केले आहे. विठ्ठल हे सहसा कुणाचे कुलदैवत नाही परंतु त्याचे जनमानसातील स्थान अतुलनीय असल्याचे त्या म्हणतात. विठ्ठल व संतांचे मार्गदर्शन यामुळे महाराष्ट्रात एकजूट राखली गेली. विविध जातीच्या संतांचे त्यातील योगदान ह्या एकात्मतेला कारणीभूत ठरले. फलटण व आसपासच्या खेड्यातून १४१६ लोकांची पाहणी करून एकोणीस दैवतांचे किती प्रमाणात पूजन होते, याचे कोष्टक कर्वेनी दिले आहे. कुलदैवत, ग्रामदैवत व इष्टदैवत यांची माहिती दिली आहे. देवी व देव यांची यादी दिली आहे. विष्णूचे अवतार त्यांनी दिले आहेत. गुरुपरंपरेचा उल्लेख केला आहे. तसेच ख्रिश्चन, मुस्लीम, जैन, पारशी, बौध्द धर्म त्यातील धार्मिक परंपरा यांचाही आढावा घेतला आहे.

### ८ सद्य:स्थितीतील महाराष्ट्र :–

ही स्थिती १९६८ मधील जेव्हा इरावती कर्वे यानी हे पुस्तक लिहिले तेव्हाची आहे. १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. कोकण, मुंबई, मराठवाडा, विदर्भ यासह महाराष्ट्र उदयास आला. पण मराठवाडा–विदर्भाला आपण दुर्लक्षित राहू अशी भिती वाटत होती. त्यांना विकासाचे आश्वासन देण्यात आले. आपण अल्पसंख्य राहू म्हणून ख्रिश्चन गोवा महाराष्ट्रात आणण्यास तयार नव्हते. मुंबईत महाराष्ट्रीय–मराठी माणसाच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी लढाऊ बाण्याच्या शिवसेनेचा जन्म झाला. मुंबईत मराठी खालोखाल गुजराती भाषा बोलली जाते. त्यामुळे गुजराती लोकांना सुरक्षितता देण्यात आली. मुंबईत उच्च शिक्षित मध्यमवर्गीय प्रामुख्याने ब्राम्हणांचा भरणा आहे. तसेच रोजंदारी मिळविणारा अस्पृश्य वर्गही आहे.

कारागिरांनाही स्थान आहे. शेती, नवीन उद्योगधंदे, यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. त्यातून औद्योगिककरण, शहरीकरण वाढू लागले.

हे गॅझेटियर तयार करताना कर्वे यांनी प्रदेश, त्या प्रदेशातील प्रजा आणि त्या प्रजेची परंपरा या तीन सूत्रांचा कसोशीने वापर केला आहे.

**स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्न-!**

❒ **योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१. आंतरराष्ट्रीय किर्तीच्या पहिल्या भारतीय महिला समाजशास्त्रज्ञ म्हणून कोणाचा उल्लेख करण्यात येतो?

(अ) डॉ. आनंदी जोशी (ब) डॉ. ॲनी बेझंट

(क) डॉ. सरोजिनी नायडू (ड) डॉ. इरावती कर्वे.

२. डॉ. इरावती कर्वे यांनी कोणत्या गोष्टींचा जाणीवपूर्वक त्याग केला?

(अ) दागिने व आधुनिक कपडे (ब) कुंकू व मंगळसूत्र

(क) इंग्रजी व संस्कृत भाषेचा (ड) पुस्तकलेखन व संशोधन.

३. डॉ. इरावती कर्वे यांनी कोणत्या विद्यापीठात कुलसचिव पदाची जबाबदारी पार पाडली?

(अ) एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई (ब) पुणे विद्यापीठ

(क) नागपूर विद्यापीठ (ड) जवाहरलाल नेहरू, विद्यापीठ.

४. ब्रिटनमधील "Emsly Hormiman Scholarship" ही प्रतिष्ठेची शिष्यवृत्ती मिळविणारी पहिली भारतीय स्त्री कोण?

(अ) इंदिरा गांधी (ब) डॉ. इरावती कर्वे

(क) गेल ओमवेट (ड) शांताबाई शेळके.

५. "Kinship Organization in India" हा ग्रंथ कोणी लिहिला?

(अ) डॉ. इरावती कर्वे (ब) सावित्रीबाई फुले

(क) मेधा पाटकर (ड) पंडिता रमाबाई.

६. डॉ. इरावती कर्वे यांच्या महाभारतावरील कोणत्या ग्रंथाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला?

(अ) युगांत (ब) हिंदू (क) स्वामी (ड) मृत्युंजय.

७. डॉ. इरावती कर्वे यांच्या मते, कोणते आप्तसंबंध हे सर्व भारतभर अत्यंत दृढ स्वरूपात असलेले दिसतात?

(अ) आई व मुलगा (ब) दीर-भावजय

(क) मेहुणा-मेहुणी (ड) वरील एकही नाही.

८. डॉ. इरावती कर्वे यांच्या मते, जाती व्यवस्थेमध्ये कोणता घटक बहिर्विवाही म्हणून ओळखला जातो?

(अ) संस्कृती (ब) धर्म

(क) गोत्र (ड) वरीलपैकी एकही नाही.

९. डॉ. इरावती कर्वे यांचा हिंदू समाजाचा अन्वयार्थ कोणत्या दृष्टिकोनावर आधारित आहे?

(अ) प्राच्यविद्यात्मक (ब) आधुनिक (क) धार्मिक (ड) अलौकिक.

१०. मानवशास्त्रातील प्रख्यात 'विदुषी' म्हणून कोणाचा उल्लेख केला जातो?

(अ) सावित्रीबाई फुले (ब) डॉ. इरावती कर्वे

(क) रमाबाई रानडे (ड) लक्ष्मीबाई टिळक.

## ४.३ सारांश

इरावती कर्वे ह्या एक मानवशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ आहेत. इतिहासवेत्त्याही आहेत. तसेच मानवाच्या जडणघडणीबाबत कुतुहल असणारी एक व्यक्ती आहे. मानवी जीवनावरील प्रेम, आस्था यातूनच त्या व्यक्ती, कुटुंब, प्रदेश व लोक यांच्या अभ्यासाकडे वळल्या आहेत.

(१) हिंदूंची समाजरचना, (२) हिंदू सोसायटी : ॲन इंटरप्रिटेशन, (३) किनशिप ऑर्गनायझेशन इन इंडिया, (५) महाराष्ट्र : लँड अँड इट्स पीपल, (६) महाराष्ट्र : एक अभ्यास असे सर्व प्रकारचे विविधांगी ग्रंथलेखन म्हणजे त्यांच्या संशोधन कौशल्याचा आविष्कार आहे.

इरावती कर्वे हिंदूंचा अभ्यास करतात, तो एक धर्मपंथ म्हणून नव्हे तर एक मानवसमूह म्हणून.

भारतातील नातेदादीचा अभ्यास इरावती कर्वे यांनी केला तो हिंदू हा मानव समूह कशा रितीने संघटित झाला आहे, हे जाणून घेण्यासाठी.

महाराष्ट्राचा अभ्यास करताना इरावतीबाईनी आपले तर्क, संकल्पनात्मक चिंतन बाजूला ठेवून वस्तुस्थितीच्या छाननीतून पुढे येणाऱ्या निष्कर्षावर भर दिला.

## ४.४ पारिभाषिक संज्ञा

१. **आप्तसंबंध व्यवस्था :** नातीगोती प्रथा.

२. **महाभारत :** संयुक्त पितृसत्ताक कुटुंबाची कथा.

३. **सगोत्र विवाह :** एकाच कुलात विवाहास मनाई.

४. **प्राच्यविद्या :** सांस्कृतिक, प्रतिमानाची प्रक्रिया.

५. **अंतर्विवाहाचा नियम :** वांशिक शुद्धतेसाठी जाती-धर्मामध्येच विवाह.

६. **सर्वाभूती परमेश्वर :** परमेश्वर एकच आहे असे तत्त्वज्ञान.

७. **महाराष्ट्रातील विदूषी :** आंतरराष्ट्रीय किर्तीची महाराष्ट्रातील बुद्धिमान स्त्री.

## ४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. = (ड) डॉ. इरावती कर्वे.

२. = (ब) कुंकू व मंगळसूत्र.

३. = (अ) एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई.

४. = (ब) डॉ. इरावती कर्वे.

५. = (अ) डॉ. इरावती कर्वे.

६. = (अ) युगांत.

७. = (अ) आई व मुलगा, (ब) दीर-भावजय, (क) मेहुणा-मेहुणी.

८. = (क) गोत्र.

९. = (अ) प्राच्यविद्यात्मक.

१०. = (ब) डॉ. इरावती कर्वे.

## ४.६ सरावासाठी प्रश्न

१. डॉ. इरावती कर्वे यांच्या आप्तसंबंध संकल्पनेचे विश्लेषण करा.

२. आप्तसंबंध परिभाषेची चर्चा डॉ. इरावती कर्वे यांनी कशी केली आहे ते स्पष्ट करा.

३. जातिव्यवस्थेची मांडणी डॉ. इरावती कर्वे यांनी कशी केली आहे त्याचे विवेचन करा.

४. 'हिंदू समाज : एक अन्वयार्थ' यातील डॉ. इरावती कर्वे यांनी मांडलेल्या महत्त्वाच्या मुद्यांचे स्पष्टीकरण करा.

५. जातिच्या उत्पत्तीचा डॉ. इरावती कर्वे यांनी मांडलेला सिध्दांत सविस्तर स्पष्ट करा.

६. महाराष्ट्र प्रदेशाविषयीची डॉ. इरावती कर्वे यांनी मांडलेली ठळक वैशिष्ट्ये विशद करा.

७. ‘महाराष्ट्र : लँड अँड इटस् पीपल’ या ग्रंथातील डॉ. इरावती कर्वे यांच्या विवेचनाचे मूल्यमापन करा.

८. समग्र स्वरूपात डॉ. इरावती कर्वे एक समाजशास्त्रज्ञ व मानवशास्त्रज्ञ म्हणून त्यांच्या योगदानाचा आढावा घ्या.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **डॉ. इरावती कर्वे,** *‘मराठी लोकांची संस्कृती’.*

२. **डॉ. इरावती कर्वे,** *‘आमची संस्कृती’..*

३. **डॉ. इरावती कर्वे,** *‘युगान्त’.*

४. **डॉ. इरावती कर्वे,** *‘हिंदू समाज : एक अन्वयार्थ’.*

५. **डॉ. इरावती कर्वे,** *‘महाराष्ट्र : एक अभ्यास’.*

६. **Dr. Irawati Karve,** *'Kinship orginization in India.'*

७. **Dr. Irawati Karve,** *'Group Relations in Village Community.'*


❑❑❑